म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. १४८०

# व्यासपर्व

- दुर्गा भागवत

REFBK-0012345

निबंध निबंध
१४८० ३०.११.६३.

# व्यासपर्व

१४८० निबंध

# व्यासपर्व

दुर्गा भागवत

क्र. १२३४४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३५६०८ वि: निबंध
क्रमांक ......१४८०...... नों: दि: 30/11/83

REFBK-0012345

मौज प्रकाशन गृह
मुंबई ४

मौज प्रकाशन : ७५

पहिली आवृत्ति : नोव्हेंबर १९६२

© १९६२, दुर्गा भागवत

**किंमत ३ रुपये ५० नये पैसे**

मुखपृष्ठावरील चित्र :
संभाजी कदम

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

# अनुक्रम

प्रस्तावना ... १

पूर्णपुरुष कृष्ण ... २१
मोहरींतली ठिणगी ... २८
कोंडलेलें क्षितिज ... ३५
व्यक्तिरेखा हरवलेला माणूस ... ४५
एकाकी ... ५६
परीकथेंतून वास्तवाकडे ... ७१
मुक्त पथिक ... ८५
अश्रु हरवल्यावर ... १००
माणसांत विरलेला माणूस ... १११
कामिनी ... ११९

परिशिष्ट ... १३४

# प्रस्तावना

महाभारताचा आधार भारतीय मनाला केवढा आहे, हें का सांगायला हवें ?

पण या आधाराची वाट मात्र एकेकाची वेगळी असते. निदान असावी. पण होतें काय ? बहुतेकांना महाभारत ही कौरवपांडवकथेची खूपच पाल्हाळाने सांगितलेली, विस्कळित व संकीर्ण अशी नीतिकथा वाटते. गोष्ट म्हणून शुद्ध कथेचा लळा दाखवणें अनेकांना प्रतिष्ठेच्या पोटीं आवडत नाही. ज्यांना ललित-वाङ्मयाचा शोक त्यांना त्यांतल्या अललित अशा विस्तीर्ण भागांमुळे कथा म्हणून महाभारत स्वीकारणें परवडत नाही. ललितवाङ्मयाचा घाट व काव्याचा सहजमधुर भाव संस्कृत काव्याच्या कालिदासी शोकिनांना इथे सापडणें दुरापास्त आहे. आणि दुर्दैवाने कालिदासी अभिरुचि हीच आमच्या पुरातन संस्कृत काव्य-वाङ्मयाची पारख करण्याची एकमेव मोजपट्टी ठरून गेल्यामुळे लालित्याच्या निकषाने—अभिजात सौंदर्यग्राहकतेच्या, कलात्मकतेच्या व वाङ्मयीन मूल्याच्या निकषाने—महाभारतासारख्या अगडबंब, ओबडधोबड, उघड-उघड अनेक हातांनी रचलेल्या, अनेक कालखंडांत विभागलेल्या कृतीचा आस्वाद तर राहोच परंतु साधा परामर्शहि घेणें साहित्याच्या व्यवहारी टीकेच्या चौकटींत बसण्यासारखें नव्हतें. म्हणूनच हें काव्यसमीक्षेचें प्रतिकूल अंग डावलून, अन्य यशोदायी धोरणांनी महाभारताचा अर्थ धोरणी तत्त्वज्ञानी पंडितांनी व राजकारणपटूंनी स्वतःच्या आवडीच्या जीवनक्षेत्राच्या समर्थनासाठी विविध प्रकारें लावला. त्यामुळे इतर अनेक क्षेत्रें उजळलीं. विचारांचें क्षितिज रुंदावलें. संस्कृतीच्या कक्षा वाढल्या. परंतु त्यांतले काव्यमय भाव मात्र झाकळून गेले.

महाभारत हें अनेकांना भगवद्गीतेचें कोंदण वाटतें आणि या समजांत अतिशयोक्ति आहे असेंहि नव्हे. कारण महाभारत हें त्याच्या नांवामुळेच भारतीय राष्ट्रीय तत्त्वज्ञानाचें प्रतीक गेल्या दीडशे वर्षांत भारतीय युयुत्सु राष्ट्रवादामुळे आपाततः बनलें. भगवद्गीता हातीं धरून फाशीचें मरण मदनलाल धिंग्राप्रमाणे अनेकांनी आनंदाने स्वीकारलें हेंहि खरेंच. भगवद्गीतेंत उपनिषदांचें नवनीत गोपालनंदनाने भरलें. शंकराचार्यांनी गीतेचें प्रथम उद्गान केलें. गीता तेव्हापासून जणु वेदांताचें मुखच बनली. ज्ञानेश्वरांनाहि गीतेंतच स्वतःचें स्फूर्तिक्षेत्र व जीवनसूत्र सापडलें. त्यानंतर कुणीं गीतेंत ज्ञानयोग पाहिला, कुणीं कर्मयोग तर कुणीं अनासक्तियोग पाहिला. कुणाला भक्तियोग तिच्यांत आढळला. गीता सर्व प्रकारच्या कर्मानुसंधानी त्याप्रमाणे विरक्त योगानुसंधानी आधुनिकांची दैवी माताच बनली. गीतेंत 'दैवी संगीत' श्रवणारेहि निघाले. एकूण काय ? जसजसा यंत्रयुगाचा वेग व ताण वाढला, तसतसा गीतेचा लौकिकहि वाढत गेला. तिची गरज वाढल्याने तिच्या तेजांत भर पडली. कारण युद्धोद्ध्वस्त जगांत अमर श्रद्धास्थानें शोधण्यासाठी ज्ञानवंतांची तडफड गेलीं पन्नास वर्षें जशी चालू आहे तशी पूर्वी कधी झालेली नव्हती. मानवतेच्या पायाखालची वाळू घसरत चालली आहे आणि विनाशाचे काळलोट समृद्धीच्या क्षणींहि सारी संस्कृति पार गिळून टाकायला उठले आहेत, अशी परिस्थिति एकाच पुराणकथेच्या प्रसंगाशीं तुळतां येते—भारतीय युद्धाच्या. म्हणूनच श्रांत व भ्रांत मानवाला हरघडीच्या लहानमोठ्या आपत्ति-विपत्तींत अचूक मार्गदर्शन करणारा गीता हा श्रेष्ठ धर्मग्रंथ आहे असें वाटणें अस्वाभाविक नाही. असा हा ग्रंथ महाभारतांत आहे म्हणूनच महाभारताची महती कायम राहिली आणि त्यांतल्या कौरवपांडवांच्या कथेचें, इतर उपकथांच्या संभारासहित, उन्नयन झालें.

महाभारताचा सूक्ष्म अभ्यासहि देशोदेशीं थोडका झालेला नाही. महाभारताच्या कर्त्याने त्याला इतिहास म्हटलें आहे. म्हणून प्राचीन इतिहासाच्या साऱ्या शाखांचा वेध अभ्यासकांनी त्याच्यांतून घेतला. राजकीय इतिहास, धर्मशास्त्राचा इतिहास, तत्त्वज्ञानाचा इतिहास, सामाजिक इतिहास, भौगोलिक इतिहास, वांशिक इतिहास, भाषिक इतिहास, चरित्रेतिहास—अशा सर्व तऱ्हेच्या इतिहासांच्या फांद्या, विद्वानांनी या पुराण ग्रंथाच्या वृक्षावरून मन

मानेल तशा तोडून घेतल्या आणि आपली शाखा हेंच काय तें एक महाभारताचें सार अशा श्रद्धेने त्या त्या विषयाचा प्रपंच केला. महाभारताचा विषयवारीने परामर्श घेतल्यास यांत कांही वावगें नाही; आणि त्याचा अवाढव्य आकार आणि विलक्षण गुंतागुंतीची गुंफण पाहतां, एकेका विषयाचा उलगडा वेगवेगळ्या व्यक्तींकरवी, वेगवेगळ्या काळीं, वेगवेगळ्या धोरणांनी होऊन गेला हें बरेंच झालें. तरी पण महाभारताच्या सुबक सामग्र्याचें दर्शन हें त्याच्या अंतरंगाच्या पृथक्करणाचें पहिलें व अखेरचें उद्दिष्ट आहे यांत शंका नाही. आणि त्याचा प्रत्यय या अभ्यासांत नेमका येतोच असें नाही. महाभारताच्या एका अंगाचें दर्शन हें त्याच्यांतल्या सामर्थ्यपूर्ण व सौंदर्यशाली गाभ्याचें संपूर्ण दर्शन नव्हे. वर उल्लेखिलेल्या विविध अंगांत महाभारताच्या सामर्थ्याची निःसंशय प्रचीति येते. त्यांतल्या यौगिक भूमिकेचाहि प्रत्यय येतो. ज्ञानाचें वैदग्ध्य सहज भासतें. मानवी व्यवहाराची जटिलता जाणवते. दैवगतीची वक्रता मनाला थरकवते. कथेचा ओघ प्रबळ आहे हें पटतें. पात्रांचें परिमाण विलक्षण विशाल आहे याचें भान प्रारंभापासून अखेरपर्यंत क्षणभरहि ढळत नाही. हाच महाभारताच्या सामर्थ्याचा निर्वाळा. परंतु महाभारताचें सौंदर्य त्याच्या या उत्तुंग बलावेगांतच केवळ नाही. या स्थूल सामर्थ्याहूनहि एक अति सूक्ष्म, अभेद्य असा कोमलतेचा कंद, काव्यच्छंदाच्या अनुरोधाने, कथेच्या लालित्याच्या अनुषंगाने, महाभारताच्या कठीण कवचाच्या अंतर्यामांत भरून राहिला आहे. भव्य दगडी कोरीव मूर्तीच्या तोंडावर जी कोवळ्या मानवी भावाची छटा दिसते, तीच कोवळी छटा महाभारताच्या नाट्यपूर्ण, अतिविशाल कथेच्या अंगप्रत्यंगांत भरून राहिली आहे, याचा साक्षात्कार झाला तरच महाभारताच्या कलाकृतीचें भान येण्याचा संभव. नाहीतर अभ्यासकाला भरपूर ओलाकोरडा चारा पुरवणारें एक अनुपम कुरण, एवढेंच त्याचें औपयोगिक मूल्य ठरतें. मग तें मूल्य व्यावहारिक ज्ञानासाठी असो, तत्त्वनिष्कर्षासाठी असो, नीतीच्या पुरस्कारासाठी असो, किंवा आध्यात्मिक गरजेसाठी असो.

त्यांतल्या त्यांत मौज अशी की केव्हा ना केव्हा तरी भारतीय संस्कृतीचा अभ्यासक या गहन क्षेत्रांत शिरतोच. नद्या समुद्राला मिळायच्याच, त्याप्रमाणे सामाजिक शास्त्राच्या शाखा ऐतिहासिक प्रवासांत वळणें घेत, धडपडत, दौडत, महाभारताला येऊन मिळतातच. महाभारताला डावलून सामाजिक

आशयाचें सम्यक् स्वरूप ओळखणें अगर विशद करून सांगणें जमण्यासारखें नाही. इतरांप्रमाणे मीहि या गहन प्रांतांत शिरलें. शिरावेंच लागलें. इतरांना काय अनुभव आले तें कांही मला माहीत नाही. पण मला मात्र कोंडल्यासारखें झालें. या गहन विद्यारण्यांत आपण वाट चुकलों असें वाटलें. मी भरपूर भोवंडलें. या ग्रंथाच्या कीर्तीच्या दडपणानेच अर्धमेली व्हायची मी. कोणता तरी जुनाट संदर्भ देण्यासाठी, स्वतःच्या विधानाला बळकटी यावी, वजन यावें म्हणून, व्यासाच्या नांवाचा, त्याच्या कृतीचा केवळ उपयुक्ततेच्या धोरणाने वापर करण्यासाठी मीं महाभारताला प्रथम स्पर्श केला. महाभारत वापरतांना, त्याचा तो पुराण गंध, त्याचें तें जुनाटपणाचें अवजड ओझें, भाषेचें तें अवडंबर, हें सारें पेलणें माझ्या शक्तीबाहेरचें काम होतें. केवळ स्वतःच्या विधानाला पुष्टिकारक असा संदर्भ तेवढा मला हवा असे. लहानपणापासून पांडवकथा ऐकिवांत असल्यामुळे कथेचे धागेदोरे उगीचच संदर्भशोधनांत अडथळा निर्माण करताहेत असें वाटायचें. पण हे अडथळे आहेत म्हणून तर महाभारतांतल्या उल्लेखांचें, पुराव्यांचें महत्त्व, अशीहि अभ्यासकी परंपरेंतली धारणा मनोमनीं जागृत असल्यामुळे, वेळींअवेळीं, हवे असोत की नको असोत, संदर्भ हुडकण्याचा छंद मीं स्वतःला अट्टाहासाने लावून घेतला. पण हा छंद कांही झालें तरी उपराच होता. घामाघूम होऊन संदर्भ हुडकावा आणि मग सुटकेचा एक निःश्वास टाकून पुस्तक बंद करावें. 'मीं महाभारत चाळलें' याचीच धुंदी कांही काळ चढावी आणि मग स्वाभाविकच संदर्भ शोधण्याचे श्रम केवळ कोरडे असल्याने मानसिक ग्लानीहि यावी. हा कोरडा आटापिटा करण्याचें प्रयोजन काय, असाहि प्रश्न मनांत सारखा येई. पण त्याला व्यावहारिक जुजबी उत्तरहि चतुर मन देई. "भल्या भल्या पढिकांनी हें केलें. तेंच तूं कर. त्यावाचून सुटका नाही." आणि मग महाजनांच्या वाटेने निमूटपणें जाण्याचें मीं ठरवलें. अशा तऱ्हेने एकदा गरज मिटली की पुस्तक बंद करावें तें फिरून गरज लागेपर्यंत उघडूं नये असें चाललें. पण गरजाच वाढूं लागल्या आणि त्यामुळे हा ग्रंथ कांही केल्या हातावेगळाच होईना अशी स्थिति झाली. व्यावहारिक गरजा आता अधिक व्यवस्थितपणें भागत होत्या. नवे बारकावे आढळांत येऊं लागले होते. अभ्यासाचें फळ हातींतोंडीं आलें होतें. पण नेमका हा फलसिद्धीचा काळच माझ्या मनांत

असमाधानाचा आणि अश्रद्धेचा डोंब उसळवणारा ठरला. नकळत महाभारतांतल्या आख्यानांतल्या कांही भागांनी मला अस्वस्थ केलें. ग्रंथाचें समाजशास्त्रीय प्रयोजन मला शंभर टक्के आकलन झालें होतें. पण दमल्या-श्रमल्यावर माणूस गोष्टींत रंगूं पाहतेंच. श्रमपरिहारासाठी कथा आपोआपच जवळ केली जाते. या अशा विश्रांतीच्या, काव्यशास्त्रविनोदाच्या गरजेपोटीं जेव्हा मी कथानकाकडे वळलें, तेव्हा केवळ ठाम गोष्ट पोरसवद्या वृत्तीने मी हुडकूं लागलें. त्या वेळीं हवी होती सुटसुटीत चढउतारांची रंजक कथा. मूळची माहीत असलेलीच. पण ती आता वडिलधाऱ्यांच्या तोंडून ऐकायची नव्हती. बाळबोध पुस्तकांतून वाचायची नव्हती. व्यासमुखानेच ऐकायची होती. आणि ती ऐकतांना अपेक्षा मात्र अशी होती की आपण या कथेची जी मनोमन उभारणी केली आहे, ती त्याच घाटांत, त्याच अभिनिवेशांत व्यासाकडून सांगितली जावी. वाचतांना या अपेक्षेचा चक्काचूर झाला, हें का सांगायला हवें ?

भीष्म शरपंजरीं पडला हें कथेच्या व भीष्म या पात्राच्या दृष्टीने ठीकच होतें. पण मग त्याचें मरण रेंगाळत ठेवून शांतिपर्वांतल्या त्या भाकड कथा त्याच्या तोंडीं कां घातल्या गेल्या ? मोक्षधर्माचें, राजधर्माचें भारूड तिथे कां रचलें ? बरें, रचलें तर रचलें. गणराज्याची निंदा, स्त्रियांची नालस्ती त्याच्या तोंडीं कां घातली ? गणराज्याला निंदणारा भीष्म व गणराज्याच्या आदर्शाप्रमाणे संघरचना करणारा गौतमबुद्ध यांच्यापैकी कुणाची धारणा अधिक उन्नत ? युद्धाचा क्षण ठेपलेला आणि तिथेच गीता सांगायचा उमाळा कृष्णाला कां आला ? अर्जुन त्याचा सखा. मग त्याच्या मनाचे विविध संमोह त्याला अगोदर कळलेच नाहीत का ? अगदी आताच अठरा अध्यायांत जें त्याने सांगितलें तें घरीं स्वस्थ बसून त्याला वेळोवेळीं सांगतां नसतें आलें ? कारस्थानें आणि पांडवांचा पक्षपात याहून कृष्णाचें प्रयोजन या ग्रंथांत काय ? असे विविध प्रश्न माझ्यापुढे उभे राहिले. आणि त्यांच्या मागे एकच तक्रार उभी राहिली की, कथेच्या सूत्राला या दूरान्वयी भागांनी शिथिल केलें आहे. कथानकाची गति रोखली आहे. आंतल्या भावनांचा जोष कुंठित केला आहे. मग मनांत असा प्रश्न उपस्थित झाला की, या साऱ्या अतिरिक्त सामाजिक व तात्त्विक साहित्याच्या अनुषंगाने मूळच्या तोकड्या, स्खलित कथेची प्रतिष्ठा वाढवली आहे की जें कथानक एरवी सुश्लिष्ट व वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण झालें

असतें त्याचा विचका या अवांतर पसाऱ्यामुळे झाला आहे? कथानकाच्या अनुषंगाने जेव्हा या प्रश्नांचे भोवरे माझ्या मनांत गरगरूं लागले, तेव्हा कथानकाचाहि सारा तळ ढुसळला गेला. फेस व चिखल एक झाला. मूळची सरळ कथा, जी बाळपणापासून मनांत ठसली होती, तिचा तो भावनिक नितळपणा निघून गेला. एक प्रकारचा गढूळ काळोख, कथेच्या प्रसंगाप्रसंगाला, व्यक्तीव्यक्तीला जडबोजड करून सर्वत्र भरून राहिला. परंपराश्रुत व्यक्तिरेखांचा आकार या धुरकटलेल्या काळोखांत बुडून गेला. अंधारांत डोळे फाडून पाहावें, त्याप्रमाणे मी मग कथानकाच्या आकृतिबंधाऐवजी व्यक्तिरेखांच्या आधारें लालित्याचा कानोसा घ्यायला गेलें. तर काय? प्रसंगाच्या अनुषंगाने व्यक्तिदर्शन घडलें तें असें : प्रत्येक व्यक्ति आपली ठाम आपल्या साच्यांत रुतून बसवलेली. धातूच्या रसाची ओतीव पुतळी असावी तशी. खुल्या वातावरणांत वावरणाऱ्या जिवंत व्यक्तींऐवजी या रेखीव काष्ठपुतळ्या व्यासाने अति चपळाईने भव्य पटावर नाचवल्या आहेत असें वाटलें. कारण त्या त्या पात्राचें स्वरूप प्रथम व्यासाने गृहीत धरलें आणि त्याप्रमाणे प्रसंगांची गुंफण करून, तो तो व्यक्तिविशेष कोरून कायम करून टाकला. भीष्म कायमचा अविवाहित व अधिकारत्यागाची प्रतिज्ञा घेतलेला. प्रतिज्ञापूर्तीचा कैफ भोगण्यासाठीच जणु स्वतःच्या इच्छेची प्रतिष्ठाहि तो सतत वाढती ठेवतो. शरशय्येवरचें अनुपम इच्छामरण पत्करतो. द्रौपदी स्वतःच्या रूपाभिमानाने भरलेली. एकदा घेतलेला त्रागा ती अखेरपर्यंत सोडीत नाही. भीम कौरवांवर जळायचें सोडीत नाही. अर्जुन लढायचें सोडीत नाही. युधिष्ठिर चिंतन करायचें सोडीत नाही. विदुर दुसऱ्यांत स्वतःला पाहण्याचें सोडीत नाही. दुर्योधन द्वेष सोडीत नाही. कर्ण पीळ सोडीत नाही. कुंती खंत सोडीत नाही. कृष्ण निर्घृण व्यावहारिक पटुता सोडीत नाही. कुणीच आपलें कांहीच टाकायला तयार नाही. हट्टी मूल हट्टाचें गाठोडें पोटाशीं आवळतें, त्याप्रमाणे कोमल भावांशीं सर्वथा विरोधी असलेला आपापला रोकडा देहस्वभाव सांडायला जर इथे कुणीच तयार नाही, तर मग या साऱ्या पात्रांना तारायला एकच उपाय व्यासापुढे होता. तो म्हणजे नीति, तत्त्वबोध, विविध तऱ्हेचें ज्ञान कथेंत वेळोवेळीं घालून जीं मूल्यें समाजांत प्रतिष्ठा पावलेलीं आहेत, त्यांच्या आधारें कथेची प्रतिष्ठा राखणें. आणि मग त्या नैतिक मूल्यांचें, ज्ञानाविष्काराचें जरा बारकाईने निरीक्षण

करण्यास मीं सुरुवात केली. आदिपर्व विविध कथानकांनी भरलेलें. त्यांतल्या त्यांत उपकथानकांची सुंदर सजावट अशी मोहक की तिच्यांत कौरवपांडवांचें कथानक अगदीच फिकें वाटावें असें. पुरूरव्याची कथा, गरुडाची कथा, ययातीची कथा, शकुंतलेची कथा, भीष्मजन्माची कथा—या साऱ्याच कथा संपूर्ण व रोमहर्षक. या रोमहर्षणाची भूल पाडून तर व्यासाने आपल्याला चकवलें नाही, असें म्हणतच मीं सभापर्वात प्रवेश केला. राजकारण, कारस्थानें, मुत्सद्दीपण, द्यूत या साऱ्यांच्या कठोर परिणामांनी भरलेलें हें पर्व आहे. वनपर्वहि सावित्री, धर्मव्याध, वगैरेसारख्या परमसुंदर आख्यानांनी भरलेलें आहे आणि या दूरस्थ कथानकांनी त्यांत भरपूर माधुर्य ओतलें आहे यांत शंका नाही. तसें कांहीच सभापर्वात नाही. भांडणें, वादविवाद, उलटसुलट पवित्रे, समारंभ आणि राजकारणी महत्त्वाकांक्षेचें विदारक क्रूर स्वरूप असा स्थूल मानाने प्रपंच यांत येतो. तरी पण यांतल्या दोन ओळी वाचतांना कांही तरी गवसल्याचा भास होऊन मी थबकलें. ओळी साध्याच. कोणताच उत्कट भाव आंत नसलेल्या. पांडवांघरून निघतांना कृष्ण सुभद्रेचा निरोप घेतो आहे, असा प्रसंग. ओळी अशा :

**सार्थं तथ्यं हितं वाक्यं प्रियं युक्तमनुत्तरम् ।**
**उवाच भगवान् भद्रां सुभद्रां भद्रभाषिणीम् ॥**

यांतल्या प्रासापेक्षा ठेक्याने मला चाळवलें. त्या ओळी नकळत पाठ झाल्या. मनांत घुमूं लागल्या आणि मग मनाला एकच छंद लागला. कृष्णमुखांतून उमटलेल्या नादपूर्ण शब्दांचा वेध घेण्याचा. अर्थपूर्ण, कल्याणकारक, उचित, प्रिय आणि ज्याच्यावर कांही उत्तरच देतां येणार नाही असें प्रिय भाषण कृष्ण बोलला. सुभद्रा मंजुभाषिणी होती. तिच्याशीं बोलण्यांत कृष्णाने भाषणसौष्ठवाची शीग गाठली. मग जेव्हा आणखीच उत्कट प्रसंग असेल, तेव्हा त्याचा आवाज अधिकच श्रवणीय होत असेल. गीता त्याने याच पवित्र्यांत सांगितली. आणि मग गीतेच्या त्या प्रवचनांत मला तऱ्हेतऱ्हेच्या सुश्राव्य नादांचीं आवर्तनें आढळूं लागलीं. गीतेसारखी श्रवणसुभगता क्वचितच कुठे आढळेल. अपवाद वैदिक ऋचांचाच. इथून व्यासाच्या शैलीचें सौभाग्य प्रतीत होऊं लागलें आणि कृष्णवाणीचे झंकार अधिक स्पष्ट झाले.

तरी पण अवाचनीय होतें तें वाचनीय झालें, रुक्ष होतें तें सरस झालें, याहून अधिक जवळीक निर्माण झाली नव्हती. पण मग एक दिवस निराळाच उगवला. सभापर्वच अजूनहि चालू होतें. राजसूय यज्ञ, मयसभा यांच्या झगझगाटाची तिरीप अजून मनावर रेंगाळत होती. द्यूतानंतर पांडवांचें सारें तेज मावळलें होतें. ते दास झाले होते व रजस्वला द्रौपदीचा आक्रोश चालू होता. त्या विटंबनेच्या प्रसंगीं, सर्व कला, सर्व धर्म ज्या सत्याला सदैव धुंडाळीत असतात व त्या धुंडाळण्यापायीच सत्त्वशाली बनतात, त्या सत्याच्या मानवी मूलाधारालाच द्रौपदीने आवेगाच्या भरांत, अनवधानाने हात घातला. तो श्लोक शत-नादांनी माझ्या मनांत निनादला. अगदी साधी त्याची रचना. प्रासाचें अवगुंठन नाही. उपमा-उत्प्रेक्षांची सजावट नाही. पण बुद्धिमान, ज्ञानवंत, धर्मज्ञ यांच्या अनुभवाचें सारसर्वस्व त्यांत भरलेलें. सत्याची व्याख्या असलेला, निर्वाणीच्या तीव्र सुरांत उच्चारलेला श्लोक:

**न सा सभा यत्र न सन्ति वृद्धाः**
**न ते वृद्धाः ये न वदन्ति धर्मम् ।**
**नासौ धर्मो यत्र च नास्ति सत्यं**
**न तत्सत्यं यच्छलेनानुविद्धम् ॥**

सुगम काव्यांनी होणार नाही इतकें वृत्तींचें आंदोलन मीं त्या क्षणीं अनुभवलें. एक भावनातीत भावानुभव मीं घेतला. त्याचें स्वरूप नक्की कसें होतें तें मला अजूनहि सांगतां येणार नाही. पण महाभारताच्या कर्त्याच्या प्रतिभेचा साक्षात्कार या चार ओळींनी मला खचित करून दिला. बद्ध वातावरण खुललें व नवे किरण नवे भाव जागवीत आले. मग मला द्रौपदी वेगळी दिसूं लागली. कृष्ण वेगळा दिसूं लागला. या दोघांवर लक्ष केंद्रित केल्यावर नेहमीच्या ठराविक कथेच्या चाकोरीची चौकट तशीच राहिली, तरीहि या पात्रांचें परिमाण, त्यांचे आकार, आणि समग्र कथेंतलें त्यांचें प्रयोजन मला वेगळ्या संदर्भांत दिसूं लागलें. मग व्यक्तीमागून व्यक्ति उठली, सजीव झाली आणि स्वतःच्या तोलामोलाने चालूं लागली. त्यांच्या संभाषणांचे तुकडे मी कान लावून ऐकूं लागलें. आणि नाट्येंच नाट्यें मला प्रसंगोप्रसंगीं भरलेलीं आढळलीं. घाट कवितेचा, ताल छंदाचा पण आत्मा नाट्याचा अशी

ही समग्र कृति मला भासूं लागली. कथेंत उपकथा असणाऱ्या कृतीला पारिभाषिक तंत्राप्रमाणे परिमंडलकथा असें नांव आहे. बृहत्कथा, आरबी सुरस कथा याच वर्गांत मोडतात. बृहत्कथेने आपल्यापुढे महाभारताचाच आदर्श ठेवला होता. परंतु तरीहि बृहत्कथेला महाभारताच्या अंतरंगाची अनुकृति वठवतां आली नाही. मोठ्या कथेंत छोट्या असंख्य कथा एवढीच स्थूल गुंफण तिने उचलली. छंदोबद्धता उचलली. परंतु महाभारताचें अंतरंग ज्या रुचिर नाट्याकृतींनी भरलें आहे, त्यांचा वेध गुणाढ्याला घेतां आला नाही. मोठ्या नाट्यबंधांत छोटे नाट्यप्रसंग व्यासाने खचून भरले आहेत आणि त्यामुळेच त्याच्या कृतीला जबरदस्त भरीवपणा आला आहे. हें नाट्य त्याने अशा तऱ्हेने भरलें आहे की त्याला तांत्रिक पाया मुळींच नाही. संभाषणें आणि द्रुत कृति यांच्यांतूनच नाट्यभाव प्रकट होतो. अर्थात् अशी कृति अनुकरणसुलभ नसते. आणि म्हणूनच रामायणावर जितकी सुलभ नाट्यरचना उत्तरकालीं झाली, तितकी महाभारतावर झाली नाही.

प्रवृत्ति व निवृत्ति यांच्यांतल्या समतोलांत व्यासाची नाट्याची धारणा निपजली आहे. नाट्यांतलीं नाट्यें महाभारतांतच पाहावीं, इतकीं दृश्यें विविध छटांत, विविध रंगांत, विविध नादांत, कधी वर्णनांत, तर कधी संभाषणांत, तर कधी नुसत्या सूचनेंतच व्यासाने सढळपणें पेरून ठेवलीं आहेत. तीं अशीं कांही मागचापुढचा विचार न केल्यासारखीं, जागा दिसेल तिथे त्याने फेकून दिलीं आहेत की, एक तर पावलोपावलीं त्यांचें रूप दिसावें व क्षणभर पाहणाराने थबकावें, किंवा या बारीकसारीक रांगोळीकडे पाहायला सवड नसल्यामुळे वाचकाने हे कंटाळवाणे भाग सोडून देऊन ठळक प्रसंगांकडेच अवधान द्यावें.

व्यासाचें अनुपम नाट्यावधान ज्या तऱ्हेने प्रकट झालें आहे, ती तऱ्हाहि फार नाजुक आहे. सूक्ष्म व तरल आहे. अति थोड्या शब्दांत, कधी सूत्रबद्ध पद्धतीनेहि हें नाट्य प्रकटतें. भाषा, भावना, रंग, रस यांची ही विलक्षण काटकसर आणि तरीहि त्यांच्या गुंफणींतून भव्य भावानुभवाचा आविष्कार करण्याची कला महाभारतांत विपुल प्रमाणांत आढळते. अशा प्रसंगीं नकळत त्या त्या पात्राचा स्थूल व्यक्तिगत भाव कलत्या व विरोधी सुरावर जरासा टेकू घेऊन मग पुन्हा स्थिर होतो. उदाहरण विदुराचेंच घेऊं. प्रसंग द्रौपदी-

स्वयंवरानंतर पांडव फिरून सपत्नीक इंद्रप्रस्थाला येतात त्या वेळचा. यापूर्वी लाक्षागृहांत पांडव जळून मेल्याची वार्ता हस्तिनापुरांत पसरलेली होती. आंधळ्या धृतराष्ट्रालाहि अजूनपर्यंत तसेंच वाटत होतें. एकीकडे लाज व दुसरीकडून वेड्या वत्सलतेपायी त्याला या वार्तेने सुख वाटत होतें. पण भूमिका राजाची असल्यामुळे तो कर्तेपणाची भूमिका गंभीरपणें, वरवर उदासपणें वठवीत होता. पांडवांनी द्रौपदीला जिंकली ही बातमी त्याला ते येण्याच्या वेळीं विदुराकडून कळली. पण ती साधेसुधेपणाने नव्हे. चेष्टेच्या रूपाने, थोडें वाकडें वळण घेऊन ती वार्ता धृतराष्ट्रावर येऊन आदळली. एरवी नेहमीच्या शांत, दांत, भ्रातृवत्सल, सेवक विदुराने नेहमीच्या सरावाप्रमाणे 'पांडव जळले असें वाटलें तें खोटें. ते लाक्षागृहांतून निसटले व ब्राह्मणवेषाने द्रुपदाच्या स्वयंवरमंडपांत गेले. अर्जुनाने पण जिंकला व कुंतीच्या आदेशाप्रमाणे ती पांच पांडवांची भार्या झाली,' असें सरळ निवेदन केलें नाहीं. विदुराच्या मनांत लाक्षागृहाची अमानुषता झणाणत होती. दुर्योधनाची फजिती झाली याचा त्याला फार आनंद झालेला होता. तीव्र कटुता व हा एक प्रकारचा आसुरी आनंद यांचा आवेग दान्त विदुरालाहि एकदम आवरतां आलेला नाही. एवढेंच नव्हे, तर आयुष्यांत प्रथमच धृतराष्ट्राच्या अपंगपणाचा फायदा घेऊन त्याच्या मुलाच्या कृतीबद्दल त्याला टोचून मजा पाहण्याचें क्षणिक व हीन सुख विदुर अति सामान्य पातळीवर येऊन घेतो. असा हा प्रसंग व्यासाने उभा केला आहे, तो असा :

द्रौपदीने पांडवांना वरलें आणि धृतराष्ट्राचे मुलगे फजीत होऊन गर्व उतरून परतले असें कळतांच विदुर मनांत खूष होऊन गेला व राजा धृतराष्ट्राला म्हणाला, 'कुरूंची भरभराट होवो.' हें ऐकून विस्मित झालेला धृतराष्ट्र मोठ्या आनंदाच्या भरांत म्हणाला, 'उत्तम झालें, उत्तम झालें.' त्याला वाटलें की दुर्योधनालाच द्रुपदकन्येने वरलें. त्या आंधळ्याला खरी गोष्ट माहीतच नव्हती. मग त्याने द्रौपदीसाठी पुष्कळ भूषणें आणलीं. आणि तो म्हणाला, 'कृष्णेला आणि मुलगा दुर्योधन याला आणावा.' इतकें झाल्यावर विदुराने सांगितलें की, द्रौपदीने पांडवांना वरलें असून ते कुशल आहेत व द्रुपदाने त्या वीरपुरुषांची यथोचित संभावना केली आहे. त्यावर धृतराष्ट्र उद्गारतो, 'ते पांडूचे मुलगे, पण त्याच्यापेक्षाहि ते माझेच मुलगे जास्त आहेत.'

एवढाच हा प्रसंग. पण त्यांत किती खोचा आहेत. कौरवांना भीमासारख्यांच्या असंख्य वाक्ताडनांनी साधलें नसतें तें सारें शल्य कटुतम होऊन विदुरमुखाने बाहेर पडतें. विदुरावर क्षणभर पडलेल्या या छायेच्या अनुरोधाने व्यासाने नाट्यांतली कलानिष्पत्ति साधली आहे. पांडवांची सिद्धि, लाक्षागृहांतला त्यांच्यावरचा अन्याय यांच्यावरचा केवळ उतारा म्हणून त्याने हा प्रसंग वापरलेला नाही. ना यांत कौरवांची डागणीच केवळ साधली. पांडवांवरच्या पुढच्या दुर्धर प्रसंगाची नांदीच हा प्रसंग आहे. त्यामुळे कौरवांना टोचून बोलण्याचें कर्म पांडवांकडून न करवतां तें विदुराकडून अशा सौम्य व गर्भित पद्धतीने घडविण्यांत मोठें औचित्य आहे.

अशी धृतराष्ट्राची एका क्षणांत उलटसुलट भावनांच्या आहारीं जाऊन तारांबळ झाली. 'पांडव पांडूपेक्षाहि मला प्रिय आहेत,' असें म्हणून हा प्रसंग घाईघाईने गुंडाळण्याचें तंत्रहि परिणामकारक आहे. भीरु मनाच्या वृत्तिचांचल्याचें नाट्य या प्रसंगांत आहे. हें नाट्य विदारक असलें तरी त्याचा परिणाम धृतराष्ट्राच्याबद्दल घृणा उत्पन्न करण्यांत होत नाही, तर धृतराष्ट्र, त्याचे मुलगे व पांडव या साऱ्यांबद्दल एक प्रकारची करुणाच उत्पन्न होते. धृतराष्ट्र हा स्वतः खल म्हणून प्रतीत न होतां वत्सल पित्याचें दुर्धर नशीब भोगणारा माणूस म्हणूनच प्रतीत होतो. एक प्रकारें विदुराच्या पदरीं एवढासा कां होईना पण दोषाचा भाग दाखवण्यांत व्यासाने सत्त्व-रज-तमाच्या कसोटींत त्यालाहि घासून काढायला सोडलें नाही. या त्रिगुणात्मक स्वभावरचनेच्या असाधारण भानामुळेच व्यासाला महाभारताच्या अगणित व्यक्तिरेखा क्षणाक्षणाच्या कृतींच्या आलेखानुसार कोरतां आल्या. जिवंत करतां आल्या. हाडामांसाने भरलेल्या मनस्वी व्यक्ति म्हणून दाखवतां आल्या. यामुळेच खलत्व एका व्यक्तींत कोंडून ठेवून खोटे किंवा मानीव मानवी आदर्श निर्माण करण्याचा खटाटोप त्याला करावा लागला नाही. त्रिगुणाची जाणीव बौद्ध तत्त्वज्ञानांत नसल्याने बौद्ध वाङ्मयांत बुद्ध हा केवळ मांगल्याचें, कल्याणाचें प्रतीक, तर मार हा अकल्याणाचें, पापाचें प्रतीक म्हणून स्वाभाविकच तयार झाले. बायबलमध्ये सैतान आला. परंतु व्यास मात्र, मानव कितीहि विकसनशील असला तरी अंतर्गत संघर्ष त्याला अटळ आहे हेंच मुख्यतः या लहानमोठ्या स्खलनांतून पदोपदीं दाखवीत गेला. या अनंत स्खलनांच्या परिपाकालाच त्याने 'दैव' म्हटलें. आणि त्या दैवाच्या

विराट लीलेंत मानवी जीवनाचे धागेदोरे कसे गुंफले गेले आहेत हें पावलो-पावलीं कर्मगतीच्या तत्त्वज्ञानाच्या आधारें दाखवलें. कर्ण, दुर्योधन, विदुर, युधिष्ठिर, अर्जुन या साऱ्यांच्या तोंडून—किंबहुना 'प्रकृति तुला करायला भाग पाडील' अशा उद्गारांतून कृष्णाच्याहि तोंडून—दैव अटळ आहे, हें महाभारतांत ठिकठिकाणीं वदवलें आहे. या दैवासंबंधीच्या उल्लेखांत, व कर्मपरिपाकाच्या अनुषंगाने ज्या अति दुर्धर घटना महाभारतांत आलेल्या आहेत त्यांत, जीवनांतलें दुःखतत्त्व उत्कटतेने प्रतीत होतें यांत संशय नाही. संसाराची दुर्धरता असारतेच्या सीमेपर्यंतहि कांही ठिकाणीं पोचली आहे. पापाहूनहि संसारांतलें दुःख दुर्धर आहे असें महाभारतांतल्या शोकपूर्ण विविध कहाण्यांनी नाट्यपूर्ण भावाने ठिकठिकाणीं विशद केलें आहे. महाभारतांत शोकात्म भावाची जी लय आहे ती असाधारण आहे. भारतीय महाकाव्याच्या धारणेप्रमाणे स्थूलमानाने पाहिल्यास ललितकृति आनंदपर्यवसायी असायला हवी; परंतु महाभारताने पांडवांच्या स्वर्गमनाने विराम गाठला आहे. अर्थात् सुखपर्यवसानाचा संकेत नाटकाला अधिक कसोशीने लावला गेल्यामुळे महाभारत (व रामायणहि) त्या स्थूल नियमापासून जरा बाजूला सरलें, तर विस्मय वाटण्याचें कारण नाही. आणि तसें पाहिलें तर महाभारताचा कर्ता व पारंपरिक वाचक त्याला 'ललितकृति' म्हणून संबोधीत नाहीतच मुळी; तेव्हा ज्या माझ्या-सारख्यांना ती ललितकृति वाटते, त्यांनाच हा प्रश्न जाचतो.

महाभारतांत शोकात्मतेचें जें भान आहे, तें अनन्यसाधारण आहे. संस्कृत वाङ्मयांत तर तें जरा उणेंच आहे. भवभूतीसारख्यांनी 'एको रसः करुण एव' म्हणून जरी जीव पिळवटून सांगितलें तरी संस्कृत वाङ्मयांत वेणीसंहारासारखें एखादें नाटक सोडल्यास शृंगाराच्या अभिरुचीवर करुणाला क्वचितच कुठे मात करतां आली; करुणाचें सर्व छटांसह, सर्व आकृतिबंधांसह, सर्व कल्पनाबंधांसह जीवनाच्या कलेकलेला स्पर्शणारें दिग्दर्शन जर कुठे झालें असेल तर तें फक्त महाभारतांत. महाभारत दैवतकथेंतून स्फुरलें आहे. कृष्णाच्या रूपाने मानवरूप परमात्म्याचें दर्शन त्यांत घडवलें आहे, आणि दैवतकथेचें प्रतीक अशा तऱ्हेने कायम राखलें आहे. दैवतकथेला अनुरूप अशीं अतिविशाल परिमाणें आंतील पात्रांना देण्यांत आलीं आहेत. आणि म्हणूनच तीं पात्रें आपल्यापैकी असूनहि आपल्या जीवनांत तीं सामावत नाहींत. मानवतेचीं ओझीं, मानवतेचीं

सुखदुःखें, विचारविकार पेलून तडीपार, अगदी अनंताच्या कवेपर्यंत पोचविण्याचें दैवतकथेंतल्या पात्रांचें कार्य हीं पात्रेंहि सहज करतात आणि त्या कृतीला व कृतीमागच्या प्रेरणेला 'दैवगति' असें नांव देतात. जीवजंतु, मानव यांना घेऊन राहणाऱ्या विशाल नियतीचें भान महाभारतांत सतत जागृत असल्यामुळे आणि कर्माच्या तत्त्वज्ञानाची जोड त्याला असल्यामुळे अतिविशाल असें क्षेत्र कर्त्याला योजणें भाग पडलें. जीवनमृत्यूचें विराट व सूक्ष्म स्वरूप आणि दोहोंतला चेव आणि परस्परपूरकता हीं अंतर्गत विरोधासह दाखविण्यास रणभूमीसारखें अनुरूप क्षेत्र आणखी कुठलें असणार? 'जय' या कल्पनेंतच सारे संघर्ष, सारीं साफल्यें व वैफल्यें येतात. पौरुष येतें. कर्ममयता येते. वेग येतो. आवेश येतो. ग्लानि येते. तत्त्वज्ञान येतें. सौंदर्य येतें, कुरूपता येते. उदारता येते व कार्पण्य येतें. सर्व भूतमात्रांना कवटाळून धरणारें कारुण्य येतें व भयंकर द्वेषहि येतो. उपरोध येतो. 'हा हा हा हा' असे रोदनाचे निनाद येतात. क्वचित् कामुकतेचे शिडकावे येतात. 'पुढे काय?' ही मूढताहि येते. 'पूर्वी काय होतें?' ही खंत येते. आणि प्राप्त क्षणाला कवटाळून राहण्याची जिद्दहि येते. हें सारें महाभारताच्या बीजाकृतींतच साठवलेलें सारतत्त्व एका विराट कृतींत, ललित कृतींत, प्रकट व्हावें ही असाधारण सिद्धि आहे.

परंतु शोकक्रंदन, क्रौर्य, वीर्य, धैर्य यांच्या अर्कानें रंगवलेल्या या पात्रा-पात्रांच्या आकृति जणु अक्षयतेच्या वरदानाने स्थिर झाल्या आहेत. व्यासाच्या प्रतिभेची ही दुःखोन्मेषाची शक्ति ग्रीक शोकांतिकेच्या कर्त्यांच्या धारणेपेक्षा किती तरी उन्नत, विशाल आणि दूरगामी आहे. ग्रीक दुःखांतिकांत पात्रांचीं परिमाणें विशाल आहेत, भूमि विस्तृत आहे, उदात्ततेचा उत्कृष्ट परिपाक आहे, सौंदर्याचें जागृत भान आहे, लसलसत्या शृंगाराचें वैभव आहे, ऐहिक जीवनाची परमासक्ति आहे; परंतु लहानथोरांच्या लहानमोठ्या दुःखांत भरलेलें नाट्य व्यासप्रतिभेने जसें मानवी स्वभावाच्या सूक्ष्म आकलनाच्या बळावर पेलून धरलें तसें होमरलाहि करतां आलें नाही. ग्रीक महाकाव्यांत देवतांचा प्रकोप, प्रेम, मत्सर यांनीच मानवाच्या कृतीचें क्षेत्र संकुचित केलें आहे. ग्रीकांची दैवाची कल्पना व महाभारतकाराची दैवाची कल्पना यांत फरक इथेच येतो. जिथे कर्माचें तत्त्वज्ञान आलें तिथे कर्ममयतेला शेवटीं मर्यादा पडली तरीहि तिचें क्षेत्र किती तरी विशाल व गहन

होतें. एवढेंच नाही तर कर्मांच्या पलीकडचें अज्ञाताचें भानदेखील मानवाच्या आत्म्याला येऊं शकतें, ही श्रद्धा सर्व नैराश्याला, सर्व भीरुतेला व साशंकतेला दूर सारते आणि मग त्या अज्ञात सत्याच्या प्रतीक्षेची तीव्र, उन्मनस्क उत्कंठा सर्व व्यवहारांना, भौतिक व्यापारांना व भावनांना, त्यांचा साचा जराहि बदलूं न देतां, नव्याच आशयाने भरून टाकते. आणि म्हणूनच 'तमसो मा ज्योतिर्गमय' या औपनिषदिक वचनाचा काव्यमय व प्रत्यक्ष प्रत्ययहि आपल्याला महाभारतांतून येऊं शकतो. एवढेंच नाही तर पांडवांच्या मृत्यूनंतर, युधिष्ठिर स्वर्गसंमुख झाल्यावर, युद्धाचा सारा भीषण परिपाक आपण विसरतों, कृष्णाला विसरतों, गीताहि विसरतों; त्या स्वर्गाच्या दाराच्या फटींतून नियति जो एक किरण टाकते, त्या किरणाला अनुसरून मात्र आपण अनवधानाने असें सहज म्हणून जातों:

**तेजोऽसि मयि तेजो धेहि।**

आणि म्हणूनच ग्रीक शोकांतिका वाचल्यावर मानवी जीवनाचें सुंदर शिल्प हेकेखोर दैवाने क्षुद्र मानून विध्वंसून टाकल्याचें जें वैफल्य भासत राहतें त्याचा अंशहि महाभारतांत सापडत नाही.

व्यासाच्या धर्मावगुंठित कलेचा विशेष हाच की ती लेण्यांतल्या शिल्पाप्रमाणे ज्याला जसें बघण्याची इच्छा असेल, ज्याची जशी पात्रता असेल, तसें त्याला अनुकूल असें आंतरिक विश्व प्रेक्षकांत, वाचकांत वा श्रोत्यांत खुलें करते. व्यासाची प्रतिभा क्रांतदर्शी आहे ती याच अर्थाने की ती क्षुद्र, संकुचित, सव्यंग, पापपूरित, कुरूप व्यक्ति व घटना यांनाहि सरळ आत्मसात् करते. केवळ नीति, सौंदर्य, भव्यताच तिला प्रिय आहे असें नाही. हा समभाव केवळ स्वतःच्या निर्मितीकडे अति अलिप्त व अति जागरूक दृष्टीने पाहणाऱ्या प्रतिभावंतालाच साध्य असतो. विश्वरूपदर्शन हें या व्यापाराचें प्रतीक समजायला हरकत नाही. नियतीचा खेळ हें महाभारताच्या कथेचें महत्त्वाचें सूत्र असलें तरी, आणि त्यांत नियतीचें विराट व क्रूर स्वरूप प्रतीत होत असलें तरीहि, एक सत्य सतत भासमान होत राहतें. मानवाची भौतिक नियति इतर जीवसृष्टीप्रमाणेच आहे; परंतु मानवाचें आत्मिक जीवन हें सर्व भौतिक आविष्कारापलीकडील चिन्मय शक्तीशीं निगडित आहे : हें सत्य महाभारतांतील दैववादाच्या बुडाशीं आहे.

मात्र हें सत्य सूचित करतांना, स्थलकालातीताच्या सीमाप्रांतापर्यंत पोचतांना, व्यासाला सद्यःक्षणावरच लक्ष केंद्रित करावें लागलें हें विशेष व तितकेंच स्वाभाविकहि आहे. यासाठीच युद्धाची घटना ही अत्यंत अनुकूल कथावस्तु होती. बौद्ध वाङ्मयांतहि बुद्धाला शांति मिळवण्यासाठी मारसेनेशीं मुकाबला करण्याचा प्रसंग आला. तसेंच हें युद्धाचें प्रतीक प्रत्यक्ष कथेच्या रूपानें व्यासाने वापरलें आहे. मात्र मारसेनेचें व महाभारतांतील संग्रामाचें उद्दिष्ट भिन्न होतें हेंहि विसरून चालणार नाही. मारसेनेचें प्रयोजन सर्वस्वी आध्यात्मिक आहे. बुद्धाचें कल्याणमय मंगलप्रद शुभ स्वरूप पापाच्या, मोहाच्या, क्रौर्याच्या रूपाहून सर्वस्वी भिन्न असतें हें दाखवण्यासाठी माराची निर्मिति आहे. परंतु भारतीय युद्ध हा कथेचा गाभा बनवतांना आध्यात्मिक मूल्यांहून कथात्मक मूल्यच अधिक महत्त्वाचें आहे असें व्यासाला प्रतीत झालें असल्याचे दाखले युद्धाच्या त्याच्या सम्यक् दर्शनांत सापडतात आणि कथेंत व पात्रांच्या स्वभावांत युद्धाचा अर्क त्याने अतिशय अभिज्ञतेने भरलेला ठायीं ठायीं आढळतो. व्यासाला अभिप्रेत असलेली करुणा, शोक हीं वाल्मीकीच्या करुणेच्या व शोकाच्या अनुभूतीहून भिन्न आहेत. मूळ मानवी स्वभावाहून भिन्न असें आदर्शांचें अस्तित्व व्यासप्रतिभेला मान्य नाही. म्हणूनच आपल्या कथेसाठी तिने अगदी बारीकसारीक क्रिया, हेतु व त्यांच्यावरचे बरेवाईट अभिप्राय संजयाकरवी वेळोवेळीं वदवून युद्धाचा उपयोग करून घेतला. युद्धांत माणसाचें काळ्यांत काळें व गोमट्यांत गोमटें स्वरूप प्रकट होतें. युद्धांत माणूस क्रूर होतो. उतावळा होतो. बावरा होतो. मागचें एकदम आठवतो व विसरतो. विचित्र स्वप्नें पाहतो. जन्ममृत्यूंना समोरासमोर बघतो. भोगलोलुप होतो. उन्मत्त होतो. गर्विष्ठ होतो. नम्र होतो. विरक्त होतो. कृपण होतो. उदार होतो. किंबहुना जीवनाची क्षणभंगुरता व साफल्य कांही मोजक्या क्षणांत तो मर्मज्ञपणें जाणतो. भूत व भविष्य तो बुद्ध्याच बाजूला सारतो आणि प्राप्त-कालाचें अभिनव दर्शन घेतो. प्राप्तकालाचें, आजचें महत्त्व योद्धा जसें जाणतो, तसें कोण जाणूं शकणार ? आणि अशा एकाच नव्हे तर अगणित योद्ध्यांचें निःपक्षपाती दर्शन रसराज शृंगाराला वगळून कथेच्या तंत्रामंत्रांत आणण्याची कलाचातुरी व्यासाशिवाय अन्य कोण दाखवूं शकणार ? क्षोभाच्या पटावर शांतीचे मंद, निळे रंग भरण्याची हातोटी कुणाला साध्य झाली आहे ? युद्धाचा

प्रसंग थोड्या दिवसांचा असला तरी परिणाम रेंगाळणारे असतात आणि त्याचा मनावर उठणारा ओरखडा किती तरी दीर्घ व खोल असा असतो. ही दीर्घता व गूढता पेलण्यासाठीच जणु कांही व्यासाने आपली कृति इतकीं प्रदीर्घ व्याख्यानें, आख्यानें, कथा-उपकथा, इत्यादि विविध कल्पनाबंधांनी भरून काढली असावी. स्वतःच्या कृतीला कथा न म्हणतां इतिहास म्हणून इतिहासांतल्या साऱ्या घटनांचीं जंत्रीसारखीं कंटाळवाणीं वर्णनें तंत्रासाठी ओतप्रोत वापरूनहि व्यासाने आपल्या कथेचा गाभा सतत टवटवीत राखला कसा, याचेंच आश्चर्य वाटतें.

व्यासाला कथेचें, आता जिला कादंबरी म्हणतां येईल अशा महाकथेचें, आकलन कसें झालें होतें तें आता फिरून सांगण्याची जरूर नाही. मात्र त्या आकलनामुळेच त्याची कलाप्रवणता अधिकच मोलाची ठरते. डी. एच्. लॉरेन्स म्हणतो की, कादंबरीकार हा संत, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि कवि यांच्याहून श्रेष्ठ असतो. कारण बाकीच्या सर्वांना जीवनाच्या एकेका अंगाचेंच दर्शन झालेलें असतें. परंतु कादंबरीकार मात्र समग्र जीवनाचा वेध घेऊं शकतो. कादंबरीमुळे जिवंत माणूस अथांग थरथरतो. "म्हणूनच कादंबरी हें जीवनाचें पुस्तक आहे. बायबल ही एक अपूर्व कादंबरी आहे. ती कादंबरी गुंतागुंतीची आहे व श्रेष्ठ आहे. आदाम, ईव्ह, जेकब, डेव्हिड, जॉब, रूथ, एस्थर, येशू, हीं सारीं जिवंत माणसेंच आहेत नाही तर काय? बायबलांतला ईश्वर हाहि जिवंत माणूसच नाही का?"

लॉरेन्सचें हें विधान व्यासकृतीलाहि यथार्थपणें लागू पडतें असें मला वाटतें आणि म्हणूनच गुणाढ्याने अमर कृति निर्माण करतांना महाभारताचें अनुकरण केलें. बृहत्कथा म्हणजेच कादंबरी. गुंतागुंतीची, विराट कादंबरी. गुणाढ्याने महाकथेचें तंत्र आत्मसात् केलें. परंतु अध्यात्मांतून व्यासाला स्फुरलेली कलाप्रज्ञा मात्र त्याला अवगत झाली नाही हें खचित. व्यासाच्या कृतींत अकृत्रिम जीवनच कला बनलें आणि जीवनाच्या अंतिम उद्दिष्टाचें भान कुठेहि विलुप्त झालें नाही. जीवनाच्या सर्व अवस्थांना व्यासाच्या अनुभवाने समरूप बनवलें. या समरूपतेच्या जाणिवेंतच व्यासाने दैवाच्या कल्पनेचा जो वापर केला त्याचें बीज दडलेलें आहे. जीवनाचें अंतिम उद्दिष्ट समरूपतेच्या साधनामार्फत चित्रित करतांना व्यासाला थोराचें थोरपण दाखवायचें होतें; पण तें दाखवतांना त्याला दाखवायचें होतें की थोरांचें मोठेपण सत्तेत नसतें,

तर जीवनाच्या अथांग प्रवाहांत, वादळें आलीं तरीहि त्यांत अनंताचें दर्शन घेण्यांत असतें.

व्यासाने ज्या जीवनाचें दर्शन घडवलें आहे, त्या जीवनाचा अर्थ असा : जीवन ही एक सतत चाललेली आत्म्याची गतिमानता आहे; ही गतिमानता अपरिहार्य आहे, कारण तिच्यांत विलक्षण सामर्थ्य व चैतन्य भरलेलें आहे. हें चैतन्य एकाच बीजांत जणु सामावलेलें आहे. आणि या व्यक्तिरूप केंद्रांतून तें सर्वतः क्रियेच्या द्वारा प्रसृत होत असतें. परंतु वस्तुतः त्याचा रोख एकाच ध्येयाकडे असतो. तें ध्येय म्हणजे संपूर्ण एकात्मता साधणें. आंतरिक प्रेरणा व बाह्यविश्व यांतली एकतानता साधणें. जीवनामध्ये हें समतोलाचें तत्त्व अभिप्रेत असल्यामुळेच जीवन खऱ्या अर्थाने कधीच उद्ध्वस्त होत नाही. तें सारखें परिवर्तन पावतें. जन्मोजन्मांत परिपूर्ण जीवन साकारतें. भारतीय दर्शनाप्रमाणे माणूस कोरा जन्मूंच शकत नाही. सर्व सांडून मरूंहि शकत नाही.

व्यासाने जीवनांतलें गद्य व काव्य दोन्ही अक्षरशः टिपून घेतलें आहे. त्याच्या शैलींतून व निवेदनाच्या विविध पद्धतींतून गद्य व काव्य यांच्या स्पष्ट सीमारेषा आढळतात. वास्तविक समग्र ग्रंथ छंदोबद्ध असला तरी जिथे निवेदन, सरळ कथन आहे, संभाषण आहे, तिथे तिथे गद्याचा प्रभाव जाणवतो. जिथे विरामस्थळें आहेत, तिथे ठेक्यासाठी 'पद्य' हें विशेष परिणामासाठी ध्रुपदासारखें वापरलें आहे. उदाहरणार्थ, वनपर्वांत द्रौपदी युधिष्ठिराला उद्देशून "तूं वनांत गेलेला पाहून चीड कां येऊं नये?" असें म्हणते. त्या वेळीं आपली व आपल्या प्रत्येक पतीची दीन स्थिति वर्णन करतांना ती 'कस्मात् मन्युर्न वर्धते' हा पद्यबंध अनेक वेळां ध्रुपदासारखा वापरते. धृतराष्ट्र व संजय यांच्या संभाषणांतहि ठिकठिकाणीं अशीं पद्यबंधाचीं आवर्तनें अनेकदा आढळतात. विशेषतः ज्या वेळीं धृतराष्ट्र आत्मगत लांबलांब भाषणें करतो त्या वेळीं तर तीं विशेष आढळतात. गद्यपद्याची विभागणी ठराविक परिणाम साधण्यासाठी अशा तऱ्हेने वापरून व्यासाने नादांचें एक वेगळेंच सामर्थ्य प्रकट केलें आहे. युद्धांत भेरी, दुंदुभि, शंख यांचे कर्कश नाद, जयध्वनि, कोल्हेकुई, आक्रंदन, भांडणाचे आवाज, असें तुमुल नादांचें गरगरतें विश्वच त्याने साकारलें आहे. कधी कधी अगदी नाजुकपणें नाद अगदी मंद करून तो काव्याची पेरणी करतो तर कधी कधी तो गाणींहि घालतो. महाभारतांतलें सर्वांत सुंदर गाणें कुंती

नवजात कर्णाला करंडयांत घालून अश्वनदींत सोडते त्या वेळच्या तिच्या उद्गारांचें आहे. शोक, कंप, कोमलता, ताटातूट सारें कांही त्या गाण्यांत नादमय शब्दांच्या आधारें व्यासाने साकारलें आहे. त्यांतल्या कांही ओळी अशा:

शिवास्ते सन्तु पन्थानो मा च ते परिपन्थिनः ।
आगताश्च तथा पुत्र भवन्त्वद्रोहचेतसः ॥
पातु त्वां वरुणो राजा सलिले सलिलेश्वरः ।
अन्तरिक्षेऽन्तरिक्षस्थः पवनः सर्वगस्तथा ॥
धन्यस्ते पुत्र जनको देवो भानुर्विभावसुः ।
यस्त्वां द्रक्ष्यति दिव्येन चक्षुषा वाहिनीगतम् ॥
धन्या सा प्रमदा या त्वां पुत्रत्वे कल्पयिष्यति ।
यस्यास्त्वं तृषितः पुत्र स्तनं पास्यसि देवज ॥
को नु स्वप्नस्तदा दृष्टो या त्वामादित्यवर्चसम् ।
दिव्यवर्मसमायुक्तं दिव्यकुण्डलभूषितम् ॥
पद्मायतविशालाक्षं पद्मताम्रदलोज्ज्वलम् ।
सुललाटं सुकेशान्तं पुत्रत्वे कल्पयिष्यति ॥
धन्या द्रक्ष्यन्ति पुत्र त्वां भूमौ संसर्पमाणकम् ।
अव्यक्तकलवाक्यानि वदन्तं रेणुगुण्ठितम् ॥

या गाण्यांत आईच्या ऐवजी तिचें बाळाला आंदुळण्याचें काम नदी करते आहे. नदीच्या पाण्याचा ललित कलरव आणि वाऱ्याच्या मंद लहरी यांची प्रतीति 'ल', 'व' आणि 'र' या अक्षरांच्या आवर्तनांनी कशी सुंदर पकडली आहे. मातेला आपलें मूल देवज असलें तरी तहानेने व्याकुळ होईल असें वाटून रडें येतें. नदीचें वाहणें हेंच त्या शोकावेगाचें प्रतीक. आपलें धुळींत मळलेलें रांगणारें बाळ तिच्या मनश्चक्षूंपुढे उभें आहे. पण तें प्रत्यक्ष पाहणारीं माणसें मात्र आणखीच कुणी असतील. मात्र हें बाळ इतकें सुंदर व तेजस्वी आहे की, त्याला माया लावणाऱ्या माणसांचा तुटवडा पडणार नाही हेंहि नदीच्या पाण्याची झुळझुळ तिला सांगते.

या बाबतींत महाभारत रामायणाहून भिन्न अशी शैली राखतांना आढळतें. रामायण हें उघड एकसंध काव्य आहे. पद्य आहे. तें गद्याच्या पातळींवर कधीच

उतरत नाही. रामायणाच्या कर्त्याला आपण काव्य करतों आहों हें माहीत होतें. तत्कालीन काव्याचीं सारीं अंगें रामायणांत आलेलीं आहेत. रामायण व महाभारत हीं दोन्ही महाकाव्यें जगांत अजोड ठरावीं अशीं आहेत. ग्रीक महाकाव्यें हीं मृतांच्यावर लिहिलेलीं काव्यें आहेत. त्यांतली संस्कृति जिवंत नाही. परंतु रामायण व महाभारत हीं मृत संस्कृतीचीं प्रतीकें नव्हत. त्यांतलें जीवन जितकें पुरातन तितकेंच नवनूतन आहे. रामायणांत काव्याचे सारे संकेत प्रामाणिकपणें पाळले आहेत. तें सर्गबद्ध आहे. त्याचा नायक उदात्त आहे. त्याच्या चरित्राचें उद्गान त्यांत आहे. महाभारतहि सर्गबद्ध आहे. परंतु त्याला नायक असा कुणीच नाही आणि तरीहि कित्येक व्यक्ति अशा आहेत की त्यांच्याभोवतीच सारें कथाचक्र फिरतें आहे. काव्याच्या संकेतांना एक प्रकारें बाजूला टाकूनच त्याची रचना झाली आहे. म्हणून ती मुक्त कृति आहे. म्हणूनच तिच्यांत गद्य आहे, पद्य आहे, काव्य आहे, नाट्य आहे आणि शुष्क प्रबंधहि आहेत. राम देवावतार आणि देवकार्यासाठी आलेला म्हणून रामायणाचें प्रयोजन धर्मप्रवर्तक ठरतें. परंतु महाभारतांतले पांडव देवांश असले तरी मानवच होते. कृष्णहि माणूसच राहिला; अगदी सदोष असा माणूस तो राहिला. आणि तरीहि महाभारताला धर्माचें स्फुरण कांही दिव्य क्षणांतून मिळालें. इथेच व्यासाला भौतिक व आध्यात्मिक प्रेरणांना एका लयींत पकडण्यांत यश आलें आहे. धर्म व कला या एकमेकांना पूरक नाहीत हें मत हर्बर्ट रीडला झेनचीं कलापूर्ण चित्रें पाहून नुकतेंच सोडून द्यावें लागलें. प्रज्ञा ही धर्मानुसंधानाला त्याप्रमाणेच कलानुसंधानाला आवश्यक असते. आणि जिथे जीवनाचा सामग्र्याने विचार करायचा तिथे ईश्वराला प्रकृतीपासून भिन्न समजतां येत नाही. पौर्वात्य कलेचा—धर्मप्रवण कलेचा—विशेष हाच की, ती एकांत अनेक व अनेकांत एक पाहू शकते, असें रीडने म्हटलें आहे. हीच कलादृष्टि व्यासाने महाभारतांत बाळगली आहे यांत शंका नाही.

व्यासकृति ही उघड एकाची कृति नाही. व्यासाने ‘जय’ लिहिलें, वैशंपायनाने ‘भारत’ व सौतीने ‘महाभारत’ हें सर्वश्रुतच आहे. परंतु व्यासाने ‘जया’च्या रूपाने जो एक आदर्श निर्माण करून जो विशाल पट व परिमाणें तयार केलीं, कलावस्तूचा जो घाट तयार केला त्याची उत्तरोत्तर सांगताच वैशंपायन व सौति यांनी केली. कोरीव लेणें कधी एका हाताने व एका काळीं

होत नाही; पण तरी तें एकात्म असतें. त्याचें मनोमय निर्माण व सुरुवात ज्या क्षणीं होते, ज्याच्याकडून होते, तोच त्याचा कर्ता. वेरूळच्या कैलासलेण्याचा कर्ता जसा एकच, त्याच अर्थाने महाभारताचा कर्ता एकच. इथे व्यक्तीला महत्त्व नाही. तें एकच निर्माणक्षम प्रज्ञा असलेलें मन जितक्या व्यक्तींत, ज्या ज्या काळीं उत्पन्न होऊन मूळ कृतींत भर टाकीत गेलें तें तें मन प्रारंभीच्या मनाहून भिन्न समजतां येणार नाही. स्थल व काल आणि कार्यकारणभाव यांना बाजूला सारून दिव्यपुष्पाप्रमाणे सौंदर्यानुभव घेण्याची ही घटना भारतीय सौंदर्यशास्त्राचें परम भाग्यशाली रहस्य आहे. अभिनवगुप्ताची सौंदर्यानुभवाची व्याख्या व व्याप्ति या बाबतींत सर्वांत मोठें प्रमाण मानायला हवी. रसाच्या सिद्धांतांत 'रस' हाच सौंदर्यानुभव आहे. रस म्हणजेच आनंद. हा आनंद कोणत्याहि अहंभावाशीं निगडित नसतो. शृंगार, भय, क्रोध, दुःख यांची प्रतीति रसात्मक अनुभूतींतून आली की त्या विभावांचा व्यक्तिगत संबंध संपतो आणि ते सर्वसाधारण होतात. हा भट्टनारायणाचा सिद्धांत अभिनवगुप्ताने उचलला. पण तो तेवढ्यावरच थांबला नाही. त्याने तो वाढवून त्याला काल व स्थल यांच्या बंधनांतून मुक्त केलें. "रसो वै सः", "आपो वै रसः", या श्रुतींतल्या रसाच्या जाणिवेशीं काव्यांतल्या निस्यंदाला नेऊन त्याने भिडवलें. काव्यानंद हा ब्रह्मानंदसहोदर असतो, हें दंडी, विश्वनाथ, वगैरे साऱ्यांनीच मानलें आहे. परंतु अभिनवगुप्ताने रसाच्या अनुभवाचें योग्याच्या अनुभवाशीं साम्य जुळवलें आहे. योग्याला ब्रह्मानंद झाला की त्या क्षणीं त्याच्यापुरता 'संसार' नाहीसा होतो. फक्त तो आनंद राहतो. आणखी कांही नाही. त्याप्रमाणेच रसामुळे उत्पन्न झालेला सौंदर्यानुभव घेतांना त्या क्षणापुरता 'संसार' नाहीसा होतो.

इंद्रियगम्य जाणिवांशी निगडित असूनहि त्यांच्याहून भिन्न असें, आत्मवृत्तींना प्रस्फुरित करणारें, सच्चिदानंदाच्या सीमेवर टेकूं पाहणारें, आणि समाधींत सामावणारें असें हें रसतत्त्व आहे. भारतीयांचें हें सौंदर्यानुभवाचें तत्त्व कळल्यास, महाभारतासारखी कृति महान् धर्मग्रंथ व श्रेष्ठ कलाकृतीहि होऊं शकते. किंबहुना एकाच प्रज्ञेच्या स्फुरणांतून धर्मज्ञान व कलानुसंधान या अद्वितीय ग्रंथांत सामावलें आहे, असें म्हणायला कांहीच हरकत उरत नाही.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५५८६ वि: १ नेबंध
नों: दि: ३०।७।१६

१

# पूर्णपुरुष कृष्ण

कृष्णाचें जीवन मला फार मोहवतें. व्यासाच्या प्रतिभेने महाभारत, हरिवंश (व मागाहून भागवत) या ग्रंथांत ज्या भव्य व जिवंत व्यक्तिरेखा भारताच्या मनामनावर कोरून ठेवल्या त्यांत कृष्ण ही सर्वांत मध्यवर्ती आकृति आहे. बाकीच्या सर्व आकृति तिच्या भोवती केवळ फेर धरून, तिच्या आधारानेच जणु उभ्या आहेत. आणि तरीहि महाभारतांतला कृष्ण हा खूप निरखून पाहायचें म्हटल्यास त्याचें अवयवी स्वरूप दृष्टीपुढे नीट येतच नाही. त्याला रेखामय आकार देतां येत नाही. विराट रूपाच्या त्या एका उल्लेखाने रेखामय शरिराची सारी आकृतीच पुसून टाकली आहे, झाकून गेली आहे. ढगांनी सूर्य झाकावा तशी. एक श्यामल, धूसर वातावरण कृष्ण या नांवांतच भरून राहिलें आहे. पण जिथे जिथे कृष्णाच्या आकृतीची रेखा क्षणभर तरी दृग्गोचर होते, कडाकडांनी दृग्गोचर होते, तिथे तिथे मला एक मोठा रंगांचा पुंजका दिसतो. विलक्षण रीतीने त्या रंगांच्या छटा एकमेकींत शिरतांना आणि फिरून अलग होतांना दिसतात. सांध्यमेघांच्या छटांप्रमाणे हे विलक्षण नाचरे, धावरे रंग आहेत. कृष्णाच्या व्यक्तिभासाचें रूप हें मला अक्षरशः सांध्यरंगांप्रमाणे वाटतें. मनाच्या प्रत्येक कणांतून हे रंग उसळून बाहेर पडताहेत असा भास मला अनेकदा झाला आहे.

इतिहासांतल्या, वाङ्मयांतल्या अनेक व्यक्तिरेखा माझ्या मनांतून जिवंत होऊन बाहेर पडतात, तेव्हा नानाविध भास मला होतात. मग त्या व्यक्तिरेखा त्या ग्रंथांचा किंवा इतिहासाचा भाग राहतच नाहीत. कुणा व्यक्तीची आकृति सुंदर रेषांनी

बनलेली असते. कुणाला नुसते डोळे तर कुणाला नुसते काम करणारे अति सुंदर हात असतात; कुणाचे ते डोळे माझा पाठलाग करतात तर ते हात कांही खुणावतात. कुणाचे ओठ बोलूं पाहतात, कुणी सारखें विडंबन करीत असतात. तर बुद्धासारखीं माणसें शिळेसारखीं जड होऊन पुढे बसतात. कुणी साफ पाठ फिरवतात. पण असा एकसंध भास कृष्णाच्या त्या रंगाकृतींत मला होत नाही. त्या रंगाकृतीला एक वास येतो. पण तो कुठल्याच ज्ञात वासासारखा नाही. मात्र तो वास फार उत्तेजक आहे. तीव्र आणि खूप खूप रेंगाळणारा आहे. सृष्टींतल्या साऱ्या नरांच्या प्राणशक्तींतला एकत्र वास आणला आणि तो साऱ्या फुलांच्या गंधांत मिसळला तर येईल तसा. आणि त्या वासाच्या गाभ्यांत स्वराचा एक लसलसता कोंब पण फुटल्याचें मला दिसतें. उंच कोमल निषादाचा धैवतावर किंचित् रेललेला स्वर.

पण विराट स्वरूपाचें भासमय आवरण कधी कधी पटल फाटल्यासारखें बाजूला होतें. अनेक पुराणकथांतून, भाबड्या श्रद्धेतून, आणि स्त्रियांच्या नसांतून जो निनावी अनुभव स्फुरलेला असतो, तो सारा एकत्र होतो आणि त्यांतून एक ऐसपैस पुरुष निघतो. तो आदमच्या जवळचा आहे; शरिराने आणि वासनांनी. पण आदमहून किती तरी दैवी देणें याच्याजवळ आहे. आदमला संस्कृति नव्हती. याच्याजवळ ती परिपूर्ण आहे. सुखाचे मळे याच्या भोवती फुलले आहेत. आदम बिचारा बागेंतून—ही बाग आहे याची जाणीव होण्यापूर्वीच —बाहेर पडला आणि वणावणा हिंडला. इंद्रियांच्या फणांचे फटकारे खात हिंडला. पण हा मात्र पौरुषाची, मानव्याची सारी रग पचवून, आणि मरणाच्या, विरहाच्या सर्व कळांना हळुवार स्पर्शीत जगला. स्पर्शाचें सारें लालित्य, सारा नखरा, त्याच्यांत भरलेला होता. व्यासाने निर्मिलेल्या रंगांच्या झळकींतून हें दुसऱ्या पातळींतलें पुरुषरूप अधिक मनोज्ञ व रेखीव होऊन निघतें. साक्षात्काराच्या किमयेंतून मुक्त होतें. पार्थिव जीवनाच्या आधाराने चालूं हलूं लागतें.

कृष्णचरित्र एकाच एका ग्रंथांत कोंडून पडलेलें नाही. अनेक ग्रंथांनी, काव्यांनी, नरनारींच्या जीवनांनी तिळ तिळ देऊन तें बनवलें आहे. अजूनहि जीवनाच्या सर्व बाजूंना स्पर्शणारें व्यक्तीव्यक्तीच्या सुखदुःखाचें स्पंदन स्वतः भोगून त्यांना सजीव व कृतार्थ करीत कृष्ण जगतो आहे. कारण, कृष्ण हा मानव आहे. नुसता मानव नाही, तर पुरुष आहे. पूर्णपुरुष आहे.

कृष्णाचा जन्म मृत्यूच्या अटीतटींत, भीतीच्या भोवऱ्यांत, आशेच्या अमर आश्वासनांत झाला. रामाचें बाळपण कुणाला आठवत नाही. तें बालकांडांतच बंदिस्त होऊन पडलें. खिस्ताचें आणि बुद्धाचें बाळपण प्रौढपणाने केव्हाच गिळून टाकलें. पण कृष्णाचें बाळपण घरोघरीं खेळतें आहे. स्वतःच्या आई-जवळून नाहीसें होऊन तिला जन्माबरोबरच विरहाचा चटका लावणारें बाळ अनेक आयांच्या अनुभवांत स्थिर झालें आहे. पण त्या बाळाप्रमाणे हें बाळ विराम पावलें नाही. यशोदेच्या पोळलेल्या मनाला त्याने टवटवीत केलें. तें रांगलें, पाळण्यांत खडा टोचला म्हणून रडलें, मुतलें. त्याने हट्ट केला. मार खाल्ला. कोंडून घेतलें. खोड्या करून जिवाशीं गाठ आणली. आईला प्रतिक्षणीं आपल्याला द्वाड आणि गोड मूल आहे, ही जाणीव देतच तें वाढलें.

मग दुसरें पर्व ! गवळी मित्र. ते खेळ. चोऱ्या. बायकांच्या खोड्या. भलत्या वयांत राधेशीं प्रेमचेष्टा. कुस्तींत प्रावीण्य. काय नव्हतें त्या यौवनोन्मुख कृष्णांत ? एकीकडे कंस, शिशुपाल त्याच्यावर वैर राखून होते, तर दुसरीकडे भाबडीं पोरें आणि गोपी त्याच्यासाठी प्राण देण्यास सिद्ध होतीं. मोठा भाऊ दास झाला होता. गायी-गुरें त्याच्या वत्सल स्पर्शाने सुखावत होतीं. पुष्ट होत होतीं. त्यांचें प्रसव वाढत होतें. दुधदुभत्याचे पाट वाहत होते.

त्याची मुरली तारुण्यांतल्या उद्रेकांना आवाहन देत होती. पण त्या संगीताची जरब अशी की, गोपींना फक्त वादकाचेंच वेड लागलें ! फक्त त्याच्या-पुरताच त्यांचा यौवनोन्माद होता. त्याचें सार्वत्रिक स्वैराचारांत परिवर्तन झालें नाही. समुद्राची भरती शिगेस पोचते आणि मग लाटा स्वयंप्रेरणेनेच मागे खेचल्या जातात्; तसेंच हें आकर्षण होतें. कृष्णांतून निघून परत कृष्णाकडे येणारें. अति मृदु आणि म्हणूनच अति दृढ असें हें नातें होतें. या नात्याचें सर्वोत्कृष्ट प्रतीक राधा. परंपरेने, कृष्णाशीं द्रौपदीला बहीण म्हणून जखडून टाकून व्यावहारिक नीतीची प्रतिष्ठा ठेवण्याचा एक तऱ्हेने यशस्वी व दुसऱ्या तऱ्हेने अयशस्वी प्रयत्न केला. पण पुढे राधा आली. तिने हे सारे बांध फोडले. वय, विवाहबंधन, कांही कांही त्या प्रीतीला अडवूंच शकलें नाही. अनिर्बंध आणि नाजुक अशा रेशमी शृंगाराचें हें दर्शन सर्वदा अभिनव वाटावें असेंच आहे.

भारतीय संस्कृति लालित्याने क्वचितच फुलते. पण ती एकदा मात्र घवघवीत

फुलली. राधाकृष्णाच्या प्रीतीचा वसंत एकदाच आला आणि गेला, पण कांही तरी सदा फुलतें, घमघमतें मागे ठेवून गेला. भारतीय पातिव्रत्याच्या कडकडीत-पणाला कायमचें आव्हान देत राधेने एकनिष्ठ प्रीतीचें चांदण्याने रंगलेलें पूर्ण सौंदर्य उघडें केलें. प्रीतीचा लालभडक रंग राधेमुळे सौम्य निळा, रुपेरी झाला. या निळ्या प्रीतीला सामावून घेतांना कृष्णाचें व्यक्तिमत्त्व आकाशा-एवढें विस्तारलें. उंच झालें. रात्रीप्रमाणे अतीव मृदु व गूढ झालें. राधा-कृष्णांच्या प्रीतीमुळे भारतीय प्रेमकथेला नवा कोवळेपणा आला. संसारी भाराने कधी शिळा न होणारा भाव तिला आला. प्रीतीच्या परिपूर्तीला चिरतारुण्य अपेक्षित असतें. तें साधण्यासाठीच या आदर्श प्रेमिकाने जणु राधेच्या विरहाने स्वतःला बांधून घेतलें.

मृत्यूंतल्या अमरत्वाप्रमाणे प्रिय सहवासाच्या कायमच्या अंतरांत प्रेमाचें खरें सार्थक होतें, हें त्याला दाखवायचें होतें का? अशा तऱ्हेच्या चिरविरहांतच प्रेमसाफल्याचें अशरीरी रूप उत्कटपणें प्रतीत होतें हें स्वानुभवाने त्याला सुचवायचें होतें का? राधाकृष्ण एकत्र वास कधी करीतच नाहीत. क्षणाक्षणांतच त्यांचा सहवास भरलेला आहे. हे क्षण फार बोलके आहेत. त्यांचे सगळे बोलके भाव पुराणांनी, काव्य-कथांनी जतन केले. बासरीचें प्रतीक या संजीवक प्रीतीला मिळालें. पण नंतरचा तो कधी न मिटणारा विरह! तो मूक आहे. गूढ आहे. त्याला नाद-रंग-रूपांचीं आभरणें कधी चढणार नाहीत. त्या विरहामागे कलह, उपेक्षा, मृत्यु हेहि संकेत नाहीत. आणि तरीहि हा विरह त्याच्या अनामिकत्वामुळेच अति जिवंत झाला आहे. रामाप्रमाणे कृष्णाने पुढे कधी राधेची आठवण काढून उघड शोक केला नाही. अगदी नाजुक असा हा प्रेमाविष्कार त्याने अगदी ओळखूंहि येणार नाही अशा तऱ्हेने, अंतरांतल्या अगदी तळच्या भागांत, त्याला व्यवहारी संकेतांचा कुठे धक्काहि लागणार नाही अशा तऱ्हेने झाकून ठेवला काय?

राम हा मर्यादापुरुषोत्तम, तर कृष्ण हा प्रत्येक गोष्टींत शीग ओलांडणारा झाला. प्रत्येक गोष्टीला पारंगतता त्याने आणली. अमर्याद सौंदर्य व चैतन्य तिच्यांत ओतलें. वाऱ्याच्या झोताप्रमाणे सोसाट्याचें जीवन तो जगला. बाळपणीं खेळांत त्याचें पटुत्व होतें. जीव ओतून तो खेळला. चोरीलाहि त्याने रमणीयत्व आणलें. विनोदाचें अंग मनमुराद जोपासलें. भारतीय तत्त्वज्ञांना विनोदाचें

वावडें—किंबहुना जगांतील साऱ्याच तत्त्वज्ञांना. अपवाद फक्त एका कनफ्युशियसचा! त्याने, ज्याला विनोदाचें अंग नाही तो संत होत नाही, असें प्रतिपादन केलें. कृष्णाच्या गीतेंत विनोद नाही. ती कृति गंभीर आहे. पण कृष्णाच्या पूर्वजीवनांत खेळकर विनोद खूप आहे. तो नसता तर गीतेचें गांभीर्य उणावलें असतें.

कृष्णाचा पिंड कलासक्त. संगीताचा तो उपासक. पण ही कलासक्तीदेखील त्याच्या प्रीतीप्रमाणे पृथ्वीवरच पाय रोवून प्रथम उभी राहिली. त्याने वीणा घेतली नाही तर बासरी घेतली. तो तुकडा त्याने प्राण भरून मोहरवला. कृष्णाच्या लहरी पाव्याची गोडी अमर आहे. गुराख्याचें साधेंसुधें तें वाद्य, पण कृष्णाने त्याला किती जिवंत केलें. अगदीं प्राकृत, ढोबळ दिसणाऱ्या गोष्टींनाहि चिरंतन कलामूल्य आणावें कृष्णानेच. कलावंताचें उतू जाणारें, स्वतःला होमूं पाहणारें व्यक्तिमत्त्व हें कृष्णाच्या जीवनाचें प्रमुख अंग आहे.

हा उतू जाण्याचा, विसर्जनाचा गुण इतका अनिवार झाला आहे की, कृष्ण स्वतः एका भूमिकेंतून चटकन् दुसरींत जायचा व तिच्याशीं एकदम तन्मय तर व्हायचाच, पण हें करतांना पूर्वभूमिकेशीं संबंधित व्यक्तींनाहि होमून मोकळा व्हायचा. देवकीला मातृपद देऊन तिला त्याने मागे टाकलें. तेंच दैव यशोदा-नंदांना मिळालें. गोपगोपींच्याहि वाट्याला तेंच आलें. बरें, मथुरेच्या प्रजेला तरी कंसवधानंतर तो चिकटून राहिला? मुळींच नाही. मथुरा सोडून तो द्वारकेला गेला. योद्धा म्हणून मिळवलेल्या कीर्तीचें विसर्जन भारतीय युद्धांत हातीं शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा करून त्याने केलें व तत्त्वज्ञाची भूमिका धारण केली. ही भूमिका धारण करतांना त्याने यादवांच्या त्यागाची तयारी केली, ते उन्मत्त झाल्याचें पाहून स्वतःच पुढे यादवांचा नाशहि घडवून आणला.

या अनासक्त योगेश्वराला उचित मरण समाधीचें! पण याहि पारंपरिक भूमिकेचा त्याने त्याग केला. त्याला मरण आलें विजनांत. व्याधाचा बाण लागून. मुलगा, सवंगडी, भाऊ, वादक, प्रियकर, योद्धा, पति, राजा, राजकारणपटु, वक्ता, तत्त्वज्ञ या साऱ्या भूमिकांत अपरंपार रस ओतून कृष्णाने शेवटीं या साऱ्यांची परमावधि साधा माणूस म्हणून मरण पत्करण्यांतच गाठली! ख्रिस्ताने मरतेवेळीं "परमेश्वरा! मीं काय पातक केलें म्हणून तूं मला ही शिक्षा केलीस?"

असे उद्गार काढले. मला ते उद्गार विनम्र माणुसकीला तो पारखा झालेला नाही याचें द्योतक वाटतात. डुकराचें मांस खाल्ल्याने अतिसार झाल्यामुळे गौतम बुद्धाला मरण आलें. यांतहि सामान्य मानवाच्या शरिराची नियति योगांत सिद्धि मिळविलेल्यांच्याहि वाट्यास येते, हेंच आढळून येतें. तीच कथा कृष्णाच्या लीन मरणाची.

कृष्णाच्या गोपींशीं केलेल्या ' व्यभिचारा 'चा मोठा बाऊ केला जातो. कृष्णाने तें जीवन स्वीकारलें तें सामान्य प्राकृत माणूस ज्या तऱ्हेने स्वीकारील त्याच तऱ्हेने स्वीकारलें हें खरें असलें, तरी त्यामागेहि सामान्य माणसाच्या नियतींत मिठाच्या खड्याप्रमाणे विरघळून त्याला आपला गुण देण्याचें त्याचें कसब होतें हेंहि खरें! लहान मुलें, पशु-पाखरें, अशिक्षित, लहान-मोठ्या सुरूप-कुरूप स्त्रिया, साऱ्यांचा स्वीकार त्याने समभावाने केला, त्यांच्यांतला एक म्हणून केला आणि कांही काल जरी त्यांच्यांत तो पूर्ण गुरफटल्यासारखा वाटला तरी जेव्हा त्यांना सोडणें प्राप्त झालें तेव्हा त्याने फिरून त्यांच्याकडे वळून पाहिलें नाही ! पौगंडदशा संपते न संपते तोंच त्याने राधेला सोडलें. मग इतर गोपींकडे वळून पाहणें दूरच ! पुढे त्याने गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. आणि शेवटपर्यंत कुटुंबवत्सलाचा पेशा त्याने राखला तरी स्वतःचा वंश वाढूं दिला नाही. तिथेहि त्याने अपत्यमरणाच्या वेदना मुक्याने सोसल्या आणि त्या अष्टनायिकांच्या पसाऱ्यांतहि तो एकाकीच राहिला !

आसक्ति व विरक्ति यांची परमावधि त्याने कुशलतेने गाठली. मेघासारखा रिता होऊन तो गेला. द्वारका जळाली. पांडवांनाहि राज्याचें सुख असें मिळालेंच नाही. भारतीय युद्धांतलें दुःख त्यांना जन्मभर जाळीतच राहिलें. कृष्णाचें राहिलें काय ? कांही नाही. फक्त जळत्या कापराचा वास. स्वतःचें व्यक्तित्व स्वतःच पुसून टाकण्याचें त्याचें कौशल्य अपूर्व खरें.

पण तरीहि कृष्ण आजच्या जगाच्या विशाल अनुभूतींत सामावेल असें म्हणतां येणार नाही. कृष्ण फिरून आजच्या जगांत फिरतांना पाहावा, तो आला तर जगांत सुख मिळेल, असें मला वाटत नाही. किंबहुना तो त्या जुन्या वाङ्मयाच्या अवगुंठनांत आहे तोंवरच त्याचें चिरंतनत्व कायम राहील. कारण यंत्रयुग आलें आणि कालहि सावध झाला. जास्त शहाणा झाला.

कुणाचींहि एकाकी पावलें पडलीं तर त्यांचा मागोवा घेऊन आपलें चक्र फिरवण्याचा भाबडेपणा त्याच्यांत आता राहिलेला नाही. व्यासाच्या काळीं, लोककथांतल्या कधी नव्हेशा कोण्याएका कल्पित काळीं, कृष्णाचें जीवन विश्वव्यापक झालें; पण आता व्यक्तिजीवनाच्या समग्र कक्षा वाढल्यामुळे कोणताहि एक सर्वांगीण आदर्श पुरुष आताच्या सुसंस्कृत जीवनाला व्यापून दशांगुळें उरण्याइतका मोठा वाटणार नाही. पूर्वीच्या धर्मप्रवर्तकांएवढ्या मोठ्या व्यक्ति केवळ तात्कालिक चळवळ्या जीवनाच्या अग्रभागीं चमकतील एवढेंच. समग्र मानवी जीवनाचें तत्त्वज्ञान सांगण्याचें धाडसहि आता कुणी करणार नाही. कृष्णाचें प्रेम त्याच्या काळीं सुंदर होतें. त्याचें राजकारणपटुत्व आजच्या गणराज्याला पुरेसें नाही. या महामानवाचें जें जें म्हणून होतें तें आजच्या संस्कृतीच्या प्रगल्भपणाला पुरेसें नव्हतें. कृष्ण हा पूर्णपुरुष म्हणूनच प्राकृतहि होता. कृषि संस्कृतीचेंच प्रतीक तो होता यांत संशय नाही. हल्लीच्या यांत्रिक, नागर संस्कृतींत तो राहील तर केवळ साठवणीचा अलंकार म्हणूनच; पौरुष, प्रीति, संगीत व तत्त्वज्ञान यांचें प्रतीक म्हणूनच. कृष्णकथा शतकोशतकें कोट्यवधि मुखांत गाजवून अखेर शहाण्या झालेल्या कालानें कृष्णाचें स्वरूप प्रतीक म्हणूनच स्थिर केलें. महामानवाचीं स्वप्नें अजूनहि भले भले पाहतात; पण यंत्रयुगांत महामानवाचें विसर्जन होतें, उज्जीवन होत नाही. कारण मानवी मनाच्या मूलभूत दुबळेपणाची जाणीवहि आता आम्हांला झाली आहे. महामानवाचें अंतर्मन का आणखी निराळ्या वाणाचें व गुणाचें होणार आहे ? आणि आता असा महामानव प्रत्यक्ष आमच्यांत येण्याची शक्यता नाही, ही जाणीव आहे म्हणूनच आम्ही या पूर्वकालीन थोरपणाच्या आदर्शांना गौरवतों, प्रतीकें म्हणून जोपासतों आणि त्यांच्या-आमच्यांतलें अंतर कमी होणार नाही अशी दक्षता घेतों.

## २

## मोहरींतली ठिणगी

महाभारताची शोकांतिका कशांत आहे? द्रौपदीच्या पुत्रांच्या निधनांत? कर्णाच्या बलिदानांत? कुंतीच्या अविरत वाहत्या दुःखाच्या धारेंत? कौरवांच्या भीषण संहारांत? मला वाटतें, हें सारें दुःख एकत्र केलें तरी ज्ञान-लालसेंतून जन्मलेल्या ज्या अभिमानाने आणि लीनतेने काठोकाठ भरलेल्या ज्या अभिनव अनामिक दुःखाने एकलव्याला पूर्णपणें एकाकी केलें, त्या दुःखाच्या कणाचीहि बरोबरी या थोरांच्या जगन्मान्य दुःखांना यायची नाही. कशी येणार? त्यांच्या प्रत्येकाच्या दुःखांत स्वतःचीहि कांही प्रमादांची भागीदारी होती. स्वतःच्या कर्मांचें भोक्तृत्व होतें. पण एकलव्याचें भोक्तृत्व? त्याचें अखेरपर्यंत वर्णन करायला व्यासाचीहि लेखणी आखडली. मात्र जिथे एकलव्याची कथा संपली, तिथे तो धागा एकदमच गुंडाळून घेऊन त्याला कायमचा विराम—अपुऱ्या अवस्थेंत विराम—देण्याचें जें कसब व्यासाने दाखविलें आहे त्याला तोड नाही. कवीचें मौन हें सर्वांत निर्माणशील असतें असें म्हणतात. त्या दृष्टीने पाहिलें तर आपल्या कृतींत असें निर्मितीचीं बीजें पोटीं साठवणारें मौन एकट्या व्यासानेच धारण केलेलें मला दिसतें. मात्र कधी संदेह येतो की, प्रतिष्ठितपणाच्या गाभ्यालाच आव्हान देणाऱ्या झोंबऱ्या व चावऱ्या सत्यालाच झाकून टाकण्याची 'नरो वा कुंजरो वा' अशी चलाखी तर याच्यामागे नसेल? थोडें सांगितलें व सत्याची एक झलक कायम राखली. वरवर पाहतां एकलव्याची कथा जशी न् तशी आली. पण तिचे साद-पडसाद? कुठे गेले ते? देवयानीच्या प्रेमहानीचा आक्रोश, त्याचे सारे सारे

सूक्ष्म प्रतिध्वनि स्वच्छपणें एकू येतात. दमयंतीची व्यथा, तिचें सुखहि किती कोमलपणें सांगितलें गेलें. सावित्रीच्या पातिव्रत्याची कथा पावित्र्याने ओसंडून गेली. पण एकलव्याची कथा सांगतांना मात्र रोकडा एकसूर आणि अतिसंक्षिप्त वाणी कां वापरली गेली ? इथे कविमन तुडुंब भरून जाण्यासारखें कांहीच नव्हतें ? ओसंडून पुरासारखें वाहून जाण्याइतकें आवेगी सत्य इथें नव्हतेंच काय ?

पण असें तरी कसें म्हणावें ? एकलव्य मौनांत झाकला गेला तरी द्रोण मागे राहिलाच. त्याच्या जीवितसाफल्याच्या विफल कहाणींतच एकलव्याची अनामिक उत्तरकथा पाहायला मिळते. नायक गेल्यावर रंगलेलें खलनायकी नाटक द्रोणकथेचेंच. आणि एकलव्याच्या या उत्तरकथेचें भान जागृत होतें म्हणूनच व्याधगीता, भगवद्गीता, वगैरे अनेक उपदेशपर तत्त्वज्ञानांच्या हिरव्या गाथा ऐसपैस पसरलेल्या दिसताहेत. एकलव्याच्या कथेंतून निघालेलें कुरूप सत्य झाकण्यासाठी किती आटापिटा करून हीं गोंडस तत्त्वज्ञानें सजवावीं लागलीं. एका व्याधपुत्रावरच्या अन्यायावर पांघरूण घालण्यासाठी दुसऱ्या व्याधाकडून संसारी तत्त्वज्ञान किती चांगल्या तऱ्हेने सांगितलें गेलें. भगवद्गीतेंत कुठल्या नीतीचें दिग्दर्शन नाही ? मात्र या दोन्ही तात्त्विक चिंतनांतून एकलव्याच्या हकीकतीला, त्याच्या वेदनेला, कुठेच उत्तर नाही. पहिल्यांत आईबापांच्या सेवेचें मोठें अवडंबर माजवून व्याधाला उंचावलें आहे, तर भगवद्गीतेंत विराट दर्शनाच्या अनुषंगाने लांबचें तेवढें दाखवून आत्म्याच्या अमरत्वाचा गौरव केला आहे आणि जवळचें टाळलें आहे. कदाचित् जर एकलव्याने तक्रार केलीच असती, तर दोन्ही पक्षीं त्याच्या तक्रारीला संमोह हें सुंदर नांव मिळालें असतें. पण स्वतःच विद्या शिकून तरबेज झालेला आणि त्या तरबेजपणापायी अंतीं पोळलेला एकलव्य तक्रार तरी कशाला करतो आहे ? आणि केली तरी ऐकूं कुणाला येणार ? अशा चिरडलेल्यांच्या दुःखाचा आवाज बालसदृश साध्यासुध्या माणसांनाच ऐकूं येतो आणि समजतो. पण त्यांच्या समजण्याला वाचा नसते. आणि व्यासाने कुठे अशांसाठी महाभारत लिहिलें ? थोरांच्या कथा—थोरांनीच ऐकण्यासाठी त्या लिहिलेल्या. थोरांचें चुकतें कधी कधी. पण तें आपलें एवढेंसेंच टिंब असतें; त्यांचींहि चरित्रें माणसांचींच चरित्रें होतीं हें दाखवण्यासाठी हीं विरामचिन्हें असतात. साध्यासुध्या व्यवहाराशीं

बांधून घेतल्यामुळेच सामान्य माणसांतला व त्यांच्यांतला दुवा अढळ राहतो. त्यांच्यामुळे त्यांचें यश गालबोटतें थोडेंच ?

तत्त्वज्ञ, राजकारणी व्यासाचा उघड न्याय हा असला, तरीहि त्याच्यांत लपलेला कलावंत व्यास मोठा खट आहे. किती दाबलें, दटावलें तरी तो ऐकत नाही. बाहेरच्या व्यासाला जें दिसेल तेवढेंच सत्य तो मानीत नाही. सत्यालाहि पापुद्रे असतात. दर पदराचा रंग वेगळा. प्रत्येक रंगाची छटा वेगळी, पोत वेगळें, मूल्य निराळें, हें तो जाणतो आणि बरोबर त्या रंगच्छटेला, त्या पोताला, त्या मूल्याला तो वेचून काढून योग्य तें नांव देतो. त्याला नीट मोजतो, मापतो, आणि मग स्वतःचा कुंचला घेऊन त्या ठळक आकृतीमागे स्वतःला दिसलेली अशी एक रंगाकृति तयार करतो. फिकट, फार फिकट आणि पारदर्शक असते ती. फार निरखलें तर तिच्या रेषाहि हरवतात. पण मुख्य ढोबळ आकृतीकडे पाहिलें तर तिच्या मागे ही आपली सदा उभी असते. कधी तिला साथ देत तर कधी तिचें विडंबन करीत. बरें, नुसती कुलाकृति काढूनच तो थांबतो का ? नाही. कधी तो मूळ आकृतीच्या बाजूला विचित्र आलेख कोरतो. कधी कधी नादांची भिंगरी तो त्या आकृतीभोवती फिरती ठेवतो. कधी ते स्वर सुसंवादी असतात, कधी कधी विसंवादी. डोळे जें पाहतात, त्याच्या विरुद्ध कान ऐकतात. पण जेव्हा नाद आणि दृश्य एक होतें, तेव्हा एक नवीनच कलाकृति पुढे येते. सुंदर, असुंदर, रुद्र, करुण, प्रसन्न, भीषण असें कसलेंच विशेषण तिला लावतां येणार नाही. आंतल्या व्यासाची भेदक कलादृष्टि या द्वंद्वांची भेदरेषा ओळखीत नाही. ती जाणते एकच तत्त्व. कालाच्या सर्व थरांतून, मानवामानवांतून वाहणारी माणुसकीची संतत धार. जिथे ती धार खुंटते, तिथे व्यासाचा कलानिष्ठ क्रोध, त्याचा दुःखावेग उसळून उठतो. आणि तो आपल्या आकृतींत खरे रंग जीव भरून ओतूं लागतो. जीवनाच्या तालावर मृत्यूचें संगीत गाऊं लागतो.

गाणींच गाणीं या कलावंत व्यासाने गायिलीं. पण एक गाणें असें आलें की स्फुरतां स्फुरेना. सोडूं म्हटल्या सुटेना. त्या गाण्याच्या अमूर्त सुरांनी, भावांनी तो झपाटला गेला. आणि त्या अवस्थेंत एकलव्याची व्यथा द्रोणाच्या चिरव्यथेंत एकरूप झाल्याचें त्याने पाहिलें. नव्हे, ही कथा आता एकलव्याची राहिली नाही की द्रोणाची. बुद्धिमंतांच्या अविकसित आकांक्षांची भीषण

शोककथा ती झाली. अशा ज्ञात्यांचें विशाल जग मोहरीएवढें हलकें व लहान आहे. किती प्राण त्यांत ओता, तें क्वचितच एखाद्या महाभागाच्या स्पर्शानें परत विशाल व्हायचें. मोहरी परत आपली मोहरीच. एकाला मोठें व्हायचें तर दुसऱ्यानें ठेंगणें राहिलें पाहिजे, अशी परंपराच त्या मोहरींतल्या ठिणगीनें तयार केली. 'तूं नाही तर मी'चें तत्त्वज्ञान झालें. बलशालींचें बल निसर्गसिद्ध, तपःसाध्य राहिलें नाही. व्यवहारी समर्थांच्या हातीं बल गेलें. बुद्धि, कौशल्य, साऱ्यांचें नियोजन द्रोणानें एकलव्याचा आंगठा कापून घेतला तेव्हापासूनच सुरू झालें. या निर्माणक्षयी नियोजनाला एकदा जी चालना मिळाली ती अद्याप, कुठेहि पाहा, केव्हाहि पाहा, सारखी आपली फिरतीच आहे.

द्रोण दरिद्री ब्राह्मण. ब्राह्मणाला दारिद्र्य हें कांही अपरिचित नाही. परंतु दारिद्र्यानें ज्याचें मन अक्षरशः भाजलें-पोळलें, व तें कधीहि पूर्वीप्रमाणे टवटवलें नाही, असा द्रोणासारखा ब्राह्मण विरळाच. विद्यार्थिदशेंतला द्रोणाचा मित्र द्रुपद. दोघांनी आमरण मैत्रीच्या शपथा घेतलेल्या. द्रोण सर्व विद्यांत पारंगत. युद्धाच्या शास्त्रांत तर अप्रतिम प्रवीण. पण गृहस्थाश्रमी झाला आणि दारिद्र्याचे काटे त्याला बोचूं लागले. मूल दूध मागूं लागलें. दूध नव्हतें. पाण्यांत पीठ घालून तें पाजलें आणि मूल 'मी दूध प्यालों!' म्हणून नाचूं लागलें. तें पाहून बापाचें अंतःकरण फाटलें. द्रुपद आपला मित्र, जावें त्याच्याकडे, म्हणून तो निघाला. पण द्रुपदाच्या घरीं विपरीत अनुभव आला. द्रुपदानें त्याला ओळखहि दिली नाही आणि उलट उपहास केला. त्या वेळीं द्रोण अत्यंत संतापला. त्याला आपल्यांतल्या क्षात्रविद्येची आठवण झाली. द्रुपदाला मुलाबाळांसकट ठार मारण्याची प्रतिज्ञा करून त्यानें धृतराष्ट्राच्या दरबारीं राजपुत्रांना शस्त्रविद्या शिकविण्याचें काम पत्करलें; त्यांत अर्जुनाचें कौशल्य पाहून याच्याच हातून आपल्याला आपल्या कार्याची सिद्धि करतां येईल ही आशा त्यानें मनांत बाळगली. अर्जुनाच्या महत्त्वाकांक्षेला त्यानें खूप खत घातलें. 'तुझ्यासारखा धनुर्धर होणार नाही' हें अभिवचन त्यानें अर्जुनाला दिलें.

आता स्थिति सुधारली तरी त्याचें मन द्रुपदाविषयी वैर वाढवीतच राहिलें. इतकें की, शेवटीं द्रुपद राहिला बाजूलाच, पण त्या वैरानें द्रोणाच्या मनाचा कोपरा न् कोपरा ठणकूं लागला. त्याच्या रोमारोमांत असहिष्णुता भिनली. 'गुरु काय तो मी. शिष्य काय तो माझा. विद्येची मर्यादा मी

दाखवीन तीच,' अशा उद्दाम रोगट वृत्तीच्या या माणसांत ज्ञानाचा संयम, विनीतता यावी तरी कुठून? याच अनुदार, आत्मकेंद्री वृत्तीचें निदर्शन एक-लव्यासारख्या वन्य राजकुमाराला त्याने शिष्य करून घेण्याचें नाकारलें यांत होतें. पण तरीहि द्रोणाला गुरु मानून एकलव्याने धनुर्विद्येंत जें प्रावीण्य कमावलें तें पाहून अर्जुनाला कमालीचा मत्सर वाटला. आणि हा भिल्लकुमार आपल्या गुरूचा शिष्य आहे हें पाहून तर अर्जुनाचा संताप अनावर झाला. त्याने गुरूला आपल्या वचनाची आठवण करून दिली. आणि गुरूनेहि गुरुदक्षिणेच्या निमित्ताने एकलव्याचा उजव्या हाताचा आंगठा तोडून मागितला. एकलव्याने कुरकुर न करतां तो तोडला. झालें. इथे त्याची पूर्वकथा संपली. पण जिथे एकलव्याचें जिवंत मरण सुरू झालें तिथूनच द्रोणाच्या मृत जीवनाला सुरुवात झाली होती. राजघराण्यांत आपली प्रतिष्ठा कायम राहावी या हेतूने द्रोणाने अर्जुनाला अभिवचन दिलें आणि वरवर पाहतां क्रौर्यांचा, अन्यायाचा डाग लागत असतांनाहि तें पूर्ण केलें. यांत शिष्याचें प्रेम तरी त्या तऱ्हेचें असायला हवें होतें! पण तेंहि डागळलेलेंच होतें. मिंधेपणाचा डाग लपवण्या-साठी द्रोण नाना तऱ्हेच्या बहाण्यांचा आश्रय घेत होता. समजून उमजून नव्हे, तर तो त्याचा स्वभावच बनला होता. एकदा गेलेलें दारिद्य परतून येईल की काय, हीच धास्ती बहुधा त्याला गिळीत असावी. दारिद्र्याच्या या पाठलागांतून तो कधीच मुक्त झाला नाही. त्याचा धंदा शूराचा. पण या भीतीवर त्याला जय कधीच मिळवतां आला नाही.

आपल्याप्रमाणे आपला मुलगा यशस्वी व्हावा, आपल्यापेक्षा सवाई व्हावा, असें कुठल्या बापाला वाटत नाही? द्रोणालाहि तसें वाटलें तर काय नवल? पण नवल हेंच की ज्याने एकदा जीवनाकडे आत्मकेंद्रित दृष्टीने पाहायला सुरुवात केली, त्याला इतर सर्व तऱ्हेचीं इमानें पारखीं होतात. द्रोणाचें तसेंच झालें. कौरव-पांडवांमुळे त्याचें दारिद्य गेलें. त्याला राजाश्रय मिळाला. पण त्या अशान्त शास्त्रवेत्त्याच्या मनांत कसल्याच निष्ठेला आधार राहिला नाही. स्वामिभक्तीच्या सर्वश्रेष्ठ मूल्यालाहि त्याने डाग लावला. आपला मुलगा अर्जुनापेक्षाहि सरस व्हावा या लालसेने त्याने इतर मुलांना कामाला पाठवावें आणि अश्वत्थाम्याला मात्र अमूल्य अस्त्रें शिकवावीं. ही त्याची लबाडी अखेर उघडकीला आली. तरीहि त्याने एक अमोघ अस्त्र आपल्या

मुलाला चोरून दिलें तें दिलेंच. पण किती भयंकर शाप त्यामुळे पुढे त्याच्या वाट्याला आला. अर्जुन आणि द्रोण एकाच हीन ईर्ष्येने पेटलेले—आपल्याहून कुणी प्रवीण असू नये. असलाच तर त्याचा काटा कसाहि काढावा. शिखंडीचा आश्रय घेण्याचें धैर्य अर्जुनाला झालें तें याचमुळे. अर्जुनाला कृष्णाचा आधार होता म्हणून त्याचें सर्वच न्यून झाकलें गेलें. पण जसे कौरव बलिष्ठ झाले, तसा द्रोण मात्र अधिकाधिक चेपला गेला. दुर्योधनाच्या एकेका कृत्याचें समर्थन, मनांत असो वा नसो, करणें त्याला भाग आलें. मातबर कौरवांचा तो मिंधा झाला. पांडव पदहीन होते. त्यांच्याबरोबर तो जाऊं शकला नाही. कौरवांच्या प्रत्येक कृत्याबरोबर द्रोणाची मान खाली होत होती. डोळे उघडत होते. पण वय गेलें होतें. कौशल्य मिंधें झालें होतें. एकलव्यावर आपण केलेल्या अन्यायाचें स्मरण या प्रसंगीं त्याला कधीच झालें नसेल का? झालें असलें तर आपल्याला कौरवांच्या अन्यायाविरुद्ध बोलायला अधिकारच नाही असें त्याला वाटलें असावें आणि म्हणून तो दीनवाणा होऊन गप्प राहिला असावा. पण जर तें स्मरणहि त्याच्या मनांतून निसटलें असेल, तर मात्र बधिरतेच्या बाधेने तो पुरता घेरला गेला असला पाहिजे.

विद्यावंतांची बधिरता हा संस्कृतीला लागलेला मोठा शाप आहे. बुद्धिवंतांची संवेदनक्षमता करवंडली की मग पाशवी बलाचाच आग्रह अनावर होतो. स्वतःची कीव करीत भले भले बसतात आणि मग चळवळे, दुय्यम दर्जाचे लोक सामर्थ्याचीं सारीं क्षेत्रें काबीज करतात. पण तीं त्यांनाहि फार काळ पेलत नाहीत. जागा मोठ्या, माणसें लहान,—असें उलटें गणित सुरू होतें. हें उलट्या गणिताचें चक्र द्रोणाने युगापूर्वी फिरविलें. अजून तें तसेंच फिरतें आहे. द्रोण गेला तरी तडफडाट गेला नाही. अश्वत्थाम्याच्या रूपाने त्याला अमरपणा आला. ज्या अस्त्रामुळे अश्वत्थाम्याला युद्धांत मरण आलें नाही, किंबहुना चिरंजीवित्व त्याच्या वाट्याला आलें, त्यांत कोणतें सुख त्याला झालें? द्रौपदीचीं मुलें अश्वत्थाम्याने झोपेंत असतांना मारलीं. पण मातेचें दुःख काय असतें हें कळल्यामुळे द्रौपदीने त्याला जीवदान दिलें. पण त्याच्या आईने काय पाहिलें? मुलाचें अखंड भळभळणारें मस्तक. कधी न मिटणारी वेदना. कधी न संपणारें वणवण भटकणें व याचना. एकलव्य मेला. सर्वस्व गुरुचरणीं अर्पिल्याचें समाधान बरोबर घेऊन गेला. पण त्याच्या अघोर वंचनेची

ही उत्तरकथा संपवणें व्यासाच्याहि शक्तीपलीकडचें आहे. जोंवर कमअस्सल ईर्ष्येने पछाडलेले बुद्धिवंत आहेत तोंवर मोहरींतली ठिणगी अशीच पेटणार.

दुःख गिळणें ही एक श्रेष्ठ तपस्या आहे. साऱ्या कला, तत्त्वज्ञानें, सौंदर्य यांचा साक्षात्कार याच दुःख गिळण्याच्या शक्तींत आहे. मुक्त दुःख अभिनव प्रज्ञा देतें. जुन्या अनुभवाच्या जड संपुटांत तें कोंडलें की त्याची निर्माणशक्ति खुंटते. तसेंच द्रोणाचें झालें. एकलव्याने सारें गिळलें. पण द्रोण हा अश्वत्थाम्यावरच्या कोत्या प्रेमामुळे फुकट गेला. त्याच्या प्रेमाने त्याची ज्ञानतपस्या अपुरी राहिली. त्याच्याच मरणाबद्दल 'नरो वा कुंजरो वा' असें युधिष्ठिराने म्हटल्याबरोबर तो कोसळला. जें पुत्रमरणाचें दुःख द्रौपदीसारखी स्त्री समंजसपणें सोसूं शकली, त्यांतून औदार्याचा धडा नव्याने शिकली, तें द्रोणासारख्या आचार्याला, शूराला साधलें नाही. रणांगणाबाहेर तो वीर नव्हता. विद्येच्या आखाड्याबाहेर तो ज्ञानी झाला नव्हता. त्याने जपलें तें फक्त त्या मोहरींतल्या आगलाव्या व्यक्तित्वाला. आणि त्या क्षुद्र व्यक्तित्वाची शोकांतिका सर्वांत जर कशांत असेल तर गुरूशीं प्रतारणा करणाऱ्या युधिष्ठिराला कायमचें गालबोट लावून व्यवहारी व्यासाने द्रोणाला अधिकारी स्वराने जो न्याय दिला त्याच्यांत. या न्यायदानाचें एकांगी स्वरूप किती केविलवाणें आहे! एकलव्याच्या बाबतींत झालेल्या अन्यायाचे जनक दोन. द्रोण व अर्जुन म्हणजेच पांडव. त्यांना मात्र व्यवहारी व्यासाने सर्वच जबाबदारींतून मुक्त केलें. पण पुढे जेव्हा या गुरुशिष्यांचा विपरीत संबंध आला तेव्हा युधिष्ठिराला बोल लावून व्यास मोकळा झाला. त्यांतहि जय त्याने पांडवांचाच ठेवला. न्यायाचा मान त्याला मिळाला. पण त्या न्यायापेक्षा किती तरी मोठा अन्याय त्याने जो पूर्वी केला होता, त्याचें निरसन तर राहोच, पण तो पुढे कुठे कधी घडूं नये एवढेंहि श्रेय त्याला घेतां आलें नाही. पांडव दुहेरी अन्यायाचे मात्र वारस झाले. हेंच मोठ्या जाणत्या माणसांचें दौर्बल्यचक्र सारखें फिरतें आहे. तें कोण आवरील?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३५२८८ दि: ...
क्रमांक ............ नों: दि: ........ ३०/११/६९

# ३ | कोंडलेलें क्षितिज

अश्वत्थाम्याची मूर्ति आठवली की मला गुदमरल्यासारखें होतें. खूप मोठा बिलोरी आरसा असावा आणि त्याचीं मोजतां येणार नाहीत अशीं शकलें शकलें व्हावींत आणि तरीहि प्रत्येक भंगलेल्या तुकड्यांत आजूबाजूचें मावेल तेवढें प्रतिबिंब मात्र सारखें दिसत राहावें, आणि एकेरी प्रतिबिंबांचा एकमेकांशीं ताळमेळ नसला तरी त्या सर्वांतून एकाच गोष्टीचें रूप बिंबलेलें दिसावें, तसेंच अश्वत्थाम्याच्या व्यक्तिमत्त्वाचें झालें आहे. द्रोण, पांडव, युधिष्ठिर या साऱ्यांत तो दुभंगला. युद्धाने साफ भंगलेली व्यक्ति जर कुणी असेल तर हीच. युद्धाने याचें सारें व्यक्तिमत्त्वच तिरकस झालें. रुद्र, भयानक आणि तरीहि अति खंतावलेला दुसरा कुणी पुरुष महाभारतांत याच्यासारखा नाही. त्याच्या विदीर्ण व्यक्तिमत्त्वाच्या कणांना सांधणारा एकच मानसिक दुवा आहे: तो म्हणजे सरलतेचा. बालभावाचा. तो शेवटपर्यंत वोढाळ मूलच राहिला. तो वीर झाला, पण जाणता झाला नाही. मोठा झाला नाही. योद्धा झाला, पण पुरुष झाला नाही. तो नपुंसक नव्हता, पण पौगंडदशेच्या पलीकडे त्याचें मन पोचूं शकलें नाही. अपरिपक्व नवयुवकाचें मन एकदा आदर्शवादाने पछाडलें म्हणजे ज्या विकृति भोगतें, त्याच विकृति—बऱ्या आणि वाईट—अश्वत्थाम्याच्या वाट्याला आल्या. त्या जाज्वल्य वृत्तींना मनोरम आकार देणें, आदर्शवादाला मुक्त स्वरूप देणें त्याला जमलें नाही. हा मुलगा स्वप्नेंहि नीट पाहणारा नव्हता आणि वास्तवाशींहि त्याचें नीटसें नातें कधी जमलें नाही. सदा बावरलेला, भित्रा नसूनहि गडबडलेला तो दिसतो. स्वतःचें हरवलेलें कांही तरी

कावरेबावरेपणाने शोधीत राहतो. कुणीं पाहिलें तर जागच्या जागीं संकोचून उभा राहतो. संकट सामोरें आलें तरच तो ताठ उभा राहतो आणि निकराने आणि विश्वासाने तें दूर करतो. बोलणें सहसा याला माहीत नाही. पण जगाकडे पाहण्याची दृष्टि चौकस नसली तरी मायाळू. स्वसंरक्षणाविषयी हा जागरूक आहे. पित्याने दिलेल्या ब्रह्मशिर-अस्त्रामुळे वास्तविक ब्रह्मांडाला जाळील, बारा वर्षें पृथ्वी निर्बीज करील, असें कोणाचाहि थरकाप करणारें अस्त्र त्याला विद्यार्थिदशेंतच मिळालें होतें. मुळांतच हा अंतर्मुख; पण अंतर्मुखतेला गूढ सत्याचा आविष्कार झाला नाही. कारण त्याची कल्पनाशक्ति अधू होती. त्याची वासना रसरंगहीन होती. त्याच्या पौरुषाचीं क्षितिजें मुळांतच त्याच्या बापाने वात्सल्याच्या विपरीत उद्रेकांत कोंडून टाकलीं होतीं. वात्सल्याच्या या उफराट्या कोंडींतून अश्वत्थामा कधीहि मुक्त झाला नाही.

योगायोगाने युद्ध आलें. थोरामागे थोर सेनानी पडले, आणि उडत्या प्राणांचे क्षीण कण धुळींत मिसळणाऱ्या दुर्योधनाच्या इच्छेचा अंकुर अश्वत्थाम्याच्या वैशिष्ट्यपूर्ण युद्धकृतींत स्फुरला. धूळ, रक्त, गिधाडें, कोंडलेल्या काळोखी दिशा, असंयत वैर, कमालीचें वैराग्य आणि निराशा, या सर्वांचा अर्क त्याच्या सेनापतीच्या भूमिकेंत आढळतो. वास्तविक सेनानीची भूमिका ही मुळीं अश्वत्थाम्याची नैसर्गिक भूमिकाच नव्हे. भीष्म, द्रोण, कर्ण वगैरेंना ती साजेशी होती. या भूमिकेला लागणारें सुसंस्कृत, प्रगल्भ व टवटवीत व्यक्तिमत्त्व आणि कल्पकता हीं त्याच्यामध्ये नव्हतीं. पण थोरांमागे थोर पडले आणि हें माडाएवढें वाढलेलें थोराड, निष्ठावान्, बलिष्ठ पोर केवळ प्रसंगामुळे सेनानी झालें. तें पायघोळ, ढिगाळ पद त्याच्या व्यक्तिमत्त्वाला केवढें तरी पुरून उरणारें होतें. या योद्ध्याचे स्नायु आणि रक्त हीं युद्धाने स्फुरलीं, पण मन यत्किंचितहि तरल झालें नाही. तें झिंगलें; पण कोणत्याहि दृश्याने हलून नव्हे. बापाच्या मृत्यूच्या प्रसंगाने तो हादरला. पण त्या हादऱ्याने त्याला कैफ आला तो केवळ अजाण दुःखाचा. त्यांतून उद्भवलें तें मूढ क्रौर्य. आणि क्रौर्यांत असायचा तेवढा सगळा रिक्तपणा, वांझोटा मोठेपणाहि अश्वत्थाम्याच्या वाट्याला आला.

अश्वत्थाम्याचें जीवन सारें धुक्याने व्यापलेलें वाटतें. त्याच्या जीवननाट्यां-तले चार प्रसंगच काय ते व्यासाने प्रकट केले आहेत. आणि हें अपुरें नाटक

त्याने कुठेहि जोडणी न करतां तसेंच विस्कळितपणें बाजूला सारून दिलें आहे. मनासारखा न जमलेला डाव त्याने उधळून टाकला आहे. आणि म्हणूनच अर्धवट असला तरी हा विस्कटलेला डाव पुन्हा मांडणें कुणाला जमण्यासारखें नाही. पहिल्या प्रसंगांत दूध मिळत नव्हतें तेव्हाचें बाळपणचें दृश्य आहे. दरिद्री बापाचें दुधाकरिता लालचावलेलें मूल पीठ कालवलेलें पाणी दूध समजून पितें आहे आणि आनंदाने 'मी दूध प्यालों!' म्हणत थयथय नाचतें आहे. या प्रसंगांत बाळपणांतलें निरागसपण हें कुठेहि केव्हाहि आढळणारेंच आहे. व्यक्तीचा विशेष असा कांही नाही. दारिद्र्यावरचें तें एक दारुण भाष्य आहे. अविस्मरणीय असें. पण यांत विशेष हाच की हें वैषम्याचें भाष्य याच मुलाच्या अनुसंधानांत अमर वाणींत उच्चारलें गेलें. त्या अमर वाणीमुळे अश्वत्थाम्याच्या जीवनाची पार्श्वभूमि रेखाटली गेली. या पार्श्वभूमीमुळे आजू-बाजूला धुकें पसरलें असलें, तरी बिंदूबिंदूंनी इथे-तिथे रेखाटलेली अश्वत्थाम्याची आकृति कल्पनेने अजमावतां येते.

दुसरा प्रसंग त्याच्या विद्यार्थिदशेंतला, पण दोन दृश्यांत विभागलेला आहे. द्रुपदाशीं वैराची प्रतिज्ञा करून आलेला द्रोण मुलांबाळांसहित द्रुपदाला नाहीसें करण्याची मनोमन प्रतिज्ञा करतो. त्या प्रतिज्ञेच्या पालनाचा प्रारंभ तो मुलाला विद्या देऊन करतो. कौरव-पांडव नंतर आले. अश्वत्थाम्याच्या स्वतंत्र सहज वर्तनाचें अत्यंत ओझरतें, एका वाक्यांत मावणारें एकच मनोज्ञ चित्र व्यासाने रेखाटलें आहे. हें कौशल्य म्हणावें की गफलत हें मला समजत नाही. पण हें टाकण्यासारखें खचित नाही, याचा उमज व्यासाला नव्हता असें कसें म्हणावें?

द्रोण नव्यानेच हस्तिनापुरीं आलेला. आपलें नांवगाव गुप्त राखूनच तो कृपाचार्यांकडे तेव्हा राहत होता. पांडव तिथे आसपास खेळायला यायचे. चोरून अश्वत्थामा त्यांच्यांत मिसळायचा. पांडवांवर त्याचें मन जडलें आणि त्या भाबड्या सरळ मुलाने अर्जुनाला—आपल्या लाडक्या मित्राला—आपणाला अवगत असलेली युद्धाची विद्या शिकवली. राजपुत्राची मैत्री म्हणजे केवढी भाग्याची गोष्ट. त्या भाग्याचें उतराई होण्यासाठी त्याने विद्या दिली का? गरिबी त्याला आंतून टोचीत होती का? पण एवढें मात्र खरें की जें दिलें तें अश्वत्थाम्याने भरलेल्या मनाने, उदारपणाने, लाजाळू वृत्तीने आणि खेळाच्या पवित्र्यांत दिलें. कुणाला न कळतां मैत्रीचें ऋणप्रदान त्याने केलें. चिमणीच्या

दाताने खाऊ दुसऱ्याला द्यावा तसें. आणि हा खेळ कुठे जरा आकाराला येतो न येतो, तोंच पित्याच्या आक्रमक धोरणाने अश्वत्थाम्याला हें स्वरूप आखडतें घ्यावें लागलें. तो संकोचला. द्रोणाने कौरव-पांडवांना शिकवण्याचें काम उघड पत्करलें. हा क्षण अश्वत्थाम्याच्या सहजतेला मारक झाला.

अश्वत्थाम्याचा भोळा प्रेमळपणा, त्याचा ऋजुपणा अर्जुनाला आठवतो. ही गुरुपुत्राबद्दलची भक्ति नाही. माणसाने माणसाला ओळखण्याची ग्वाही आहे. मैत्रीच्या शुद्धतेचें द्योतक आहे. अर्जुन द्रोणाच्या मरणाने फार तळमळला. विशेषतः युधिष्ठिराने अश्वत्थाम्यासारख्या भाबड्या जिवाशीं असें कपट करावें याची त्याला फार चीड आली. युधिष्ठिराला या असत्य कर्माबद्दल दोष देतांना अर्जुन म्हणाला, "अश्वत्थामा अलौकिक आहे. साऱ्या प्राणिमात्रावर तो लोभ करतो." आणि ऐन युद्धप्रसंगांतसुद्धा पांडवांबद्दलची अश्वत्थाम्याची भावना दुर्योधनाच्या मृत्यूपर्यंत सौहार्दाचीच होती. घटोत्कचाला तो 'वत्सा' अशी हाक मारतो. "माझें तुझ्याशीं वैर नाही" म्हणून सांगतो.

कर्णाचा मुलगा मेल्यावर कर्ण व अर्जुन यांचें युद्ध जुंपतें. तेव्हा अश्वत्थामा दुर्योधनाला म्हणतो, "दुर्योधना, पांडवांबरोबरचें वैर थांबव. युद्धाचा धिक्कार असो. मी व कृप अवध्य आहों. तूं पांडवांबरोबर राज्य कर. मीं सांगितलें तर अर्जुन शांत होईल. युद्ध करणार नाही. कृष्णसुद्धा विरोध इच्छीत नाही. युधिष्ठिर भूतहितांत रत आहे. भीम व इतर भाऊ त्याचे अंकित आहेत. शांति कर. समेट कर."

दुर्योधन ऐकत नाही म्हणून अश्वत्थामा रागावतोदेखील. परंतु युधिष्ठिराच्या भूतहिताच्या वृत्तीचा फायदा मिळत नाही तो मात्र एकट्या अश्वत्थाम्यालाच. त्याच्या उद्गारांतला व प्रत्यक्ष घटितांतला विरोधाभास महाभारतांत अजोड आहे. या विरोधामुळेच पुढे अश्वत्थाम्याच्या क्रौर्याला प्रतिपक्षियांच्या विश्वासघाताची स्वाभाविक बैठक मिळते.

द्रोण मरेतोंवर बापलेक एकत्र होते. शरिराने व मनाने. पण हें मनाचें एकत्वच अश्वत्थाम्याच्या विकासाच्या आड आलें. त्याचें गोड, उदार व लाजाळू व्यक्तिमत्त्व लोपून गेलें. मुळांत त्याचा स्वभाव महत्त्वाकांक्षी नव्हे; बापाने आकांक्षा त्याच्यावर लादली. पांडवांवर दोघांचें प्रेम. पण तरीहि विद्येबद्दलचा पक्षपात द्रोणाने केला. अश्वत्थामाहि बापाच्या इच्छेप्रमाणे सगळ्या

कुमारांबरोबर पाणी भरायला जायचा. त्याला मोठ्या तोंडाचा कुंभ बाप द्यायचा. त्याचें काम अर्थातच लवकर आटपे. आणि तो मग घरांत आला की त्याला अगोदर बोलावून द्रोण त्याला अधिक शिकवी. बापाची आकांक्षा त्याला माहीत होतीच. बापाच्याच मानसिक संघर्षाचें प्रतिबिंब मुलांत या वयांतच पडलें असावें काय ? बापाच्या पक्षपाताला अश्वत्थाम्याने विरोध केला नाही. मुकाट्याने तो सांगेल तसें केलें. प्रेमळ पण करारी पित्याचें कोणतेंहि मूल ऐकतें, तसेंच त्याने केलें. कदाचित् वाढत्या वयाबरोबर द्रोणाची जरबहि त्याला बसली असावी. या प्रसंगांतला त्याचा मानसिक संघर्ष कुठेच दाखविलेला नाही. त्यावरून एवढेंच समजायचें की अश्वत्थाम्याच्या मनांत वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हती. उत्कृष्ट योद्धा शिस्तीचा भोक्ता असतो. याच शिस्तीने अश्वत्थाम्याला गिळलें. त्यांतल्या त्यांत जीवन सुखाचें होतें. सुरक्षित होतें. राजघराण्याला चिकटून राहण्यांतच काय तें या ब्राह्मण पिता-पुत्र योद्ध्यांचें श्रेय होतें. परशुरामाची स्वतंत्र युद्धप्रतिभा दोघांतहि नव्हती. आश्रितांच्या पेशांतला सुस्थितपणा आणि लाचारी यांच्या आहारीं दोघेहि गेले होते. यानंतर वर्षेंच्या वर्षें जातात. अश्वत्थामा जणु सुस्थितींत पुरला जातो. तारुण्याचा पहिला बहर येतो आणि जातो. त्या वेळीं तो काय करतो, कसा वागतो, त्याची मनःस्थिति कशी असते, कौरव-पांडवांच्या सदा वाढत्या वैरांत त्याची स्थिति कशी होते—कांही कांही व्यासाने सांगितलेलें नाही. तो गृहस्थ होता, सुखी संसारी होता, एवढेंच आपल्याला कळतें.

आणि मग एकदम त्याचें दर्शन होतें तें युद्धाचा वणवा पेटल्यावर. त्याचा आवाज कर्कशपणें उंच ऐकूं येतो तो बापाच्या मृत्यूनंतरच. हा जन्मला तेव्हा घोड्यासारखा म्हणे खिंकाळला. इतक्या जोराने हें मूल रडलें, तें मोठें बळकट म्हणूनच. आणि म्हणूनच त्याचें नांव अश्वत्थामा पडलें. पण हें कर्कश ओरडणें अक्राळविक्राळ आक्रंदनांत, क्रूर गर्जनेंत उमटलें तें फक्त युद्धाच्या वेळीं. याचा स्वभाव रागीट. संतापला की मग त्याला सुमार राहायचा नाही. त्यांत आणखी मनाने घेतलें तर वाटेल तें अघोर कृत्य करायला हा माघार घ्यायचा नाही, अशीहि त्याची ख्याति होतीच. बापाचा वध धृष्टद्युम्नाने व पर्यायाने पांडवांनी अधर्माने केला हें पाहून अश्वत्थाम्याचा संताप अनावर झाला. आता वैर हें भाडोत्री वैर राहिलें नाही;—अगदी स्वतःचें झालें. त्या

वैराला कर्ण, भीष्म व दुर्योधन यांच्या वधाच्या वेळीं पांडवांनी केलेल्या कपटाची बैठक. तें कपट आठवून आठवून अश्वत्थाम्याने त्यांना अभद्र शिव्या मोजल्या. कृष्णाला त्याने पापात्मा म्हटलें. बापाची प्रतिज्ञा हेंच त्याचें उद्दिष्ट झालें.

दुर्योधन त्याचा राजा आणि सखा. त्याची अखेरची इच्छा हें त्याचें कर्तव्य झालें. बाप व राजा यांच्या इच्छेंत प्रथमच त्याची स्वतःची इच्छाहि एकरूप झाली. आणि तो सेनानी झाला. हा तिसरा प्रसंग व्यासाने खूप विस्ताराने रंगवला आहे. परंतु विस्तारांतच त्याने जिज्ञासूला चांगलेंच चकविलें आहे. या विस्तृत प्रसंगाभोवती, आणि नंतरच्याहि, जें धुकें त्याने भरलें आहे त्याला तोड नाही. म्हटलें तर दृश्यावर खूप प्रकाश आहे, म्हटलें तर सारेंच सारवल्या-सारखें दिसावें, अशी खुबी केली आहे त्याने. व्यासाचें हें वाङ्मयीन मयगृहच आहे म्हणा ना! उलटें सुलटें एक झालें आहे. प्रमाणें हरवलीं आहेत. रेखा इतक्या ठळक की त्यांनी चरेच चरे उत्पन्न केले आहेत. किंबहुना हे चरेच अश्वत्थाम्याच्या त्या वेळच्या मनोवृत्तीचें व कृतीचें प्रतीक असावेत. विसंगति हाच या दोन्ही प्रसंगांचा आधार. आणि सर्वांत मोठा चमत्कार हा की, ही विसंगति तत्त्वज्ञानाच्या सुसंगततेच्या आधाराने साधली गेली आहे. भगवद्गीतेंतला तो रोमहर्षक प्रसंग आणि तेंच तें तत्त्वज्ञान पार उफराट्या रीतीने इथे वापरलें आहे. वस्तूची छाया असते तसें. त्या दृष्टीनें पाहिलें तर या प्रसंगांत सेनानी अश्वत्थामा अर्जुनाची भुतासारखी सावलीच वाटतो. तसें न वाटतें तरच आश्चर्य होतें. क्रांतदर्शी व्यासाची प्रतिभा व प्रज्ञा वास्तवाच्या दर्शनाच्या मिषाने, खऱ्याखुऱ्या व्यक्तीच्या आधाराने, अज्ञेयाचें चित्रण करूं धजते. आकृति वास्तवाची, पण रंग अवास्तवाचे. शब्द व दृश्यें परिचित. भयानकाची आगाऊ सूचनाहि आलेलीच असते. दुर्योधनाचें मरण म्हणजे वास्तविक एका बाजूचा सर्वनाश. तिथेंच युद्ध थांबायला हवें. पण नाही. दुर्योधनाचा प्राण एकदम गेला नाही. किती तरी वेळ, दोन-चार दिवस, तो तगून होता. हा काळ हा या प्रसंगांत नाट्यमय ताण उत्पन्न करणारा काळ आहे. या ताणाचा वेग अश्वत्थाम्याच्या विलक्षण गतींत व प्रचंड शक्तीने भारावलेल्या कृतींत आहे. पण ही गति व कृति कोणत्याहि जयिष्णु प्रेरणेनें भरलेली नाही. तिचें स्वरूप संपूर्णपणें अभावात्मक आहे. विनाशाचा वेग

तिच्यांत आहे. मृत्यूंतला व जीवनांतला प्रत्येक विकट आविष्कारच तिच्यांत भरलेला आहे. अश्वत्थाम्याला पराभवाने चेतवलें; अहंकाराने नव्हे. त्याचा द्वेष प्रचंड मृत्युमय आंधळ्या शक्तीशीं जोडला गेला. स्वतःचा बचाव त्याला करायचा नव्हता. त्याला मालकाचें राज्य राखायचें नव्हतें. त्याला फक्त सूड घ्यायचा होता. धृष्टद्युम्नाचा आणि पांडवांचा. आणि या उन्मनस्क स्थितींत त्याने शब्द उच्चारले ते देहाच्या नश्वरतेचे आणि आत्म्याच्या अमरत्वाचे. हें रणांगणोचित तत्त्वज्ञान कृष्णाने युद्धाच्या सुरुवातीला, आपल्या लोकांशीं आपण युद्ध कसें करावें, या संभ्रमांत पडलेल्या हाडामांसाच्या अर्जुनाला सांगणें वेगळें आणि पिशाचमनोवृत्ति बनलेल्या अश्वत्थाम्याने कृप, वगैरे अर्धमेल्या झालेल्या मूढ लोकांना युद्धाच्या अखेरीस सांगणें वेगळें. दैवाधीन असलेल्या माणसाची लीन मूढताहि यांत नाही. तत्त्वज्ञानाला आवश्यक अशी कोणतीच उभारी यांत नाही. चौकट केवळ स्वामिभक्तीची.

पण या तत्त्वज्ञानाच्या आविष्काराहूनहि अधिक चमत्कार पुढेच आहे. स्वतः पिशाचवत् बनलेल्या अश्वत्थाम्याला भुतांच्याच दर्शनाने उलटसुलट हादरे बसतात. या हादऱ्यांचा प्रारंभदेखील फार भयाण असून व्यासाने त्याला प्रतीकहि फार समर्पक योजलें आहे. अश्वत्थाम्याचा पराभव पांडवांकडून झाल्यावर त्याला रात्रीं कावळ्यांच्या अंड्यांचा व पिलांचा नाश करणारें घुबड झाडावर दिसतें. त्यावरून त्याला धृष्टद्युम्न व द्रौपदीचे मुलगे यांना झोपलेले असतांना मारावें ही कल्पना सुचते. अधू कल्पनेच्या माणसाला कल्पना सुचली तर ती त्याला पूर्णपणें ग्रासते. अश्वत्थामाहि कृपाने निषेध केला तरी आपलें म्हणणें सोडीना. आणि त्याची ती इच्छा इतकी बलवत्तर झाली की शेवटीं कृपहि तिच्या आहारीं गेला.

अश्वत्थाम्याला धृष्टद्युम्नाच्या शिबिराच्या तोंडाशीं भूत दिसलें. अक्राळ-विक्राळ, तेजस्वी आणि भव्य. त्याला भुताचा भास न होणेंच कठीण. ज्या मनःस्थितींत अश्वत्थामा होता त्या स्थितींत अश्वत्थाम्याच्या घुम्या स्वभावाचें उलटें प्रतीकच तें होतें. हें भूत बोलणारें नव्हतें. अश्वत्थाम्याप्रमाणेच तें भूत क्रियाशील मात्र होतें. क्रियाशील या अर्थाने की अश्वत्थाम्याने शस्त्रें टाकलीं की तें तीं गडप करी. अश्वत्थाम्यावर उलट प्रहार त्याने केला नाही. तें भूत पाहून अश्वत्थामा घाबरला नाही किंवा आश्चर्यचकितहि झाला नाही. कोणतीहि

भयंकर गोष्ट पाहून घाबरण्याच्या स्थितीपलीकडे तो केव्हाच गेला होता. जोंपर्यंत त्याचें शरीर सुदृढ होतें तोंपर्यंत अश्वत्थामा भीतीपासून मुक्त होता.

भुताने सारीं आयुधें गडप केलीं, तेव्हा अश्वत्थाम्याने शिवाची आराधना केली. शिव प्रकट झाला आणि त्याने अश्वत्थाम्याला सांगितलें की, "कृष्ण मला प्रिय असल्याने त्याचा आदर करण्यासाठी मीं धृष्टद्युम्न, द्रौपदीचे मुलगे व पांचाळ यांना कांही काळ संरक्षण दिलें. पण वास्तविक ते काळाच्या जबड्यांत सापडलेले आहेत. त्यांचा मृत्यु अटळ आहे. हा मृत्यु घडून यावा म्हणून मी तुला मृत्युंजय असें शस्त्र देतों." विराट स्वरूपांत कृष्णाच्या कराल दाढांत सापडलेल्या योद्ध्यांच्या दर्शनाची व उक्तीची ही फिकट आवृत्ति आहे. मात्र हें दर्शन अश्वत्थाम्याला आश्वासक असलें तरी विश्वरूपदर्शनाप्रमाणे प्रेरक नाही. युद्धांतलें संहाराचें अखेरचें माप पूर्ण करण्याच्या दृष्टीने तें घडून आलें. आणि तसें आलें तें भक्त व ईश्वर यांच्या नैसर्गिक उमाळ्यामुळे नव्हे. अश्वत्थाम्याच्या उग्र आत्माहुतीच्या निश्चयाच्या आव्हानांतून तें निघालें. ईश्वर करुणेने भक्ताकडे वळला नाही, तर दैवाने मृत्यु जिथे घडवला तिथे त्याला फार काळ थोपवून धरण्यांत अर्थ नाही, या दैववादी चिंतनांतून हें घटित निर्माण झालें आहे. या दर्शनांत व शस्त्रदानांत अश्वत्थाम्याला वांछित वस्तु व शक्ति मिळाली. मोल देऊन वस्तु घ्यावी तशी. पण त्याला करुणा, शुद्धि, मुक्ति, शांति यांपैकी कांही कांही मिळालें नाही. त्याचें मन शत्रूंना मारल्यावरसुद्धा वैराने भरलेलेंच राहिलें. धृष्टद्युम्नाला मारतांना त्याने तो झोपेंत असतांना पायाला स्पर्श करून त्याला जागें केलें. त्याला सावरायलाहि अवसर दिला नाही. इतकेंच नव्हे तर त्याने त्याला शस्त्राने मारण्याचें नाकारलें. वीरोचित मृत्यु त्याला येऊं नये म्हणून त्याने त्याला पशूसारखें मारलें. पायांनी तुडवून मारलें. तो स्वतःहि त्या वेळीं पशूच बनला.

दुर्योधनाला त्याने आपण पांडवांकडील या वीरांचा निःपात कसा केला तें सांगितलें. पांडवांकडचे सात व कौरवांकडचे तीन योद्धे बाकी राहिले. युद्धाची ही समाप्ति दुर्योधनाने ऐकली. अश्वत्थाम्याने सूड घेतला, हेंच त्याचें व अश्वत्थाम्याचें समाधानाचें एक स्थान.

शिवदर्शनाच्या वरांत व्यासाने पुढचें अशुभ भवितव्यच जणु सूचित केलें आहे. इथेहि कृष्णाकडून अश्वत्थाम्याला अधर्माचा बोल लावून त्याच्या

मस्तकांतला मणि त्याने कापून काढून घेतला. अश्वत्थाम्याने पांडवसंहारासाठी ब्रह्मशिर-अस्त्राचा वापर केला. द्रोणाने 'हें अस्त्र कधी वापरूं नको', असें सांगितलें असतांनासुद्धा त्याने तें वापरलें. इथेच अश्वत्थाम्याचें पित्याशीं असलेलें नातें तुटतें. पतंग गहाळ झालेल्या दोरीप्रमाणे अश्वत्थाम्याची स्थिति होते. सूडाचें पिशाच त्याला अनावर होतें. पांडव नाहीत तर उत्तरेच्या गर्भाचा बळी घेऊन तो तें अस्त्र कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे आवरतो. त्याचा मणि गेला. ज्या मण्यामुळे भूक, तहान, भयभीति—सारें जातें तो मणि द्रौपदी मागते व कृष्ण तिला देतो. या मण्याच्या उल्लेखाने एक लहान विसंगति व्यासाने निर्माण केली आहे. अश्वत्थाम्याजवळ हा मणि जन्मतः होता. मग लहानपणीं दूध हवें हा भुकेचा आक्रोश कसा ? मण्याबाबतचें कांही तरी घटित हरवलें आहे. पुसून टाकलें गेलें आहे. मणि गेला. (आणि ही विसंगति सोडली तर) अश्वत्थाम्याची बाळपणची क्षुधा परतली. आता तो पूर्णपणें भूकतहानेच्या आहारीं गेला. लाचार झाला. दुबळा झाला. आणि कळस म्हणजे व्यासानेच मणिदानाची आज्ञा त्याला केली. व्यास स्वामी. त्याची आज्ञा तो कशी मोडणार ? स्वामिभक्तीचेंच वलय काय तें त्याच्याभोवती उलटयासुलटया प्रकाराने फिरत राहिलें. उत्तरेच्या गर्भाचा नाश हा लहानांत लहान नाश करून अस्त्र परत येईल असें अश्वत्थाम्याने म्हटलें व त्याप्रमाणे घडलें. आणि जरी उत्तरेचें मूल कृष्णाने जिवंत केलें तरी त्या अस्त्राच्या वापराबद्दल सजा म्हणून त्याने अश्वत्थाम्याला रक्तपितीचा शाप दिला. अश्वत्थाम्याने शस्त्रें टाकलीं. जखमी व अति दीन होऊन तोंड झाकून तो रडत रडत रानाकडे पळून गेला आणि दिसेनासा झाला.

कृष्णाने सांगितलें त्याप्रमाणे अजून शापित अश्वत्थामा पृथ्वीवर भटकतोच आहे. सात चिरंजिवांपैकी अभागी चिरंजीवित्व याच्याच वाट्याला आलें. बळीला देवानेच पाताळांत गाडला तरी तो पुण्यात्मा होता. अजून दिवाळीच्या वेळीं बळी घरोघरीं धान्याधुन्याची लयलूट करीत अदृश्य रूपाने हिंडतो असें म्हणतात. मारुति चिरंजीव. तो विविध रूपांनी भक्तांना पावतो. बाळंतिणींची सुटका करतो. स्मशानांत प्रेतांची राखण करतो. चेटक्यांचा नाच तिथे अवसेपूर्णिमेला पाहतो. मांत्रिकांना सिद्धि देतो. नाना तऱ्हा करतो. इतर चिरंजीव माणसांच्या जीवनांत लुडबूड करीत नाहीत. पण अश्वत्थामा मात्र दुनियेंतल्या हरएक माणसाच्या दुःखदैन्याची मूर्तिमंत निशाणीच झाला आहे.

एकटा, परित्यक्त, दीन, याचक असा हा महारोगी खेडोपाडीं भटकतो. डोकींतली जखम म्हणे दाखवतो आणि तेल व चिंध्या मागत हिंडतो. त्याची लोकांना अजून भयंकर दहशत आहे. तेल न देईल त्याला तो शापतो. महारोगी जगाला कसलेंच वरदान देऊं शकत नाही. हें भयंकर व्यवहारी सत्य, अश्वत्थामा चिरंजीव आहे या समजुतीच्या रूपाने भारतांत घरोघरीं शेकडों वर्षें फिरतें आहे.

रोग भोगतांना व्यथेच्या पोटांत दडलेलें एक नाजुक सत्य असतें. परम नम्रतेचें सत्य आर्तांच्या भक्तिभावांत कृष्णाने उल्लेखिलेलें आहे. आर्तांचें निमूट सोशिकपण विशिष्ट सौंदर्याने भरलेलें असतें. हें सौंदर्य आकलन झालें म्हणून का अश्वत्थामा मृत्यूच्या वराची अपेक्षा करीत नाही ? त्याला मृत्यूचें वरदान न देण्यांत व्यासाने शेवटचा एक कलात्मक गूढ पेच निर्माण केला आहे. मृत्यु नाही, धन्यता नाही, शांति नाही, वैर नाही, सूड नाही. आहे ती फक्त रखरखच. शारीरिक वेदनांची अपार जाणीव. या न मिटणाऱ्या वेदनेंत, कुणाची साथ-सोबत नसलेल्या जीवनयात्रेंत, अति हीन अवस्थेंतदेखील मृत्यूच्या भव्यतेला आपल्याहून लहान करण्याची शक्ति आहे हें त्याला सुचवायचें आहे का ? सूक्ष्म व भव्य दोन्ही टाळूनहि असल्या रणरणत्या अवस्थेच्या कायमपणांतहि तोंडदेखल्या दयेला दूर ठेवणारें कांही तरी विलक्षण व आकर्षक आहे यांत संशय नाही. पण तें इतकें विलक्षण आहे, आणि इतकें जरवेने भरलेलें आहे की त्याला नांव देणें शक्य नाही. फक्त कधीकधी त्याचा किंचित् प्रत्यय मात्र, जिथे अति दुरवस्था आणि दैन्य आहे तिथे होतो. तोच अश्वत्थाम्याच्या चिरंजीव व्यथेचा व व्यक्तिमत्त्वाचा साक्षात्कार. मोकळ्या आकाशाखाली धरणीवर संचार करीत असतांनादेखील अनुभवांचें हाताशीं असलेलें विश्व बुद्ध्याच बाजूला लोटून अश्वत्थामा चारी क्षितिजें जवळ ओढतो. स्वतःला कोंडून घेतो. कोंडून घेण्याची, गुदमरण्याची त्याची ही सवयहि सुटत नाही. बापाचें नातें तुटलें. स्वामीची स्मृतीहि संपली. आणि या अखंड कोंडलेल्या मनोमय जगांत अक्षय संचार करण्याचा निर्धार मात्र प्राक्तनाच्या रूपाने स्वीकारून अश्वत्थामा फिरतो आहे. कोणताहि संदेश त्याला द्यायचा नाही. अमरत्वाला अंकुर नसतात, त्यांत स्रष्टेपणा नसतो, हें त्याला दाखवायचें आहे काय ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६८ वि: मेघदूत
क्रमांक ९४८० नों: दि: ३०/११/६

# ४

# व्यक्तिरेखा हरवलेला माणूस

माडाच्या झाडाचीं मुळें उघडीं पडलेलीं दिसतात. जीर्णशीर्ण रंग असतो त्यांचा. एवढ्या ताठ उंच झाडाचीं तीं खुरटीं उपरीं मुळें पाहिलीं की माझें मन विषण्ण होतें. त्याचें माथें आकाशाला भिडलेलें आहे, हें लक्षांत येतच नाही. त्या झाडाच्या पायाला कुठलाच रंग आणि आकार नसतो. पाण्याची जवळीक हाच त्याचा आधार; वाळूच त्याचें पोषण. वाळूच्या वांझ सान्निध्यांतच त्याचें जीवन जायचें, हेंच तीं मुळें सांगतात जणु.

अगदी तसाच विषण्ण भाव माझ्या मनांत दुर्योधनाची आकृति पुढे आली की उत्पन्न होतो. दिसतात तीं त्याच्या व्यक्तिमत्त्वाचीं केवळ खुरटीं उपरीं मुळें. व्यासाने एकच एक रंग, खलत्वाचा, त्याच्या व्यक्तिमत्त्वांत भरला आहे. तोहि अशा खुबीने की त्याच्या विडंबनाचीच तेवढी बाजू दाखवून. मुद्दाम विरूप केलेलें हें व्यक्तिमत्त्व पायांतूनच ढासळल्यासारखें वाटतें. आणि व्यास आपली नजर त्या पायाजवळून ढळूं देत नाही. पण क्वचित् एखादा क्षण येतो, जेव्हा व्यास एखादा किरण याच्यावर टाकतो. त्या किरणांत मात्र दुर्योधनाचें माथें उंचावलेलें दिसतें. त्याचे पायहि व्यासाने नाहीसे केले आहेत. कमरेपासून खाली एखादा दगड असावा तसा तो आहे. त्याच त्या जडमूढ व्यक्तिमत्त्वाचें दर्शन व्यास आपल्याला सदा घडवतो. दुर्योधनाच्या व्यक्तिमत्त्वाचें व्यासाचें प्रतीक म्हणजे मांड्या. त्या मांड्यांचा उल्लेख द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगापासून तों अखेरपर्यंत केलेला आहे. प्रारंभापासून अखेरपर्यंत दुर्योधन हा केवळ खलपुरुष आहे. मात्र त्याच्या पापी बुद्धीची चिकित्सा

करतांना व्यासाने एकच शब्द वारंवार वापरला आहे : 'मूर्ख', 'वेडा'.

बौद्ध-कथांत गौतम बुद्ध हा शुद्ध भावनांचें व मार हा पापभावनांचें प्रतीक दाखविलेला आहे. परंतु मार हा अत्यंत तीक्ष्ण बुद्धीचा आहे. कला, सौंदर्य यांचा दर्दी आहे. जीवनांतलें विलासतत्त्व अति साक्षेपाने जपणारा व संवर्धित करणारा आहे. जीवनांतलें उत्तेजकत्व म्हणजे मार आहे. दुर्योधनदेखील विद्यामंडित होता. कुशल योद्धा, अप्रतिम सारथि होता. चांगला कर्तृत्वशाली राजा होता. सत्तेच्या तेजाची पारख असणारा व तें तेज स्वतःमध्ये स्फुरत ठेवण्याची ईर्ष्या करणारा होता. परंतु दुर्योधन सूक्ष्म बुद्धीचा नव्हता. जसजसे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे पापुद्रे उलगडावे तसा खरोखरी मूर्खपणाच त्याच्यामध्ये ओतप्रोत भरलेला आढळतो. कधीकधी त्याचा मूर्खपणा वेडाच्या सीमेपर्यंत पोचे. आणि हे सारे प्रसंग दृष्टीसमोर आले की एक प्रकारची कीवच त्याच्याबद्दल उत्पन्न होते. त्याची बुद्धि पक्ष्याच्या उड्डाणाप्रमाणे सरळ रेषेंत असे. त्याच्या बुद्धीचा वेग प्रचंड पण तिचा पल्ला फार फार आखूड. त्यांतहि त्याची बुद्धि 'सर्व कांही हवें, साऱ्यांचें हवें, सर्वदा हवें' याच भावनेने भरलेली. पोरबुद्धीच्या थोराचें उदाहरण दुर्योधनाचेंच. आपणाला हवें तें मिळत नाहीसें झालें की पोर पराकाष्ठेच्या उद्दाम वृत्तीने हातीं लागेल त्याची नासधूस करतें. मार खातें, पण हार खात नाही. तसेंच चित्र आहे दुर्योधनाचें. दुर्योधनाची बालिशता दोनतीन ठिकाणीं तर इतकी स्पष्ट दिसते की सांगून सोय नाही.

पांडव वनवासाला गेले तरी पुढे ते येतील आणि राज्य घेतील या भयाने दुर्योधनाला चैन पडेना. तो रडे. तो बडबडे. एकदा तो शकुनीला म्हणाला, "जर पांडव परत इंद्रप्रस्थांत आलेले दिसले तर मी अन्नत्याग करून प्राण देईन, किंवा विष पिईन, नाही तर अग्निप्रवेश करीन. ते पुन्हा येतील आणि त्यांची भरभराट होईल, हें मी कल्पनेनेसुद्धा सहन करूं शकत नाही." त्या वेळीं शकुनि त्याला उघड म्हणतो की, "राजा असून तूं असा काय बालिशतेने वागतोस ?"

राजसूय यज्ञामुळे पांडवांची झालेली भरभराट पाहून जळफळत असलेल्या दुर्योधनाच्या कल्पनेला असेच बालिश अंकुर फुटले. आपल्या कल्पना तो कर्णाला बोलून दाखवीत होता;—आपल्या कल्पना कोणाला तरी बोलून दाखवल्याशिवाय त्याला राहवतच नसे. मनांत विचार करून कांही तरी निर्णय

घेण्याचें त्राणच त्याच्यांत नव्हतें. आणि म्हणूनच त्याची बुद्धि सर्वस्वी इतरांच्या सांगीप्रमाणे चाले. पण त्यांतहि गंमत अशी की, तो सल्ला त्याच्या कल्पनेशीं सुसंगत असाच हवा. विरोधी बोलणें तो ऐकायचाच नाही—पांडवांच्या ऐश्वर्याचा विलक्षण हेवा वाटून दुर्योधनाने आपल्या परीने तें नाहीसें करण्याचा उपाय शोधला तो असा! पांडवांमध्ये आपापसांत भांडणें लावावीं. सुंदर स्त्रियांचीं प्रलोभनें दाखवून भावाभावांना वेगवेगळ्या ठिकाणीं जाण्यास लावावें. द्रौपदीला नव्या सवती आल्या की तिच्याहि मनांत पक्षपात उत्पन्न होईल आणि मग हळूहळू तिचें मन पांडवांबद्दल विरक्त होईल. त्यांत द्रौपदीबद्दल त्याची वासनाहि नव्हती हें विशेष. हें सरळसोट गणित कर्णाने ऐकलें आणि त्याने दुर्योधनाला त्याच्या बेतांतला वेडेपणा दाखवला. कर्ण म्हणाला की, "पांडवांच्या एकीचें मूळ द्रौपदी हेंच आहे; अनेक पति असणें स्त्रीला प्रिय असतें. द्रौपदीला तर ही संधि अनायासें मिळाली आहे. तर ती ती सोडील का? पति निर्धन होते तेव्हाहि ती त्यांच्यावर प्रीति करी. मग वैभवांत ती त्यांचा त्याग करील का?"

भीष्म, द्रोण, अश्वत्थामा, विदुर यांचा आणि प्रत्यक्ष बापाचा सुद्धा कानउघाडणीचा शब्द दुर्योधनाने मानला नाही. तो नमे फक्त कर्णापुढे. पांडवांत जें जें थोर, जें जें तेजस्वी, जें जें म्हणून पराक्रमाने भरलेलें आहे तें तें सारें एकट्या कर्णातच आपल्या बाजूला आहे हें त्याला लहानपणापासूनच जाणवलें होतें.

दुर्योधनाचा स्वभाव इतका एककल्ली, उद्दाम, मत्सरी, आणि सुख असतांहि तें टिकेल का, टिकेल का अशा विवंचनेंत पडण्याइतका कातर कसा झाला? या प्रश्नाचा मागोवा घेतांना दुर्योधनाचें बालिश व्यक्तिमत्त्वहि केवळ एकसंध आणि साधें नाही असें आढळून येतें. त्याच्या व्यक्तिमत्त्वांत अनेक व्यक्तिमत्त्वें मिसळून गेलेलीं मला दिसतात. किंबहुना त्या व्यक्तिमत्त्वांची निर्मिति म्हणजेच दुर्योधन. दोन वृद्ध अपंग मनें आणि दोन बालमनें. धृतराष्ट्र-गांधारीचीं अपंग मनें; भीमसेनाचें त्याला सदा भिववणारें आणि तसेंच चेतवणारें अर्धें बालमन आणि अर्धें तरुण मन;—दुर्योधनाच्या व्यक्तिमत्त्वापासून हीं अलग करतां येत नाहीत. चौथें बालमन त्याचें स्वतःचें. हें मन प्रारंभीं भीमाच्या बालमनाला सर्वस्वी समांतर होतें. पण भीम वाढत होता आणि दुर्योधन मनाने फारसा

वाढूं शकला नाही : लाडावलेलीं मुलें कधीच वाढत नाहीत, त्याप्रमाणे तो मनाने पोरच राहिला. त्याची वाढ त्याच्या आईबापांनीच थांबवली. लोभाच्या आधीन झालेलीं माणसें लांबवरचें पाहूंच शकत नाहीत.

धृतराष्ट्र आणि गांधारी दोघंहि दुर्योधनामागून कांही वर्षांनी मेलीं. परंतु तीं दोघं पूर्णत्वाने कधी जगलींच नाहीत असें मला वाटतें. अपूर्ण व्यक्तिमत्त्व परवडलें;—पूर्ण व्यक्तिमत्त्व असतें कुणाचें ?—पण यांचीं व्यक्तिमत्त्वें विषमतेनेच भाराक्रांत झालेलीं होतीं. अति दुबळीं होतीं. सैरवैर भटकणाऱ्या त्यांच्या मनांत जें कांही येई तें तिथे कधी खोलवर रुजूंच शकलें नाही. वाऱ्याने पाचोळा उडावा तसे त्यांचे विचार इतस्ततः उडत. अगदी खोलवर रुजलेलें असें त्यांच्या मनांत एकच होतें. तें म्हणजे वात्सल्य. पण या वात्सल्यालादेखील संभ्रमाने पछाडलेलें होतें. कुंतीचें प्रेम हा एकच पांडवांच्या जीवनाचा व पराक्रमाचा आधार होता. तसें दुर्योधनाचें झालें नाही. त्याच्या बाबतींत आईबापांचें प्रेम ही एक नेहमीची, मागावी तेव्हा सहज मिळणारी, म्हणूनच विशेष न जाणवणारी वस्तु ठरली. एक प्रकारें कुंतीचें कर्णाविषयीचें चोरून ठेवलेलें वात्सल्य आणि गांधारीचें प्रकट पण सदा संभ्रमित वात्सल्य यांत एक प्रकारचा सारखाच विषण्ण भाव दाटलेला आढळतो मला. जेव्हा कुंतीने कर्णाबद्दलचें आपलें प्रेम उघडपणें व्यक्त केलें त्या वेळीं तें व्यावहारिक दृष्ट्या निरुपयोगी झालें होतें. गांधारीचें वात्सल्य मुलगा जिवंत असतांनासुद्धा अपुरें, दुबळें पडत होतें. चिंतेने, लज्जेने भाराक्रांत झालें होतें. तिचें मन वैतागलें होतें. धृतराष्ट्रालाहि अधूनमधून वैतागाचा उमाळा येई; कधी तो वैताग लटकाहि असे. परंतु गांधारीच्या न्यायनिष्ठुरपणाची सर त्याला नव्हती. गांधारीला उत्तरवयांत जें जाणवलें तें धृतराष्ट्राला जाणवलें नाही असें नाही. परंतु त्याच्या भावनांना दृढताच नव्हती. कशी असणार ? अपंगाच्या नियतीने तो घेरलेला होता. न्यूनभावनेने पुरता ग्रासलेला होता. हा न्यूनभावनेचाच वारसा, पण जरा वेगळ्या स्वरूपांत, दुर्योधनाच्या वाट्याला आला.

आपण मोठे असलों तरी अंधत्वामुळे राज्याचे स्वामी होऊं शकत नाही, ही खंत धृतराष्ट्राच्या मनोमनीं भरलेली होती. विदुराने हीन जन्म आणि सत्ताहीनता हीं भूषणासारखीं शोभवलीं. आपण राजवैभवाचा त्याग स्वेच्छेने केला याचें भीष्माला स्मरणहि राहिलें नाही. 'तुम्ही द्याल तें मी घेईन;

बापाच्या संततीसाठी हवें तें दिव्य करीन' या बाण्यामुळे भीष्माला वृत्तीचें स्थैर्य आलें. लीनतेंतली मानसिक तृप्ति मिळाली. परंतु धृतराष्ट्राला हें साधलें नाही. त्याची खंत नाना रूपें, नाना वळणें घेत राहिली. त्याची भावनाविवशता महाभारतांतल्या इतर कोणत्याहि व्यक्तीपेक्षा अधिक शबल होती. धृतराष्ट्र प्रेमळ होता. अंध माणसांना परावलंबनामुळे इतरांवर विश्वासावें लागतें. लाचार व्हावें लागतें. तसाच तोहि विश्वासत होता. आधारासाठी विदुर, संजय, गांधारी आणि दुर्योधन यांना घट्ट धरूं पाहत होता. परंतु अंधांच्या मध्ये अविश्वासाची, संशयाचीसुद्धा, तीव्र धार असते. संरक्षणाची सतत गरज असल्यामुळे ती सदा परजलेली असते. कधी ती लबाडीचेंहि रूप घेते. अंध धृतराष्ट्र असाच लबाडी करूं पाहत होता. अपंगाचा शब्द बहुधा खरा मानला जातो. पण व्यवहारांत मात्र आपल्या वैगुण्याचा फायदा उठवण्याची एकदा सवय पडली की अपंग माणूस त्या दुबळेपणाला कावेबाजपणाने किफायतशीर करूं पाहतो. तसेंच धृतराष्ट्राचें झालें. 'मी राज्याला वंचित झालों, माझीं मुलेंहि होतील,' या शंकेने रात्रंदिवस तो मनांत त्रस्त असे. आणि त्यांत भर पडली ती ही की, हा माणूस पांडूच्या मृत्यूमुळे खरोखरीच राजपदाचें दुर्मिळ सुख प्रत्यक्ष भोगूं शकला. हा भोग न मिळता तर कदाचित् त्याने भीष्मादिकांचाच सल्ला प्रमाण मानला असता. पण एकदा दुष्प्राप्य सुख मिळालें की तें सोडणें कठीण होतें. भीष्माच्या त्यागाची मोहिनी धृतराष्ट्राच्या मनावरून कधीच उडाली होती. वरपांगी त्याने त्याचा आदर केला तरी मनांतून हा आपला पोशिंदा आहे अशीच भावना त्याची झालेली होती. नेमक्या याच वृत्तीचें अनुकरण दुर्योधनाने केलें. तसें पाहिलें तर दुर्योधन हा धृतराष्ट्राच्या सुप्त आकांक्षांचें उघड कर्तृत्वांतलेंच रूपांतर आहे. दुर्योधनाने गांधारीकडून अव्यंग देह घेतला. परंतु मन घेतलें पित्याचें. क्षणोक्षणीं संशयाने पछाडलें जाणारें धृतराष्ट्रावरचें भीष्मादिकांचें बंधन पांडूच्या मृत्यूनंतर ढिलें पडलें. पण धृतराष्ट्राचें दुर्योधनावर कधीच बंधन नव्हतें. ऐकीव गोष्टीच प्रमाण मानणारा धृतराष्ट्र पुत्रमोहामुळे उघड पक्षपाती बनला. तोंडाने पहिल्यापासून अखेरपर्यंत तो सतत म्हणे की, "पांडव मला मुलांसारखे, त्यांच्याहिपेक्षा जास्त प्रिय." परंतु वस्तुस्थिति अशी होती की, पांडवांबद्दल त्याच्या मनांत ओलावाच नसल्यामुळे त्याला हा उद्घोष वारंवार करावा लागे.

त्याच्या या पक्षपाताला मुलांच्या बाळपणापासूनच सुरुवात झाली. पांडु मेल्यानंतर पांडव हस्तिनापुरीं आले. तोंपर्यंत या दोन्ही बाजूंच्या मुलांना एकमेकांबद्दल कांही माहीतहि नव्हतें. आणि पुढे धृतराष्ट्राचें मन द्विधा आहे हें न ओळखण्याइतकी कुंती भोळी नव्हती. विधवा माता घारीहून अधिक जागरूक असते. प्रसंगीं हिंस्र होते. हीच स्वतःच्या बचावासाठी आवश्यक असलेली हिंस्र वृत्ति भीमाच्या रूपांत कुंतीने जोपासली. अगदी कुणाच्या लक्षांत न येईल अशा तऱ्हेने. धृतराष्ट्रांत तोच बाणा आढळतो. पांडवांपैकी भीम सर्वांत हूड आणि शक्तिवान्; अविवेकी आणि खादाड; रागीट आणि तितकाच भाबडा असा. करील तिथे जिवाभावाने प्रेम करील, नाही तिथे कधीच प्रेम करायचा आव आणायचा नाही. युधिष्ठिर आणि अर्जुन शांत. यामुळेच पांडवांचा लहानपणचा म्होरक्या भीम झाला. तूं कौरवांच्या खोड्या करूं नको म्हणून त्याला कुणींच दटावलें नाही. दांडगें मूल पोरासोरांतहि कौतुकाचा विषय होतें. तसेंच भीमाचें झालें. कौरवपांडवांचे वेगळे गटच झाले. आतापर्यंत कौरवच साऱ्यांच्या कौतुकाचा विषय होते. आता भीमाचा बोलबाला होऊं लागला. कधी भीमाने कौरवांना पाण्यांत बुडवावें आणि तीं मुलें भीतीने अर्धमेलीं झालीं की त्यांना सोडून देऊन हसावें. तीं झाडावर चढलीं की झाड गदगद हलवून त्यांना धडाधड पाडावें. धावण्यांत, खेळांत त्यांना सदा हरवावें. यामुळे 'मी-तूं'चें वातावरणच राजवाड्यांत उत्पन्न झालें.

दुर्योधन याच अनुभवांमुळे, या नवागत मुलांच्या अतिक्रमणामुळे आणि पुढे हेच राज्याचे स्वामी होणार का या चिंतेमुळे, लहानपणींच भीमाचा प्रतिस्पर्धी बनला. भीमाहून तो दुबळा होता. पण दुबळ्यांचें वैर त्यांना अति क्रूर व कपटी बनवतें. याच वृत्तीचा संचार दुर्योधनांत झाला. या वृत्तीला आंधळ्या बापाचा मनोमन आधार आहे, हें न कळण्याइतका खुळा तो थोडाच होता? मुलांच्या भांडणाला मर्यादा असतात, असेंच धृतराष्ट्रालाहि इतरांप्रमाणे वाटत होतें. त्याशिवाय आपण अनेक वर्षें राज्य केल्यामुळे पांडवांना राज्य मिळालें तरी अर्धा हिस्सा आपल्याला भीष्मादिकांच्या कृपेमुळे मिळणारच हें माहीत असल्याने धृतराष्ट्र एक प्रकारें संतुष्ट होता. पण जेव्हा भीमाला विष घालून दुर्योधनाने नदींत फेकलें त्या वेळीं करड्या आणि न मिटणाऱ्या वैराचें दर्शन सर्व वडील माणसांना झालें. पांडव कुंतीसकट दूर निघून गेले.

पण तरीहि दुर्योधनाने लाक्षागृहांत त्यांना जाळण्याचा कट केला. थोडक्यांत तो फसला. लाक्षागृह हें कौरव-पांडवांच्या वैराचें प्रतीकच समजलें पाहिजे. त्याच्यानंतर पांडवांचें लग्न, त्यांचें इंद्रप्रस्थाला आगमन, त्यांच्या राज्याची सुरुवात, राजसूय यज्ञ, मयसभा—या साऱ्या गोष्टी त्यांच्या अजिंक्य पराक्रमाची व एकजुटीची ग्वाही देण्यास पुरेशा होत्या.

लाक्षागृहाची योजना फसली आणि दुर्योधनाच्या मनाने ठाव सोडला. बापाप्रमाणे अर्ध्या राज्याने त्याचें समाधान होत नव्हतें. आणि मयसभेंतल्या अपमानाने तर तो पेटून निघाला. द्रौपदी त्याला हसली. भीम हसला. "धृतराष्ट्र-पुत्रा, हें दार इकडे आहे बघ," असें म्हणून मयसभेंत त्याला त्याने भिंत कुठली व दार कुठलें तें हसत हसत दाखवलें. त्यांत त्याच्या बापाच्या आंधळेपणाची व पर्यायाने त्याची कुचेष्टा होती. या वेळीं कुंती किंवा मोठे पांडव यांनी—किंबहुना कृष्णानेहि—दुर्योधनाच्या अपमानाकडे दुर्लक्ष केलें. 'लाक्षागृह' त्यांना विसरायला झालें नव्हतें. पण त्यामुळे दुर्योधनाचें बाळपणचें वैर मात्र उसळून निघालें. आता जाळपोळ, विष, वगैरेपेक्षा जास्त चतुर उपाय त्याने योजला आणि पांडवांची संपत्ति द्रौपदीसकट हरण करण्याचा, शकुनीने सुचवलेला द्यूताचा मार्ग त्याने अवलंबिला. शकुनीचें कपट त्याला मानवणारेंच होतें.

द्रौपदीची विटंबना करतांना जरी दुर्योधनाने आपली मांडी तिला दाखवली, तरी कीचकाप्रमाणे तिच्याबद्दल कामवासना त्याला नव्हती. तिच्याबद्दल द्वेषच त्याला होता. आणि त्या द्वेषाची परमावधि 'दासी' म्हणून तिला हीन तऱ्हेने वागवण्यांत आहे हेंच त्याने जाणलें. मयसभेचें उट्टें काढलें. या वेळीं दुर्योधनाच्या उद्दाम वैरी वृत्तीला आणि अशिष्टपणाला कुणीं सर्वांत विरोध केला असेल तर विकर्णाने. भावाची त्याने कडक शब्दांत कानउघाडणी केली. भीमाने युधिष्ठिराची केली तशी. त्यानेच धृतराष्ट्राला द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर द्यायला लावून तिला तीन वर देण्यास प्रवृत्त केलें.

पांडव वनांत गेले आणि दुर्योधनाची आईबापांशीं तेढ प्रकट झाली. पांडवांचा वनवास धृतराष्ट्राला मनांतून आवडलाच होता. पण वरकरणीं न्यायाचें सोंग त्याला करायचें होतें. त्याने विदुराला झाल्या प्रकाराबद्दल मत विचारलें आणि विदुराने दुर्योधनासारख्या पुत्राचा त्याग कर म्हणून सांगितलें. त्या वेळीं धृतराष्ट्राचें खरें रूप दिसलें. त्याने विदुराला "तुला पांडव प्रिय आहेत,

आम्ही नाहीं" असें म्हटलें व हाकलून दिलें. पण त्याचें नाही म्हटलें तरी विदुरावर प्रेम होतेंच. पुढे त्याला विदुर गेला याबद्दल पश्चात्ताप झाला आणि विदुराला परत बोलावून धृतराष्ट्राने त्याची क्षमा मागितली.

ही गोष्ट कळतांच दुर्योधनाला बापाची चीड आली. पांडवांना वनांतून हा म्हातारा बोलावून आणतो की काय, ही धास्ती त्याला पडली आणि त्याने बापाला उघड विरोध केला. "मी आंधळा, तो माझें कसलें ऐकतो?" हे हताश उद्गार धृतराष्ट्राला काढावे लागले. इतकें झालें, गांधारी, व्यास, वगैरेंनी सांगितलें, तरी दुर्योधनाचा त्याग करण्यास त्याने संमति दिली नाही. पुत्र-मोहाचा दुबळेपणा त्याने उघड स्वीकारला. "पुत्रप्रेमापुढे मी हतबल आहें," असे उद्गार त्याने काढले. बुद्धिमान् व्यासालाहि या त्याच्या उद्गारांवर अधिक कांही बोलतां येईना. त्या वेळीं धृतराष्ट्राला उघड छेडलें गांधारीने. पांडव वनांत गेले त्या वेळीं साऱ्यांनी अश्रु ढाळले; ढाळले नाहीत दुर्योधन, दुःशासन, कर्ण आणि शकुनि यांनी. द्रौपदीच्या हें चांगलें स्मरणांत राहिलें. मग गांधारीने तें दुर्लक्षिलें असेल असें कसें म्हणवेल? मुलाचा विनाश तिला सतावूं लागला. त्याच्या दुष्ट, मत्सरी स्वभावाबद्दल, त्याच्या सभेंतल्या ओंगळ कृतीबद्दल तिला चीड आली होती. तिची न्यायी वृत्ति जागी झाली. विदुरा-प्रमाणेच पांडवांना वनांतून बोलावून आणून त्यांना अर्धें राज्य देण्याचा आग्रह तिने धरला. तिच्याच आग्रहामुळे, अनुद्यूताचा हट्ट दुर्योधनाने धरला होता तो धृतराष्ट्राने मोडून काढला होता. दुर्योधनाच्या हें चांगलें लक्षांत होतें. बापाला वाकवतां येतें तसें आईला यापुढे वाकवतां येणार नाही हें त्याने ओळखलें. आणि याचा परिणाम म्हणजे तो तिला टाळूं लागला. जो कुणी पांडवांशीं समेटाची भाषा काढील त्याचा बोलून न बोलून अत्यंत उद्दामपणें उपमर्द कसा करावा ही कला दुर्योधनालाच साध्य होती. बापाचें व व्यासाचें बोलणें त्याने उडवून लावलें. विदुर व भीष्म यांना "तुम्ही आमच्या पदरचें खाऊन पांडवांना डोकीवर घेतां" असा उघड बोल लावला. मैत्रेयाने हाच उपदेश भर दरबारांत केला, त्या वेळीं त्याने तोंडांतून अवाक्षर न काढतां, डोळेहि वर न उचलतां, मांडी थोपटून आपला धिक्कार व्यक्त केला.

मानी दुर्योधनाला कर्णाची व्यथा जशी कळली तशी इतर कुणालाहि कळली नाहीं. द्रौपदीस्वयंवरांत कर्णाचा तेजोभंग झालेला ऐकून कुंतीहि हळहळली

नाही. परंतु तें शल्य दुर्योधनाला जाणवलें. केव्हाहि क्षत्रियत्वाची उणीव त्याला भासूं नये म्हणून अंगदेशाचें राजपद त्याने त्याला दिलें आणि आमरण मैत्रीची याचना त्याने कर्णाजवळ केली. कर्णहि अखेरपर्यंत हें ऋण विसरला नाही.

राजा म्हणून दुर्योधनाची कारकीर्द प्रजेला फार सुखाचीच झाली याची कबुली युधिष्ठिराने दिली आहे. पांडवांना सुईच्या अग्रावरची जागादेखील द्यायची नाही, हा आपला हेका त्याने मरेपर्यंत पाळला. पराभवाच्या वेदना सोशीत तो मेला, परंतु शेवटीं फक्त पांच पांडवच काय ते शिल्लक राहिले आहेत ही वार्ता त्यांतल्या त्यांत त्याला समाधानाची वाटली. अश्वत्थाम्याला त्याच्या निष्ठेबद्दल, कर्तृत्वाबद्दल त्याने धन्यवाद दिले. स्वतःच्या दुःस्थितीबद्दल दुःख दर्शविलें नाही. स्वतःची कीव प्रारंभीं करणारा दुर्योधन धैर्याने मृत्यूच्या आधीन झाला. मरतां-मरतांहि आपलें वैर कायम आहे याचें समाधान त्याने अनुभवलें. त्याने आईबापांची आठवण काढली नाही. कुणाबद्दलहि शेवटीं आसवें गाळलीं नाहीत. सभोवार घिरट्या घालणाऱ्या गिधाडांची भीति त्याला वाटली नाही. दुर्योधनाच्या जीवनाला हावरेपणाचे अनेक डाग आहेत. पण मैत्रीच्या नात्याला मात्र त्याने कधी डाग लावला नाही. तसें नसतें तर माद्रीचा भाऊ शल्य त्याच्या बाजूला आलाच नसता.

दुर्योधनाचा पीळ कणखर. त्या पिळामुळेच त्याचें व्यक्तिमत्त्व खुरटें वाटत नाही. माडासारखें उंच वाटतें. मात्र या पिळदार व्यक्तिमत्त्वाला त्याच्या शेवटच्या एका भीरु कृत्यामुळे तडा गेला. पांडवांना मारण्यासाठी त्याने अनेक हीन युक्त्या अमलांत आणल्या होत्या. त्यांच्या पोटीं भीतीचें बीज होतें; पण तें भय क्षम्य होतें. राजवैभवाचें स्वप्न त्या भयाच्या पोटीं दडलेलें होतें. पण भीष्म, द्रोण, कर्ण—सारे जण पडले आहेत, आता पराभव अटळ आहे, अशा वेळीं दुर्योधन जलस्तंभनविद्येच्या आधाराने पाण्यांत लपून राहिला आणि मरण टाळण्यासाठी इतका दुबळा व भ्याड बनला, हें पाहून अति विषाद वाटतो. मागे अनेकदा आत्महत्येच्या गोष्टी त्याने केलेल्या होत्या. पण आता मरण पुढे ठाकलेलें पाहतांच त्याचें धैर्य गळालें आणि तो लपून बसला. तो आता शूर योद्धा नव्हता. आपल्या सैनिकांशेजारी सुखाने शेवटची झोप घेणें हें आपलें कर्तव्य मानणारा राजा नव्हता. तो होता अंधाचा पुत्र. सदा धागधुगींत जगणारा. खुरट्या आशांना जपणारा.

दुर्योधनाच्या जीवनांत मैत्रीचें जें रसायन कायमचें होतें, त्याच्यावर व्यासाने युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं अति सूचक नाट्यप्रसंग उभा केला आहे. दुर्योधनाच्या स्वभावांतली सारी कोवळीक त्यांत त्याने भरली आहे. बालिश मनाच्या या माणसाच्या भावनांचे तंतु बालपणाच्या स्मृतींना कौशल्याने भिडवले आहेत. तो प्रसंग असा. अश्वत्थामा आणि घटोत्कच यांचें युद्ध होतें आणि त्यांत अश्वत्थामा कच खातो. यानंतर कर्ण व घटोत्कचाचें युद्ध होतें आणि कर्ण घटोत्कचावर आपली वासवी शक्ति टाकतो. घटोत्कचाचा मृत्यु होतो. पण हीच कर्णाच्या मृत्यूची नांदी असते.

या प्रसंगीं, घटोत्कचाच्या प्राणावर बेतलें असूनहि, कृष्ण व अर्जुन एकमेकांकडे पाहून हसत होते. बाळपणच्या गोष्टी बोलत होते. तें पाहून दुर्योधन विचलित झाला. सात्यकीशीं युद्ध करतांना थबकून तो म्हणाला, "क्रोध, लोभ, असूया व क्षात्र आचार, यांचा धिक्कार असो. सैन्याचा धिक्कार असो. मला लहानपणचें सारें आठवतें. तूं माझा प्राणाहून प्यारा मित्र. मीहि तुला तसाच. तो आज तूं माझ्याशीं युद्ध करायला तयार झालास. मला बालपणचें प्रेम आठवतें. तें सगळें युद्धांत संपून गेलें. क्रोध आणि लोभ याशिवाय युद्धांत काय आहे ?"

परंतु कृष्णार्जुनाची जोडी पाहून बाळपणच्या काव्यमय विश्वांत दुर्योधन शिरला होता तसा करड्या स्वभावाचा प्रौढ सात्यकि शिरूं शकत नव्हता. तो रुक्षपणें म्हणाला, "हें आचार्यांचें घर नाही. इथे आपण खेळायला आलेले नाहीं."

तरीहि दुर्योधनाच्या मनावरची मोहिनी उतरली नव्हती. तो त्या तंद्रींतच म्हणाला, "बाळपणची क्रीडा कुठे आहे ? खरोखर काळाची लीला अगम्य आहे. कुठे ती क्रीडा व कुठे हें युद्ध. आपण सारे लोभाने लढतों आहों."

हें ऐकून कृष्णालाहि राहवलें नाही. तो म्हणाला, "हेंच क्षात्र वृत्त की ज्यांत गुरुबरोबरहि लढावें लागतें. मला तूं मार." निःशस्त्र कृष्णाला दुर्योधन खरोखरीच मारील अशा शंकेने सात्यकीने त्या दोघांतल्या संवादाला पुढे स्वरच फुटूं दिला नाही. कृष्णाला दुर्योधनाच्या मनाचा मृदुपणा जाणवला होता आणि त्याच्या उत्तरांत कडवटपणा नव्हता, तर केवळ अपरिहार्य युद्धनीतीचा पुरस्कार होता. परस्पर प्रेमाहून श्रेष्ठ असलेलें युद्धाचें मूल्य होतें. पण या मूल्याचा आचार युद्धप्रवृत्तीला पोषक असला तरी उच्चार कुठे नेईल याची

खात्री सात्यकीला वाटत नसावी. म्हणूनच सात्यकि घाईघाईने म्हणाला, "मला माझ्या मित्रांना संकटांत घालायचें नाही." इतकें म्हणून तो उसळून लढूं लागला. त्याबरोबर दुर्योधनाचीहि कळा पालटली आणि तोहि उसळून लढूं लागला.

दुर्योधन कर्णासारखा ताठ राहूं शकला नाही. वैर प्रज्वलित असूनहि राहूं शकला नाही. परंतु तो पाण्यांतून वर आला, अनिच्छेने आला, आणि मग मात्र हा तुटलेला सांधा फिरून जुळला. बेमालूमपणें जुळला. निरखून पाहणारा-खेरीज इतरांना हा सांधा उमगणारहि नाही. त्यानंतर अखेरच आली. आणि अति उद्दाम अहंकाराने दुर्योधनाने मरणगति पत्करली. हा राजा भूमीवर निजला; सभोवार मृत परिवाराची सोबत घेत. केवळ धुगधुगी राहिली आहे-नाही अशा स्थितींतहि अश्वत्थाम्याने पांडवपरिवाराच्या समग्र विनाशाची सुखवार्ता सांगतांच दुर्योधनाचे प्राण डोळ्यांत आणि ओठांत परतून आले. डोळे किंचित् सुखावले. मन आर्द्र झालें. ओठांवर स्मित आलें. आपल्या परम मित्रांबद्दल त्याने कृतज्ञतेचे उद्गार काढले आणि वैराचा आणि स्नेहाचा परमोच्च बिंदु एकाच वेळीं अनुभवीत तो मरण पावला.

बालपणापासून व्यक्तिमत्त्वाची रेषाच हरवून बसलेला हा माणूस! परंतु या शेवटल्या दृश्याच्या आधाराने निळ्या धूसर रणभूमीवर, वैर आणि मैत्री यांच्या केवळ काळ्या-पांढऱ्या ठिपक्यांत भरलेली आकारहीन पण एक अति अवाढव्य आकृति मला दिसते. सामान्य योद्धयाची. मात्र ही आकृति इतकी प्रचंड आहे की तिच्यांतच युद्धांतले सारे योद्धे सामावलेले आहेत. आणि नवल हें की जरी या योद्धयाचें अंतरंग संकुचित असलें तरी या अवाढव्य आकारामुळे महाभारतांतली प्रत्येक व्यक्ति याच्याशीं सुसंवादाने किंवा विसंवादाने संबद्ध आहे. याच्या कोतेपणामुळेच हाच केवळ युद्धाचें प्रतीक झाला. क्रौर्य, संकुचितपणा, विनाश, हेच युद्धाचे विशेष. तेच त्याचेहि विशेष होते. अर्जुनाला कृष्णाने गीता सांगितली, आणि अर्जुन जिंकला म्हणून तो अनेकांना भारतीय युद्धाचा नायक वाटतो. मला तसें वाटत नाही. भारतीय युद्धाचा नायक, प्रणेता दुर्योधन. खलनायक असला तरी नायक तोच. पण तसें पाहिलें तर युद्धाला नायक असतोच कुठे? युद्धें होतात तीं खलनायकांमुळेच ना!

# ५

## एकाकी

दुर्योधन दुष्ट होता; भारतीय युद्धाचा अग्रेसर प्रणेता होता. द्रौपदीच्या मानभंगाच्या कल्पनेचा प्रमुख जनक होता. रजस्वलेला भर दरबारांत आणण्याची अभिनव दुष्ट कल्पना इतर कुणालाहि सुचण्यासारखी नव्हती. ती दुर्योधनाला सुचली. अनेक खुरटीं कपटें त्याने पांडवांविरुद्ध रचलीं आणि तीं डोळां राख झालेलीं पाहिलीं. युद्ध हें एकच पहिलें व शेवटलें धर्मबद्ध कृत्य त्याने अंगिकारलें. आणि नवल असें की एकदा युद्धाचा स्वीकार केल्यानंतर मात्र कपटापेक्षा शौर्याचाच आधार त्याने घेतला. अश्वत्थाम्याचें अगदी अखेरचें कृत्य सोडल्यास दुर्योधनाच्या बाजूने कपट झालें नाही. जें जें कांही लबाडीचें झालें तें सारें पांडवांच्याच बाजूने झालें. आणि नेमक्या याच गोष्टीमुळे कौरवांविषयी घृणेची भावना राहत नाही. राहते ती अनुकंपा. परंतु ही अनुकंपा केवळ दुबळ्या-भाबड्यांबद्दलची कीव होत नाही. तिलाहि एका अजोड श्रेयाची जोड मिळते. या बाजूचें न्यायाचें पारडें पांडवांइतकेंच जड होतें. फक्त पांडवांकडचा विचार केल्यास, न्याय त्यांना ताबडतोब जाऊन भिडतो. कौरवांच्या बाजूला प्रथम न्याय येत नाही. न्याय येतो तो कर्णाचें धीरगंभीर रूप घेऊन. कर्ण नसता तर कौरवांना न्याय देणें व्यासाला शक्य झालें नसतें. कर्ण नसता तर नीतीचें आव्हान इतकें उग्र झालें नसतें. कर्ण नसता तर पांडवांचा पीळ घट्ट झाला नसता. कारण दुर्योधनाला त्यांना युद्धाचें आव्हान देण्याइतकें अवसानच राहिलें नसतें.

कर्ण हा भारतीय युद्धांतलें आश्वासनाचें प्रतीक होता. कर्ण होता म्हणूनच

कृष्णाला गीतेच्या तत्त्वज्ञानाचा अर्जुनापुढे उलगडा करावा लागला. जगण्या-मरण्याचा वेदांत इतका तऱ्हातऱ्हांनी फुलवून-खुलवून सांगावा लागला. जीवनमृत्यूच्या अभिन्न तालाचें शब्दरूप प्रतीक गीता आहे; पण त्या तालाचें प्रत्यक्ष स्फुरण कर्णाच्या स्वभावांत व कृतींत आहे. कृष्ण आणि कर्ण या वास्तविक एकाच तात्त्विक भूमिकेच्या, पौरुष-चैतन्याच्या, निर्भयतेच्या आणि निर्ममतेच्या दोन प्रतिमा आहेत. एका प्रतिमेला दैवी स्तरावर ठेवणें व्यासाला आवडलें. दुसऱ्या प्रतिमेला त्याने संपूर्ण पार्थिव स्तरावर ठेवलें. या दोघांना विरोधी बाजू घ्यायला लावण्यांत व्यासाने एक कलात्मक सिद्धि मिळविली. भीष्म, द्रोण, अश्वत्थामा हे युद्धांत पांडवांचे विरोधी नव्हते का ? पण त्यांचा विरोध हा केवळ त्या युद्धापुरताच मर्यादित होता. एक प्रकारें कृत्रिम होता. मनांतून ते पांडवांचे प्रेमी होते. त्यांना खाल्लया अन्नाला, दिलेल्या वचनाला, धर्मयुद्धाच्या वीरोचित कर्तव्याला जागायचें होतें. भावनाशून्य होऊन त्यांनी वैऱ्याच्या भूमिकेचा पवित्रा पार पाडला. पण कर्णाचें तसें नव्हतें. त्याचें वैर ज्वलंत होतें. अनेक कोंडलेल्या भावनांचे उद्रेक त्यांत होते. वैराच्या परिपूर्तीसाठी केवळ दुष्टपणाचा आधार त्याने घेतलेला नव्हता. त्याने वैऱ्यांना दान दिलें तें भरल्या मनाने. आपल्या विनाशाचें तें दानरूप प्रतीक त्याने केव्हाच ओळखलें. आणि तरीहि अर्जुनाच्या प्राणांचें रक्षण करणाऱ्या इंद्राला त्याने कवचकुंडलांचें दान न कुरकुरतां दिलें. सूर्याने तीं देऊं नको म्हणून सांगितलें असतांना दिलें. हें दान देतांना कर्णाच्या मनांत काय आलें नाही ? सर्व वासना, सर्व कटु कर्तव्याच्या भावना, सारे पीळ आणि समर्पणाच्या भावनेची परिपूर्ति—सारें कांही त्यांत होतें.

कुंडलें कानांत होतीं तोंपर्यंत कर्ण अवध्य होता. तेजाने चमकत होता. कुंडलें कापतांना कानांचा छेद होणार होता. तेज तर जाणारच होतें. मृत्यु अटळ होता. आणि आपला मृत्यु म्हणजे पांडवांचा जय हें सत्यहि त्याला कळून चुकलें होतें. तरीहि कुंडलें त्याने दिलीं. त्या वेळीं कर्ण मृत्यूला भ्याला नाही. पांडवांच्या जयाच्या कल्पनेने व्यथित झाला नाही. तो विचलित झाला एकाच गोष्टीने. कान तुटले तर आपला चेहरा विद्रूप होईल या शंकेने. आणि तीं देतांना त्याने इंद्राकडून आपलें शारीरिक व्यंग झाकलें जावें असा वर मागून घेतला. इंद्रानेहि तो दिला. इंद्र सौंदर्याचा भोक्ता. अनेकांचीं अपंग

शरीरेंहि त्याने सुंदर व सतेज करून दिलेलीं. मग मुळांतच सुंदर, सुदृढ कर्णाचें हें लहान कां होईना पण आपल्याला दिलेल्या भिक्षेंतून उत्पन्न झालेलें कुरूपपण इंद्रालाहि सहन होणारें नव्हतें. शोभा देणारें नव्हतें. तसें वरदान आपणहून न देणेंहि त्याला कमीपणाचें होतें. स्वतःच्या जीवनाचें दान देणाऱ्या या वीरबलीची काया अभंग, सुंदरच असावी व यज्ञकर्म संपूर्ण व्हावें हा संकेतहि यामागे असावा.

परंतु कर्णाच्या बाजूने विचार केल्यास, ज्या वेळीं कर्ण हा अर्जुनाला अशा गुप्त रीतीने प्राणदान देण्याच्या त्यागभावनेच्या स्फुरणाने भारला गेला होता, एक प्रकारें व्यथित झाला होता—स्वामीची, दुर्योधनाची इच्छा परिपूर्ण करण्यास आपण असमर्थ ठरणार असें वाटून एका बाजूने खचला होता—त्या वेळींहि प्रत्यक्ष दानक्रिया करतांना त्याच्या नकळत एक प्रतिक्रिया त्याच्या मनांत उमटली. आपण सुंदर आहों ही गोष्ट कर्णाच्या मनोमनीं मुरलेली होती. आपल्या सौंदर्यास, बलास उचित असे भोग जरी आपल्याला जन्मलांछनामुळे मिळाले नाहीत, तरी आपलें सौंदर्य इतर कुणाहि पुरुषापेक्षा पाहणारास मोहित करतें हें त्याला माहीत होतें. "दैवाधीन जन्म; माझ्या हातीं पौरुष आहे, पराक्रम आहे—" असें सांगणारा कर्ण आपल्या परम सुंदर व अतिभव्य व्यक्तिमत्त्वाचा चुकूनहि उल्लेख करीत नाही. उद्घोष करतो तो फक्त आपल्या प्रयत्नांचा. पुरुषार्थाने भरलेल्या वृत्तीचा. परंतु आपल्या निसर्गदत्त सौंदर्याचा अभिमान व त्याचें निसर्गदत्त कौतुक डोळ्याडोळ्यांत उमटून जातें याची जाणीव त्याच्या मनांत इतकी खोल गेली होती की, ती उच्चारण्याइतकीहि वेगळी राहिली नव्हती.

पण कान जेव्हा आपल्या हाताने चिरले, तेव्हा मात्र जें आजवरचें आपलें निसर्गदत्त देणें होतें तें गेलें ही जाणीव त्याला झाली. कुंडलांचें लेणें गेलें याबद्दल जराहि हळहळ त्याला वाटली नाही. परंतु जन्माने जी एकच एक देणगी त्याला दिली होती, तिचा हा विच्छेद त्याला जाणवला. नकळत त्याने मागणें मागितलें. याचक म्हणून नव्हे, दीन होऊन नव्हे, तर कांही तरी मोलाचें, केवळ आपल्याच हक्काचें असें हरवलें म्हणजे माणसाची स्वाभाविक प्रतिक्रिया तें मागण्याची, कुणाकडेहि मागण्याची, होते; तीच अहेतुक कृति कर्णाची होती. इंद्र व कर्ण या दोघांच्या मनोमनीं एकाच वेळीं ही प्रतिक्रिया, ही हळहळ,

उमटली. कर्णाला स्वतःबद्दल अशी हळहळ वाटली ती ही प्रथमच. स्वतःबद्दल कीव आली, पण इथे आता क्रोध नव्हता. क्षात्रतेज झाकून घ्यायचें नव्हतें. क्षात्रतेजाच्या उदार आविष्कारांत आपल्या कुरूपपणाचें भान त्याला झालें. इतर कुणालाहि होईल तसें. या असामान्य क्षणीं, समर्पणाच्या क्षणीं, अगदी स्वतःचें असें आपलें शरीर पूर्ण सौंदर्यानें भरलेलें असतांच मृत्यूच्या वेदीवर पडावें असें त्याला वाटलें का? मला वाटतें की, नाही. सुरूपतेचा अंत हा प्रत्यक्ष मृत्यूपेक्षाहि भयानक असतो. त्या भयानकाचा क्षणमात्र पण प्रत्यक्ष अनुभव कर्णानें घेतला. आणि त्या अनुभवानेच रसरसत्या जीवनाशीं असलेला त्याचा संबंध अत्यंत दृढ केला.

कर्णाचें मरण त्या समर्पणाच्या क्षणीं निश्चित झालें. परंतु ही प्रतिक्रिया जणु कर्णालाहि डावलून त्याच्यामधून विजेसारखी उद्भवली. स्वतःच्या क्षणभंगुर देहाच्या सौष्ठवाबद्दलचें ममत्व, भीतीचा धक्का खाऊन अधिक सचेतन झालें. कर्णाच्या साऱ्या इच्छा प्राकृतिक झाल्या. स्वतःच्या सौंदर्यचिंतनांत तो क्षणमात्र कां होईना पण नार्सिससप्रमाणे बुडाला. नार्सिससप्रमाणे तो त्यांतच अडकला नाही, कारण कर्ण हा मूळचा आत्मकेंद्री असला तरी अति कर्तव्यबद्ध होता. बाळपणापासून अपमानित असल्यामुळे पौरुषाची पूजा करणारा होता. जीवनाचा उपभोग व जीवनाचें समर्पण हीं दोन्ही विरोधी टोकें त्याने क्षणाक्षणाने जगलेल्या आयुष्यांत ओतलीं होतीं. भोग त्याने हावरेपणाने भोगले नाहीत. द्रौपदीचा स्वामी होण्यास लायक असा तो होता. कृष्णाने त्याला त्याचें जन्मवृत्त सांगितलें आणि "तूं पांडवांना येऊन मिळ, द्रौपदी तुला पति म्हणून स्वीकारील," असें आश्वासन दिलें, तरीहि कर्णाचें मन चळलें नाही.

द्रौपदी का त्याला नको होती? कोणत्याहि दुष्प्राप्य स्त्रीचें मन आकर्षून घेण्यास समर्थ असा हा कर्ण इतका मानी होता की, मानीपणाबरोबर येणारी लीनताहि त्याने सहज धारण केली. रावणाप्रमाणे आपलें मन त्याने द्रौपदीभोवती भटकूं दिलें नाही. किंबहुना द्रौपदीला त्याने तुच्छहि मानलें. आणि राधेने पसंत केलेल्या स्त्रियांशीं, सूतकन्यांशीं त्याने सुखाचा संसार केला. आपल्या मुलांवर पोटभर प्रेम केलें. क्षत्रिय कन्यांची अभिलाषा त्याने सहज जिंकली, राजा झाल्यानंतरहि जिंकली. कर्णाने भोगांचें ऐश्वर्य जाणलें, पण त्यांची गुलामी पत्करली नाही. जें मानाने मिळालें, जें देणें प्रेमाने आलें, तें त्याने

स्वीकारलें. दुर्योधनाने दिलेलें राजपद त्याने ग्रहण केलें. दुर्योधनाच्या करुणावृत्तीला त्याने उपेक्षिलें नाही. दुर्योधनामधली मैत्रीची भावना कर्ण नसता तर कधीच अशी विकसित झाली नसती. कृतज्ञतेचा हा अंकुर बरें-वाईट, न्याय-अन्याय यांनाहि प्रसंगीं उपेक्षून कर्णाने वाढवला. कर्ण आंतून जळत होता. जन्माच्या कालिम्यामुळे अगतिक झाल्याने जळत होता. त्या ज्वालेने त्याच्यांतली रसिकता, कामुकता,—सारें ग्रासून टाकलें होतें. एकच नाजुक, अगदी अंतर्गाभ्यांतला, कोंब टिकला होता, आणि कधी न जळणारा म्हणूनच टिकला होता. तो कोंब म्हणजेच स्वतःच्या सुंदरपणाची सुखद जाणीव. कर्णाचें स्वरूप कुंडलें गेल्यावरहि, इंद्राच्या वरदानामुळे कां होईना, परंतु पूर्वीप्रमाणेच सुंदर व मोहक राहिलें. कर्णाच्या स्वतःच्या रूपाविषयीच्या कातरतेंत दुसरीहि एक अत्यंत अमोल अशी नैतिक सौंदर्याने भरलेली कातरता, परम कल्याणकारक अशी लाजवट भावना, व्यासाने किंचित् भासमान होईल अशा रीतीनेच लपवून ठेवली आहे. आपल्या मित्रांना आपलें व्यंग दिसलें तर ते व्यथित होतील. आपल्या शत्रूंना, भावांना व्यंग दिसलें तर ते घृणेने किंवा करुणेने हिरिरीने लढणार नाहीत आणि आपण जें दान गुप्त रीतीने केलें तें विफल जाईल, या भयानेच जणु त्याने इंद्राकडून तें पूर्णसौंदर्याचें मागणें मागून घेतलें. अधिरेपणाने घेतलें. बालिशभावाने घेतलें. कर्णाच्या मनाचे सारे पीळ त्या क्रियेंत कसे सैल पडले आहेत. या भावनेंत ज्यांचें मरण सुंदर असतें, त्यांच्याच मनाचे ताणतणावे अखेरच्या क्षणीं असे चैतन्यपूर्ण पण अगदी सैल पडलेले असतात. तिथूनच त्यांचें जीवन मागे-पुढे असें कांही अंकुरत असतें. कर्णाच्या जीवनाचे हिरवे अंकुर याच सौंदर्यपिपासेच्या क्षणाला टवटवले आहेत.

या जाणिवेंतूनच कर्णाला स्वतःचें व्यक्तिमत्त्व समग्र न्याहाळतां आलें आणि सारें होमून मोकळें होण्याची शक्ति आली. कर्णाचें व्यक्तिमत्त्व त्याच्या साऱ्या देहाकृतीला व्यापून राहिलें आहे. कर्णाची आकृति ही महाभारतांतली एक अत्यंत सुस्पष्ट व सर्वांत ललित अशी आकृति आहे. महाभारतांतल्या व्यक्तींचें चित्र मनोमन रेखाटायचें झाल्यास द्रौपदी, कर्ण, भीम व किंचित् अर्जुन एवढींच पात्रें हातीं गवसतात. अंगुळभरसुद्धा देहरेखा न हरवलेला परिपूर्ण आकार कर्णाचाच. पौरुष त्याच्या अंगाअंगांतून वाहतें आहे. नदीच्या पुराचें पाणी तिच्या कडांना न जुमानतां वाहतें तसा कर्णाचा चेहरा अनेक प्रसंगीं

त्याच्या नसेनसेसकट, प्रत्येक भावांदोलनाने ढवळून निघालेला मला स्वच्छ दिसतो. द्रौपदीचें रूप आठवायचें म्हटल्यास एकच महत्त्वाचें आढळतें. न्याय मागणाऱ्या क्रुद्ध भामिनीचें. भीमहि केवळ स्फुरणाने लढणारा योद्धा दिसतो. अर्जुन मला नेहमी अधोमुखी दिसतो. जेव्हा तो तसा नसतो तेव्हा तो पाठमोरा असून कुठल्या ना कुठल्या तरी कार्यांत गढलेला असतो. परंतु कर्णाचें तसें नाही. क्रिया ही कर्णाच्या बाबतींत दुय्यम दर्जाची गोष्ट आहे. दुर्योधनाला द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगीं निर्लज्जपणें उत्तेजन देण्याची क्रिया असो, कुंडलाचें दान असो, नाही तर घनघोर युद्ध असो, खरा कर्ण त्या कृत्यापासून मनोमन दूरच असतो. त्याला जाळींत असलेली व्यथा त्याच्यांत व इतरांत नेहमी अंतर उत्पन्न करते. त्यामुळे प्रत्येक प्रसंगीं कर्णाचे हावभाव इतरांपेक्षा निराळे व उठून दिसतात. कर्णाचें वर्तन दुष्ट असो की उदार, त्याचें रूप नेहमी विलोभनीय वाटतें. त्याचें शवहि सुंदर राहिलें आहे.

कर्ण हा सदा एकाकी, सदा स्वतःच्या न्याय्य स्थानापासून बाजूला टाकलेला असा आहे. भारतीय समाजांतलें जातीचें कुंपण इतकें बंदिस्त की, तें ओलांडून जाणें अशक्य. जातिबाह्य किती मोठा असो, त्याचें जीवन निर्माल्यवत्. या निर्घृण पारंपरिक नीतीवर कुणीहि आक्षेप घेऊं शकत नसे. जातिधर्म व्यक्तीची थोरवी जाणीत नसे. कर्ण, एकलव्य यांची थोरवी जाणूनहि व्यासाला त्यांना जातिमर्यादेबाहेर मोठेपणा किंवा कौशल्य भोगूं देणें परवडलें नाही. सामाजिक दंडक किती अनुल्लंघनीय असतात हेंच याच्यावरून दिसून येतें. व्यक्ति मोठी होते. परम तत्त्वज्ञानी होते. ब्राह्मणापेक्षा धर्मव्याध व्युत्पन्न होऊं शकतो. परंतु त्याने कर्म मात्र पूर्वपरंपरेचेंच ठेवलें पाहिजे. ही उच्चनीचता विदुराच्याहि न्यायबुद्धीला मारक ठरली. योग्य दिसेल तें व्यक्तीच्या बऱ्या-वाईट कृत्यांच्या संदर्भात तो बोलला. परंतु जिथे एकलव्याची किंवा कर्णाच्या रूपाने अधर्मसंततीची किंवा हीनजातीयाची समस्या पुढे ठाकली तिथे तिला डावलूनच त्याला राहावें लागलें. जातीयतेची विषम नीति बौद्धिक किंवा आत्मिक समतेच्या आड येते ही जाणीवच त्या वेळीं नव्हती: मात्र एकलव्य, कर्ण यांच्या रूपाने एक अनामिक कटु सत्य मात्र साऱ्यांना अनु-भवायला मिळालें. पूर्वकर्मांमुळे या लोकीं जन्म मिळतो अशा समजुतीवर ज्यांच्या वाट्याला हीन जन्म येई त्यांनी निमूट दिवस काढायचे. मात्र या

कर्माच्या ऐसपैस तत्त्वज्ञानालाहि कर्णाच्या अति घन व्यक्तिमत्त्वाला स्पर्श करतां आला नाही. द्रौपदीचा पूर्वजन्म तिने पांच पतींना वरतांच व्यासाला प्रकट करावा लागला. पण जन्मतःच आईने टाकलेल्या कर्णाच्या पूर्वजन्माचें वृत्त सांगण्याला व्यासहि समर्थ झाला नाही. सबंध महाभारतांत नियतीने पुरी पुरी घेरलेली कुणी व्यक्ति असेल तर ती कर्णाचीच. पण कर्माचें विशाल तत्त्वज्ञान तिच्या प्रत्यक्ष कृतीपुढे व मानी सोशिकपणापुढे उणें ठरलें. भगवद्गीतेचा सारा कर्मयोग एकीकडे आणि कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा उच्चार न करतां केवळ पौरुषाचीच कास धरून जिद्दीने उभें राहणारें कर्णाचें व्यक्तिमत्त्व दुसरीकडे. जिवंतपणींच अनंत मरणें कर्णाने गिळलीं.

वीरोचित प्रीतिलाभाची हानि कर्णाने द्रौपदीस्वयंवराच्या वेळीं गिळली. कर्ण उभा राहिला. पण जिंकणें त्याला अशक्य नव्हतेंच. प्रत्यक्ष सूर्य वरून आल्हादून त्याच्याकडे कृपेने पाहत होता. परंतु द्रौपदीचें "मी सूतपुत्राला वरणार नाहीं," हें वाक्य ऐकतांच कर्णाने मुकाट्याने धनुष्य टाकून दिलें. त्या वेळीं त्याने सूर्याकडे पाहिलें. क्रोधाने जळत असतांहि तो सूर्याकडे पाहून हसला. आपल्या जन्मदात्याला ओळखून, पुरें जाणून कर्ण हसला. क्रोधाहून हें हसणें फार तीव्र होतें. सर्वस्वदान देऊन, अपमान सोशीत, मुद्दाम ठेंगणें होऊन जगायचें होतें. क्षुद्रत्वाचा बहाणा चालू ठेवायचा होता. द्रौपदीला सभेंत ओढून आणल्यावर कर्ण हसला. तें हसणें द्रौपदीच्या मनांतून कधी गेलें नाही. मात्र तें हसणें म्हणजे आपल्या स्वयंवराच्या वेळच्या वागणुकीला आणि मयसभेंत दुर्योधनाला आपण हसलों त्याला तितकेंच मर्मभेदक प्रत्युत्तर आहे हें तिला कसें उमगलें नाही, कोण जाणे! उमगतें तर तिने कृष्णापुढे त्याचा इतका खल केलाच नसता. द्रौपदीला उद्देशून सभेंत कर्ण जें बोलला, तें तो वीर म्हणून बोलला नाही, क्षत्रिय म्हणून बोलला नाही, राजा म्हणून नाही; सूतपुत्र राधेय 'दासी'ला उद्देशून बोलला. कर्णाने स्वस्थितीबद्दल हळहळ दाखवली नाही. परंतु हे बोल मात्र द्रौपदीच्या निर्भर्त्सनेपेक्षा त्याच्या स्वतःच्याच भग्न मनोवृत्तीचे अधिक द्योतक आहेत.

कर्णाच्या नैसर्गिक प्रवृत्ति अत्यंत उदात्त, भावना अतिशय खोल. परंतु या प्रेरणांना पुरतील एवढे संस्कार मात्र त्याच्या दुर्दैवाने त्याला मिळाले नाहीत. एकलव्याची उत्तरकथा व्यासाने निवेदन केली नाही. परंतु कर्णाच्या

पूर्ववृत्तापेक्षा त्याचें उत्तरवृत्त अतिशय सूक्ष्मतेने त्याने निवेदन केलें आहे. यांत कुठेहि कृत्रिमतेची बाधा त्याने या व्यक्तिचित्राला लागू दिलेली नाही. कर्णाचें परमभूषण म्हणजे त्याचें औदार्य, निरुपम औदार्य. पांडवांविषयी मनांतून जळत असतांहि कुंतीला त्याने दिलेलें वचन म्हणजे कुंतीच्या ओटींत त्याने टाकलेलें आपलें मरण. जें त्याचें जीवन तिने पूर्वी फेकून दिलें होतें, त्याच जीवनाला मृत्यूचा आकार देऊन कर्णाने तें तिच्याकडे परत झुगारून दिलें. 'हा तुझा तुच्छ देह तुलाच प्रत्यर्पण' असें म्हटल्यासारखें तें होतें. कुंडलांच्या दानांत तरी दुसरें काय होतें? परंतु युद्धकौशल्य, विलक्षण प्रगल्भ व्यक्तिमत्त्व आणि शूरोचित धैर्य त्याच्याजवळ असलें, तरीहि कर्णाचें व्यक्तिमत्त्व अनेकदा संस्कारहीन वाटतें. द्रौपदीला उद्देशून सभेंत "गाय, गाय" असें ओरडणें; "तुझे पांच नवरे गेले, आता या कौरवांजवळच तूं दासी म्हणून राहा" असें बोलणें, युद्धाच्या वेळीं भीमाला "मूर्ख, खादाड, भ्याड" असें बोलणें; द्यूताच्या मसलतींत शकुनीला उचलून धरणें; पांडव वनांत एकटे असतांना त्यांच्यावर घाला घालण्याची मसलत करणें;—या गोष्टी ग्राम्य संस्कारांच्याच निदर्शक आहेत. आणि नेमक्या याच गोष्टींचा पांडवांनीहि वेळीं-अवेळीं उच्चार केला. युद्धांत भीमाला बोललेले शब्द क्षत्रियधर्माला अनुसरून नाहीत असें अर्जुन त्याला म्हणाला. एवढेंच नव्हे तर अर्जुनाने त्याला 'प्राकृत', 'मूढ' असेंहि म्हटलें. भांडणाच्या वेळीं दोन्ही बाजूंनी खरें तेंच बाहेर पडतें; पण तें कर्कश होऊन, म्हणजेच अवस्तवा होऊन. कृष्ण, कर्ण, अर्जुन—कोणीच याला अपवाद नव्हते. परंतु कर्णाच्या 'प्राकृत' वृत्तीचा उल्लेख सहजासहजी डोळ्यांआड करतां येत नाही. कर्णाला राजपुत्र म्हणून कुणीं कौडकौतुकाने शिकवलें होतें? त्याला सभेंत कसें वागायचें, राजनीतीचें दुहेरी धोरण मुलायमपणें कसें सांभाळायचें, व्यवहाराचें व मृदु भाषेंतहि कठोर, लागट बोलण्याचें थोरामोठ्यांचें तंत्र कुणीं शिकवलें होतें? कर्ण शिकला तें सारें आपण होऊन. उपजतच तो फार श्रेष्ठ होता म्हणून तो मागे राहिला नाही, इतकेंच. 'सूतपुत्र' ही शिवी रात्रंदिवस त्याला सर्वांकडून खावी लागली. मेल्यावरच तो पार्थ झाला. क्षत्रिय झाला. आपण क्षत्रियत्वाच्या संस्कारांना मुकलों हें शल्य इतर सर्व दुःखांपेक्षा कर्णाला जास्त जाचत होतें. कारण वीरावेश दाबून टाकून केवळ सारथ्याचा मुलगा म्हणून जगणें तर सर्वथैव अशक्य होतें. भारतीय युद्ध ही कर्णाला मिळालेली सर्वांत मोठी दैवाची देणगी.

कर्णाला 'सूतपुत्र' हें तुच्छतेचें बिरुद किती वेळां ऐकावें लागलें कोण जाणे! तें त्याने कधी निमूटपणें गिळलें, तर कधी दातओठ खाऊन. परंतु कर्णाच्या मर्मावर सर्वांत मोठा आघात कुणीं केला असेल तर तो भीष्मानेच. कर्णाच्या युद्धकौशल्याची कल्पना कुंतीला रणरंगभूमीच्या प्रसंगीं चांगली आली. हा पोरगा कौरवांकडे जाऊन आपल्या मुलांचा वैरी होणार या जाणिवेने ती व्यथित झाली. परंतु युद्धकुशल भीष्माला मात्र ही गोष्ट उमगूं नये, याचें आश्चर्य वाटतें. युद्धाला प्रारंभ व्हायचा, त्या वेळीं हा सेनानी सर्व योद्धयांच्या गुणांचें वर्णन करीत होता. 'हा रथी', 'हा महारथी' असें म्हणत असतांना जेव्हा कर्णाची पाळी आली तेव्हा साऱ्यांच्या देखत भीष्म म्हणाला की, "कर्ण हा अर्धरथी आहे." सूतपुत्र महारथी होऊं शकत नाही. अंगदेशाचा राजा केलें तरी सारथ्याचें पोर अर्ध्या रथाचेंच वाटेकरी. भीष्माच्या तोंडाने गतानुगतिक जातीय परंपरा बोलत होती. द्रौपदीचें बोलणें गिळणें सोपें होतें. परंतु हें बोलणें कर्णाला दुःसह झालें. आयुष्यांत अगदी प्रथमच आपल्याला कुणी उपमर्दकारक बोललें म्हणून त्याचा निषेध कर्णाने तिथल्या तिथे केला असेल तर तो या वेळीं. दुर्योधनालाहि तें ऐकून बरें वाटलें नाही. आणि त्याने भीष्माच्या विरुद्ध कर्णाला उत्तेजन दिलें. कर्णाच्या क्रोधाचे अनेक उद्रेक महाभारतांत आहेत. किंबहुना चिडून टाकून बोलणें हाच त्याचा स्वभाव. मनांत माया असली तरी मनांतला थोडाहि कडवटपणा त्याला लपवितां आला नाही. लपवण्याची जरुरीहि वाटली नाही. उग्रपणा हें पौरुषाचेंच महत्त्वाचें अंग आहे असें त्याला वाटत असावें. परंतु हातीं शिर घेऊन लढायला सिद्ध झालेल्या कर्णाला भीष्माने चारचौघांसमोर 'अर्धरथ' असें म्हटलें तेव्हा कर्ण जसा संतापला तसा तो कधीच संतापला नव्हता.

भीष्माला कर्ण जे शब्द बोलला तसे उद्दाम, दर्पयुक्त पण संपूर्ण सत्य शब्द कुणी कुणाला कधी बोललें नसेल. पण ते बोलणारा कर्ण व ऐकणारा भीष्म होता. आणि म्हणूनच या उद्गारांचें मोल विशेष आहे. कृष्णाशीं बोलतांना, कुंतीशीं बोलतांना कर्णाने जो संयम बाळगला तोच त्याने इथेहि पाळला. भीष्माचीं वर्मे त्याने काढलीं नाहीत. स्वतःचें मनोदौर्बल्यहि प्रकट केलें नाही. आणि म्हणूनच त्याचे हे बोल अत्यंत प्रखर झाले आहेत. कर्ण भीष्माला म्हणाला, "तुम्ही जिवंत आहांत तोंवर मी युद्ध करणार नाहीं. जर तुमच्या

हातून पांडव मेले, तर मी दुर्योधनाच्या अनुज्ञेने कायमचा वनवास पत्करीन. जर तुम्ही पांडवांकडून मारले गेलांत तर मी एकाच रथाने सर्व महारथ्यांचा संहार करीन." आणि मानी कर्णाने दहा दिवसपर्यंत युद्धांत भाग घेतला नाही. भीष्म अखेर पडला आणि मग मात्र कर्ण हा कर्तव्यनिष्ठ योद्धा झाला. त्याच्यांतला तो उद्दाम, उत्स्फूर्त निर्वाणीचा आवेश मावळला. तो माणूस झाला. भीष्माचा अनुयायी झाला. नम्र योद्धयाच्या भूमिकेंत आसन्नमरण सेनानीबद्दल दुःखी झाला. कर्णाने युद्धांत अश्रु दोनदाच गाळले. भीष्माच्या मरणाच्या प्रसंगीं आणि स्वतःचा मुलगा मेला तेव्हा. भीष्मानेहि या प्रसंगीं त्याच्या भावनांची व शौर्याची बूज राखून त्याला लढण्यास प्रोत्साहन दिलें.

हा लहानसाच प्रसंग. पण त्याच्याभोवती केवढें गुंतागुंतीच्या भावनांचें नाट्य व्यासाने खेळतें ठेवलें आहे. इथे शापाचें ओढूनताणून आणलेलें कारण नाही. दोन प्रभावी मनांचा संघर्ष आहे. संघर्षाच्या स्वाभाविक परिणतींतच या प्रसंगाचें कलामूल्य दडलेलें आहे. अपरिमित क्षोभाचें विसर्जन क्षमाशील शोकांतच व्हावें, हें कर्णाच्या जीवनाशीं सुसंगत असलेलें सत्य अगदी अर्धस्फुट असें व्यासाने ठेवलेलें आहे. आपलें जन्मवृत्त उघड असें अनपेक्षित तऱ्हेनेच कृष्णाकडून कर्णाला कळलें. अगदी आकस्मिक अशीच कुंतीची आणि त्याची गाठभेट झाली. त्याच त्या आकस्मिक प्रकारें भीष्माने केलेल्या पाणउताऱ्याचा अनुभव त्याने घेतला. आणि या उत्तरोत्तर युद्धोन्मुख चढत्या आकस्मिकपणाचा शेवटचा बिंदु म्हणजेच भीष्माला कर्णाने दिलेलें प्रत्युत्तर व त्याचा आकस्मिक शस्त्रसंन्यास. या बिंदूला कलाटणी भावनोत्कट शोकनिदर्शनाने मिळावी यांत नवल नाही. योद्धयाचा आवेश चढा असतो, पण त्याचें मन भाबडें असतें. श्रद्धाळू असतें. ज्याच्यावर श्रद्धा ठेवायची त्या सेनापतीशींच दुर्दैवी कर्णाची अशा वेळीं चकमक उडावी आणि त्या क्षोभाने 'तूं नाही तर मी' अशी अवस्था यावी हाहि एक करुण परिहासच इथे निर्माण झाला आहे. पण इथे कर्णाला आपण आततायी, असंस्कृत म्हणायला धजत नाही. त्याने दहा दिवस युद्धांत भाग घेतला नाही, म्हणून कौरवांचें उघड नुकसान झालें, हें त्याला का माहीत नव्हतें? पण तरी कर्ण तसाच बसून राहिला. कुंतीला दिलेल्या वचनाचें प्रत्यंतर का तो घेत होता? इतर पांडवांना आपण मारायचें नाही, मारायचें फक्त अर्जुनाला; तर मग भीष्माने जर परस्पर त्यांना मारलें तर

दुर्योधनाचें भलें होईल आणि आपणाला वचनाला जागतां येईल असें का वाटलें त्याला ? आपल्या बोलण्याने, आपण युद्धांतून निवृत्त झाल्याने भीष्माला पराक्रमाची शीग गाठावी लागेल, ही वृत्ति कर्णाच्या त्राग्यामागे नव्हतीच असेंहि म्हणतां येत नाही.

या युद्धांत दोन प्रतिज्ञा निर्माण झाल्या. दोघींचाहि संबंध भीष्माशींच आला. दोन्ही प्रतिज्ञाहि शस्त्रत्यागाच्या. अर्जुनाला वाचवण्यासाठी कृष्णाला आपली प्रतिज्ञा भीष्माच्या बाबतींत मोडावी लागली. कर्णाची प्रतिज्ञा भीष्माच्या मृत्यूपर्यंतची असल्याने त्या प्रतिज्ञेची पूर्तता झालेली त्याने अनुभवली. भीष्माच्या मृत्यूनंतर संपूर्ण योद्ध्याच्या भूमिकेंत अत्यंत उंचावलेलें असें कर्णाचें व्यक्तिमत्त्व आपल्याला जाणवतें. नेहमीच्या दरबारी वातावरणांत, सामाजिक व्यवहारांत कर्णाचें आचरण थोडें ग्राम्य वाटलें, तरी कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा प्रखर नीतिमत्तेने भरलेला होता. योद्ध्याची भूमिका ही त्याची खरी भूमिका. ती त्याची भूमिका त्याला पूर्णत्वाने मिळाल्यावर प्रसंगा-प्रसंगांतून कर्ण या नीतीचें किती प्राणपणाने रक्षण करीत होता तें दिसून येतें. युद्धांत ज्याला 'अधर्म' म्हणून अर्जुन म्हणाला तें केवळ कठोर वचन; दुसरें कटु वचनाचें उदाहरण म्हणजे शल्य आणि कर्ण यांनी परस्परांना केलेलीं दुरुत्तरें. परंतु तिथेहि शल्यानेच कटू बोलायला प्रारंभ केला. कर्णाचें सारथ्य हा त्याला अपमान वाटला. त्या अपमानाची भरपाई उघड दुरुत्तरें बोलून त्याने करून घेतली. आणि म्हणूनच या दुरुत्तरांत कर्णाला दोषी ठरवतां येत नाही. अर्जुनाने भीमाबद्दल (भीमाचा प्राण घ्यायच्या युक्त्या लहानपणीं दुर्योधनाला सुचवल्याबद्दल) कर्णाला बोल लावला. पण पुढे कर्णाला उद्देशून कृष्णाने जें तोंडसुख घेतलें आणि रथाचें चाक भुईंत शिरल्यावर त्याचा अधर्माने वध करवला त्याबद्दल काय ?

कर्णाच्या प्रतिज्ञेंत आणि नंतरच्या शोकरूपी प्रतिक्रियेंत जिथे कृष्ण, अर्जुन, युधिष्ठिर व भीम तिथेच जय हें त्याला उमगलेंच होतें. त्याने त्या शोकांतच त्याचा उच्चार केला. आणि आपलें सारें बळ अर्जुनालाच मारण्याच्या धडपडींत खर्च केलें. याच शोकांत कर्णाने मैत्रीच्या भावनेचाहि उल्लेख केला आहे. आपण आपलें कर्तव्य केलें नाही तर मित्राचें ऋण फेडायचें आपलें परमश्रेष्ठ कर्तव्य राहून जाईल हीच काळजी त्याला होती.

पैलू न पाडलेल्या हिऱ्यासारखें कर्णाचें व्यक्तिमत्त्व आहे. त्याच्या अंतरांत तेजोगर्भ आहे. बाहेर खडबडीतपणा आहे. कर्णाचें तेज त्याच्या मानीपणांत आहे. सोशिकपणाचा कळस कर्णांत दिसतो. मांडी भुंग्याने पोखरली तरी कर्णाने मांडीची बैठक मोडली नाही की हां हूं केलें नाही. पण जसा शारीरिक तसाच मानसिक सोसाळूपणाहि त्याच्यांत होता. मानीपणाचाच तो सौम्य आविष्कार आहे. कर्णाला आपण कोण हें माहीत नव्हतें असें म्हणवत नाही. नाही तर द्रौपदीच्या स्वयंवरांत सूर्याकडे पाहून त्याने विषण्ण स्मित केलेंच नसतें. कृष्णाने 'तूं कुंतीचा मुलगा' म्हणून सांगितल्यावरहि क्रोध किंवा आश्चर्य त्याला वाटलेलें दिसत नाही. ही गोष्ट आपल्याला पूर्वीपासूनच माहीत आहे, अशा थाटांत तो अतिशय शांतपणें कृष्णाला आपला निश्चय सांगतो. 'सूतपुत्र' हें बिरुद मिरवण्याचा त्याचा निश्चय, त्याचा आपल्या मानलेल्या आईबापां-बद्दलचा जिव्हाळा पाहून कृष्णहि निरुत्तर झाला. राज्य, मानसन्मान, स्त्री आणि आतापर्यंत वंचित असलेलें क्षत्रियत्व यांची उघड प्राप्ति कर्णाने ठोकरून दिली. ज्या मातींत तो वाढला तिच्याशीं त्याने इमान राखलें. प्रलोभनाने मिळालेलें यश तुच्छ लेखलें. पुढे कुंतीशीं बोलतांना त्याने कुठेहि आततायी बोलणें केलें नाही. 'मला टाकलेंस तें तूं बरें केलें नाहीस' हेंच तो म्हणाला. आणि "अर्जुन सोडून कर्णासह, किंवा कर्ण सोडून अर्जुनासह पांच पुत्र तुला राहतील" असें आश्वासन तिला दिलें;—आणि असें म्हटलें तरी मनोमनीं अर्जुनाचेहि प्राण त्याने तिला दिले, कुंडलांच्या दानाच्या रूपाने. इतकेंच नव्हे तर आईचें हें गुपित त्याने मरेपर्यंत कायम राखलें. कोणत्याहि प्रकारें पांडवांना त्याचा सुगावा त्याने लागूं दिला नाही. क्रोधाच्या प्रसंगींदेखील त्यांच्या आईचा हा उणेपणा त्यांना उमगूं दिला नाहीं. कदाचित् हें सत्य झाकण्यासाठीच कर्णाने दुरुत्तरांचा आश्रय केला असावा. कृष्ण व कर्ण यांच्या भेटींतहि शेवटीं कृष्णाबद्दल अत्यंत ममता त्याने दाखवली. शेवटीं कृष्ण जेव्हा त्याला त्याचें चाक भूमीने गिळलें तेव्हा त्याला अवसर देण्याचें नाकारून अर्जुनाला त्याच्या-वर हल्ला करायला सांगतो, त्यावेळीं कर्ण त्याला 'हा अधर्म आहे' असें म्हणतो. तेव्हा कृष्ण त्याला त्याच्या पूर्वीच्या साऱ्या दुर्वचनांचा व कृत्यांचा दाखला देऊन "तेव्हा तुझा धर्म कुठे गेला होता?" असें विचारतो. कर्ण लाजेने खाली मान घालतो व मृत्यूला सामोरा जातो. शल्याशीं घातला तसा

वाद तो घालीत नाही. कारण आता त्याच्या मनाचीं क्षितिजें विस्तारलीं होतीं. युद्धाचे लहान जयपराजय, शोक त्याच्या काळजाला भिडले होते. युधिष्ठिराला व इतर पांडवांना त्याने न मारतां सोडलें. ही गोष्ट युधिष्ठिराच्या मनाला झोंबली. कर्णाला अभिमन्यु, अर्जुन आणि प्रसंगीं भीम यांच्यापुढे हार खावी लागली. एकदा तो पळालाहि. एकदा तर अशा माघारीच्या वेळीं कावून जाऊन तो म्हणाला, "धर्म म्हणे त्याचें रक्षण केलें की आपलें रक्षण करतो. मी नेहमी धर्माने वागत आलों आहें. मग माझ्या रक्षणासाठी धर्म कां उपयोगी पडत नाही? धर्माबद्दल मला शंका येते." कर्णाच्या जीवनाचें समग्र-दर्शन घेतलें तर हे उद्गार पटायला वेळ लागत नाही. पण खाचखळग्यांकडे बारकाईने पाहिल्यास कृष्णाचे लागट उद्गारहि आठवतात.

कर्ण लज्जान्वित होतो तो क्षण मोलाचा आहे. या क्षणांतच त्याच्या करणीचें सत्यदर्शन त्याला होतें. फिरून निर्वाणीने लढायला तो सज्ज होतो. पण परिस्थिति सगळीच विपरीत. कौरवांनी त्याला एकटें सोडलें आहे. रथ जमिनींत रुतला आहे. मर्मभेदी सत्याने मन साफ मोडून गेलें आहे. पण मित्राच्या हितासाठीच आपण हें सारें केलें, हें समाधान उराशीं धरून कर्ण मरण पावतो.

कर्ण मेला आणि त्याच्या जीवनाला सहस्रशः वाचा फुटली. कुंतीने त्याचें जन्मरहस्य युधिष्ठिराला सांगितलें. कधी न संतापणारा युधिष्ठिर अतिशय तापला आणि त्याने कुंतीच्या रूपाने अखिल स्त्रीजातीला शापलें. "हें गुपित तूं आधी सांगितलें असतेंस तर सारा अनर्थ टळला असता!" असें तो म्हणाला. कर्णाच्या पुढे युधिष्ठिर नेहमी क्षुब्ध होई. परंतु हें नातें कळल्यावर त्या क्षोभाला पारावार राहिला नाही. वैर गेलें. बंधुहत्येचें दुःख छातीवर बसलें. या प्रतिक्रियेमुळे कर्णाबद्दलच्या मरणोत्तर भावनांनी त्याच्याबद्दलच्या आपल्या सर्वच वर्तना-बद्दल पांडवांना अनुताप झाला. कर्णाचें वागणें प्रसंगीं क्रूर, अन्यायी झालें. पण त्याच्याशीं दैव जो क्रूर खेळ खेळलें त्याला उपमाच नाही हें त्यांना कळलें. कर्णाला उघड कुंतीपुत्र म्हणून जगतां आलें असतें, तर द्रौपदी त्यालाच मिळाली असती. राज्य त्याचेंच होतें. त्याचा निसर्गदत्त हक्क कुंतीच्या गौप्यवृत्तीमुळे पांडवांना मिळाला. नकळत कां होईना, पण त्याच्या जीवन-सर्वस्वाचें अपहरण त्याच्याच मातेने व भावांनी केलें होतें. कर्ण सारें सोशीत

मेला. सर्वस्वाचें दान उघड, मोठ्या दर्पानें पांडवांना देऊन गेला. आणि पांडवांनी त्याच्याकरिता काय केलें? तर श्राद्धविधि.

आणि कुंती? चिरतारुण्याचा वररूपी शाप मिळालेली कुंती—तिची व्यथाहि कर्णासारखीच खोल दडलेली आहे. कुंतीहि एकाकी आहे. तिच्या एकाकीपणाचा भग्न वारसा कर्णाकडे काय तो आला. तोच त्यांच्यांतला दुवा. कुंती कृष्णाकडे दुःखाचें वरदान मागते. कर्णाचें जीवन आपण दुःखी केलें त्याबद्दल प्रायश्चित्तच ती घेत होती का? कुंतीचें मन प्रथमपासूनच दुःखी. हें दुःख ती फक्त कृष्णापुढे ओकते. तो माहेरचा सहृदय माणूस म्हणून. त्याच्यापाशी कुंतीचें मोठें गाऱ्हाणें, तिचें लपलेलें दुःख बाहेर येतें. ही यादवांची मुलगी कुंतिभोज राजाला दत्तक दिलेली. वास्तविक दोन समर्थ पिते असूनहि कुंती पोरकीच होती. ती यादवांचीच राहती तर तिचा विवाह बिनबोभाट होऊन कर्णासारखें मूल तिला सोडावें लागतें ना! पण बापाला आपली गुणी देखणी मुलगी वैभवशाली राणी व्हावी असें वाटलें आणि त्यानें तिला कुंतिभोजाला दत्तक दिली. तिथे मोठ्या घरीं मोठ्या जबाबदाऱ्या आल्या. अजाण वयांत दुर्वासाचा विचित्र वर मिळाला. त्या जिज्ञासेच्या पोटीं सूर्याचें आवाहन केलें आणि मग गर्भधारणा. पुढे पांडूशीं लग्न झालें आणि नंतर पांडवांचा जन्म. यांच्या जन्माच्या आधी कुंतीनें आपणाला दुर्वासानें वर दिल्याचें पतीला सांगितलें, पण कर्णाच्या जन्माची कथा सांगितली नाही. त्या वेळीं पुत्रासाठी हपापलेल्या त्या राजानें कदाचित् कर्णाचा स्वीकारहि केला असता.

कर्ण मेला आणि कर्णाला श्राद्धहि मिळणार नाही या वेदनेनें कुंतीला ग्रासलें. जयापजयांतली ईर्ष्या गेली होती. ती आता पांडवांची आई असली तरी त्यांच्या भोगांची वाटेकरी नव्हती. आता ती फक्त कर्णाची आई होती. ज्यांच्या भल्यासाठी कर्णानें जीव घालवला त्या म्हाताऱ्या सासूसासऱ्यांच्या संगतींत तिला जीवनाची अखेर करायची होती. कर्णाचें मरण हें प्रेमाचें प्रतीक व्हायचें होतें. तेढ मिटून दोन्ही घरांचा एकजीव व्हायचा होता. मृत्यूला साक्षी ठेवून कुंती या व्रताला निर्भय मनानें तयार झाली. जीवन शेवटच्या बिंदूपर्यंत ती जिद्दीनें जगली. त्याचा लोभ म्हणून नव्हे, तर दुःखानें जड झालेलें ओझें वागवून आपल्या पापाची भरपाई व्हावी म्हणून. कुंती पतीशीं समरस झाली नाही, मुलांशीं नाही. त्यांचें रक्षण तिनें केलें. त्यांना

योग्य स्थान मिळावें म्हणून प्रोत्साहन तिने दिलें. पण मनाने ती त्यांची नव्हती. स्वतःचीहि नव्हती. पण कर्ण गेला आणि त्याच्याशीं ती शांत चित्ताने समरस झाली. जागत्या दुःखाने तिने आपलें जीवन त्याच्या जीवनाच्या शेवटाशीं जोडून टाकलें. ज्या राधेने कर्णाला प्रेम दिलें, पोषण दिलें, तिच्या पायरीला पाय लावण्याइतकी तपस्या कुंतीने केली. कर्णामागून फरफटत जाण्यांत तिने सुख मानलें. द्रौपदी, पांडव, कुंती यांच्यामध्ये फिरून कर्ण जिवंत झाला. मृत्यूपासून कर्ण नवा झाला. कर्ण मृतावस्थेंतहि अति सुंदर दिसत होता असें व्यास सांगतो. हें सौंदर्य त्या सौंदर्यप्रेमी जिवाला मिळावें, आणि इतर कुणालाहि मिळूं नये, यांतच कर्णाच्या सदा वाढत्या जीवनाचें सार आहे. प्रत्येक युगांत, प्रत्येक व्यक्तींत, हरएक दुःखनिराशेच्या क्षणांत, सुखाच्या लालसेंत, पराक्रमाच्या दुर्दम्य आवेशांत, स्नेहाच्या आविष्कारांत, कर्ण ठायीं ठायीं प्रकट होतो. पण क्षणभरच. कर्ण दिलासा देतो आणि निघून जातो. कुठेच तो फार काळ टिकत नाही. कुणालाहि कर्णावर आपला अधिकार गाजवतां येत नाही. कर्ण कुणाचाच नाही. कर्ण एकाकी आहे. सुळक्यासारखा उंच गेलेला आहे. पण सर्वांच्या वेदनेचें, अभिमानाचें, पराक्रमाचें आणि नेकीचें प्रतीक मात्र कर्ण हा एकच आहे यांत शंका नाही.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १५६८६ विः ...
क्रमांक ... नों: दि: ३०/७/६७

६

## परीकथेंतून वास्तवाकडे

अर्जुनाचें व्यक्तिमत्त्व दुभंगलेलें आहे. स्वप्नसंभ्रमांत वावरणारा नवयुवा वनवासी राजपुत्र आणि वास्तवाच्या दर्शनाने स्तिमित झालेला प्रौढ पुरुष. अर्जुनाच्या जीवनाचे सरळ दोन भाग पडले आहेत. आणि हा जोडसांधा स्पष्ट दिसतो. हा सांधा म्हणजेच भारतीय युद्ध. वास्तविक अर्जुन हा धनुर्धर. प्रारंभापासून शेवटपर्यंत. धनुर्धराचें अस्तित्वच युद्धावर अवलंबून. अर्जुनहि लहानपणापासून ही भूमिका अचूक सांभाळीतच होता. पण कुरुयुद्ध हें आगेमागे आलेल्या लढायांहून निराळें होतें. तिथे जिंकणें आवश्यक असलें, तरी हार व जीत या दोहोंनाहि एक वेगळेंच रूप आलें होतें. त्या दोहोंचें मिळून एक रसायनच जणु तयार झालें होतें. हा जो त्या युद्धाचा परिपाक होता, तो सर्वच योद्धयांना नवा होता. विशेषतः जेत्यांना. त्यांतली जयाची गोडी उतरली होती. अपजयाची खुमारी वाढली होती. क्षत्रियाला युद्धांतल्या अखेरगतीच्या तत्त्वज्ञानाचें बाळकडूच मिळालेलें असतें. तरी पण त्या साऱ्या मानीव तत्त्वज्ञानांच्या पलीकडचें, आधीच्या साऱ्या अनुभवांना नामशेष करणारें असें नवेंच सत्य पांडवांना सामोरें आलें. तें त्यांना धरवेना; तें त्यांना सोडवेना. नव्हे, तें त्यांना पुरेसें समजेनादेखील. कारण इथे सत्य हें केवळ काल्पनिक घोकीव सत्य नव्हतें. तें वास्तवाशीं एकजीव झालें होतें. हें वास्तवाशीं समरूप झालेलें प्रखर सत्य पुढे येतांच तें सामावून घ्यायला पांडवांचे आधीचे सारे अनुभव अगदी थिटे पडले. कृष्णानेहि या सत्याचें विवरण करण्याचें नाकारलें. या सत्याला मूढत्वाचें आवरण असणेंच बरें असें

तर त्याला वाटलें नसेल? वास्तवाचा अद्भुताशीं असा संयोग होऊन घडलेलें तें सत्य; त्याला नांव देणें तर राहोच, पण त्याला स्पर्शहि करणें पांडवांना कठीण झालें. आणि इकडे तर तें त्यांनाच येऊन भिडलें होतें. शत्रुत्वाची भिंत होती तोंवर सत्याच्या नांवाने तिच्यावर प्रहार करून स्वतःच्या मनाची टवटवी शाबूत ठेवणें पांडवांना शक्य झालें. परंतु ती भिंत कोसळतांच द्वैतामुळे त्या सत्याला जें स्थूल रूप आलें होतें, जो परिचित आकार आला होता, कल्पनेने ज्या रंगांचीं पुटांवर पुटें त्याला चढलीं होतीं तीं सारीं आता अनामिकांत जिरलीं. रंगीबेरंगी ढग अंधारांत जिरतात तसे. या अनामिकाचा आघात युधिष्ठिरावर फार झाला. त्याच्या खालोखाल अर्जुनावर. पण त्या दोघांच्या प्रतिक्रिया मात्र भिन्न प्रकारच्या झाल्या.

त्या दोघांच्या व्यक्तिमत्त्वांतलें भिन्नपण इथेच विशेष जाणवतें. त्यांच्यामधलें प्रेमबंधन क्षणभर अलग होतें आणि त्या दोघांच्या मनांतला सुप्त एकाकीपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे व्यक्त होतो. फरक एवढाच की युधिष्ठिराच्या व्यक्तिमत्त्वांत हा सांधा दिसत नाही. त्याच्या भावनांचें स्वरूप पूर्वीसारखेंच राहिलें. भरतीओहोटी अंगावर सतत घेणाऱ्या सागरकिनाऱ्याप्रमाणे युधिष्ठिराचें व्यक्तिमत्त्व आहे आणि म्हणूनच त्याचा वाण बदलत नाही. अर्जुनाचें तसें नाही; आणि म्हणूनच हा सांधा त्याच्या बाबतींत स्पष्ट दिसतो. भीमहि पूर्वी होता तसाच मनाने राहिला. कौरवांच्या बाबतींतला त्याचा द्वेष मरेपर्यंत होता तसाच राहिला. तरी पण भीम आणि युधिष्ठिर यांची मानसिक एकात्मता एका प्रकारची नव्हती. युधिष्ठिराची धारणा तीव्र होती, त्यामुळे त्याच्या एकात्मतेला श्रेष्ठ मूल्य आलें. भीमाची एकात्मता बालिश होती. म्हणून तिला मूल्य आलेंच नाही. अर्जुनाच्या बाबतींत मात्र एकात्मतेला आलेली बाधा विशेष जाणवते. तो युधिष्ठिरासारखा नव्हता. तरी त्याचें मन त्याच्याशीं समांतर होतें. तो भीमासारखा नव्हता. तरी तो भीमाला युधिष्ठिरापेक्षा अधिक चांगलें ओळखीत होता. त्याच्याशीं समरसू शकत होता. कां? कारण अर्जुन हा परीकथेंतल्या सढळ, ऐसपैस विजेत्याचें प्रतीक आहे. अर्जुन हा परीकथेचा आदर्श नायक आहे. आदर्श नायक असल्याने मनाने तो युधिष्ठिराजवळ व बळाच्या भूमिकेंत भीमाच्या जवळ आहे. अद्भुताच्या वलयांत जवळजवळ जन्मभर वावरलेला नायक अर्जुनच. त्या अद्भुताचा उपनायक भीम. आणि या अद्भुताला वेळीं

खतपाणी घालणारा, वेळीं वास्तवाचें दर्शन घडवून अद्भुताची सारी किमया नष्ट करणारा युधिष्ठिर.

अद्भुत कथेचा नायक अर्जुन हा इतर कोणत्याहि नायकाप्रमाणे एकाच आकाराच्या, एकाच तऱ्हेच्या घटनांच्या मंडलांत वावरत असतो. अर्जुनाची कहाणी ही इतर कुठल्याहि कहाणीप्रमाणे अति सुलभ करतां येते. एक राजपुत्र आहे. बिचारा वनवासी. विधवेचा पुत्र. तीन भावांत सर्वांत लहान. राज्य चुलत्याने घेतलेलें. तें परत मिळवायचें ही मोठ्या भावाची इच्छा. हा गुरूकडे जातो. वीर होतो. चुलत्याला आणि चुलतभावाला तें सहन होत नाही. आणि तो त्याला वनांत पाठवतो. नायक लाक्षागृहांतून बाहेर पडतो. खांडववनांत अद्भुत चमत्कार घडवतो. भावांबरोबर राजकन्येच्या स्वयंवराला जातो. तिला जिंकतो. मग राजसूय यज्ञांत पराक्रम करतो. राजकन्यांमागे राजकन्या वरतो. देशोदेशीं भ्रमण, पराक्रम, तप आणि सिद्धि मिळवतो. अद्भुत कथेंतल्या नायकाचें साध्य दुराराध्य असलें तरी तें ठरीव काळांत, ठरीव मार्गांनी प्राप्त होणारें असतें. त्याच ठरीव मार्गांनी अर्जुन नागकन्या उलूपी, चित्रांगदा यांना प्राप्त करून घेतो. किराताशीं लढतो. त्याच्याकडून वर प्राप्त करून घेतो. भावांबरोबर कांही दिवस मयसभेच्या अति अद्भुत घरांत राहतो. भावांसाठी राजांशीं युद्ध करून अपरंपार धन मिळवून आणतो. काम आणि अर्थ यांच्यांत पुरें साफल्य मिळवतो. तपांत उणा पडत नाही. तो इंद्रसभेंत जातो. भारतीय अद्भुत कथांतले अनेक नायक जातात तसाच. इंद्रलोकींची अप्सरा त्याच्यावर त्या नायकांप्रमाणेच भुलते. उर्वशीला अर्जुन नकार देतो. आणि अशा नकारांतून होणारें शापाचें परीकथांतलें वलयहि त्याच्याभोवती फिरतें. एका नागानेहि त्याच्याशीं वैर धरलें आहे. अर्जुनाचा बाण म्हणे त्याला कधीकाळीं बिळांत घुसून लागला. त्या वैराचें उट्टें फेडण्यासाठी तो नाग कर्णाच्या हातांतला बाण झाला. परीकथेंतल्या तपस्वी वैऱ्याप्रमाणे कर्णहि नेमिष्ठ असतो. एक बाण तो दोनदा सोडीत नाही आणि म्हणून नागाचें अर्जुनावरचें वैर फुकट जातें व तें कर्णावरच उलटतें. गोग्रहणाच्या संकटाचें निवारण झाल्यामुळे विराट राजा उत्तरेलाहि अर्जुनालाच द्यायला निघतो. अर्जुन तिचा स्वीकार पत्नी म्हणून करीत नाही; सून म्हणून तिचा तो स्वीकार करतो. त्याला आपलें वय आठवतें. आणि या घटकेलाच त्याला वास्तवाशीं जोडणारा

बळकट धागा व्यास तयार करतो. उर्वशीला 'नाही' म्हणतांनाच तिचें व आपलें नातें आजी-नातवासारखें आहे हें अर्जुनाच्या मनांत येतें. इथेच युधिष्ठिराचा तो भाऊ आदर्श भूमिकेंत वावरतो. युधिष्ठिर वावरला असता तसा वावरतो. इथेच वास्तव आणि आदर्श यांच्या जाणिवेचें बीज व्यास प्रथम पेरतो. आणि परमावधीच्या कौशल्याने परीकथेचा तंतु विलक्षण चैतन्याने भरून टाकतो. हें चैतन्य काल्पनिकाच्या स्फुरणांतून त्याने निर्माण केलेलें नाही. पारंपरिक परीकथांत हें स्फुरण असतें, पण त्यामुळे ती कथा यांत्रिक बनते. हें यशस्वी तंत्र वापरतांना व्यासाने त्या यशांतलें दौर्बल्य ओळखलेलें दिसतें. आणि म्हणून या तंत्राला त्याने वेगळीच कलाटणी देऊन त्याचे भडक रंग सौम्य केले. त्यांतल्या नायकाच्या एकाकी भ्रमंतीला वडील भावाचें व द्रौपदीचें कडक नियंत्रण घातलें. आणि युद्धाच्या विजयांत कथेची समाप्ति केली नाही. परंतु हें करतांना परीकथेचा नाजुक साजहि त्याने बिघडूं दिलेला नाही. अर्जुन दिव्य अस्त्रांच्या प्राप्तीसाठी काम्यक वन सोडून एकटाच महावनांत गेला, त्या वेळीं साऱ्या भावांना तें सुंदर वन शून्य दिसूं लागलें. पण त्याच्या प्रिय राणीला जें वाटलें तें वाटलें. द्रौपदी म्हणते, "झाडें फुललीं असूनहि हें वन मला वैराण वाटतें." भावांना त्याच्या धनुष्याचा टणत्कार ऐकूं येत नाही म्हणून ओकें ओकें वाटतें, तर द्रौपदीला त्या वन्य सौंदर्याचा प्राणच जणु हरवला असें वाटतें. आणि मग ज्याप्रमाणे परीकथेंत हरपलेल्या नायकाच्या शोधाला भाऊ जातात, नायिका जाते, त्याप्रमाणेच चौघे पांडव व द्रौपदी रानोमाळ अर्जुनाला धुंडीत हिंडूं लागलीं. याप्रमाणे परीकथेच्या हळुवार वेचक तेवढ्याच कला घेऊन व्यासाने आपल्या कथावस्तूला परीकथेच्या जाचांतून मुक्त ठेवलें आहे.

या परीकथेचा शेवटहि व्यासाने अतिशय मजेदार केलेला आहे. स्वप्नांतच सुंदर स्वप्न पडावें, त्याप्रमाणे गीतेचें कथन आणि विश्वरूपदर्शन हा अर्जुनाच्या नवयुवकाच्या स्वप्नाळू वृत्तीचा कळस आहे. त्यानंतर क्रिया आणि प्रतिक्रिया. बऱ्या आणि वाईट परीकथेच्या नायकालाहि अतींद्रिय शक्ति असलेला सल्लागार कुणी तरी असतो. तोच भार इथे कृष्णाने उचलला आहे. स्वतःला अर्जुनापासून दूर करतांना हा परमोच्च प्रसादाचा क्षण त्याने अर्जुनाला अनुभवूं दिला. इथेच जीवन-मृत्यूच्या लाक्षणिक अर्थाचा उलगडा पुढे करून, कृष्ण अर्जुनाच्या जीवनांतलें परीकथेचें तें विरविरीत पटल छेदून टाकतो. पण तें इतकें हळूहळू,

की तें जातें आहे असें आपल्याला कळतहि नाही. मोठी भूल घालून त्याने लहानसहान भ्रमजालकें, स्वप्नदृश्यें नाहीशीं केलीं. द्रौपदी, उलूपी, चित्रांगदा आता नायिका राहिल्या नाहीत. त्या होत्या केवळ प्रौढ माता. अर्जुनाला जिंकायचें होतें फक्त राज्य. पण त्या जिंकण्यांतला उन्माद आता गळून पडला होता. इथून पुढे त्याला नवजीवन जगायचें होतें. गतजीवनांतल्या स्मृतींची मनाशीं उजळणीहि करायची नव्हती. अर्जुन तत्त्वज्ञानाने जागता झाला. युद्धाने मुलगा मेलेला दुःखी बाप झाला. पापाचा धनी झाला. पुण्याचा वारसदार झाला. भक्त झाला. आणि तितकाच पोक्त आणि रिताहि झाला.

जिथे परीकथेंतल्या नायकाची कहाणी संपूं लागते, तिथे रित्या झालेल्या पोक्ताची रुक्ष, वास्तव कहाणी सुरू होते. इथेच पारंपरिक काव्यमयता संपून वास्तवाच्या प्रांतांत पाऊल टाकल्यावर व्यासाची संयत व प्रगल्भ काव्यमयता प्रत्ययास येते. या प्रतिभेचा साक्षात्कार अद्भुत व वास्तव यांचा अत्यंत स्वाभाविकपणें मेळ घालणाऱ्या कांही प्रसंगांत आढळून येतो. परीकथेंतल्या नायकाला गुरु असतो. अर्जुनाचे गुरु दोन: एक कृष्ण व कधी कधी युधिष्ठिर. अर्जुन इंद्रसभेंत गेला तो युधिष्ठिराच्या प्रेरणेनेच. तिथे जायची शक्ति त्याला आली ती व्यासाने आपल्याला शिकवलेली अमोल प्रतिस्मृति विद्या युधिष्ठिराने त्याला दिली म्हणूनच. या विद्येमुळेच अर्जुन इंद्रसभेंत राहूनहि आपल्या तिथे जाण्याचा मूळ हेतु विसरला नाही. उर्वशीचें प्रलोभन त्याला पडलें नाही. तिचें सौंदर्य, नृत्य, कांही कांही त्याला दिसूनहि ओळखूं आलें नाही. त्याला ती पूर्वजा या लिंगातीत स्वरूपांतच दिसली. कारण इंद्रलोकींहि दिव्य भोगांत तो बुडला नाही. तिथे त्याला सुख नव्हतें. द्रौपदींत त्याचें मन गुंतलें होतें. तिच्या दुःखाच्या जाणिवेने तो अस्वस्थ होता. तो केवळ तपस्वी होता. द्रौपदीने त्याला आणखी कुणा स्त्रीशीं संबंध आणूं नको असें थोडेंच सांगितलें होतें? पण इथे कुटुंबशील अर्जुन पत्नीला विसरूं शकला नाही. भावाला विसरला नाही. द्यूताचें शल्य विसरला नाही. युधिष्ठिराबद्दल सूक्ष्म कटु भावना त्याला विद्ध करीत होती. एकीकडे ओढ व एकीकडे घृणा. या अस्वस्थ मनःस्थितीनेच परीकथेच्या वातावरणाचा भंग होऊं न देतां अर्जुनाला वास्तवापासून पराङ्मुख होऊं दिलें नाही. परीकथा व वास्तव यांमधील हा ताण अनेक प्रसंगीं मोठ्या कौशल्याने वापरलेला दिसतो. कधी तो ताण फार खालच्या

पातळीवर नेऊन अगदी सैल केलेला दिसतो, तर कधी खूप ओढून तो कथानकांत कलाटणी निर्माण करतो; इतकेंच नाही तर नायकाच्या प्रतिक्रियाहि अतिशय तीव्र बनवतो. यक्षप्रश्नाच्या वेळीं वास्तविक अर्जुनच नायकाचें काम करायचा. पण इथे युधिष्ठिर नायक होऊन भावांना जिवंत करतो. इथे हा ताण अगदी मंद झाला आहे.

भारतीय युद्धाला सुरुवात झाली आणि दुर्योधनाच्या मनांत जयाबद्दल धाकधूक असल्याने त्याने युधिष्ठिराशीं फिरून द्यूत खेळून त्याला जिंकून घेण्याची मनीषा धरली. ज्या वेळीं द्रोण युधिष्ठिराला जिवंत पकडून दुर्योधनाला देण्याची प्रतिज्ञा करतो, त्या वेळीं युधिष्ठिर अर्जुनाला म्हणतो, "अर्जुना, ही जर प्रतिज्ञा फळली तर तूं माझ्यामागून लढ." अर्जुन त्या वेळीं परीकथेंतल्या आदर्श नायकाच्या कैफांत होता. तो उत्तरतो, "मी द्रोणावर शस्त्र धरणार नाहीं आणि तुलाहि जिंकूं देणार नाहीं. मी जिवंत आहें तोंवर तुला कुणी धरणार नाही." या वेळीं अर्जुनाला आपल्या सत्यवृत्तीचा कैफ चढला होता. तो म्हणतो, "मीं कधी खोटें बोललेलें मला आठवत नाही. माझा कधी पराजय झाल्याचेंहि मला स्मरत नाही. कधी खोटें आचरण मीं केलेलें नाही. तेव्हा तूं भिऊं नको." यक्षप्रश्नाच्या वेळीं असलेल्या भूमिकेच्या अगदी विरुद्ध ही भूमिका आहे. इथे भावाभावांच्या भूमिकांची अदलाबदल झाली आहे. इथूनच अर्जुनाचें गुरुपद एकट्या कृष्णाकडे जातें.

या भयामुळेच युधिष्ठिर युद्धांत अस्थिर झाला. कधी त्याला पळून जावें लागलें, तर कधी कर्णाने सोडल्याचा अपमान त्याला गिळावा लागला. अर्जुनाने त्याला वाचवलें. पण त्याला वाचवतां वाचवतां अभिमन्यूचा बळी पडला. युधिष्ठिराचें तोंड काळेंठिक्कर पडलें. अर्जुनाला तोंड कसें दाखवावें याची काळजी त्याला पडली. यावेळीं जयद्रथाच्या वधाची प्रतिज्ञा अर्जुनाने केली. "माझीं शस्त्रें कमी लेखूं नका. माझें हें धनुष्य कमी लेखूं नका. माझ्या बाहूंतलें सामर्थ्य कमी लेखूं नका. हा धनंजय कमी आहे असें समजूं नका." असें अवसान त्याने शोक आवरून आणलें. "अभिमन्यु पडला तर मी प्राण ठेवणार नाहीं." हें मागचें बोलणें गिळून त्याने मन घट्ट केलें. फिरून तो वीर झाला. परीकथेचा नायक अल्पकाल झाला. कृष्णाला बरोबर घेऊन हिमालयांत जाऊन पाशुपत अस्त्राची प्राप्ति त्याने करून घेतली.

जयद्रथवधापासून कृष्णाच्या सांगीप्रमाणे अनेक बरींवाईट धोरणें अर्जुनाला 'युद्धनीती'च्या नांवाखाली खपवावीं लागलीं. कौरवांचें धोरण युद्धनीति अति स्वच्छ असावी असें, तर कृष्णार्जुनांचें धोरण सर्वसाधारण दैनंदिन नीति शुद्ध व युद्धकालीन नीति प्रसंगानुरूप असें होतें. दोन्ही बाजूंच्या नीतिविषयक धोरणांचा असा एकमेकांना छेद गेल्यामुळे एक विलक्षण पोकळी निर्माण होते. आणि साऱ्या रूढ व अरूढ घटनांना ती एकाच पातळींवर आणून सोडते. दिव्य व पार्थिव एक होतें; सत्य आणि असत्य दोरखंडांतल्या पिळांप्रमाणे एकमेकांत गुरफटून जातात. वीर आणि भीरु एकाच व्यक्तींत आलटून पालटून दिसतात. दारुण दुःख व भीषण आनंद अलग करतां येत नाहीत. वैर व मैत्री यांची मर्यादा तुटते. सारीं माणसें अगदी एका मोजमापाचीं होतात. कृष्ण वास्तविक देवावतार; पण त्याचेंहि विभूतिमत्त्व या पोकळीनें पार हरण केलें. उत्तरेच्या मुलाला जिवंत ठेवण्यासाठी, अश्वत्थाम्याला जीवनांतून हुसकावून लावण्यासाठी, भीष्माला शेवटच्या क्षणीं आपल्याला सगुण ब्रह्म दिसलें हें समाधान देण्यासाठी जरी विभूतिमत्त्वाचे प्रसंग अधूनमधून आले असले, तरी कृष्णाचें व्यक्तिमत्त्व कुठेहि माणुसकीची सीमा ओलांडून जात नाही. इतरांप्रमाणे तोहि दैवाधीनच राहिला आहे. इतरांच्या हालचालींत पार गुंतून गुरफटून गेला आहे. गुरूची भूमिका धारण करण्यासाठी फार मोठी किंमत त्याला द्यावी लागली आहे. त्याने दिलेल्या बऱ्यावाईट सर्व सल्ल्यांबद्दल खूप मोठा दंड त्याने आपणहून पत्करला आहे. गाजावाजा न करतां विसर्जनाची भूमिका त्याने स्वीकारली. मुलेंबाळें, संपत्ति, कीर्ति—सारें सारें त्याने दुसऱ्यांच्या शापाच्या रूपाने भोगलें. पांडवांपेक्षा वैराण झालेलें आपलें घर त्याने पाहिलें. धृतराष्ट्राला जो संहार पाहावा लागला त्याहून दुर्धर दुःख वसुदेवाच्या वाट्याला आलें. कौरव युद्धांत मेले हें पांडवांचें श्रेय कांही थोडें नव्हतें. तें श्रेयहि यादवांच्या वाट्याला आलें नाही. क्षुद्र भाऊबंदकींत, फुशारकींतच ते मेले. कौरवांच्या मृत्यूचें प्रतीक गदा, तर यादवांच्या मृत्यूचें प्रतीक मुसळ. या प्रतीकांतच यादवांच्या शोककथेचें सार आहे. बरें, एवढें होतें तरी बरें होतें. पण कृष्णाच्या स्त्रियाहि पळवल्या गेल्या, आणि अर्जुनाच्या वीरश्रीची अखेर त्यांना सोडवण्यांत झाली. परीकथेंतल्या राजपुत्राचा खरा प्राण इथेच कायमचा गेलेला आहे. नेहमीच्या परीकथेंत गौरवाच्या शिखरावर नायक असतांना

कथेचा शेवट होतो आणि नायकाला चिरजीवन लाभतें. पण या अभिनव व्यासकथेंत मात्र अर्जुन लहानसहान मरणें मरत अखेर अशा तऱ्हेने जिवंत-पणींच्या मोठ्या मरणांत कायमचा गाडला जातो. स्वर्गारोहण करते ती त्याची केवळ छाया. युधिष्ठिराच्या भावाची छाया. द्रौपदीच्या पतीची छाया. त्याची स्वतःची छाया युद्धांत हळूहळू झरूं लागली आणि कृष्णमरणांत कायमची विरली. अर्जुनाच्या वीरत्वाच्या स्फूर्तीचा झरा जसा कृष्ण, तसा अर्जुनाच्या दोषांचाहि अक्षरशः वाटेकरी कृष्ण होतो. "मला मुलेंबाळें, बायका, राज्य यांच्याहून, इतकेंच काय पण प्राणाहूनहि अर्जुन प्रिय आहे," या कृष्णाच्या उद्गारांचा व्यासाने अति सूचकतेने उपयोग करून घेतला आहे. "कृष्णाचा प्राण अर्जुन आणि अर्जुनाचा प्राण कृष्ण" या वचनाला धरून दोघांनाहि एकाच विदारक नियतीला जखडून ठेवून व्यासाने मानवतेचीं मूल्यें कलेच्या परमोच्च पातळीवर कायमचीं नेऊन ठेवलीं आहेत. दुःखांतिका, नीति, बोध, कला, नाट्य, इतिहास, निरूपण,—सारें सारें मृत्यूच्या विराट पार्श्वभूमीवर केवळ मानवी आविष्कारांत एकजीव करून त्याने ओतलें आहे. हरघडीला जीवन व मृत्यु यांत असलेला ताणतणावा त्याने एकाच गतींत कायम राखला आहे. गर्भांतल्या जीवापासून तों भीष्मासारख्या जराजीर्णापर्यंत सर्वांना एकाच आवरणांत त्याने लपेटलें आहे. दुष्टसुष्ट, लहानथोर—सारे विविध भावनांच्या भोवऱ्यांत सापडून एकाच अंतमय अज्ञात सृष्टींत प्रवेश करून पाहतां पाहतां नाहीसे होताहेत. आणि उरतें काय? तर त्यांच्या कृत्यांच्या दीर्घकाळ मागे राहतील अशा जिवट, चिवट मातीवर चित्रविचित्र आकृति. आणि त्या आकृति चक्र-व्यूहासारख्या मेलेल्यांच्या नियतींतून उत्पन्न झालेल्या. जे जिवंत राहिले ते घुटमळत अखेरपर्यंत त्या आकृतींतच अडकून राहिले. केवळ मेल्यावरच मुक्त झाले. पण त्यांच्या त्या बद्धतेचें कायमचें प्रतीक म्हणजे अश्वत्थामा. त्याच्या मृत्युहीनतेला तोडच नाही.

या मृत्यूच्या अवाढव्य अशा चक्रव्यूहाचा प्रणेता वीरनायक अर्जुन आणि त्याचा गुरु कृष्ण. आणि अर्जुनालाच सर्वांत आधी त्याच्या प्रतिक्रियेची झळ लागते. पोक्त अर्जुन कर्णाचें अजिंक्य बल पाहून कासावीस होतो. सर्वच पांडव कासावीस होतात. पण त्या वेळीं साऱ्यांच्या टीकेचा मारा एकट्या अर्जुनालाच सहन करावा लागतो. आणि इथून पांडवांच्या अंतर्गत क्षोभाचें नवें नाट्य

खुल्या आविष्कारांत प्रकट होतें. अर्जुनाचें उरलेंसुरलें देवपुत्रत्वहि व्यास पार पार फाडून टाकतो. त्याला क्षुद्र माणूस बनवतो. युद्धांतल्या अनीतिमय धोरणाचा उबगहि पहिल्याने त्यालाच आला आणि इथूनच भावांभावांतला संघर्ष उद्भवला. युधिष्ठिराने द्रोणाशीं असत्य कर्म करावें याचा राग अर्जुनाला आला. पूर्वी वनांत असतांना भीमाशीं संगनमत होऊन त्यानेहि युधिष्ठिराला ठपका दिला होता. पण त्याच्याहून हा आरोप गंभीर होता. एरवी भीम युधिष्ठिराला टोचून बोलणाराच होता. पण इथे मात्र कौरवांचें वैर त्याच्या हाडींमासीं इतकें मुरलें होतें की त्यांच्या बाबतींत जें केलें तें थोडेंच अशी त्याची वृत्ति बनली होती. तेव्हा त्याने युधिष्ठिराची बाजू उचलून धरली आणि अर्जुनाला द्यूताचें व द्रौपदीच्या विटंबनेचें स्मरण दिलें.

कर्णाचा पराक्रम वाढत होता. त्याच्या भयाने पांडव त्रस्त झाले होते. त्या वेळीं भीमाने अर्जुनाला "तूं आमच्या जखमेवर मीठ कां चोळतोस ? तुला कळत नाही, भयाने आम्ही किती गांगरून गेलों आहोंत तें ?" असें म्हणावें यांत कांहीच नवल नाही. पण एवढ्यावरच हें प्रकरण थांबत नाही. सात्यकीदेखील धृष्टद्युम्नाला "द्रोण हा ब्राह्मण. त्याचा तूं कपटाने जीव कसा घेतलास ?" असें म्हणतो, आणि अर्जुनाच्या आक्षेपाला उचलून धरतो. त्यावर धृष्टद्युम्न सात्यकीला "भूरिश्रवा यज्ञकर्मांत मग्न असतां, जायबंदी झालेला असतांना तूं त्याचा वध कसा केलास ?" असें विचारतो. धृष्टद्युम्न व सात्यकि यांची मारामारी सुरू होते. भीम व सहदेव त्यांना दूर करतात.

ही विषादाची ठिणगी पेटतच राहते. परंतु पांडवांचें एकमेकांवरचें प्रेम या भेदांहून फार मोठें असल्याने आणि कृष्णासारखा सखा सदासर्वदा त्या कुटुंबाचें ऐक्य अभंग राहावें अशी खटपट करीत असल्यानेच या कुटुंबाच्या स्वास्थ्याला तडा गेला नाही. आणि त्यांतहि युधिष्ठिराचें सुजाण तत्त्वज्ञानाचें भान कधी नष्ट झालें नाही. त्याने कुठेहि अभिमान आड येऊं दिला नाही. म्हणून युधिष्ठिर आणि अर्जुन अखेरपर्यंत एकत्र राहिले.

अर्जुनाचें प्रथम वयांतलें परीकथेंतलें भडक व्यक्तिमत्त्व व्यासाने मोठ्या खुबीने या उत्तरभागांत खोडून टाकलें आहे. किंबहुना कृष्ण व अर्जुन यांची गीतेच्या वेळची आदर्श दैवत-भक्त ही भूमिकादेखील त्याने पार पुसून टाकली आहे. शिळी रांगोळी पुसून टाकावी तशी. युद्धानंतर अश्वमेध यज्ञ झाला त्या

वेळीं अर्जुनाने अनेक राजांना जिंकून पुष्कळ द्रव्य मिळवून आणलें. या वेळीं "युद्धांत कुणाहि राजाला मारायचें नाही, केवळ जिंकून सोडून द्यायचें," ही युधिष्ठिराची आज्ञा त्याने तंतोतंत पाळली. पण बभ्रुवाहनाने आपल्या पित्याला राज्य अर्पण करायचें ठरवलें, तें अर्जुनाला अपमानास्पद वाटलें. "न जिंकलेलें राज्य मी घेत नाहीं" असें म्हणून त्याने बभ्रुवाहनाला युद्धाला आव्हान दिलें. दोघेहि बापलेक घायाळ होऊन पडले. शेवटीं उलूपीच्या संजीवनविद्येने अर्जुन उठला. इथे त्याची जयिष्णु वृत्तीहि व्यासाने कशीबशी धकवून ठेवली आहे. पण ह्या वीरतेच्या तंतूची व अर्जुनाच्या जिज्ञासु वृत्तीची अखेर अत्यंत विदारकपणें व्यासाने केली आहे. अश्वमेध यज्ञाच्या वेळीं सभेंत कृष्ण व अर्जुन जवळजवळ बसले होते. त्या वेळीं कृष्णाला अर्जुन म्हणाला, "कृष्णा, तूं मला गीता सांगितलीस खरी, पण माझें मन ठिकाणीं नसल्याने, मला ती कळली नाही; आणि जें कळलें तें मी सारें विसरलों आहें. तर आता पुन्हा सारें सांग पाहूं."

हें ऐकून कृष्ण नाराज झाला. आणि रागावून म्हणाला, "मीं तुला इतकें जीव तोडून सांगितलें तें विसरलास, हें कांही तुला शोभत नाही. पण तुला काय सांगितलें हें मलादेखील आठवत नाही. तरीदेखील तुला कांही हवेंच तर एक गोष्ट आठवली आहे ती सांगतों. बघ तुला त्यांत काय सापडतें तें."

अनुगीतेची ही प्रस्तावना अत्यंत बोलकी आहे. अतिरिक्त, अनाठायी तत्त्वज्ञानाची शोकांतिका अशी अन्यत्र सापडत नाही. माणूस बुद्धिवान आहे. भावनामय आहे. जीवनानुभव घेणारा आहे. सत्याची त्याला अपार तहान आहे. सुखाची सुखमयता कशांत आहे, ही जिज्ञासा त्याला आहे. दुःखाचें मूळ शोधून तें अमृतत्वाला भिडतें की काय, तें त्याला पाहायचें आहे. अनंत कालांत त्याला आपलें मूळ दिसतें. सनातन मानवतेशीं जीव संबद्ध आहे, ही जाणीव त्याच्यांत जागृत आहे. आणि तरीहि या साऱ्यांचें समर्पक उत्तर मिळणें त्याला कठीण होऊन बसतें. सर्वंकष सत्याला तो हात घालतो. पण त्याच्या हातीं सत्याचा अवघा एक कण लागतो. तेंच त्याचें तत्त्वज्ञान. प्रत्येकाचें तत्त्वज्ञान केवळ त्याच्या त्याच्या मनाच्या आकाराएवढेंच असतें. मनाच्या रूपरंगाप्रमाणेच तें जन्मतें आणि तेवढेंच टिकतें. अतिरिक्त वाहून, धुपून जातें. हेंच अर्जुन शिकला काय ?

परीकथेच्या वलयांत अर्जुन प्रमुख असला तरी त्याला टेकू होता भीमाचा. भीम या दुय्यम दर्जाच्या परीकथेचा नायक आहे. दोन एकाच ठशाच्या व्यक्तिरेखा व्यासाने एकत्र कां आणल्या, असा भ्रम सकृद्दर्शनीं व्हावा इतकें त्यांचें पराक्रमाचें क्षेत्र सारखें आहे. पण व्यासाची प्रतिभा विराट असली तरी उधळमाधळ करणारी नाही. हजारों माणसांच्या व्यवहाराचें दिग्दर्शन त्याने केलें तरी तंतोतंत सारखीं माणसें त्याने निर्माण केलीं नाहीत. सारखे ठसेहि घेतले नाहीत, की अनाहूत पात्राला प्रवेश करायला अंगुळभर जागा मोकळी ठेवली नाहीं. जेव्हा भीमार्जुनांसारख्या समान व्यवहारी व्यक्तींना तो दिग्दर्शित करतो, तेव्हा त्याला कथानकाची एकात्मकता एक तर अभंग ठेवायची असते, आणि पात्रापात्रांतल्या साधर्म्य-वैधर्म्याचे रंग विरोधी छटांत दाखवतांना त्या एकमेकांत मिळून गेलेल्या दाखवायच्या असतात. कथानकाची गति, कथानकांतली उत्कंठा निर्माण करण्याची शक्ति यामुळे साधते. पात्रें एकमेकांवर रेलल्यामुळे होणारा आकृतिबंध भीमार्जुनांच्या जोडकरणींतून व व्यक्तिरेखांतून व्यासाने निर्माण केलेला आहे. आणि तरीहि भीमाचें व्यक्तिमत्त्व त्याने अलग ठेवलें आहे. बालपणचा भीम स्वतंत्र आहे. पण युवावस्थेंतला भीम अर्जुनाचा टेकू झाला आहे. या दोन अवस्थांतला सांधा व्यासाने भीमाच्या व अर्जुनाच्या मूळ स्वभावांतल्या फरकांत साधून घेतलेला आहे. भीम हा मूळचाच उग्र आणि आवेगी. त्याच्या उलट अर्जुन शांत. दोघेहि प्रेमळ. पण भीमाच्या प्रेमाला चढउतार अधिक. दोघेहि कांही तरी करण्यांत, शोधण्यांत गुंग. आणि त्यांतूनच त्यांच्या वीरवृत्तीची समान गुंफण वनवासापासून तों जवळजवळ युद्धाला तोंड लागेपर्यंत झालेली आहे. पण युद्ध मध्यावर आलें आणि अर्जुन व भीम यांच्या मानसिक प्रतिक्रियांनी वेगळें स्वरूप घेतलें. मुळांतच भीम हा जें करील तें अगदी शेवटच्या तंतूपर्यंत; भीमाने नाश केला तोहि अत्यंत विध्वंसी स्वरूपाचा आणि विकट असा. राखून कांही करणें त्याला जमतच नसे. लहानपणापासून आपण दुःखच भोगलें याची खंत भीमाला सर्व भावांत अधिक वाटे. इतकी की त्याला नको हें जगणें असें वाटे. अर्जुनाला तसें कधी वाटलें नाही. चालू काळ वाईट असला तरी भावी काळ आपल्या पराक्रमाच्या बळावर आपण मनासारखा घडवूं, हें त्याचें उद्दिष्ट. आपल्यासारखा धनुर्धर दुसरा कुणी असूं नये याबद्दल त्याने सर्वथैव दक्षता

घेतली. दक्षता हा भीमाचा गुणच नव्हता. तो कमालीचा प्राकृत होता. अर्जुनाची संस्कारिता त्याला लाभली नाही. आणि म्हणूनच द्यूताच्या वेळीं, आणि कीचकाने द्रौपदीला विराटाच्या सभेंत लाथ मारली त्या वेळीं, त्याला आपला क्षोभ इतरांप्रमाणे आवरतां आला नाही. त्या वेळीं त्याच्याजवळ भावांच्या सावधपणाचें कडें नसतें तर अज्ञातवास सफल झालाच नसता.

परीकथेंतल्या अर्जुनाचा परावर्तित अवतार भीम-अर्जुनांच्या अनुपस्थितींत झालेला आहे. त्याचें सर्वांत उत्तम उदाहरण गंधमादन पर्वतावरच्या पंचरंगी सुंदर फुलांच्या प्रसंगांतलें. अर्जुन दिव्य अस्त्रांची प्राप्ति करून घ्यायला निघून गेलेला आहे. आणि त्याचे भाऊ, द्रौपदी तीर्थक्षेत्रें तुडवीत त्याला धुंडाळीत हिंडताहेत. त्यांना वाटेंत गंधमादन पर्वत लागतो. गंधमादन पर्वत फुलांनी भरलेला. सदा सुगंधाने दरवळलेला. वासंतिक शोभेने उत्फुल्ल झालेला. ती दिव्य पुष्पशोभा केवळ अमानुषांच्याच भोगविलासासाठी निर्माण झालेली. माणसाच्या पावलाने ती भूमि कधीहि स्पर्शिलेली नसते. यक्षराक्षसांचे पंचप्राण त्या सुंदर फुलांत गुंतलेले. अशा त्या फुलांवर सुंदर नायिकेची दृष्टि जावी आणि तिने त्यांची मागणी करावी यांत नवल तें काय? त्यांतहि द्रौपदी अगोदरच चालण्याच्या श्रमाने गळलेली असते. घटोत्कचाला बोलावून भीमाने तिला वाहून न्यायची आज्ञाहि केलेली असते. द्रौपदी अर्जुनाच्या विरहाने बावरलेली आहे. मनांत शोकाने तडफडते आहे. पण तरीहि ही फुलें पाहतांच तिचें रमणीमन उल्हसित झालें. तिची विलासवृत्ति परतून आली. विरहिणीचें रूपांतर संगमोत्सुक नायिकेंत झालें. आणि द्रौपदी भीमाकडे वळली. अर्जुन असता तर ती त्याच्याकडेच वळती. ती भीमाला म्हणाली, "अर्जुन केवढा धनुर्धर. तो असता तर यक्षांशीं लढून हीं फुलें त्याने मला आणून दिलीं असतीं. तुझेंहि बाहुबळ त्याच्यासारखेंच आहे. तूं नाही देणार तीं फुलें मला?" एवढें आवाहन आणि आव्हान असल्यावर कुठला नायक नायिकेसाठी कुठलें दिव्य करणार नाही? आणि त्या नायकाला यश आलें नाही असें कधी झालें आहे?

परीकथेंतलें अर्जुनाच्या नायकत्वाचें हें प्रतिबिंब व्यासाने युद्धाच्या भयानक पार्श्वभूमीवर विसर्जन करतांकरतांनाहि साम्याचा कळस गाठून केलेलें आहे. अभिमन्यूचा मृत्यु झाला, आणि अर्जुन पेटला. शोकाने आणि संतापाने. त्याच्या नियतींत सारेच पांडव समभागी होते. कारण पुढेहि अश्वत्थाम्याने द्रौपदीचे

सारे मुलगे मारून सर्व पांडवांना सारखेंच दुःखी केलें. परंतु घटोत्कचाचा वध कर्णाकडून झाला तो प्रसंग विशेष नाट्यमय आहे. अभिमन्यूच्या वधा-पेक्षाहि अधिक करुण आहे. कारण त्यांत एक नाजुक भावनेचा धागा व्यासाने जोडलेला आहे आणि हा नाजुक भाव घटोत्कचाशीं नव्हे, तर अश्वत्थाम्याशीं व्यासाने संलग्न ठेवलेला आहे. घटोत्कच अश्वत्थाम्याशीं लढायला आला त्या वेळीं अश्वत्थामा त्याला म्हणाला, "बाळ, तुझ्याशीं माझें मुळीच वैर नाही रे! माझ्याशीं लढूं नको. जा, आपल्या बापाकडे जा." पण अश्वत्थाम्याने त्याच्या मुलाला मारलें असल्याने घटोत्कचाचा संताप शिगेला पोचला होता. बापाप्रमाणेच. तो अश्वत्थाम्यावर चवताळून तुटून पडला. आणि मग अश्वत्थाम्यानेहि त्याचें आव्हान स्वीकारलें.

अर्जुनाचा मुलगा मेला, मग भीमाचा मुलगा मरायलाच हवा. जें भाग्य नायकाचें तेंच प्रतिनायकाचें. समांतर घटना हवीच हवी. व्यासाने भीमाच्या परीकथेंतल्या नायकभूमिकेची एवढीच दखल घेतली. पण भीमाच्या नायक-पणाची कहाणी परंपरेने फारच मजेने जतन करून ठेवली आहे. भारतीय परंपरेने कृष्णकथेइतकाच ऐसपैस अवसर भीमाच्या कथांना दिलेला आहे. दोहोंतहि विनोद आहे. कृष्णाच्या चोऱ्या आणि खोड्या विनोदाचा विषय. तर भीमाचें व्यंगहि परंपरेंत अति गोड विनोद निर्माण करतें. भीमाच्या खादाडपणाचा उल्लेख अति क्रूरपणे कर्ण करतो. युधिष्ठिरहि भीम मेला तेव्हा 'खादाडपणामुळे तो जिवंतपणीं स्वर्गात जाऊं शकला नाही' असें निदान करतो. पण भीमाच्या खादाडपणाचें, आडदांडपणाचें, त्याच्या अचाट शक्तीचें उदंड कौतुक भारतभरच्या लोककथांनी केलें आहे. भीमाचा भाबडेपणा आणि अखेर त्याचा जय हें लोककथांतल्या मूर्ख विधवापुत्राला मिळालेल्या जयाचेंच परिवर्तन आहे. हें बीज व्यासाने लक्षांत येईल न येईलसें वापरलें. अजून कुठेहि जा, भीमाच्या कथा रानावनांना भिडलेल्या आहेत. पांचगणीला भीम रांधीत होता तें अवाढव्य चुलखंड दिसतें, तर ठाण्याच्या सूर्या नदीला भीमाने घातलेला अपुरा बांध दिसतो. कुठे कुठे शालवृक्ष फुलले म्हणजे आदिवासी सांगतात की, भीमाने हे पूर्वी कानांत तुऱ्यासारखे खोवले होते म्हणून. भीमाला राजकन्या हवी होती, पण तिचा एका रात्रींत अचाट बांधकाम पुरें करायचें असा पग होता. कपटी देवता कोंबड्याचें रूप घेऊन ओरडते आणि

भोळा भीम निराश होतो. ही कथा भारतभर ठिकठिकाणीं मोडक्या अवशेषांच्या प्रचंड शिलाखंडांच्या, अपुऱ्या लेण्यांच्या संदर्भात सांगितली जाते. प्राचीन भारतीय वाङ्मयाला विनोदाचें वावडें आहे. पण परंपरेने विनोदाची निर्मिति वाया दडवली नाही. भीमाचें हें यश अर्जुनाच्या वाट्याला आलेलें नाही. लोककथांत पांडवकथांचा नायक बहुधा भीमच असतो.

परीकथेच्या वातावरणांत चपखल बसलेला भीम युद्धानंतर जरी अर्जुनापासून वेगळा झाला तरी अर्जुनासारखी जागृति त्याला येत नाही. वास्तवाचा धक्का त्याला बसत नाही. मृतप्राय दुर्योधनाला तो सरळ लाथ मारतो; एवढेंच काय पण पुढे मुलांच्या श्राद्धासाठी म्हातारा धृतराष्ट्र जेव्हा युधिष्ठिराकडे द्रव्याची याचना करतो, तेव्हाहि भीम त्याला कवडीदेखील द्यायची नाही, असें म्हणतो. कौरवांबद्दलचें त्याचें वैर कधीच शमलें नाही. या वैराबद्दल त्याला कधी अनुतापहि झालेला नाही.

अर्जुनामध्ये प्रतिक्रियेचें भान आहे. अर्जुन पराक्रमाने स्फुरतो, पण चुकीच्या जाणिवेने शरमिंदाहि होतो. हेंच भीमाजवळ नाही. आणि म्हणूनच त्याने जें केलें त्याचें स्वतंत्र मोल होत नाही. परंपरेने त्याला बहाल केलेलें सारें श्रेय लक्षांत घेतलें तरी भीम हा जीवनाचा सूक्ष्म अनुभव घेऊं शकत नाही. अर्जुनाप्रमाणे तो भावजीवी नाही. अर्जुनाचें मूढत्व आणि भीमाचें ढोबळपण यांची तुलनाच करतां येणार नाही. कारण अर्जुनाची संवेदनक्षमता फार तरल होती, आणि म्हणूनच भावुकपणाच्या बळावर, कांही काळ कां होईना पण तो गीतेच्या तत्त्वज्ञानाच्या मोहिनींत गुंगूं शकला.

## ७

# मुक्त पथिक

पांडवांपैकी कुंतीचे तीन मुलगेच काय ते खरे मोठे. धाकटे दोघे माद्रीचे मुलगे जरा थिटेच आहेत. खरें पाहिलें तर त्यांना स्वतःची व्यक्तिरेखाच नाही. नकुल हा फार सुंदर होता म्हणे. एवढीच काय ती त्याची आठवण राहिली. कृष्ण, अर्जुन, कर्ण—सारेच सुंदर होते. तरी त्यांच्यांत सौंदर्याहून आणखी कांही तरी खूप होतें. पण ज्याच्यांत स्वतःचें उत्कट व्यक्तिमत्त्व असें कांहीच नाही आणि देहाचें सौंदर्य मात्र अद्वितीय असें आहे, असा प्राचीन भारतांतला संस्मरणीय पुरुष नकुलच. सहदेवाचा उल्लेख तर त्याहून विरविरीत असा महाभारतांत आहे.

अज्ञातवासांत असतांना सहदेवाने ज्योतिषी पंडिताची भूमिका घेतली होती. या भूमिकेचा परंपरेने मात्र छान उपयोग करून घेतलेला आहे. महाराष्ट्रांत काय, नाही तर छत्तिसगढाच्या परिसरांत काय, पोथी वाचणाऱ्या ब्राह्मणाचें नांव सहदेवच पडून गेलें आहे. सहदेव-भाडळीच्या ज्योतिषाच्या ग्रंथांत त्याचें प्रत्यंतर येतेंच. परंतु तीन कौंतेयांची सर यांना नाहीच. मग व्यासाने हीं उसनीं पात्रें कां घेतलीं? दुर्योधनाला टेकू दुःशासन होता. पण दुःशासनाला स्वतःचें व्यक्तिमत्त्व आहे. दुर्योधनांत उणी पडलेली क्रौर्याची धार दुःशासनानेच सतत जोपासली. दुःशासन नसता तर शकुनीच्या द्यूताच्या अखेरच्या भागांत, द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या त्या अजोड प्रसंगांत इतका प्रचंड आवेग आदळला नसता. युद्ध संपलें तरीहि त्या प्रसंगाची छाया ज्यांनी ज्यांनी तो प्रसंग पाहिला त्यांच्या मनावरून दूर झाली नाही. अर्जुनाचा टेकू भीम. याची भूमिकाहि

अशाच आक्रांतांतून निर्माण झाली आहे. परंतु नकुलसहदेवांच्या वाट्याला असे कोणतेंच प्रसंग आले नाहीत की त्यांच्यामुळे महाभारतांतल्या नाट्याला उजळा मिळाला. परंतु तरीहि हीं पात्रें अनाठायीं नाहीत. अगदी खोलांत जाऊन, निरखून पाहिलें तर हे अबोल, स्तब्ध उभे राहिलेले दोन पांडव कमानीचे दोन आधारस्तंभ असावेत तसे वाटतात. देवाच्या दारीं प्रचंड पहारेकरी असावेत तसे ते आहेत. मुके पण जागरूक. पराक्रमी पण संयत. आज्ञेला बांधलेले. स्वतःच्या कर्तृत्वाला स्वयंप्रेरणेनेच कुंपण घालून घेणारे. या दोघांच्या सहानुभूतीचें, साहाय्याचें कडें पहिल्या तीन पांडवांच्या भोवती सतत होतें. चित्राच्या पार्श्व-भूमीला जें कलात्मक मोल तेंच या दोघांच्या अस्तित्वाला आहे. त्यांचा निरंगीपणा तीन कौंतेयांच्या रंगदार व्यक्तिमत्त्वाला पोषक आहे. म्हणूनच त्यांचें अस्तित्व रितें नाही. हे दोघे आहेत म्हणूनच कुंतीचें मातृत्व उंचावलें आहे. ते सुकुमार आहेत. ते कुंतीवर अवलंबून राहणारे आहेत. तिला सुखविणारे आहेत. त्यांच्यांत लालित्य आहे. पांढऱ्या रंगाचा स्वच्छ नितळपणा त्यांच्यांत आहे. उच्छृंखलपणाचा पूर्ण अभाव त्यांच्यांत असल्यामुळेच कुंतींतलें व त्यांच्यांतले प्रेमबंधन दृढ असल्याचें व्यासाला दाखवतां आलें. सावत्रपणाचा संपूर्ण अभाव दाखवायचा, निःपक्षपाती, सफल वात्सल्य दाखवायचें तर सावत्र आईला असलीं गरीब, सालस मुलेंच असलीं पाहिजेत. हे दोघे आहेत म्हणून कुंतीचें कर्णाच्या बाबतींतलें वैगुण्य हीन पातळीला येऊन पोचत नाही. किंबहुना कर्णजन्माच्या लांछनाला छेद देण्यासाठीच जणु यांचा जन्म आणि त्यांच्या आईचा मृत्यु आणि त्यांची कौंतेयांबद्दलची निष्ठा व्यासाने उपयोगांत आणलेली आहे. दुःशासन होता म्हणूनच दुर्योधनाच्या खलत्वाचा काळा रंग त्याच्या मृत्यूच्या प्रसंगीं पुसून टाकून त्याला करुणेचा निळसर रंग व्यासाला देतां आला. दुर्योधनाचें खलत्व आपल्या-भोवती संपूर्ण लपेटून घेऊन दुःशासन एकटा मेला. कर्ण त्यांतून सुटला. शकुनि देखील पाऱ्यासारखा सुटला. पण त्या साऱ्यांच्या बोलण्या-वागण्यांतला सारा अंगार दुःशासनाभोवतीच घुटमळला. त्याची दुष्टाव्याच्या पापांतून मुक्तता झाली नाही. नकुल-सहदेव यांची भूमिका याच्या अगदी विरुद्ध. त्यांचें निरंगी शीतळ व्यक्तिमत्त्व, पांडवांच्या यशाचें, त्यांच्या गुणवत्तेचें, नकळत जतन करीत असतें. कुंतीचें दुसरें क्रियाशील आणि सुखकर असें रूप घेऊन जणु ते दोघे वावरत होते. हे आहेत म्हणूनच कौंतेयांच्या व्यक्तिमत्त्वाचा कोरेपणा कायम राहतो.

ज्या वेळीं तीन कौंतेयांत बोलाचाली होते, तेव्हाहि हे दोघे अलिप्तच राहतात. पांडव किती भांडले तरी अंतर्यामीं एकच आहेत, याचें प्रतीक म्हणून तर व्यासाने या दोघांना हें अभिनव मुकेपण दिलें नाही ?

तीन कौंतेयांचेहि तीन रंग आहेत. या तिघांत युधिष्ठिराचें व्यक्तिमत्त्व सर्वांत नेटकें व उमदें आहे. अर्जुनाला नायक करूनहि व्यासाने त्याची व्यक्ति-रेखा किंचित् अस्पष्ट ठेवली; तिच्यावर परीकथेच्या पारंपरिक रंगाचीं पुटें चढवलीं. परंतु खरी व्यक्ति त्याने रंगवली ती युधिष्ठिराचीच. उत्तम धनुर्धर काढला की अर्जुनाचें बाह्य चित्र पूर्ण होतें. पण असें कोणतेंच प्रतीक युधिष्ठिराला लागू पडत नाही. भीम-अर्जुन टोचून बोलतांना त्याला 'ब्राह्मण' म्हणत. पण ब्राह्मण हें युधिष्ठिराचें खरें प्रतीक नव्हे. त्याचें बिरुदहि नव्हे. मग युधिष्ठिर खरोखर कोण होता ? तो ब्राह्मणाहून अधिक ब्राह्मण होता. क्षत्रियाहून निराळा क्षत्रिय होता. त्याची आणि विदेही जनकाची जातकुळी एक होती. त्याची आणि गौतम बुद्धाची जातकुळी एक होती. युधिष्ठिर हा जनक आणि बुद्ध यांच्यांतला परंपरेने निर्माण केलेला सांधा आहे. बुद्धाच्या नीतितत्त्वांची खुमारी युधिष्ठिराचीं वचनें लक्षांत घेतल्यास आपल्याला अधिक चांगली कळते.

युधिष्ठिर हा ज्येष्ठ पांडव. त्याच्या ज्येष्ठत्वांतच व्यासाने छायाप्रकाशाचा खेळ मोठ्या गमतीने रंगवला आहे. हा मोठा भाऊ म्होरक्या असतो, तो याच अर्थाने की त्याच्या वचनांत त्याचे भाऊ असतात. पण जिथे क्रिया आली तिथे हा आपला छायेंत जातो आणि भावांकडून त्या क्रियेची फलश्रुति झालेली पाहतो. स्वतः हा कधीच पुढे झाला नाही. पण क्रिया ओसंडली आणि तिच्याभोवतीचें उन्मादाचें अवसान जिरलें, की एक प्रकारची शून्य पोकळी निर्माण होतेच. तशी पोकळी निर्माण झाली, की तिच्यांत फिरून चैतन्य ओतून नवनूतन क्रियेचें बीज पेरून आपल्या प्रत्येक भावाच्या कर्तृत्वाला पूर्णत्व आणूं पाहणारा फक्त युधिष्ठिरच. कारण युधिष्ठिराला तहान लागलेली होती ती पूर्णत्वाची. अपूर्णतेची त्याची जाणीवहि त्यामुळे इतरांपेक्षा अधिक प्रगल्भ व धारदार होती. प्रत्येक भावाच्या क्रियेमागे युधिष्ठिर हा आहेच. कधी तो क्रियेला प्रोत्साहक, तर कधी विरोधीहि असतो. पांडवांमधला संघर्ष व त्यांच्यांतला एकोपा हा युधिष्ठिरामुळेच फार वैशिष्ट्यपूर्ण असा झाला आहे. चिंतनशीलतेने क्रियाशीलतेला दिलेलें मुकें पण जबरदस्त आव्हान युधिष्ठिरांतच मला दिसतें.

लहानपणींच बापाच्या मृत्यूमुळे डोकीवर मोठा भार पडलेला हा मुलगा. लहान भावांचा जणु वत्सल पिताच तो असतो. स्वभावतःच अति मृदु व खंतखोर असा तो असतो. कौरवांच्या बाळपणच्या आततायी वागणुकीशीं मुकाबला करायला बलाने तो समर्थ नव्हता असें नाही. पण मुळांतच हमरीतुमरीचें आणि त्याचें वाकडें. अजातशत्रुत्व त्याच्या अंगोपांगीं भिनलेलें. पण तरीहि त्याचा जन्म शत्रुत्वाशीं झगडण्यांत गेला. बालवयांत जे कष्ट पडले त्यांमुळे भीम आणि अर्जुन गांजले; पण या गांजणुकींतून युधिष्ठिराचें मन मात्र एक नित्य नवें पोषण घेत गेलें. बाळपणीं भीम कौरवांच्या खोड्या करून आपलें वर्चस्व राखायचा प्रयत्न करी, त्याला युधिष्ठिराने अडवलें नाही. प्रहार, प्रतिप्रहार, विषप्रयोग यांच्यामुळे भीमाचें स्फुरण वाढलें. आत्मविश्वास वाढला. पण कडवटपणाहि वाढला. अर्जुनाचा आत्मविश्वासहि आपण अजोड धनुर्धर व्हावें या ईर्ष्येने प्रज्वलित केला.

युधिष्ठिराला मात्र असल्या साधनाची आवश्यकता भासली नाही. त्याच्या अंतर्मुखतेने त्याला सर्व तऱ्हेच्या अहंकारापासून मुक्त ठेवलें. जितका उत्कट भीमाचा आवेग आणि कडवटपणा, जितकी उत्कट अर्जुनाची ईर्ष्या, तितकीच उत्कट युधिष्ठिराची चिंतनांतील तन्मयता. स्वतःचीं तत्त्वें वारंवार कसोटीवर घासून पाहण्यासारखे प्रसंग त्याच्यावर बाळपणापासून इतके कांही आले, की या कसोट्यांचा त्याला सराव झाला. पुढे पुढे या सरावांतहि कौशल्य आलें. आणि अखेर युद्धप्रसंगीं कौशल्याचें तंत्र गेलें, कसोट्यांचें मूल्य हरवलें, तेव्हा याच्या भावना बोथटल्या नाहीत,—जशा भीष्माच्या बोथटल्या. दुःखाचें वरदान मागणाऱ्या कुंतीच्या या मुलाने आपल्या मनाचें हळवेपण मोडूं दिलें नाही. आदर्शाला तो सतत पूजीत राहिला. पण आदर्शाचें त्याने जड दैवत केलें नाही. करडा संयम आणि अनिवार हळुवारपणा, जागृतीचें व्यवस्थित भान आणि अजोड स्वप्नाळू वृत्ति यांचा सुंदर समन्वय युधिष्ठिरांत आहे. किंबहुना त्याच्यांत माणसाच्या सर्वसाधारण गुणांचाहि इतक्या विलक्षण तऱ्हेने समन्वय झालेला आहे, आणि त्या गुणांचा परिपाक इतक्या दोषांनी भरलेला आहे, की इतर कोणत्याहि पांडवापेक्षा युधिष्ठिर अति ढोबळपणें दोषी असा दिसावा. जुगारी, बायकोलाहि पणाला लावण्याइतका नादान जुगारी, अपमानाचा सूड घेण्याचें सोडून मेंगळट तत्त्वज्ञान उराशीं धरणारा मूढ क्षत्रिय,

स्वतःच्या पत्नीची राजद्वारीं झालेली विटंबना दोनदा सहन करणारा सत्त्वहीन पति, कृतघ्न व असत्य शिष्य—यांहून आणखी कुठलें न्यून कुणा पुरुषाच्या कपाळीं महाभारतांत आलें आहे ?

मग या माणसाच्या चिंतनशीलतेचें मोल काय ? त्याच्या तोंडचें तत्त्वज्ञान ही केवळ भुलावण तर नव्हे ? त्याने ही स्वतःची आणि इतरांचीहि फसवणूकच केली आहे की काय ? यालाच स्वर्गद्वार खुलें राहिलें यांत व्यासानेहि अनेक तत्त्वांशीं, मूल्यांशीं तडजोड केली आहे की काय ?—असे एक का दोन, अनेक प्रश्न युधिष्ठिराच्याच बाबतींत संभवतात. दुसऱ्या कौंतेयांतले दुभंग स्पष्ट दिसतात. पण याच्या व्यक्तिमत्त्वाला तडेच तडे गेलेले दिसतात; पण नेमकी हीच विरोधात्मक जुळणी करून, व्यासाने विसंगतींतूनहि अत्यंत जिवंत व कलापूर्ण व्यक्तिरेखा निर्माण केली आहे. गोरापान. उंच. स्नायु कसे जागच्या जागीं असलेला. विशाल वक्षःस्थल, खूप खूप वेदना आंत साठवणारें. श्वासागणिक वेदना आंत ओढून घेण्याचें कसब युधिष्ठिरालाच साध्य आहे. खूप खूप काळपर्यंत, श्वास कोंडेपर्यंत, त्या वेदनांचा दाब इतर सर्व अंतर्भावनांशीं व संवेदनांशीं तोलून पाहण्याचें जणु वेडच त्याला आहे. आपल्या भरदार छातींत त्याने प्रहारमय जयिष्णुतेचें क्षात्रबल वाढूं दिलें. पण प्रमाणांतच. या प्रमाणाच्या भानामुळेच त्याला स्वतःला अनेक वेळां गुदमरण्याचे प्रसंग आले. इतरांना तर त्यामुळे नको जन्म असेंहि झालें.

पण युधिष्ठिराने स्वतःचा जो असा कोंडमारा केला, तो अनाठायीं नव्हता. त्याला स्वतःलाहि अज्ञात असलेल्या एका महत्तर जगाची ओढ त्याच्या नसानसांत भरलेली होती. डोळ्यांना तें दिसत नव्हतें; बुद्धीला तें कळत नव्हतें; इंद्रियांना तें भासत नव्हतें; असें तें दूरवरचें श्रेय त्याला आंतून चाळवीत होतें. संभ्रमित करीत होतें. स्फुरण देत होतें. हें श्रेय काय हें युधिष्ठिरालाहि अखेरपर्यंत सांगतां आलेलें नाही. युधिष्ठिराला जन्मभर त्या श्रेयाच्या शोधांत राहावें लागलें. अनामिक मार्गाचा पथिक व्हावें लागलें. त्याला तें श्रेय मिळतें न मिळतें तोंच स्वर्गाचें दार सताड उघडतें. युधिष्ठिर त्यांत शिरतो व दार मिटतें. हें श्रेय मिळतेवेळीं युधिष्ठिर जगाला पाठमोरा असतो. आणि स्वर्गाचें दारच आपल्या सामोरें असतें. त्या महाविशाल द्वारांत हा एवढासा जीव एका कुत्र्याच्या संगतीसोबतींत प्रवेश करतो. जन्मभर जनांत असूनहि युधिष्ठिर एकाकीच

राहिला. अजातशत्रु असला तरी त्याचें अंतर्याम अज्ञाताच्या त्या दुर्दम्य प्रेरणेने एकांतपूर्णच राहिलें. त्याचें एकाकीपण दुबळें नसलें तरी अभंग होतें. पण स्वर्गाच्या महाद्वारांत जातां जातां कुत्र्याच्या संगतीच्या अट्टाहासांतच त्याचें श्रेय त्याला मिळालें. आणि जन्मभर जगापुढे खाली मान घालून वावरलेला, सर्व आरोप शांतपणें गिळणारा, हा निरहंकारी पांडव प्रथमच मान ताठ करून अनंताच्या कवेंत शिरला. कुत्र्याच्या निष्ठेइतकी आपली निष्ठा अढळ आहे आणि असावी याची जाणीव सदैव जिवंत राहावी, एवढाच अंधुक आदेश या अमर माणसाने मर्त्य माणसाला देऊन ठेवलेला आहे.

युधिष्ठिराच्या या अखेरच्या अंतर्धानांतच त्याच्या अस्तित्वाचें रहस्य दडलेलें आहे. सदेह स्वर्गप्राप्ति हें एका विशिष्ट मृत्युहीनतेचें प्रतीक आहे. मरून जीं सुखें कौरव स्वर्गांत भोगते झाले, तींच त्याच देहाने भोगणें हें केवळ गौरवाचें लेणें आहे. ढोबळ मानचिन्ह आहे. पण या ढोबळपणाखाली माणुसकीला सतत बिलगून राहणाऱ्या सुखमय, लीन अशा लहानशा चिर अस्तित्वाचें नाट्य व्यासाने सूचित करून सोडून दिलें आहे. मृत्युहीनता हें युधिष्ठिराला मिळालेलें वरदान आहे असें मला वाटत नाही. वरदान असतें तर तें इतकें ढोबळ राहिलेंच नसतें. व्यासाने मृत्यूचीं अनेक सुंदर-असुंदर चित्रें रंगविलीं आहेत. कृष्णाची अवतारसमाप्ति त्याने थोडक्यांत सांगून टाकली. पांडवांचीं मरणेंहि अति त्रुटितपणें व न्यायनिष्ठुर भाष्यासकट कोरडेपणाने सांगितलीं. अपराधी, लाचार धृतराष्ट्राचें मरण तपस्येच्या आवरणांत झाकून टाकलें. कर्णाच्या मरणाला हिमालयाची भव्यता आणली. उत्तरेचें मूल मृतावस्थेंतच जन्मलेलें पाहून कुसकरलेल्या कळीच्या शोकांतिकेची गाढ पण नाजुक वेदना व उद्वेगहि त्याने भरून ठेवला. युधिष्ठिराने युद्धांत मरण उघड टाळलें. दैवानेहि त्याला अमर ठेवलें. युधिष्ठिराचा मृत्यु झाला असता, तर एक अतिशय सुंदर मृत्युवलय व्यासाला सहज निर्माण करतां आलें असतें. पण तें त्याने कां टाळलें ? आत्म्याच्या अमरत्वाचें व देहाच्या विनाशित्वाचें तत्त्वज्ञान या सूक्ष्म संवेदनेच्या पांडवाच्याच बाबतींत त्याने बाजूला कां टाकलें ? मला वाटतें की, व्यासाच्या साऱ्या तत्त्वज्ञानाचें मोजमाप माणूसच होता. जीवनांत माणसाचें मोठेपण तसेंच मृत्यूच्या क्षणांतहि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचें सारसर्वस्व भरलेलें असतें. व्यासाला अभिप्रेत असलेला हा मानदंडाचा माणूस सामान्य आकाराचा

असतो. तो मित्रा असतो व नसतोहि. तो क्रूर असतो आणि नसतोहि. त्याच्या दुबळेपणांत सौंदर्य असतें. सामर्थ्यांत कुरूपता असते. त्याच्या वाणींत तथ्य नसतें. त्याच्या स्तब्धतेंत अर्थ असतो. असा हा चुकणामाकणारा माणूसहि स्वप्नाशिवाय जगूं शकत नाही. ज्याच्या त्याच्या स्वप्नाप्रमाणे त्याची नियति. आणि स्वप्न किती मोठें असलें, सिद्धि कितीहि अचाट असली, तरी सारीं माणसें अखेर एकाच मोजमापांत बसतात. मृत्यूचा शेवट अमरतेंत. एवढें दाखवण्यासाठीच व्यासाने युधिष्ठिराला अमरपद दिलें. त्याला इतरांपेक्षा श्रेष्ठ व मोठें होऊं दिलें नाही. युधिष्ठिर मेला असता तर कारुण्याचें केवढें विशाल वलय त्याच्याभोवती पडलें असतें. करुणेने भरलेलें अर्घ्य मृत्यूच्या क्षणींच माणसाला मिळतें. करुणेचा हा प्रसाद ज्या माणसाला मिळत नाही त्याच्या जीवनांतच कांही तरी उणें राहून जातें. बाकीचे पांडव गेले, द्रौपदी गेली, त्या वेळीं युधिष्ठिर शांत होता. अटळ अमरपदाच्या क्रौर्याचें भान त्याला आधीच झालें होतें. सार्‍याच पांडवांना झालें होतें. पण बाकीच्यांतलें उणें त्यांना काढून टाकतां आलें नाही. सतत साधनेमुळे युधिष्ठिरच एकटा अव्यंग राहिला आणि अमरपदाच्या जाळ्यांत अडकला. नरकाची हवा त्यानेच चाखली आणि तिच्यांतून तो बाहेर पडला. रणांगणांतून पळालेल्या या पार्थाला व्यासाने मृत्यूच्या रिंगणांतून कायमचें पदच्युत केलें आहे. त्याला नर्कवास अनुभवायला लावला आहे. त्याची थोरवी समग्र नष्ट केली आहे. कुत्रें नसतें तर करुणेचा केवढा सागर युधिष्ठिराच्या हृदयांत हेलावतो आहे याचें दर्शनहि कुणाला झालें नसतें.

युधिष्ठिराच्या अखेरगतींतला कोरडेपणा, आणि दुर्योधनाच्या मरणाचा प्रसंग आणि त्या वेळीं युधिष्ठिराला आलेला दुःखाचा उमाळा यांतला विरोध व्यासाने कौशल्याने साधलेला आहे. या विरोधामुळेच युधिष्ठिर माणूस राहिला. चांगला माणूस, पण इतरांपैकीच एक—आणि कदाचित् तितकाच अनामिक. त्यामुळेच आपण अर्जुन विसरतों, भीम विसरतों, पण युधिष्ठिर विसरूं शकत नाही.

युधिष्ठिराला दुर्योधनाच्या मृत्यूच्या प्रसंगीं जें दुःख झालें, त्याला भीमाचा जो उबग आला, त्या भावनेचें मर्म त्याची भूमिका प्रारंभापासून निरीक्षण केल्याशिवाय समजणार नाही. युधिष्ठिरांतल्या अंतर्गत संघर्षाचेंच तें चित्र आहे.

वनवासांत द्रौपदी युधिष्ठिराला टाकून बोलली. भीम-अर्जुन हेदेखील त्यांत सामील होतेच. युधिष्ठिर द्रौपदीला क्षमेचें महत्त्व काय तें सांगतो व तिला तात्पुरती निरुत्तर करतो. भावांना मात्र तो म्हणतो की, "द्यूताच्या वेळीं तुम्ही मला कांही म्हटलें नाहीत. मी जिंकलों असतों तर तुम्ही गप्प बसलां असतां. मी हरलों तेव्हा मात्र तुम्ही मला जुगारी, मूर्ख म्हणून हिणवतां हें बरें नाही. शिवाय सध्या आपण अगदी दरिद्री आहोंत. उठाव कशाच्या बळावर करणार? तोंपर्यंत आपण सिद्धि मिळवूं. अर्जुनाने पाशुपत अस्त्र मिळवावें."

या वेळीं "फार काळ एकत्र राहणें सुखाचें होत नाही. त्याने प्रेम उत्पन्न होण्याऐवजी घटतें मात्र," हें व्यासाने पुटपुटलेलें वचन युधिष्ठिराला तोडग्यासारखें वाटलें. अत्यंत कौशल्याने त्याने अर्जुनाच्या पराक्रमाला वाट मोकळी केली. भीमावर द्रौपदीचा भार टाकला तो वनवास संपेपर्यंत आणि त्याला आत्मगौरवाचें सुख उपभोगूं दिलें. अर्जुनाचा विरह हें पांडवांच्या आशेला आणि प्रेमाला मिळालेलें मोठेंच संजीवन होतें.

मात्र कर्णाचा अचाट पराक्रम पाहून युधिष्ठिर अतिशय लज्जित आणि व्यथित झाला. त्याचा अर्जुनावरचा विश्वास उडाला. आपलें क्षमेचें तत्त्वज्ञान तर तो विसरलाच, पण स्वतःवरचा त्याचा पार ताबा गेला. आणि या विकल अवस्थेंत अर्जुनाला डिवचलें तरच आपलें रक्षण होईल, नाही तर नाही, हें मनांत येऊन तो अर्जुनाला म्हणाला, "कर्ण मेला की बारा वर्षांचें शल्य गेलें. कर्णाने भुतासारखें मला पछाडलें आहे. जावें तिथे पुढे तो दिसतो. झोप नाही. द्रौपदीला उद्देशून तो जें बोलला त्यासाठी तूं त्याचा वध कर. द्वैतवनांत तूं त्याला मारण्याची प्रतिज्ञा केलीस. भीम त्याला भितो. त्याला मारलें नाहीस तर तुझें गांडीव, पराक्रम, बाण, रथ—इतकेंच काय, पण तुझें सारें सारें जें आहे त्याचा धिक्कार असो."

हें बोलणें अर्जुनाला लागलें. कर्णाने युधिष्ठिराला अगोदरच म्हटलें होतें, "तूं ब्राह्म धर्मांत प्रवीण आहेस. यज्ञकर्मांत, स्वाध्यायांत प्रवीण आहेस. वीरांशीं दोन हात करूं नको. जिकडे कृष्ण व अर्जुन तिकडे जा."

अर्जुनानेहि त्याचीच री ओढली. तो म्हणाला, "कृष्णा, तुझ्यासमक्ष मी याचेंच डोकें उडवतों. याला मारलें तरच प्रतिज्ञा पूर्ण होईल."

त्यावर कृष्ण म्हणाला, "असें प्राकृत बोलणें तुला शोभत नाही."

तरीहि अर्जुनाचा राग उतरेना. तो युधिष्ठिराकडे वळून म्हणाला, "जो तूं रणापासून कोसभर दूर असतोस, तो तूं बोलूं नकोस. भीम बोलतो, रागावतो, दोष देतो, तें ठीक. कारण तो मोठ्या योद्धयांशीं लढतो. तो साहसाचीं कामें करतो. तूं कांहीच करूं शकत नाहीस. भीम बोलला तर तें त्याला शोभतें, मला ठपका द्यावा तर त्यानेच. तूं बोलण्यांत फर्डा आणि वागण्यांत निष्ठुर आहेस. ब्राह्मणांचें बळ त्यांच्या तोंडांत असतें. असेंच तुझें आहे. जसा कांही मी दुबळा आहें असें मानून तूं बोलतो आहेस. तूं स्वतः पाप केलेंस आणि आम्हांला निस्तरायला लावतो आहेस. तूं द्यूत खेळलास हेंच मुळीं पापाचें होतें. तेंच आता आम्हांला संकटांत घालतें आहे. तरी मी तुझें भलेंच करीन. तूं जुगारी. तुझ्यामुळे राज्याचा नाश झाला. आम्ही संकटांत पडलों. आता मला क्रूर बोलून दुखवूं नको. माझा संताप अनावर होतो."

थोड्या वेळाने अर्जुनाला आपल्या बोलण्याचा पश्चात्ताप झाला. इतका की तो कृष्णाला म्हणाला, "माझ्या हातून मोठा अपराध घडला. मी आत्महत्या करतों."

कृष्णाने चतुरपणें म्हटलें, "बंधुहत्येहून आत्महत्येचा अपराध मोठा आहे."

फिरून अर्जुनाने भावाचा अपमान कधीहि केला नाही. अश्वमेधाच्या अगोदर भावाभावांची बोलाचाली फिरून एकदा झाली, पण ती तात्त्विक प्रकारची होती.

अर्जुनाला पश्चात्ताप झाला आणि त्याने भावाची क्षमा मागितली. तेव्हा युधिष्ठिरहि पश्चात्तापाने पोळून गेला होता. अत्यंत निर्मत्सर आणि मुळांतच गरीब स्वभावाचा तो पांडव आता तर अत्यंत दीन होऊन म्हणाला, "अर्जुना, मीं केलें तें चांगलें नाही. तुम्ही सारे त्यामुळे संकटांत पडलां. म्हणून तूं माझें डोकें उडव. मी पापी आहें. वाईट व्यसनांत बुडालेला आहें. भित्रा आहें. मूर्ख आहें. मला कशाला अनुसरतोस? मी आताच वनांत जातों. माझ्यावाचून तुमचें चांगलें होईल. मी क्लीब आहें. भीम चांगला राजा आहे. मला आता लागट बोलणें सोसवत नाही रे! आणि तूं बोललास तर मग राहिलें काय? मला आता जगावेंसें वाटत नाही. जीवनाला अर्थच राहिला नाही." असें बोलून युधिष्ठिर अंथरुणांतून उठून चालूं लागला.

भीमाने द्यूतप्रसंगीं त्याला "तुझे हात तोडले पाहिजेत" असें म्हटलें होतें. पण तें युधिष्ठिराने मनावर घेतलें नव्हतें. अर्जुनाचें बोलणें मात्र त्याच्या मनांतून

जाईना. युधिष्ठिराचें हें वागणें सर्वांनाच नवीन होतें. त्या वेळीं कृष्ण पुढे झाला आणि म्हणाला, "तुम्हीं दोघांनीहि एकत्र राहावें हें बरें. अर्जुनाने तुझा अपमान केला, तो माझ्या नादीं लागून. वडील माणसाचा अपमान हा वधासारखा आहे. मला क्षमा कर. मी सांगतों की कर्ण आज मरणार."

कृष्णाने पायांवर लोळण घेतली. युधिष्ठिराला मागे फिरण्यावाचून आता काय गत्यंतर होतें? तो मागे वळला आणि त्याने अर्जुनाला घट्ट मिठी मारून त्याचें मस्तक हुंगलें. अर्जुन त्याच्या कुशींत शिरला.

दुर्योधन पडला त्या वेळीं भीमाने त्याला लाथ मारली, हें पाहून युधिष्ठिर लाजेने काळवंडला. भीमाने दुःशासनाचें काळीज उपटून त्याचें रक्त पितांना म्हटलें होतें, "हें रक्त दुधाहून गोड आहे. मधाहून मधुर आहे." त्याचें तें कृत्य पाहून सारेच शहारले होते. पण युधिष्ठिराने त्या वेळीं त्याच्याकडे दुर्लक्ष केलें होतें. पण आता मात्र त्याला राहवेना. "हें तूं काय करतोस? त्याला लाथ मारूं नको. धर्माचें उल्लंघन करूं नको. तो नातेवाईक आहे. राजा आहे." पण इतकेंच म्हणून तो राहिला नाही. भीमाकडे पाठ वळवून तो दुर्योधनाजवळ जाऊन बसला. अतिशय सद्गदित होऊन तो म्हणाला, "बाबा, तूं शोक करूं नको. तुझ्या अपराधाचें फळ तुला मिळालें म्हणून तुझा मृत्यु धन्य आहे. दुर्योधना, आम्ही तुझ्याहूनहि हीन-दीन झालों आहों. आमचे सारे नातेवाईक गेले. आमचें जीवन दरिद्री झालें. आता मुलीबाळीं, सुना, नातसुना यांना मी तोंड कसें दाखवूं? विधवा सुनांचीं तोंडें कशीं पाहूं? तूं स्वर्गांत जाशील. नरकासारखें दुःख भोगीत आम्हांला मात्र राहिलें पाहिजे."

परंतु एवढ्यावरच हें प्रकरण थांबलें नाही. कमरेखाली मारूं नये हा गदायुद्धाचा नियम भीमाने पाळला नाही, याचा बळरामाला फार संताप आला होता. भीमाने सभेंतच "तुझी मांडी मी फोडीन!" अशी दुर्योधनाला उद्देशून सर्वांसमक्ष प्रतिज्ञा केली होती याची कृष्णाने आठवण दिली. पण बळराम म्हणाला, "कपट तें कपटच." आणि संतापून तो तीर्थयात्रेला निघून गेला. आता कृष्णहि चिडला. तो युधिष्ठिराला म्हणाला, "तूं भीमाला लाथ कशी मारूं दिलीस?"

बिचारा युधिष्ठिर! लाचार होऊन तो म्हणाला, "कृष्णा, मला तें मुळीच आवडलें नाही. भीम मला वनवासांत टाकून बोलला तें सारखें मनांत टोचत होतें. म्हणूनच मीं या गोष्टीची उपेक्षा केली. मी मूढ झालों होतों. धर्म असो,

अधर्म असो, मूर्ख आणि लोभी दुर्योधनाला कसेंहि मारून त्याला संतुष्ट होऊं दे, एवढाच विचार मीं केला."

या भयानक नाट्याचा शेवट व्यासाने अतिशय शहारा आणणारा असा केला आहे. दुर्योधनाभोवती राजे जमले आहेत, आणि तिथेंच हें वादंग माजलें आहे. त्या वेळीं कृष्ण म्हणतो, "चला सारे. राहूं दे याला इथेंच. हा पापी आहे. पांडवांना सुईच्या अग्राएवढी भूमीदेखील हा देईना. पडूं दे याला. शत्रु किंवा मित्रहि म्हणण्याच्या लायकीचा हा नाही."

हें ऐकून दुर्योधन त्या स्थितींतहि चवताळतो आणि शेपटी ठेचलेल्या सापासारखा, दोन हातांवर शरीर तोलून, डोकें वर करून फुसकारत म्हणतो,

"कंसाच्या दासाचा पोरटा तूं. तूंच मला मांडीखाली मारायचा सल्ला दिलास. तुला लाज नाही. भूरिश्रवा, द्रोण, कर्ण, भीष्म—साऱ्यांची आठवण तुला देतों. सरळ मार्गाने तुम्ही लढतां तर तुमचा जय झाला नसता. मी तर स्वर्गांत जातों आहें. तुम्ही मात्र भग्न हृदयाने इथेंच शोक करीत बसा."

हें ऐकून पांडव व कृष्ण काळेठिक्कर पडतात. कृष्ण म्हणतो, "कपटा-वाचून याला मारणें शक्य नव्हतें. तुम्हांला जय हवा होता ना?"

युधिष्ठिर मात्र गांधारीला तोंड कसें दाखवावें या काळजींत पडला. शेवटीं तें काम कृष्णाने पत्करलें. तरी पण त्या दिवसापासून युधिष्ठिराची झोप उडाली. तो दुःखी झाला. त्याची शांति गेली. युद्धाचे सारे भयानक प्रकार भोगतांना युधिष्ठिर इतरांपेक्षा फार फार विकल झाला. अगोदरच त्याला युद्धाची किळस. युद्ध शक्य तितकें टाळावें असेंच त्याचें मत. कृष्णशिष्टाईच्या अगोदरच तो कृष्णाला म्हणतो, "दोघे युद्ध करतात त्यांतला एक मेला तरी जय होत नाही. युद्धांत चांगलें असें काय आहे?" आणि मग समग्र जीवनच एक संग्राम आहे असें दृश्य त्याच्या डोळ्यांपुढे तरळतें आणि तो म्हणतो, "ब्राह्मणांच्या हातीं करवंटी. क्षत्रिय वधाने पोट भरतात. शूद्राला सेवेचे कष्ट. वाण्याला मीठ, गूळ वगैरेसारखे पदार्थ विकून जगावें लागतें. कुत्रा कुत्र्याला, मासा माशाला आणि क्षत्रिय क्षत्रियाला मारतो. शूर दुर्बलाला मारतो. अयशस्वी यशस्वी माणसाला मारतो. पराजय मरणाहून वाईट. जयांतहि अर्थ नाही. आपलीं माणसें मेल्यावर सुख काय? वैर वैराने शमत नाही. शांतीसारखें सुख नाही."

पण युधिष्ठिराचें हें बोलणें वाळूंत पाणी जिरावें तसें अक्षरशः जिरलें.

कर्णाच्या मृत्यूचें रहस्य कळल्यानंतर तर युधिष्ठिराचा वैताग फारच वाढला. तो इतका तगमगला की सांगतां सोय नाही. स्वतःच्या मूढतेने तो चकित झाला. नेहमीच त्याला तसें होई. पण या वेळीं त्याचा संयम बारगळला. कृष्ण शिष्टाईला निघाला तेव्हा युधिष्ठिर कुंतीला उद्देशून म्हणाला होता, "तूं धृतराष्ट्राच्या घरीं जातो आहेस, तर आमच्या आईची भेट घे. वत्सल अशी आमची आई. लहानपणापासून सासरच्यांचीं दुःखेंच पाहिलीं तिने. आमचें दुर्योधनापासून रक्षण केलें. खूप खूप दुःख सोसलें रे तिने!" असा हा कनवाळू मुलगा बेभान होऊन तिलाच शापतो. युधिष्ठिराचें कर्णाच्या बाबतींतलें आकर्षण द्विधा होतें. एकीकडे त्याच्याबद्दल फार भय व त्याच्या करणीमुळे उत्पन्न झालेला द्वेष व दुसरीकडे त्याच्याबद्दल अनावर ओढ. कर्णाचें तोंड पाहून एक प्रकारचा आनंद युधिष्ठिराला वाटे.

कर्ण व कुंती यांच्या पायांतलें साम्य युधिष्ठिराच्या लक्षांत केव्हाच आलें होतें. आणि तें साम्य आणि कर्णाचा चेहरा यांनी इतका शांत भाव त्याच्या मनांत निर्माण केला की द्रौपदीच्या विटंबनेच्या वेळींहि तो शांत राहूं शकला. आपण त्याच वेळीं या साम्याचा छडा लावून कां घेतला नाही? बंधुवधाचें पातक कां जोडलें?—ही टोचणी त्याला लागून राहिली. सर्व दुःखांहून हें दुःख मोठें होतें. वंचित कर्णाभोवती त्याचें मन घुटमळत राहिलें.

राज्य सोडून निघून जावें, तप करावें, असें त्याच्या मनांत आलें. त्याचा हा विचार पाहून अर्जुन रागावून म्हणतो, "एवढें राज्य जिंकलें तें सोडून जायचें म्हणजे काय? लोक काय म्हणतील भिक्षापात्र घेऊन हिंडलास तर?"

भीम अर्जुनाला टेकू देऊन म्हणतो, "राज्य सोडून भीक मागायची काय? अर्थ हाच क्षत्रियाचा धर्म." द्रौपदी पण त्यांना साथ देते.

अर्जुन फिरून म्हणतो, "द्रौपदीचा सभेंतला अपमान, वनवास, कीचकाची लाथ—सारें विसर. युद्धांत शत्रु, मित्र पाहायचे नसतात. युद्ध म्हणजे युद्ध. आणि तें प्राणपणाने, मन लावून करावें लागतें. द्रोण, भीष्म यांच्याबद्दल शोक करूं नको. कांही जण असे असतात की त्यांना सुखाच्या प्रसंगींदेखील दुःखच आठवतें. कांही दुःखांत असले तरी सुख आठवून आनंदी होतात. युधिष्ठिरा, तूं जें चांगलें आहे आणि जें दुःखाहून बलवत्तर असें आहे तें आठव. परंतु तुझा स्वभावच असा की तूं कांही तरी मनांत घेऊन कुढत बसतोस."

याच्यावर युधिष्ठिराने उत्तर दिलें, "सर्व कांही मानण्यांत आहे. जनकाचेंच पाहा ना. तो म्हणायचा, माझ्याजवळ कांही नाही तरी माझें धन अनंत प्रकारचें आहे. मिथिला जळली तरी माझें कांही जळायचें नाही."

आता अर्जुन कांही तो परीकथेंतला स्वप्नाळू नवयुवा नव्हता. खडतर अनुभवांनी तो प्रौढ व्यवहारी पुरुष झाला होता. राज्य मिळालें तरी धन नव्हतें. तें कसें आणून राज्याचा गाडा हाकायचा हीच चिंता त्याला पडली होती. आणि युधिष्ठिर राज्यावर असला तरच त्याला फिरून धन मिळवून आणायला हुरूप राहणार होता. तो चिडून म्हणाला, "जनक मूर्ख होता. तो राज्य सोडून भिक्षा मागायला निघाला तेव्हा त्याची राणी त्याला म्हणाली, 'संपत्ति जाळून निघालेला तूं कुत्र्यासारखा दिसतोस. तुझ्यावर अवलंबून असलेली प्रजा कुठे जाईल? कुठलें श्रेय तुला मिळणार?' जनकाचा तत्त्वज्ञ म्हणून लौकिक असला तरी तोहि मूढ होता. प्रजापालन आणि देव, अतिथि, व भूतांचें पूजन केलेंच पाहिजे."

तरीहि युधिष्ठिर आपला हेका सोडीत नाही. आपला संकल्प युधिष्ठिराने कधीच सोडलेला नाही. पण आपल्या गुणांची प्रौढीहि त्याने कधी मिरवली नाही. परंतु या वेळीं मात्र तो निर्वाणीला पेटून म्हणाला, "मी शास्त्रें शिकलों आहें. वेद, धर्म सारें कांही शिकलों आहें. तूं अस्त्रेंच शिकला आहेस. शास्त्रांचा अर्थ तुला कधीच समजणार नाही. धर्माचें सूक्ष्म स्वरूप तुला कळायचें नाही. तूं वृद्धांची सेवा केलेली नाहीस. तूं नुसतेंच युद्ध जाणतोस. धन सर्वांत श्रेष्ठ ही तुझी समजूत चुकीची आहे. तपच सर्वांत मोठें. ऋषींना त्यानेच गति मिळाली. तपाने खूप मिळतें. बुद्धीने महान् श्रेय प्राप्त होतें. त्यागांतच सुख आहे."

या वेळीं अर्जुन गप्प बसला. पण देवस्थान ऋषि व व्यास यांनी अर्जुनाची बाजू उचलून धरून सुवर्णमध्य काढला. राज्य धर्माने मिळविलें, तें सोडणें बरोबर नव्हे. यज्ञ केला की धनाचें सार्थक होईल.

या वेळीं युधिष्ठिराच्या अंतर्यामांतलें ओलें दुःख उचंबळून आलें. तो म्हणाला, "मुलें गेलीं आमचीं. बायका निपुत्रिक झाल्या. म्हणून शोक आवरत नाही. राज्यांत मन लागत नाही."

यावर व्यासाने त्याला म्हटलें, "सुख मिळो वा दुःख, जें प्राप्त झालें तें घेतलेंच पाहिजे. सुख नेहमी नसतें. दुःखहि नेहमी नसतें. हृदय अपराजित

ठेवून जें पुढे येईल तें घेतलें पाहिजे. साऱ्या सहवासांची अखेर विरहांतच होते. म्हणून शोक करूं नको."

कृष्णहि समजावणी करतो आणि व्यास राजधर्मावर प्रवचन करतो. युधिष्ठिराचें मनहि शांत होतें आणि तो वनांत जायचा हट्ट सोडून हस्तिनापुरांत प्रवेश करतो.

यानंतर युधिष्ठिराने बरींच वर्षे राज्य केलें. पण त्यानंतरच्या काळांतली हकीकत व्यासाने लिहिलेली नाही. युद्धापर्यंतच्या स्थितींतलीं युधिष्ठिराचीं मानसिक आंदोलनें कदाचित त्यांत नसतीलहि. असलींच तर युद्धाचीच गाथा लिहायला निघालेल्या व्यासाला पुढचें राज्याचें चित्र अनाठायीं वाटलें असेल. शिवाय सुख, समृद्धि एकरंगी असते. संघर्षांतच ज्याची कला फुलली तो संघर्ष-विहीन जीवनाला काय महत्त्व देणार? त्याने हात घातला तो एकदम मृत्यूच्या अखेरच्या संघर्षाला. आणि तिथे शांतताप्रिय, संघर्षरहित युधिष्ठिरालाच शेवटच्या निष्क्रिय शांततेचें प्रतीक बनवून त्याने अक्षरशः शून्यांत बुडवून टाकलें. त्याचें पार्थिव जीवन संपलें, मृत्यूहि संपला. आणि त्याचा कल्याणप्रद संकल्प मात्र झरून जाऊं नये म्हणून स्वर्गाच्या संपुटांत घालून व्यासाने ठेवून दिला.

युधिष्ठिराने दानधर्म केला, पुण्याची कास धरली. पण ती इतरांप्रमाणे सकाम नव्हती. वनांत द्रौपदीला तो म्हणतो की, 'मी धर्म करतों, पण फळाची इच्छा ठेवून करीत नाहीं.' त्याने विशिष्ट दैवताचें किंवा धर्मसंप्रदायाचेंहि स्तोम माजवलें नाही. कश्यपाची क्षमेची गाथा तो द्रौपदीला सांगतो. जनकाचेंहि आकर्षण त्याला आहे. परंतु तो भक्त असा कुणाचाच नव्हता. बुद्धीची प्रतिष्ठा तो उत्तम तऱ्हेने जाणीत होता. स्वतःच जीवनाचा विचार करावा, सुज्ञांचा सल्ला मात्र घ्यावा, असा त्याचा बाणा होता. स्वतंत्र बुद्धीचा उद्गाता त्याच्यासारखा अन्य महाभारतांत नाही. आपल्या मतांसाठी त्याने अपार कष्ट सोसले. आपल्या निर्णयांची त्याने प्रौढीहि मिरवली नाही. किंबहुना बुद्धिवादी असल्यानेच तो सदा साशंक असे. द्विधा होत असे. एका प्रश्नाचा दोन तऱ्हांनी विचार करूं शकत असे. म्हणूनच तो अजातशत्रु होता. म्हणूनच एकाकीहि होता. त्याचा धर्म म्हणजे उच्चतम नीतिमत्ता. वैयक्तिक, कौटुंबिक व सार्वजनिक नीतिमत्ता त्याने भीष्माकडून ऐकली. अध्यात्माचे सिद्धांत त्याने

घोकले नाहीत. उपनिषदांच्या तत्त्वांचा काथ्याकूट केला नाही. दैनंदिन जीवनांतलें व विशिष्ट प्रसंगांतलें माणसाचें वागणें हाच सर्व तत्त्वज्ञानांचा मूलाधार आहे हें त्याने जाणलें. त्याने मोक्षाचा ध्यास घेतला नाही. ध्यास घेतला स्वकीयांना धर्ममार्गाने जाऊन सुखी कसें करतां येईल याचा! सर्वांत मोठा ध्यास त्याला क्षमेचा. प्रभुत्व व सत्ता यांची शोभा क्षमेंतच आहे, हें अट्टाहासाने—कुचेष्टा होत असतांनाहि—सांगणारा युधिष्ठिर हा एकटाच होता. शांतीची तळमळ त्याच्यासारखी क्वचितच कुणाला असेल.

अत्यंत मृदु अंतःकरणाचा हा माणूस युद्धाच्या कठोर करणीसाठी नियतीने कां वापरला कोण जाणे! पण एक मात्र खरें की, बाळपणापासून अखेरपर्यंत युधिष्ठिराने कोणत्याहि तीव्र महत्त्वाकांक्षेंत स्वतःला वाहवूं दिलें नाही. लवचिकपणा कायम ठेवून तो सतत शांतीच्या मूलाधाराचा वेध घेत राहिला. आणि वाटसराप्रमाणे आपल्याच त्या अरुंद पाऊलवाटेने सतत चालत राहिला. अखेरची वाट फार निरुंद होती. चढणीची होती. पत्नी पडली. भाऊ पडले. वाटेंतलें कुत्रें तेवढें राहिलें. कुत्र्याच्या डोळ्यांतलें कारुण्य युधिष्ठिराच्या प्राणांना भिडलें. कारुण्य प्राणांना भिडतें तेव्हाच धर्माचा आढळ होतो. शांति आपोआप स्रवूं लागते. त्याच शांतीचा घुटका घेत हा पथिकहि मुक्त झाला.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......... वि: ...निबंध......
क्रमांक ....१४६०.......... नों: दि: ..........
३०/११/६७

# ८

## अश्रु हरवल्यावर

प्राचीन भारतीय वाङ्मयांत शतायुषीपणाचें महन्मंगल स्तोत्र ठायीं ठायीं गायिलेलें दिसतें. मुलें, बाळें, नातवंडें-पंतवंडें यांचा समृद्ध संसार स्वतः वार्धक्यांतहि तरतरीत राहून पाहावा ही मनीषा वैदिक ऋषींनीहि बाळगली. त्याच मनीषेचा वारसा महाभारतांत दिसावा यांत कांहीच नवल नाही. मात्र पूर्वीच्या वाङ्मयांतलें तें चिरायुषीपणाचें स्वप्न महाभारतांतल्या विराट व्यवहारांत तसेंच रंगीत, गुळगुळीत व आकृतिहीन राहिलेलें नाही. माणसाच्या प्रत्येक कामनेला, प्रत्येक अनुभवाला, हरएक जीवनावस्थेला व्यासाने एकेक घाट दिलेला आहे. आणि हा घाट देतांना स्वतः केलेल्या मुशी त्याने स्वतःच फोडून टाकलेल्या आहेत. आणि म्हणूनच महाभारतांतले हे घाट सार्वत्रिक, किंबहुना विश्वव्यापक, वाटले तरीहि ते स्वतःच्या केंद्रापासून कधी ढळत नाहीत. आणि म्हणूनच त्यांतल्या व्यक्ति फक्त त्या व्यासनिर्मित वातावरणांतच स्वतःचा आकार, स्वतःचीं परिमाणें, स्वतःचे खास विशेष धारण करून जिवंतपणें वावरतात. त्यांना तिथून बाहेर काढून त्यांचे व्यवहारी आदर्श बनवा की ते केवळ ढोकळे बनतात. काष्ठपुतळ्या बनतात.

वार्धक्याचें परिमाण व्यासाने जें दिलें आहे तें मुसमुसलेल्या तारुण्याच्या त्याच्या भानाहूनहि फार विशाल आहे. हें परिमाण मात्र त्याचें स्वतःचें नाही. परंपरेंतून त्याने तें उचललें आहे. 'वार्धक्य' हें परिपक्वतेचें दुसरें नांव आहे. माधुर्य, अनुभवांची परिपूर्णता, आणि अलिप्ततेने लहानमोठे व्यवहार जोखण्याइतका समतोलपणा असणें याचेंच नांव वार्धक्य. पलीकडच्या सीमेकडे

ज्याचें लक्ष केंद्रित झालें आहे असाच मनुष्य ही अवस्था भूषवूं शकतो. असा मनुष्य अंतर्मुख असूनहि तटस्थ असावा लागतो. त्याच्या स्वतःच्या इच्छा अशा नसतातच. परंतु कल्याणाचा, सार्वत्रिक कल्याणाचा छंद मात्र अशा परिपक्व वृत्तीच्या माणसांत जबरदस्त असतो. स्वतःचें विसर्जन करण्यासाठी तो धडपडत असतो. असा हा आदर्श वृद्ध द्रौपदीने फार चांगला आकलन केला होता. तो नसला तर सभेचें सभापण हरवतें. कारण या वृद्धाजवळ निखोड सत्याचा अमोल ठेवा असतो. हें सत्य करुणावृत असतें. सर्व प्रकारच्या दंभापासून मुक्त असतें आणि म्हणूनच भीरु नसतें.

असा हा द्रौपदीने मनोमनीं रेखाटलेला, कौरवांच्या सभेंत आक्रोश करून आळविलेला वृद्ध कोण होता? कुठे होता? पितामह भीष्म, गुरु द्रोण, जराजर्जर धृतराष्ट्र, विदुर हे सारे म्हातारेच होते. पण त्यांच्यांतला तो शांत, भव्य भाव असलेला वृद्ध कुठच्या कुठे लुप्त झाला होता. भीष्म, विदुर हे पार गोठून गेले होते. परंतु अंध धृतराष्ट्राच्या मनांत मात्र त्या वेळीं प्रचंड क्षोभ माजला. धृतराष्ट्राच्या वार्धक्याचा विशेष हाच की त्याचें मन नेहमीच अशांत असायचें. द्विधा असायचें. शंकाकुल असायचें. आणि अटीतटीचे प्रसंग तर सदाच त्याच्याभोवती असायचे. त्यांतून तो पडला राजा. निर्णय घेण्याचा बोजाहि त्याच्याचवर पडायचा. जिथे जिथे स्वार्थाला छेद द्यायचा प्रसंग येई तिथे तिथे धृतराष्ट्राची समबुद्धि कोलमडे. आणि तो न्यायाला टाळून, सत्य डावलून कांही तरी करून बसे. नाही तें बडबडे. कधी दीन होई, कधी मत्सरग्रस्त होई. तर कधी पश्चात्तापाने पोळून निघे. अनेक वेळां न्यायाच्याच वाटेने आपण गेलें पाहिजे ही बोचणी त्याला लागे. आणि मग तो विदुराला बोलावी आणि आपलें हृद्गत त्याच्यापाशी ओके. भीष्म, द्रोण आणि विदुर यांच्याहून तो फार दुबळा होता यांत शंकाच नाही. परंतु सभेंत द्रौपदीच्या आव्हानाने सर्व लहानथोर स्तिमित झाले असतांना, धृतराष्ट्रांत, क्षणभरच कां होईना, पण द्रौपदीने हेरलेल्या आणि प्रत्यक्षांत चिरस्वरूपांत न दिसणाऱ्या त्या आदर्श वृद्धाचा संचार झाला. त्याने तिला दास्यांतून पतींसकट मुक्त केलें. आणि तेवढें घडल्यानंतर मात्र धृतराष्ट्र फिरून आपला आपण झाला. ठेचाळत, गोते खात, रडत ओरडत, स्वतःला व इतरांना दूषणें लावीत तो अखेरपर्यंत राहिला. हां हां म्हणतां तें शालीन विशाल वृद्धत्व सभेंत भासमान

दा. क. १२३८५

झालें आणि नाहीसेंहि झालें. धृतराष्ट्राला त्यानें जराहि उंचावलें नाही. भीष्मादिकांना कुठलीच प्रेरणाहि दिली नाही. पांडवांना कुठलेंच आश्वासनहि त्यामुळे मिळालें नाही. सर्वांच्या माना खाली झाल्या. क्षुद्र दुबळ्या मनांची कीव, चरफडाट आणि सर्वत्र विफलता पेरून तें विचित्र भान नाहीसेंहि झालें.

मात्र त्या क्षणाचा, त्या भानाचा दबदबा निरनिराळ्या प्रकारें साऱ्याच वयोवृद्धांना सतत चाळवीत राहिला. धृतराष्ट्राचीं मानसिक आंदोलनें तेव्हापासून शतपट वाढलीं. गांधारीच्या मनाची तीव्रता तर इतकी वाढली की न्यायाचें स्फटिकासारखें रूप तिच्या नजरेसमोर वारंवार येऊं लागलें. आपल्या स्वार्थी, पापी पुत्राचा त्याग करण्याबद्दल भीष्माप्रमाणेच तिने पतीला सांगितलें, त्याच्याशीं अत्यंत समतोलपणें चर्चा केली. द्रौपदीच्या अन्यायाचें मानसिक परिमार्जन खऱ्या अर्थानें कुणीं केलें असेल तर तें गांधारीनेच. आई मुलाविरुद्ध उठली. युद्धांत मरूं घातलेल्या मुलांची आई राजकारणाविरुद्ध अगोदरच एक प्रकारचें बंड करून उठली होती. अनुद्यूताची कल्पना हाणून पाडण्याचें लहानसें यश तेवढें तिच्या पदरीं पडलें. परिपक्वतेच्या दिशेने गांधारी भराभर चालूं लागली होती. धृतराष्ट्र मात्र तिच्या किती तरी मागे होता. भीष्म, विदुर यांच्या बरोबरीने गांधारी आता वाढली होती. त्यांच्याहूनहि मोठें दुःख गिळीत ती न्यायाला चिकटून राहण्याची शिकस्त करीत होती.

मात्र इतकें झालें तरी या साऱ्या वयोवृद्धांच्या प्रतिमा आपल्यासमोर येतात त्या दुःखाच्या भारानें वाकलेल्या, कंबर मोडलेल्या व्यक्तींच्या. त्याला अपवाद एकच. भीष्म. महाभारतांतला वृद्ध म्हटल्यावर एकच आकृति प्रथम डोळ्यांसमोर येते, आणि आदर्श वृद्धाची कल्पना तिच्यांत पूर्णत्वाने साकारली नाही तरी तिच्या आसपास छायेसारखी वावरणारी आकृति कुणाची असेल तर ती पितामह भीष्माचीच. कणखर शरीर, साऱ्या स्मृति अखेरपर्यंत जिवंत असलेलें खोल व गंभीर मन, साऱ्यांत मिसळून पुन्हा तटस्थ—असा हा भीष्म आहे.

कुरुवंशांतला सर्वांत ज्येष्ठ पुरुष तोच. सर्वांना वाढवून नीति, कर्तव्य आणि कर्तृत्व यांचे पाठ देणारा देखील तोच. स्वतःनंतरच्या तीन पिढ्या तर राहोतच, परंतु स्वतःच्या आधीच्या पिढीसाठीहि झिजणारा भीष्मच. एक उदासीन, आंतल्या आंत उकळणारें, आणि शांत पण जड कवच वरून धारण करणारें कुणाचें व्यक्तिमत्त्व असेल तर तें भीष्माचेंच.

भीष्म हा उपजतच पोक्त होता. अष्टावक्रासारखा. पुरूसारखा. अष्टावक्राने बंदीपुढे बढाई मारली की, "मला लहान म्हणूं नकोस. ज्याचें डोकें केवळ पांढरें तो कांही स्थविर होत नाही. जो तरुण असून पंडित असतो त्याला देवहि वृद्ध म्हणतात." पुरूने तर उघड बापाचें म्हातारपण स्वतःवर घेतलें. पण तें म्हातारपण अंतरंग भूषवणारें वार्धक्य नव्हतें, तर युवावस्थेची मरणकळा ज्याला म्हणतात असें सर्वदा सर्वांना नकोनकोसें वाटणारें नेहमीचें म्हातारपण होतें. त्यांत कामवासनेचा मृत्यु होता. निर्माणाची व पराक्रमाची अखेर होती. भीष्माच्या रूपाने व्यासाने या दोन्ही उच्चनीच अवस्थांचा समन्वय घडवून आणलेला आहे. पित्याची इच्छा पूर्ण करतांना राज्य, विवाह, सर्वांचाच त्याग भीष्माने केला आणि त्याबद्दल त्याला कधीहि अनुताप झालेला नाही. जीवनांतील शारीरिक तारुण्याचा त्याग त्याने केलेला नाही. मात्र त्या तारुण्याच्या बलिष्ठ निर्माणांत त्याने अष्टावक्राला अभिप्रेत असलेलें सारें स्थैर्य, सारा समंजसपणा ओतला. हें करतांना एक विलक्षण अंतर्मुखता त्याला लाभली. तो स्वतःच्या आंत आंतच बुडत राहिला. पण त्याबरोबर त्याच्या तरल संवेदना त्या प्रमाणांत करवंडत गेल्या. युधिष्ठिराप्रमाणे अंतर्मंथनांतून निघणारी सूक्ष्म संवेदनाक्षमता भीष्माच्या बाबतींत आढळत नाही. आढळायचें कारणच जणु आता उरलेलें नाही. ही बोथटणी नसती तर भीष्माला शांत, दांत वृत्तीने त्यागाचा भार सहज पेलून धरतां आला नसता.

आंदोलणाऱ्या भावना युधिष्ठिराला शोभून दिसल्या. क्वचित् क्षोभाचे अश्रु विदुराला सुखाने गाळतां आले. पण तरुणपणांतच अश्रु हरवून बसलेला माणूस भीष्माशिवाय दुसरा कुणी आढळेल असें मला वाटत नाही. स्वतःच स्वतःला अट्टाहासाने पारखा करून घेणारा, स्वतःच्या मनाचे कांही भाग स्वतःच कायमचे बंद करून घेणारा हा माणूस मुलांचीं, सुनांचीं, नातवंडांचीं, समग्र परिवाराचीं सुखदुःखें अगदी हळुवारपणें हाताळीत राहतो. भीष्म हा खरा पितामह आहे. पृथ्वीवर घट्ट पाय रोवून बसलेला हा माणूस नातवंडा-पंतवंडांच्या रोजच्या व्यवहारांत अगदी बुडून गेलेला आहे. स्वतः ब्रह्मचारी असून याला पारंब्या खूप फुटलेल्या आहेत. हा कधी फुलत नाही, हसत नाही, तरी याचीं फळें हजारों पाखरें आपल्या चंचूंनी नित्य पोखरताहेत. त्यांना कृतार्थ करताहेत. महाभारतांत खऱ्या अर्थाने कुणी रुजला असेल तर भीष्मच.

माती सोडून वर जायला तो मुळीं तयारच नाही. तरुणपणीं भोगांचा स्वर्ग त्याने अगदी सहज टाकून दिला. आणि आपल्या अति दीर्घ आयुष्यांत त्याने मुमुक्षुपणाचा छंद घेतलेला नाही. स्वर्ग आणि पृथ्वी यांतलें अंतर समग्र कापून टाकून त्यांना एकाच पातळीवर आणूं पाहण्याचा छंद जणु याने घेतलेला दिसतो.

आणि या छंदामुळेच त्याचें आजोबा हें बिरुद किती शोभून दिसतें. भीष्माचें वात्सल्य कुणा मातेलाहि मागे टाकील असें आहे. तें उत्तरोत्तर पिकत चाललें आहे. युधिष्ठिर अनेकदा सद्गदित होऊन कुंतीसारख्याच मायेने भीष्माने आपल्याला वाढवलें हें सांगतो. दुर्योधन सोडल्यास भीष्माबद्दलचें प्रेम आणि आदर प्रत्येक जण केव्हा ना केव्हा तरी व्यक्त करतो. दुर्योधनालाहि भीष्म पडल्याचें कळलें तेव्हा अनावर दुःख झालें. तें केवळ स्वार्थापोटीं होतें असें म्हणतां येणार नाही. भीष्माच्या या मायाळूपणाला व्यासाने वाचाळ होऊं दिलेलें नाही. भीष्म लहानग्यांना कुरवाळतो आहे, कुठे भावनावश होऊन आपल्या अंतःकरणाला खुली वाट करून देतो आहे, असें झालेलें नाही. भीष्माच्या भोवती एकहि कोमल दृश्य व्यासाने उभारलेलें नाही. या वत्सल पालकाची, आजोबाची पार्श्वभूमि मात्र व्यासाने एका अनोख्या कोवळ्या रंगाने भरून काढली आहे, आणि प्रत्यक्ष चित्र मात्र कोरड्या निबर रेषांनी काढलें आहे. प्रत्येक रेषा अति बांधेसूद, भरीव—आणि आकृतीच्या गोलवटपणाला कुठेहि कंगोरा नाही. भीष्माचा स्वर गंभीर; पण आता त्याच्या पूर्वजीवनांतल्या निग्रहाचा कठोरपणा त्यांत राहिलेला नाही. निग्रहच मुळीं मुरून मऊ झालेला आहे. इतका की, भीष्माने अटीतटीचा निग्रह कधी केला होता की नाही याचीच शंका यावी. स्वतःच्या उत्कट वृत्तींना अशी झिजवट कळा भीष्माने मुद्दाम तर आणली नसेल? की वैराग्याचा सामान्य आदर्श—मग तो आदर्श क्षत्रियरूपाने राजवाड्यांत राहत असला तरीहि—जरा सुद्धा विकृत होतां कामा नये हा संस्कृतीचा दंडक व्यासाने पाळला? भीष्म विरागी, तर मग त्याला पांडु राजा झाल्यावर कर्तव्य केल्याचें समाधान मानीत सहज वनांत तप करतां आलें असतें. तप कांही त्याला जड गेलें असतें असें नव्हे. मग त्याला संसारी पसाऱ्यांतच इतक्या विरक्तपणें वागायला लावण्यांत व्यासाचा हेतु काय?

मला वाटतें की, कठोर तापसांचीं, शांत ऋषींचीं, ज्वलज्जहाल हेकेखोर तपस्येने इष्टपूर्ति करणारांचीं चित्रें कांही झालें तरी भडकच असतात. वैराग्य-ज्वाला सूडाच्याहि कामीं कांही कमी जणांनी वापरलेली नाही. ईर्ष्या तपाला वावडी नाही. आणि क्षणिक मोहाने साऱ्या तपाचें फळ वाया गेल्याचींहि उदाहरणें थोडकीं नाहीत. व्रतस्थ मुनींचें बीज परमनिर्माणकारी असतें हा प्रत्ययहि नियोगाच्या रूपाने इथे येतोच. या सर्व पारंपरिक तपस्येच्या दालनांतच वावरणाऱ्या विविध मूर्ति व्यासानेहि वेळोवेळीं कोरल्या. परंतु त्याने स्वतःच्या लहरीने एकच मूर्ति घडवली. कुणाला ही बिघडलेली मूर्ति अर्धवट सोडली असेंहि वाटावें, अशीच ती घडूं दिली. पण या मूर्तींत स्वतःलाहि कांही ठिकाणीं पेलणार नाही इतकें कसब व्यासाने प्राणपणाने ओतलें. सफाईचा हात हिच्यावर फिरवायला तो धजला नाही. तपाचा घाट त्याने इथे कलता ठेवून वापरला. अंबेच्या द्वेषाची तिरीप त्याच्यावरून हलूं दिली नाही. तिच्या मरणांतहि ती जिरली नाही. शिखंडीमध्ये पेटती चूड घेऊनच ती जन्माला आली.

अंबेचें प्रकरण हें लहान असलें तरी इतकें जाज्वल्य आहे की, जणु या ठिणगींतच भारतीय युद्धाचा सारा अंगार मावला आहे. कुरुवंशाच्या वृद्धीचें प्रतीक भीष्म तसेंच विनाशाचेंहि तोच, असें वाटावें इतकी अंबेच्या सूडाची धार तीव्र आहे. अंबा ही जणु भीष्माची दुर्भाग्यविधात्रीच आहे. अंबा आहे म्हणून आपल्याला शंतनूच्या लंपटपणाचा आणि आप्पलपोटेपणाचा राग येत नाही. जणु कांही जें घडलें तें अगदी स्वाभाविकच, इतकें सहज तें प्रकरण भीष्माने आपल्या अंगावरून जाऊं दिलें. पण त्याची प्रतिक्रिया त्याला थोपवतां आली नाही. त्या प्रतिक्रियेचें नांव अंबा. दुर्बळ भावाकरिता स्वतःचा अतुल पराक्रम वाया दवडणाऱ्या या पुरुषाचा अंबेने धिक्कार केला. त्याच्या पौरुषाला तिने आव्हान दिलें. हरण केलेल्या कन्येचें पाणिग्रहण स्वतःच करावें, हा नीतिनियम तिने उपस्थित केला. आणि स्वतः शाल्वाशीं प्रेमबद्ध असल्याने आपलें हरण करणें अनुचित, ही जाणीवहि भीष्माला दिली. परंतु या घटनेपूर्वीच भीष्म अश्रु हरवून भावनांना पारखा होऊन बसला होता याची तिला काय जाणीव ? त्यागाने निर्माण होणारी पोकळी सोशिकतेने भरून काढीत भीष्म केव्हाचा बसलेला होता. आता त्याच्या जीवनांत वादळें नव्हतीं. चांदणें

नव्हतें. रडणें नव्हतें. जेव्हा तारुण्याच्या तिसऱ्या प्रहरींच स्वतःच्या जीवनाला येऊन भिडलेलें हें अखेरचें वादळ त्याने पाहिलें, तेव्हा सावध राहून त्याने अंबेला सोडून दिलें. त्याचा स्वतःचा प्रेमभंग झालेला कुठेच दिसत नाही. कदाचित् बापाच्या आयुष्यांतील प्रेम व काम यांची सांगता अशा विलक्षण तऱ्हेने झाल्यावर, प्रीतीचा अंकुरच त्याने जाळून फुंकून टाकला असेल.

पण अंबेचा प्रेमभंग व मानभंग एकदमच झाला. सत्यवतीहून अंबा किती तरी श्रेष्ठ होती. सत्यवतीने विचित्रवीर्य मेल्यावर भीष्मालाच अंबिका व अंबालिका यांच्याबरोबर सहशयन करून नियोगपद्धतीने पुत्रजनन करण्याची विनवणी केली होती. पण सत्यप्रतिज्ञ भीष्माने ती मानली नाही. धृतराष्ट्र, पांडु, विदुर यांचें पितृपद त्यामुळे व्यासाकडे आलें. परंतु अगदी प्रथम भीष्माने अंबेला जो नकार दिला त्याची सर या दुसऱ्या नकाराला नाही. कुरुवंशाचा क्षय सत्यवतीची इच्छा आहे तोंवर होणें अशक्य होतें. आणि भीष्माने नाही म्हटलें याची कुठलीच प्रतिक्रिया न होतां ती गोष्ट घडूनहि आली. अगदी सहज. पण अंबेच्या नकाराच्या पहिल्या घटनेंत मात्र स्फोट होता.

भीष्मालाहि शिखंडीला पाहून त्या घटनेचें स्मरण झालें. स्वतःविषयी कधी न बोलणारा भीष्म कौरवांना आपलें व्रत सांगतो तें अगदी त्रोटक. आणि मग अंबेची कथा सांगतो. स्वतःच्या तरुणपणाची ती एकमेव रंगीत आठवण सांगतांना भीष्माला सुख वाटल्याचा भास होतो. अर्जुनाच्या बाणाच्या गंगेने त्याची तृषा भागली. अंबेच्या हकिगतीनेहि एक प्रकारचें समाधान त्याला मिळालें असावें, असें त्याच्या कथनाच्या ओघावरून वाटतें. भीष्म कधीकाळीं तरुण होता याची एवढीच एक खूण महाभारतांत सापडते. अंबेच्या तपाची, तिने आपण होऊन ओढून घेतलेल्या मरणाची—असें आत्महत्यारी, आततायी मरण महाभारतांत एवढेंच आहे—आठवण जागृत होती, म्हणूनच का भीष्म दुर्योधनाला आवरूं शकला नाही ? त्याचीं दुरुत्तरें सहन करूं शकला ? दैव अटळ आहे, अंबा हेंच दैव आहे, असेंच तर त्याला वाटलें नसेल ?

महाभारतांतल्या साऱ्या व्यक्ति आपल्यासमोर खऱ्या उभ्या राहतात त्या कौरव-पांडवांच्या ऐन तारुण्यभरांत. त्या वेळीं भीष्म आयुष्यांतलें कर्तव्य संपलें अशा वृत्तींतच असतो. आणि तरीहि तो युद्धाला जुंपला जातो. सेनापति होतो. त्याचें मन पांडवांकडे, शरीर कौरवांकडे. धृतराष्ट्र व दुर्योधन यांची

वृत्ति अशी की, हा आपलें अन्न खाऊन पांडवांचा धार्जिणा आहे. हें मिंधेपण भीष्माला जाणवतें. त्याच्या औदार्यांतून, पित्याला दिलेल्या दानांतून त्याने हें मिंधेपण सुखाने स्वीकारलेलें असतें. पण आता युद्धाचा प्रसंग आल्यावर त्याच्या म्हाताऱ्या खांद्यांना तो भार पेलत नाही. युद्ध करायचें आणि तो भार काढून टाकायचा, इतका गतानुगतिकपणा त्याला आलेला आहे. भीष्म पित्याकरिता जें सोडतो, तें पाहून आपल्याला त्याची दया येत नाही, कौतुकच वाटतें. पण त्या वचनाच्या परिपाकाचा गुण मात्र असा की, त्यामुळे मग भीष्माबद्दल केवळ कीवच यावी. लढतांना, "तुझें मन पांडवांकडे म्हणून तूं तें लावून युद्ध करीत नाहीस" हें दुर्योधनाने दिलेलें दूषण नाहीसें करण्यासाठी भीष्म आपलें सारें बळ युद्धांत ओततो. प्रतिज्ञा करतो. कृष्णहि मोठा चतुर. आपली प्रतिज्ञा मोडून तो भीष्माची प्रतिष्ठा कायम राखतो. अर्जुनाची मूर्च्छा हें भीष्माच्या पूर्वपराक्रमाचें प्रतीक वाटावें अशाच तऱ्हेने व्यासाने वापरलें आहे. खरें तें कारण जाणते ओळखतात. आजोबा जीव लावून लढताहेत. फार कुशलतेने लढताहेत. पण त्यांचे लढण्याचे दिवस आता संपले आहेत. शरीर थकलें आहे. भीष्माबद्दल आदर साऱ्यांनाच आहे, परंतु त्याचा दरारा कुणालाच नाही, याची जाणीव कुणाला असेल तर ती भीष्मालाच अधिक. कारण दुर्योधनाने टोमणा मारला तेव्हा भीष्महि चिडला आणि म्हणाला, "मी म्हातारा. माझ्याच्याने होईल तें मी करतोंच आहें. पण पांडव अजिंक्य आहेत. आता माझा पराक्रम पाहा."

अर्जुनाला मात्र भीष्माशीं लढतांना कसेंसेंच वाटतें. कारण भीष्म अगोदरच त्याला म्हणतो, "बाळा, तुला पाहून मला आनंद वाटतो. युद्ध कर आणि जय प्राप्त करून घे."

त्यावर अर्जुन म्हणतो, "तुम्हांला न जिंकतां युद्धांत कसें जिंकायचें तें सांगा."

इथे भीष्माच्या डोळ्यांपुढे जणु तारुण्याचें चित्र उभें राहतें. शस्त्राच्या स्पर्शाने तो पुन्हा गतकाळांतल्या रणरंगाचा अनुभव घेतो. तो म्हणतो, "मला जिंकील असा कुणी नाही. आणि मला जिंकल्याशिवाय माझा मृत्यूहि नाही." दोन वाक्यांत दोन काळांचा सांधाहि व्यासाने जोडला आहे. भीष्माचें बळ व त्याच्या समग्र जीवनकार्याचें वैफल्य यांचें सार या सांध्यांत आहे.

भीष्म दुर्योधनावर वारंवार चिडतो. दुर्योधनाला आवर म्हणून धृतराष्ट्रालाहि बजावतो. पण त्याचें कुणीच ऐकत नाही. पांडव वनांत गेले, आणि भीष्म फार दुःखी झाला.

गोग्रहणाच्या प्रसंगीं त्याने अर्जुनापुढे हार खाल्ली. त्याला पळून जावें लागलें. तसेंच द्रोणालाहि. परंतु तरीहि भीष्माने मनाचा समतोलपणा सोडला नाही. त्याने युद्ध टळावें म्हणून शेवटपर्यंत प्रयत्न केले. गोग्रहणाच्या प्रसंगानंतर "वर्षभर कौरवांना तुम्ही अभय द्यावें," असेंहि अभिवचन त्याने पांडवांकडून घेतलें. खाल्लया अन्नाचें इमान अशा तऱ्हेने राखण्याची त्याने पराकाष्ठा केली.

बापाच्या वंशजांचें भलें करण्यासाठी त्याने गर्भिणीचेंच व्रत जणु अंगिकारलें. शरतल्पावर पडल्यानंतर भीष्म युधिष्ठिराला अनेक धर्मांचें विवेचन करून सांगतो. त्यांत राजधर्मावर बोलतांना तो म्हणतो, "राजाने गर्भिणीचें अनुकरण करावें. गर्भिणी स्वतःचें प्रिय बघत नाही. मनाला येईल तें करीत नाही; केवळ गर्भाचें हित ती पाहते."

कुरुवंश जणु आपला गर्भच आहे असें मानून भीष्म जन्मभर स्वतःला विसरून त्याला सांभाळीत राहिला. पण तें सांभाळणें व्यर्थ गेलें. त्याने मिळवलें काय? तर गर्भपात होऊनहि न रडण्याचें वरदान. खरेंच तें. भीष्म पडला तेव्हा सारे रडले. भीष्म इच्छामरणी. शरतल्पावर पडून राहिला. युद्धाची अखेर होईपर्यंत तो चांगला जागृत होता. जागृति कधी न संपणें हा त्याला मिळालेला वर की शाप हेंच समजत नाही.

भीष्माकरिता सगळे रडले तरी भीष्म कधी कुणासाठी रडूंच शकला नाही. शरशय्येवर तो एका विशिष्ट तंद्रींतच होता. युधिष्ठिराला त्याने आपल्याला येत असलेले सारे धर्मविचार शेवटीं सांगितले. व्यवहारी आणि आध्यात्मिक मार्गांवरचे सारे पारंपरिक सिद्धांत त्याला अवगत होते यांत कांहीच नवल नाही. पांडित्याचा केवढा प्रचंड साठा भीष्माजवळ होता याची साक्ष शांतिपर्व व अनुशासनपर्व देतातच. भीष्माचें मरण लांबवणें, त्याचें ज्ञानभांडार तळापर्यंत उपसणें, या दोन क्रियांतच व्यासाने त्याच्या जीवनाच्या कोरडेपणाचें न बोलतांच चांगलें दिग्दर्शन केलें आहे. त्याचा क्षण आणि क्षण सारखा ज्ञान गोळा करण्यांतच गेला तरीहि त्याच्या चिंतनाला खोली नाही. या विस्ताराच्या आवडीने तर त्याची खोल भावनांत बुडी मारण्याची वृत्ति आखडून गेली

नसेल? भीष्माने शरशय्येवर साऱ्यांचीं मरणें ऐकलीं. पण तोहि या वेळीं मृत्यूच्या मांडीवरच होता. तेव्हा त्याला शोक न होणें एक प्रकारें स्वाभाविकच होतें. दुसरा एखादा असता तर त्याला शोक झाला असता. द्रोणाला नाही झाला? घटोत्कचाला नाही झाला? अर्जुनाला नाही झाला? दुर्योधनाला नाही झाला? पण भीष्माची जातच निराळी. अश्रु हरवून बसलेली. बापाच्या प्रतिज्ञेपायी त्याने अश्रूंचें वरदान गमावलें. पण तरी नवल असें की बापाचें सर्व त्याच्या वारसांना देण्याची त्याची सवय मात्र शेवटपर्यंत सुटली नाही. शेवटीं राहिलें तें ज्ञान. राजधर्माचें विवरण संपवून भीष्म युधिष्ठिराला म्हणाला, "माझा पिता शंतनु याने मला हा राजधर्म सांगितला होता. तो मीं तुला सांगितला आहे." तेवढाच वारसा त्याच्याजवळ शिल्लक होता. तो कुरुवंशाच्या त्या वारसाला देऊन भीष्म पूर्ण रिता झाला. कृष्णाच्या दर्शनाची धन्यता त्या ऋणप्रदानांत अनुभवीत भीष्माने देह ठेवला. भीष्माचें अतिदीर्घ जीवन, त्याचा तो तितकाच रेंगाळणारा मृत्यु, त्याची सतत खाली असणारी मान, त्याची ती सतत दुसऱ्यांचीं दुःखें पाहून हळहळणारी कोरडी नजर, रागाचे उद्गार आलेच तर ते केवळ सुकलेल्या पानांच्या सळसळीसारखे—या साऱ्या गोष्टी विशीर्णतेच्या द्योतक आहेत. भीष्माच्या रूपाने अश्रु हरवल्यानंतरची एक अननुभूत अवस्था व्यासाने रेखाटली आहे. पराशराच्या स्खलनाने झालें नाही, शंतनूच्या निर्लज्ज कामवासनेने झालें नाही, तें सारें भीष्माच्या निखोड, असूयारहित वृत्तींतून उद्भवावें हें किती विचित्र! त्याच्या ब्रह्मचर्यांतून, व्रतनिष्ठेंतून विचित्रवीर्याची व्यंग असलेली संतति नियोगपद्धतीने निर्माण व्हावी आणि त्या व्यंगाने पुढल्या सर्व अघोर घटनांना तेवढा जन्म द्यावा हेंहि किती विलक्षण!

पहिल्या पिढींत अंधत्व, अपमृत्यु, तर दुसरींत विलक्षण विरोधी गुणदोष निर्माण होऊन सारे महाभाग व खलपुरुष एका पातळीवर यावे, हा संकेत मागे जातां जातां फक्त भीष्मालाच येऊन भिडतो. प्रत्यक्ष जन्मदाते सुटतात, पण पालक मात्र सारें भोक्तृत्व मुकाट्याने भोगीत राहतो. प्राचीन भारतीय वाङ्मयांत संततीची आवड सर्व मानवी कामनांत प्रधान आहे. मुलें, नातवंडें यांच्यावरच गृहस्थाश्रमाचें श्रेय आधारलेलें आहे. पण नवल असें की, प्राचीन वाङ्मयाच्या अफाट संसारांत आजोबा-नातवंडांच्या प्रेमप्रसंगांचा तर राहोच, पण कुणा विशिष्ट तऱ्हेच्या पितामहाचा उल्लेखहि नाही. भीष्म हा एकच एक

पितामह आहे. आणि तोहि गुणांनी झालेला पितामह आहे, संसारी परंपरेने नव्हे. भीष्माने मुलगा म्हणून, भाऊ म्हणून, चुलता म्हणून, आजोबा म्हणून नात्याची बूज जशी राखली तशी कुणींच राखलेली नाही. आणि तरीहि विशीर्णतेच्या दैवगतीने बांधला गेल्यामुळे व्यासाला त्याच्या प्रत्येक कृतीला ताजा रंग वापरतां आला नाही. रंग उडालेली, क्वचित् इथे तिथे शकलें उडालेली प्राचीन कलाकृति असावी तशीच ही भीष्माची आकृति व्यासाने राहूं दिली आहे. या रंग उडालेल्या, अबोल पण जाणीव परिपूर्ण असलेल्या पितामहा-भोवतीच युद्धाच्या धुमाळींत रंगरेषांनी सजलेल्या साऱ्या आकृति फिरताहेत. म्हणूनच युद्ध पूर्ण होईपर्यंत भीष्म मेला नाही. नाना तऱ्हेचीं नीतितत्त्वेंहि इतक्या प्रदीर्घपणें त्याच्या तोंडून वदवण्याचा व्यासाचा हेतु हाच असावा की, मूळचा आकृतिबंध तसाच कायम राहावा. त्याचा तोल ढळूं नये. उद्दाम, उच्छृंखल, अनिर्बंध, स्खलित असें जें जें कांही असेल तें तें सारें समपातळीवर यावें. हा तोल राखण्यासाठीच ही सारी लांबण. भीष्म गेला. युधिष्ठिर राजा झाला. ती विशीर्णता गेली आणि तिच्याबरोबरच युद्धामुळे उत्पन्न झालेला ताण गेला. आणि महाभारताच्या नाट्यालाहि उतरण लागली.

९

# माणसांत विरलेला माणूस

महाभारतांत सत्याचें दैनंदिन नीतितत्त्व द्रौपदी क्षणाच्या उद्वेगांत बोलून जाते. पण तें आव्हान चार पुरुषांना चार तऱ्हांनी साकारून दाखवावें लागतें. कृष्ण अर्धपार्थिव, अर्धदैवी स्वरूपांत समग्र तत्त्वज्ञान त्याच्या उलगड्यापायी खर्ची घालतो. युधिष्ठिर भावनांचे गोते खात खात शेवटीं त्याच्याजवळ जातो. भीष्म अधिकच मुका होऊन युद्धाच्या ज्वालेंत स्वतः होरपळत असतां भूतकाळाचा आधार घेत घेत पारंपरिक अध्यात्म व व्यवहार यांत अंतर्धान पावतो. त्या गूढ प्रश्नाभोवती तो नुसता गिरक्याच घेत राहतो. विदुर तें मनोमन जाणतो. पण त्याचा पेशाच इतका लीन की, परंपरा त्याच्या जाणिवेला वाचा फुटूं देत नाही. विदुराच्या या मर्यादेच्या जाणिवेंतच तें अर्धस्फुट सत्य क्वचित् कधी निरखून पाहणारालाच काय तें दिसतें. गवती फुलाचें विकसन असावें, तसेंच विदुराच्या मनाचें विकसन व्यासाने दाखवलें आहे.

विदुरहि पंडित आहे. नुसता पंडितच नव्हे, तर म्हणे महापंडित आहे. त्याची वाणी महाभारतांत ऐसपैस पसरली आहे. पण तिचें जड अवडंबर झालें नाही. वाऱ्याच्या झुळकांप्रमाणे ती अधूनमधून येते. कोंडलेलें वातावरण स्वच्छ, खेळतें करून निघून जाते. विदुर स्वच्छंदी आहे, पण स्वैर नाही. विदुर नियमांचा भोक्ता आहे, पण दास नाही. जिथे विदुर येतो तिथे प्रसन्नता येते. जिथे विदुर येतो तिथे आत्मपरीक्षण करणारें स्वच्छ मन येतें. जिथे विदुर येतो तिथे दिलासा येतो. कारण विदुर हें सत्ताविहीन चांगुलपणाचें प्रतीक आहे. भीष्माचा भलेपणा उग्र होता. युयुत्सूचा संन्यास असावा तसा. त्याच्या

चांगुलपणाची प्रतिक्रियाहि तितकीच उग्र होती. परंतु विदुराचा चांगुलपणा हा केवळ भलेपणाच होता. तिथे सत्ता नव्हती. पद नव्हतें. ऐश्वर्य नव्हतें. आणि तरीहि ज्यांच्या हातीं सत्ता आहे त्यांना विदुरापुढे आपण दुबळे आहों याची जाणीव सतत होती. विशुद्ध चांगुलपणांत किती तेज असतें त्याचें विदुर हें उत्तम उदाहरण आहे.

धृतराष्ट्र, पांडु आणि विदुर तिघेहि भाऊ. पण तिघांच्याहि भौतिक नियतींत कांही तरी उणें राहून गेलेलें. पहिले दोघे राण्यांचे मुलगे म्हणून राजपुत्र; आणि विदुर दासीचा मुलगा म्हणून मागे मागे असलेला, परंतु राजपरिवारांत वाढलेला. या तिघांपैकी शारीरिक दृष्ट्या अव्यंग तोच. अपंग माणूस हा सत्ता असो, धन असो, पुत्रपौत्र असोत, मनांतल्या मनांत कसा झुरत असतो, तें धृतराष्ट्राच्या रूपाने व्यासाने दाखवलें. पण विदुराला जीवनांत नीच स्थान असलें तरी शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य भरपूर आहे. मात्र त्याचा पेशा क्षत्रियाचा नाही. तो ब्राह्मणपुत्र आहे, परंतु ब्राह्मण नाही. त्याची जागा सूत, चारण, मागध यांच्याच तऱ्हेची आहे. पण विदुर नुसता आश्रित नव्हता. त्याच्यांत प्रज्ञा होती आणि कमालीची सदिच्छा भरलेली होती.

मुळांतच तें राजकुळ भंगलेलें होतें. पांडूचें कुटुंब तर पहिल्यापासूनच बाहेर राहिलेलें. तरीहि पांडवांची राज्यावरची सत्ता सर्वांना मनोमनीं भासत होती. कांहींचीं मनें त्यामुळे धास्तावत होतीं. गांजत होतीं. तर कांहींच्या मनांत आशेचे नवांकुर त्यामुळे फुटत होते. भीष्म व विदुर हे दोघे नव्या क्षितिजाकडे आशेने बघणारे होते. कारण दोघांनाहि दुर्योधनाबद्दलचा उपजतच तिटकारा होता. दुर्योधन जन्मला त्या वेळीं म्हणे गाढवासारखें ओरडला. हा आवाज अशुभ. तो ऐकून विदुराने धृतराष्ट्राला तूं या मुलाचा त्याग कर म्हणून सांगितलें. पण पुत्रस्नेहाने धृतराष्ट्राने तें म्हणणें ऐकलें नाही. विदुर कधी कुणाला टोचून बोलणारा नव्हे. पण कधी कधी धृतराष्ट्राच्या आणि त्याच्या संवादांत ही संतापाची वाफ बाहेर पडे आणि विदुर त्याला आपलें म्हणणें न मानल्याबद्दल या बाबतींत टपका देई.

धृतराष्ट्र तो अपमान गिळून म्हणे, "बापाचें हृदय, बाबा रे, बापाचें हृदय असेंच असतें." यावर मात्र विदुराला कांही उत्तर सुचत नसे. तो गप्प बसे किंवा विषयांतर करी. निर्वाणीच्या वेळीं तो गप्प राही. कारण अशा वेळीं

बोलणें म्हणजे वितंडवाद घालणें. त्याचें तर विदुराला वावडें. जराहि अतिरिक्त, अनाठायीं आणि नको असेल त्या ठिकाणीं आपण होऊन बोलणें हा त्याचा स्वभावच नव्हे. विदुर हा डोळे उघडे ठेवून बघणारा होता. युद्धाचें क्षेत्र त्याला वर्ज्य होतें. त्यामुळे त्याच्या क्रियाशीलतेला मुळांतच मर्यादा पडल्या होत्या. जें होईल तें पाहायचें, नित्य नवें ज्ञान गोळा करायचें, असा त्याचा परिपाठ. मात्र हें ज्ञान व्यवहाराच्या पातळीला सोडून नव्हतें. रोकड्या गजबजलेल्या व्यवहारावर निखालस नीति घासून पाहणारा विदुर हा एकच एक प्रयोगी आहे. युधिष्ठिरालाहि हा छंद होता; परंतु त्या प्रयोगांत त्याला स्वतःच्या दुःखी अनुभवांनी गति प्राप्त करून दिली. विदुराचें तसें नव्हतें. त्याला स्वार्थ नाही. विदुर संसारी असला तरी त्याच्या वैयक्तिक जीवनाला महाभारतांत कुठेच स्थान नाही.

धृतराष्ट्र अंध असल्याने हा समवयस्क भाऊ त्याचा मंत्री झाला. अंधाची कुचेष्टा करणारा तो नव्हता. म्हणूनच धृतराष्ट्र त्याच्यावर जास्त विसंबून राही. विदुराची बुद्धि चोखंदळ आहे. सत्य सांगायला तो कचरत नाही. तरी पण तें सत्य सांगतांना एक प्रकारची खंत त्याच्या मनाला सतत वाटत राहते. किंबहुना अप्रिय पण पथ्यकर सांगण्याची वेळ येणें हाच मोठा दुर्दैवविपाक आहे ही त्याची मनोमन खात्री पटलेली असते; सर्व कांही दैवाधीन आहे या निराशेने तोहि ग्रासलेला असतो आणि म्हणूनच कर्तव्यमय नीतीला तो अतिशय तत्परतेने जपतो.

विदुर हा राजपुरुष आहे. अति आदर्श असा राजपुरुष आहे. थोरपणाचें मर्म म्हणूनच तो जाणतो. त्या गुंतागुंतीने भरलेल्या राजघराण्यांत अत्यंत सावध राहून, कुणालाहि न दुखवतां विदुर साऱ्यांना योग्य तो सल्ला देतो. या परिस्थितींत श्रेष्ठ मूल्यांशीं त्याने कधीहि तडजोड केली नाही, हाच त्याचा विशेष. नैसर्गिक प्रेमळपणा व चाणाक्षपणा हे एकाच वृत्तीचे भिन्न आविष्कार आहेत, हें विदुराने ओळखलें होतें. आणि कितीहि आणीबाणीचा प्रसंग येवो, कितीहि कटु अनुभव येवो, आपल्या मनाचा समतोलपणा विदुराने कधी बिघडूं दिला नाही.

विदुर हा पारंपरिक पांडित्याचें उत्तम प्रतीक आहे. परंतु हें पांडित्य मर्यादित कक्षेंतलें आहे. विदुर शूद्र आहे. राजबंधु झाला तरी परंपरेने ज्ञानाची

जी पायरी ठरवली तिचें उल्लंघन करण्याचें माणसाला प्रयोजन पडतें हें विदुराला जाणवणें शक्यच नव्हतें. त्याच्या ज्ञानाची कक्षा ही व्यावहारिक आचारांच्या नीतीची कक्षा होती, सर्वसामान्य सुज्ञतेची होती. समदर्शी माणसाच्या नैसर्गिक प्रेरणेने तिला तेज मिळालें होतें.

विदुराची वाणी व्यासाने अतिशय योजकपणाने वापरली आहे. वास्तविक विदुराची वाणी म्हणजे काय ? तर सुभाषितें व म्हणी यांची भली मोठी गुंफणा-वळ. विदुर स्पष्टपणें म्हणतोच की, शहाण्या माणसाने सतत सुभाषितांचा संग्रह करावा. ज्या माणसाचा हा साठा मोठा, त्याला समाजांत प्रतिष्ठा होती हें का सांगायला हवें ? परंतु व्यास विदुराला सुभाषितें मनमुराद पेरणारें यंत्र बनवीत नाही. विदुरनीतीने महाभारतांत भरपूर जागा अडवली आहे. परंतु तरीहि महाभारतांतल्या नाट्यांत ती इतकी खुबीने आणली आहे की, गीतेप्रमाणेच तिचेंहि अस्तित्व आवश्यक ठरतें. परंतु तिचें अंतरंग मात्र गीतेहून पुष्कळच वेगळें आहे. गीतेच्या वापराप्रमाणेच संभ्रमित श्रोत्याला आश्वासन देण्यासाठी तिचा वापर झालेला आहे. मात्र गीतेचें ध्येय युद्धकर्म तर विदुरनीतीचें ध्येय सार्वकालीन शांतिमय जीवन हें आहे. गीता अर्जुनाला आशेचें स्फुरण देते; तर विदुरवाणी भग्नहृदय धृतराष्ट्राला, स्वतःच्या मूर्खपणाचा परिपाकहि शांतपणें सहन करतां येतो, एवढेच नव्हे तर हा अनुतापविधि समृद्ध तपश्चर्येचाच एक भाग असतो, हें दाखवून देण्यासाठी महाभारतांत आलेली आहे. अर्जुनाला गीता पेलली की नाही हा अनुगीतेमुळे चर्चेचा विषय होऊं शकतो. विदुराचे शहाणपणाचे बोल धृतराष्ट्राने पहिल्याने धुडकावून लावले. परंतु अखेर चहूकडून विनाश गिळायला उठला तेव्हा विदुराचें बोलणें हाच धृतराष्ट्राचा आधार झाला. कृष्ण आणि अर्जुन दोघे दूर दूर राहूं लागले. अंताच्या वेळीं कृष्ण एकाकी राहिला. पण धृतराष्ट्र आणि विदुर मात्र बरोबर राहिले. त्यांचा अंतहि बरोबरच झाला. धृतराष्ट्राचा शोक अगदी विझून त्याच्या हृदयाचा गाभा शांतीने भरून गेलेला अखेर विदुराने पाहिला. हीच विदुराच्या जीवनाची सांगता होती. एका राजाच्या जीवनाबरोबर या राजपुरुषाचें जीवन व्यतीत झालें. त्याच्याबरोबरच तें संपलें. परंतु विदुराचा विशेष हा की, तिथेच तें संपलें नाही. इतरांप्रमाणे तें जीवन शेवटचा श्वास थांबल्याने मिटलें नाही. बी मातींत रुजूं घालावी व मातीनेच झाकली जावी त्या तऱ्हेने विदुराचा

शेवट झाला. महाभारतांतल्या सर्व अंतांत हा अंत अत्यंत विलोभनीय असा आहे. मृत्यु भयकारी नाही, असें सारींच तत्त्वज्ञानें सांगतात. परंतु आनंदपर्यवसायी मृत्यूचें उदाहरण मात्र फार दुर्मिळ. किंबहुना विदुराशिवाय असा मृत्यु मला तरी अजून कुठे वाचलेला आठवत नाही.

धृतराष्ट्र व गांधारी यांच्या समवेत विदुर वनांत तप करीत असतो. इतरांचे मृत्यु समाधींत किंवा नैसर्गिक रीत्या घडून येतात. परंतु युधिष्ठिराला पाहून विदुराला आनंदाचें भरतें येतें. या आनंदाने त्याच्या वृत्ति बहरून जातात. या आनंदांत भक्तीचा उमाळा नाही. कारण युधिष्ठिर विदुराला पितृतुल्य समजे. विदुराचें वर्णन युधिष्ठिराने असें केलें आहे की, "विदुर हा भक्त आहे. हा गुरु आहे. हा पालक आहे. पिता आहे. माता आहे. हा सखा आहे. अगाध बुद्धीचा आहे. दीर्घ दृष्टि असलेला आहे." याशिवाय विदुराने आपल्यावर आईच्या ममतेने प्रेम केलें, याचीहि आठवण युधिष्ठिराला नेहमी येई. युधिष्ठिर व विदुर यांच्यांत एक दृढ प्रेमबंधन व्यासाने निर्माण केलें आहे. कृष्ण आणि अर्जुन यांच्या संबंधाचा त्याने खूपच गौरव केला आहे. तशा तऱ्हेचा गौरव यांच्या संबंधाचा केला नाही. कृष्ण आणि अर्जुन हे एकमेकांचें हृदय होते. तसें या दोघांचें नव्हतें. कारण या दोघांत समवयस्कता नव्हती. एका पिढीचें अंतर होतें. या अंतराची जपणूक व्यासाने केली आहे. परंतु हें करतांना दोन समानधर्मी मनांना शेवटीं एकरूप करण्याचें अपूर्व कौशल्यहि त्याने दाखवलें आहे. आणि हें अत्यंत सहजपणें घडलेलें त्याने दाखवलें आहे. हा सहजपणा व्यासाच्याच कलामयतेला काय तो पेलू शकतो.

युधिष्ठिर आणि विदुर यांच्या समविचारांचे अनेक संदर्भ महाभारतांत आहेत. युद्धापूर्वी युधिष्ठिराने "मी समेटाचें बोलणें करायला येतों" असा निरोप संजयाबरोबर धृतराष्ट्राला पाठवला. संजयानेहि "साप जीर्ण दुबळी कात टाकतो त्याप्रमाणे तो अजातशत्रु तुझ्या बाबतींत पाप टाकून गोडवा ठेवून वागतो. तूं पण मोठें मन ठेवून पांडवांशीं समेट कर. मूढपणाने वागूं नको. सकाळीं युधिष्ठिराशीं बोलणें कर. युद्धांतल्या प्राणहानीचें पाप तुझ्या माथीं बसेल हें विसरूं नको," असें धृतराष्ट्राला म्हटलें.

रात्रीं धृतराष्ट्राला झोप येईना. त्याने विदुराला बोलावणें पाठवलें. "मला झोप येत नाही," तो म्हणाला.

विदुर म्हणाला, “तुझ्या मनांत वाईट विचार तर नाहीत? त्यांनीच झोप उडते. तुला परद्रव्याचा लोभ तर सुटला नाही? कर्ण, दुःशासन, शकुनि, दुर्योधन यांच्या हातीं कारभार सोपवून यशाची इच्छा कसली करतोस?”

रात्र वाढत होती. हा टोला धृतराष्ट्राला लागला. तो गप्प बसला. जेव्हा जेव्हा विदुर शहाणपणा शिकवी तेव्हा तेव्हा माघार घ्यायची हें धृतराष्ट्राच्या अंगवळणींच जणु पडलें होतें. पण आजची रात्र ही विदुराच्या दृष्टीने फार वेगळी रात्र होती. इथेंच युद्धाचा पाया पडायचा होता, किंवा शांतीचा. विदुराचें मनहि प्रक्षुब्धच होतें. शहाणा कोण, मूर्ख कोण इथपासून सुरुवात करून व्यावहारिक नीतीचीं जीं सारीं अंगें त्याला माहीत होतीं, तीं त्याने सुसंगति-विसंगतीचा विचार न करतां एकामागून एक बोलून टाकलीं. न जाणों, त्यांतला कुठला एक अंश जरी गळला, तरी तेवढेंच आपण या आंधळ्याला, या आपल्या दुबळ्या राजाला, वडील भावाला, सांगितलें नाही, असें व्हायला नको. आणि हें सारें पारंपरिक सुभाषितांच्या स्वरूपांतलें तत्त्वज्ञान त्याने तल्लीन होऊन निरूपण केलें.

पण यांतहि एक भाग विदुराच्या व्यक्तिमत्त्वाचें दिग्दर्शन करणारा आहे. युधिष्ठिरांतहि नेमकें हेंच वैशिष्ट्य आढळतें. दोघांच्या जीवनांतील भूमिका मात्र वेगळ्या. हें साम्य म्हणजे विदुराने केलेलें क्षमेचें विवेचन. तो म्हणतो, “क्षमावंतांचा एकच दोष. लोक त्यांना दुबळे म्हणतात. पण हा दोष समजूं नये. क्षमा अशक्तांचा गुण आणि समर्थांचें भूषण आहे. क्षमेंत वशीकरणाचें सामर्थ्य असतें. क्षमेने काय मिळत नाही? ज्याच्या हातीं शांतीचें खड्ग आहे तो काय करूं शकत नाही?” युधिष्ठिराने द्रौपदीला उद्देशून केलेल्या क्षमेवरच्या भाष्यासारखेंच हें क्षमासूत्र तंतोतंत आहे. दोघांचेंहि पालुपद एकच —“गवत नसलेल्या जागीं अग्नि पडला तर तो आपोआपच विझतो.”

कृष्णशिष्टाईच्या अगोदर दुर्योधनाचा युद्ध करण्याचा निश्चय आणि धृतराष्ट्राचा भीमाबद्दलचा द्वेष लक्षांत घेऊनहि विदुर आपलें युद्धाबद्दलचें मत व्यक्त करतो. तो म्हणतो, “दोघे युद्ध करतात त्यांतला एक मेला तरी जय होत नाही.” हें वचनहि ‘युद्धांत काय चांगलें आहे?’ या युधिष्ठिराच्या उक्तीशीं मिळतें-जुळतेंच आहे.

युद्ध संपल्यानंतर युधिष्ठिराला विरक्ति आली आणि त्याने वनांत तपाला

जाण्याचा हेका धरला. त्या वेळीं अर्जुनाने व भीमाने धर्माहून, अर्थ व काम हे राजाला किती आवश्यक आहेत तें सांगितलें. त्या भावांत तुमुल वादविवाद झाला. त्या वेळीं विदुराला जरी युधिष्ठिराने राज्यत्याग करून वनांत जावें असें वाटलें नाही, तरी त्याने धर्मालाच सर्वश्रेष्ठ स्थान दिलें व म्हटलें, "राजा, धर्म हा सर्वांत श्रेष्ठ गुण आहे. अर्थ मध्यम आहे आणि काम हा लहान आहे." भीमाचें समाधान त्यामुळे झालें नाही हें खरें. परंतु विदुरालाहि युधिष्ठिराने राज्य सोडून निघून जावें हें आवडलेलें नाही हें त्याने ताडलें. विदुराला अडवून युधिष्ठिराला आपल्या मताप्रमाणे वागायला लावायचा निश्चयच त्याने केला होता. सरळहृदयी भीम प्रथमच काव्यमय वाणी बोलला. तो म्हणाला, "फुलांत मध तसा माणसांत काम आहे. काम हा धर्मार्थयोनि आहे. ज्याला काम नाही तो अर्थाची इच्छा करणार नाही. ज्याला काम नाही तो धर्माची वासना धरणार नाही. म्हणूनच काम महत्त्वाचा आहे. वाणी, शेतकरी, गवळी, सुतार, शिंपी, भिक्षुक—सारे सारे कामामुळे कर्माला प्रवृत्त झाले आहेत."

भीमाचा मुद्दा खोडून टाकणें कठीण होतें. विदुराने धर्माचें विवरण अधिक तपशिलांत जाऊन करण्याचें मुद्दाम टाळलें. कारण आपण शूद्र आहों, अध्यात्म-विद्येच्या उद्गानाचा हक्क आपल्याला नाही, हें त्याने मागे धृतराष्ट्राला स्पष्ट सांगितलें होतें. सुभाषितें, म्हणी, दृष्टांत यांच्या द्वारा नाना तऱ्हेच्या आचार-धर्माचा ऊहापोह विदुराने केला आणि त्यामुळे धृतराष्ट्र अतिशय संतुष्ट झाला. "मला तूं आणखी गहन धर्मतत्त्व सांग," असें तो विदुराला म्हणाला. तेव्हा विदुराने उत्तर दिलें, "मी शूद्र आहें. सांगितलें त्याहून अधिक सांगण्याचा हक्क मला नाही." आणि त्याने सनत्सुजाताला बोलावून त्याच्या-कडून अध्यात्मविद्येचें निरूपण करवलें. मात्र आताची वेळ वेगळी होती. इथे युधिष्ठिरानेच निर्णय घ्यायचा होता. आणि त्याने तो घेतला पण. काम जीवनाचें मूळ असला तरी जीवनाचें ध्येय मोक्षच असतो हें तत्त्व युधिष्ठिराने उच्चारलें. कामाच्या स्थानाबद्दल दोघां भावांचा समेट झाला. धर्माच्या उच्चतर स्थानाबद्दलहि आता मतभेद राहिला नाही. आणि "तूं म्हणशील तसें मी करीन," असें युधिष्ठिराने भीमाला सांगितलें.

असा हा विदुर मनाने युधिष्ठिराच्या सतत जवळच राहिला. आणि अखेर देहपाताची वेळ आली, तेव्हा युधिष्ठिराच्या तोंडाकडे एकाग्र मनाने पाहत,

त्याच्या नजरेंत आपली नजर स्थिर करून, त्याचें व आपलें मन एक झालें असें पाहून, विदुराने आपले प्राण युधिष्ठिरांत विसर्जन केले. वनस्पति प्रकाशाकडे झुकते, तसा विदुर युधिष्ठिराकडे आपोआप झुकला. एकहि शब्द न उच्चारतां हें प्राणमीलन झालें. एका ज्योतींत दुसरी ज्योत मिळणें, जितकें स्वाभाविक व प्रशस्त, तितकेंच हें दोन जिवांचें अभंग ऐक्य होतें. भक्त ईश्वरांत लीन होतो; प्रेमिक एकमेकांत विरून जातात; ध्येयांत व्यक्ति विलीन होते; या घटना सवंग नसल्या तरी अपरिचित नाहीत. परंतु विदुराचें मरण हें मृत्यूंतल्या शांतीचें एकमेव प्रतीक दाखवण्यांत व्यासाने जी जाण दाखवली आहे, तिला जोड नाही. स्वतःच्या अस्तित्वाची अस्पष्टशी खूणहि मागे न राहतां आपण मरावें, अशी विदुराची मनीषा असावी. कारण दुर्योधनाला उपदेश करतांना पण धृतराष्ट्राला अनुलक्षून विदुर म्हणतो, "पक्ष्याचीं पावलें आकाशांत दिसत नाहीत. प्रज्ञावान् मुनीचीं पावलें भूमीवर दिसत नाहीत."

त्या प्रसंगीं दान्त पुरुषाचीं लक्षणें विदुराने पाल्हाळाने वर्णन केलीं. इतर पारंपरिक नीति त्याने पाल्हाळाने सांगितली, तशीच. परंतु हा पारंपरिक दृष्टांत आपल्या जीवनांत अशा विलक्षण तऱ्हेने साकार होईल, असें विदुराला वाटलें असेल काय? अमूर्त कामनेला त्याच्या मरणानेच असा अभिनव घाट दिला. या मानवताप्रेमी सरलहृदयी विदुराचें विसर्जन मानवांतच व्हावें हें भाग्य किती विलक्षण आणि प्रेरक आहे! संपूर्णपणें मानवमय झालेला संत विदुराशिवाय अन्य कोण आहे? अध्यात्माचा काथ्याकूट न करतां सनातन आचारमय नीतीला विदुराने ब्रह्मज्ञानाहून भूषवलें. मानवप्रणीत सनातन सदाचार जीवनाइतकाच विशाल आणि कालातीत आहे. मृत्यूइतकाच कालातीत आणि गूढ आहे. आणि गूढ असला तरी अंतःकरणाच्या सरळ प्रेरणांनी तो माणसाला साध्य करून घेण्यासारखा आहे. ही माणसांतली अबोल श्रद्धा विदुराने प्रत्यक्षांत अनुभवली आणि तिचें द्वार मानवतेला खुलें करून दिलें. मानवाचें मूळ माणूस आणि ध्येयहि माणूसच. हेंच विदुराच्या जीवनाचें सार आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ...२४८८..... नों: दि: ३०/११/६०

१०

## कामिनी

महाभारतांत तडफडणाऱ्या मनांना तोटा नाही. जीवजंतूंच्या अंगोपांगांतून आरपार जाणारें, जीवनाच्या सर्व क्षितिजांना समभावाने स्पर्श करणारें, सुख आणि दुःख एकाच कवेंत धरणारें, नियतीचें उग्रमधुर भान व्यासाने आरंभापासून तों अखेरपर्यंत सतत खेळतें ठेवलें आहे. परंतु या भानाचें मूर्त स्वरूपहि एका व्यक्तिमत्त्वांत ओतून त्यांतून स्त्रीजातीचें सनातन तेज आणि दौर्बल्य त्याने द्रौपदीच्या रूपाने मनोज्ञतेने रेखाटलें आहे. प्रीति आणि रति, भक्ति आणि मैत्री, संयम आणि आसक्ति या भावनांच्या द्वंद्वांतला सूक्ष्म तोल द्रौपदीच्या व्यक्तिमत्त्वांत जसा आढळून येतो तसा अन्य कोणत्याहि पौराणिक स्त्रींत मला आढळत नाही. आणि म्हणूनच द्रौपदीचें मन हें एक अतिशय स्फुरणारें मन आहे. त्यांत विलक्षण पाशवी चैतन्य आहे. अनाकलनीय बुद्धिमत्ता आहे. आणि अतिशय शुद्ध वासनांची कमालीची उत्कटता आहे. इतकी की, ती पुष्कळदा प्रचंड प्रक्षोभाचेंहि रूप घेते. आणि म्हणूनच द्रौपदीच्या मनाचें तडफडणें हें भारतांतल्या विलक्षण सुंदर अशांततेचा मूलस्रोत आहे.

या अशांततेला नितांतसुंदर रमणीदेहांत व्यासाने लपेटलें आहे. तिच्या विपुल काळ्या, कुरळ्या केसांच्या लाटांप्रमाणेच क्रोधाच्या अथांग लहरीहि त्याने तिच्या भोवती फिरत ठेवल्या आहेत. द्रौपदीचें व्यक्तिमत्त्व त्यामुळे कांही वेगळेंच झालें आहे. वाऱ्याच्या झोतामुळे फडफडणाऱ्या ज्योतीसारखी ती वाटते. किंबहुना वारा आहे तोंवर फडफडत तेवणारी आणि संकटाचा वारा ओसरल्यावर विझून शांत झालेली द्रौपदी माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते.

द्रौपदीचा जन्म—तो यज्ञज्वालेंतला जन्मच तिच्या सबंध व्यक्तिमत्त्वाचें प्रतीक आहे. भीष्माच्या अंताच्या दैवी योजनेंत शिखंडीप्रमाणे द्रौपदीहि तितकीच महत्त्वाची आहे. तिचा जन्म भोगासाठी नसून जळण्यासाठी आणि जाळण्यासाठीच झालेला आहे. तरी पण द्रौपदी केवळ दैवी शक्तीचें मानवी प्रतीक नाही. ती संपूर्ण मानवी आहे. उत्कट, विराट आणि प्राकृतिक स्त्रीत्वाचा आविष्कार द्रौपदीसारखा अन्यत्र मिळणें कठीण.

ही याज्ञसेनी सुंदर आहे. महाभारतांतल्या साऱ्याच नायिका सुंदर आहेत. उर्वशी, देवयानी, शर्मिष्ठा, शकुंतला, दमयंती, तपती, सत्यवती, कुंती, गांधारी, सुभद्रा यांतली कोणती स्त्री तिच्या सौंदर्यासाठी प्रसिद्ध नव्हती ? त्या साऱ्यांच्या सौंदर्याचा परामर्श व्यासाने घेतलेला आहे. तरी पण यांच्या सौंदर्याहून द्रौपदीचें सौंदर्य केवळ अलौकिक असें आहे. कुंतीच्या सौंदर्यापासून सुभद्रेचें सौंदर्य वेगळें काढतां येत नाही. शकुंतला आणि तपती या संगमोत्सुक कुमारिकांच्या सौंदर्याचा आविर्भाव व्यासाला सारखाच दिसला. या स्त्रियांतल्या सौंदर्याचें वेगळेपण व्यासाला वेचून काढतां आलें नाही. सौंदर्य एक—त्याला मिळालेले देहांचे आकार व विभ्रम तेवढे वेगळे. हे विभ्रम तात्कालिक व त्या त्या ठिकाणींच भासमान झाले. प्रियकराच्या सहवासांतच त्या सौंदर्यांची सफलता होती. परिणति होती. त्या क्षेत्राबाहेर त्या सौंदर्याचें प्रयोजनहि नव्हतें. परंतु द्रौपदीचें सौंदर्य व्यासाने एका विलक्षण अनुभूतीच्या भानांत निर्माण केलें आहे. द्रौपदीची भूमिका ही प्रधान भूमिका आहे, या जाणिवेंतून तिची आकृति निर्माण झालेली नाही. किंबहुना तिच्या प्रधान भूमिकेचा आणि सौंदर्याचा संबंधहि फारसा घनिष्ठ नाही, जसा तो सीतेचा आहे. सीतेच्या रूपामुळेच रामायणांतला संघर्ष उत्पन्न झाला. परंतु द्रौपदीच्या सौंदर्यामुळे महाभारतांतल्या विग्रहाला चालना मिळालेली नाही. द्रौपदी हा त्या संघर्षाचा केंद्रबिंदु नव्हता, तर राजसत्ता हा होता.

महाभारतांतलें नाट्य भाऊबंदकीच्या द्वेषांतून निघालेलें आहे; नायिकेसाठी झालेल्या स्पर्धेतून नव्हे. द्रौपदीच्या जीवनांत स्पर्धा नाही, असें थोडेंच आहे ? स्वयंवरांत स्पर्धा होतीच. भावाभावांनी एक द्रौपदी वाटून घेतली, त्याच्या मुळाशीं कुंतीच्या आज्ञेहूनहि, ती एकाला मिळाल्यास इतरांचें स्वास्थ्य जाईल, भावांचा एकोपा मोडेल, तसें होऊं नये, हाच हेतु गर्भित होता. जयद्रथ,

कीचक, वगैरेंच्या वागणुकींतहि स्पर्धेहून आणखी काय आहे? परंतु स्पर्धा ही द्रौपदीच्या जीवनाचाहि केंद्रबिंदु झालेली नाही; मग ती महाभारताचा केंद्रबिंदु कशी होणार? सभेंतल्या द्रौपदीच्या विटंबनेने स्वयंवराच्या प्रसंगापासून तों राजसूय यज्ञापर्यंत स्पर्धेची भुलावण कायम ठेवली. आणि नंतर सभेंत तिला रजस्वला असतांना आणून त्या स्पर्धेच्या नाट्याला उपनाट्याचें स्वरूप आणलें. जयद्रथ आणि कीचक नसते, तर हें उपनाट्य नीरस झालें असतें. कृष्ण नसता तर स्पर्धांतीत स्पृहेचें कमनीय स्वरूप प्रकट झालें नसतें.

द्रौपदीच्या सौंदर्याचा घाटच मुळीं वेगळा आहे. रंगहि निराळा आहे. इतर नायिका गोऱ्या रंगाच्या; कुणी गुलाबी कमळासारख्या, कुणी पांढऱ्या कमळासारख्या, तर कुणी पिवळ्या कमळासारख्या. परंतु याज्ञसेनीचें सारेंच न्यारें. भारतीय श्यामवर्णी सौंदर्याची ती परिसीमा आहे. तिच्या रूपाचें मूळ शची आहे. आणि केवळ रूपराशि हेंच शचीचें वैशिष्ट्य आहे. इंद्राणीचें हें पार्थिव रूप नीलमण्याची कांति घेऊन अवतरलें. द्रौपदीचे डोळे कमळाच्या पाकळीसारखे मोठाले आणि तेजस्वी आहेत. तिचे केस खूप मोठे, लांब आणि कुरळे आहेत. द्रौपदीच्या साऱ्या सौंदर्याचें रहस्य तिच्या शरिराच्या प्रमाण-बद्धतेंत आहे. ती उंच नाही, ठेंगणी नाही. किडकिडीत नाही, की लठ्ठ नाही. तेज आणि कोमलता तिच्या अंग-प्रत्यंगांत भरलेलीं. तिचा प्रत्येक विभ्रम अतिविलोभनीय. जो कुणी तिच्याकडे पाहील तो तिच्यावर लुब्ध झाला नाही असें व्हायचेंच नाही. द्रौपदीचें सैरंध्रीच्या वेशांतलें रूप पाहून सुदेष्णेने उद्गार काढले ते उल्लेखनीय आहेत. सुदेष्णा म्हणाली, "बाई ग, तुला माझ्या घरांत दासी म्हणून मी कशी ठेवून घेऊं? तुझ्यासारखें पराकाष्ठेचें मोहक लावण्य मीं अजून कुठेहि पाहिलें नाही. तुला पाहून स्त्रियाहि मोहित होतात तिथे पुरुषांची कथा काय? तूं जर माझ्या नवऱ्याच्या दृष्टीस पडलीस, तर माझें इथलें राणीपण संपलेंच. तूं चालूं लाग कशी?"

अशी ही कामकलिका द्रौपदी जन्मतःच जळतें आणि जाळतें रूप घेऊन आलेली आहे. तिच्या भावना संपन्न आणि उफाळणाऱ्या. वृत्ति अतिशय गंभीर. तिची बुद्धि अतिशय चपळ आणि सुसंस्कृत. तिच्या वासना मुलायम पण प्राकृतिक. द्रौपदी कन्या किंवा कुमारी न दाखवतां एकदम तरुणी दाखवतांना व्यासाने स्त्रीच्या असंकीर्ण मत्त यौवनाचें एक उत्कृष्ट प्रतीक

निर्माण केलें आहे. द्रौपदीचें तारुण्य, तिच्या रूपाचा रम्यभीषण परिपाक हा तिच्या जीवनांतून अलग करतां येत नाही. जयद्रथवध हा या रूपविधानांतला शेवटला उच्चबिंदु. त्यानंतर युद्ध होतें. त्या युद्धांत द्रौपदीला स्थानच नसतें. युद्धांत तिचे मुलगे मेले, तरी पुत्रवियोगाचें सारें शोकनाट्य व्यासाने सुभद्रे-भोवती खेळतें ठेवलें. द्रौपदी नंतर नुसती राणी राहिली. आणि मग तें रूप प्रौढत्वाच्या, साफल्याच्या आवरणांत व्यासाने कायमचें झाकून टाकलें.

द्रौपदी मुळांतच तरुणी. आणि त्यांतहि संगमोत्सुक. महाभारतांतील साऱ्याच सुंदर नायिकांप्रमाणे. परंतु त्यांच्यापेक्षा द्रौपदीचा विशेष हा की, आपण पुरुषांवर छाप पाडूं शकतों, हा स्त्रीसुलभ अभिमान तिच्या प्रत्येक वृत्तींतून या ना त्या तऱ्हेने प्रकट झालेला आढळतो. महामानी द्रौपदीच्या स्वभावाचा मध्यबिंदु हाच आहे. कोणत्या पुरुषाला आपल्याबद्दल काय वाटतें, आणि त्याच्या आकर्षणाला दूर ठेवावें की जवळ करावें हा निर्णय अतिशय वेगाने ती घेऊं शकत असे. कर्णाला तिने एकदम नकार दिला. परंतु अर्जुनाने जिंकल्यावर आणि त्या वेळीं तो दरिद्री ब्राह्मणपुत्र आहे हें माहीत असूनहि तिने त्याला वरलें. एवढेंच नाही तर कुंतीचा बोल खरा करण्याचा केवळ योगायोग साधून तिने पांच पतींना वरण्यासहि खुषी दाखवली. तारुण्य तिच्या नसा-नसांतून वाहत होतें आणि त्याला योग्य अशा वासनाहि तिच्यांत तेवत होत्या. पांच पतींची पतिव्रता जगांत द्रौपदीहून दुसरी कुणी झाली नाही.

द्रौपदीचें पातिव्रत्य खोटें नाही. परंतु तिच्या वासना, तिच्या प्रणयभावना या अत्यंत स्वयंशासित होत्या. तीव्र चोखंदळ बुद्धि आणि प्राकृतिक वासना यांचा मेळ रूपगर्वितेच्या बाबतींत घालायचा झाला, तर त्याला द्रौपदीइतकें समर्पक प्रतीक दुसरें नाही. आणि म्हणूनच व्यासाने तिच्या प्रणयानुभवाच्या कांही अत्यंत कोमल छटा केवळ सूचित करून कल्पनेवरच सोडून दिल्या आहेत. जणु त्या गूढ नाट्याचा सविस्तर उल्लेख करायचा म्हणजे त्यांतल्या आकर्षणाचा शतरंगी भाव हलका करून सोडायचा.

द्रौपदीचे पांच पति होते, यांत अनेकांनी कुठल्या तरी प्रांतांतल्या, कुठल्या तरी जातीच्या बहुपतित्वाच्या प्रथेचा उल्लेख करून त्याचा अन्वय लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु मला तसें वाटत नाही. द्रौपदीच्या या अवस्थेचा अन्वय योगायोगाने जो महाभारतांत आलेला आहे, त्यांत मला एक विशिष्ट

अभिप्राय दिसतो. अर्थात् हा अभिप्रायहि व्यासाने केवळ सुचवून सोडून दिलेला आहे. कुंती आणि द्रौपदी या सासवा-सुना; म्हणजे एकाच वंशाच्या वर्धनाची जबाबदारी असलेल्या दोन स्त्रिया. कुंतीला मिळालेल्या वरामुळे तिला देवांना कामपूर्तीसाठी बोलावणें सहजसाध्य झालें. परंपरेंतल्या एका सुभाषितांत 'द्रौपदी पांच जणांना काम्य झाली—आणि कुंती पण' असें म्हटलें आहे. अजाणतांच या सुभाषिताने त्या दोघींतल्या मानसिक व दैहिक साधर्म्याचा उल्लेख केला आहे. त्या दोघींच्या मनाची जडणघडण या बाबतींत एकाच तऱ्हेची होती. कुंतीच्या अशा तऱ्हेने झालेल्या संततीच्या वंशाची जोपासना द्रौपदीसारखीकडूनच व्हावी, हा केवळ योगायोग नव्हे. हा एक अनुक्त संकेत व्यासाने, कुणाच्याहि लक्षांत सहसा येऊं नये अशा तऱ्हेने, वापरला असावा असें वाटतें. कारण याच्यावर जरा जरी जोर दिला असता तरीदेखील कुंती आणि द्रौपदी यांच्या व्यक्तिमत्त्वांतलें समग्र सौंदर्य व औचित्य नष्ट झालें असतें. आणि म्हणूनच कुंतीच्या भोवती सतत दुःख त्याने फिरतें ठेवलें आणि द्रौपदीचा संभव इंद्राणीपासून आहे असें दाखवलें. इंद्र अनेक, इंद्राणी एकच, हा पुरातन संकेत द्रौपदीच्या बाबतींत व्यासाने किती चतुरपणें वापरला आहे! पांडव कुंतीचे मुलगे होते, म्हणूनच त्यांना द्रौपदीशीं असें समान नातें जोडणें इष्ट वाटलें व शक्यहि झालें, हें तितकेंच खरें.

द्रौपदीच्या स्वभावांतला हा सकामतेचा तंतु परंपरेंत, तिचें मन कर्णावर गेलें होतें व शेवटपर्यंत ती त्याला विसरूं शकली नाही, त्यामुळे शेवटीं तिचा देहपात झाला आणि ती सदेह स्वर्गांत जाऊं शकली नाही, अशा तऱ्हेने जतन केलेला आढळतो. जशी कृष्णाच्या बाबतींत तशीच द्रौपदीच्याहि बाबतींत परंपरेने महाभारताहून एक स्वतंत्र व विशिष्ट दृष्टि बाळगलेली आहे. मात्र परंपरेने कृष्णाचें चरित्र समृद्ध केलें, तितकें द्रौपदीचें केलें नाही. कर्णाच्या बाबतींतलें तिचें दूषण, तिला कृष्णाची बहीण म्हणून परंपरेने भरून काढलें आहे.

व्यासाने मात्र कृष्ण आणि द्रौपदी यांच्या नात्याला कोणताहि विशिष्ट घाट दिला नसला, तरी त्यांत एक अनामिक नाजुक रंग त्याने भरला आहे. ज्याप्रमाणे द्रौपदीच्या नीलमण्यासारख्या कांतीचें चित्र प्रत्यक्ष डोळ्यांपुढे उभें करतां येत नाही, तें सारखें भासत राहतें आणि इतरांपेक्षा ही कांति कांही निराळी आहे असें सतत जाणवतें, तसाच प्रकार या दोघांच्या परस्पर आकर्षणाबद्दलचा आहे.

भक्ति, प्रणय आणि सख्य या तिन्ही भावनांचें मीलन या आकर्षणांत आढळून येतें. द्रौपदी विवाहिता आणि त्यांतहि आर्यधर्मानुसारी पतिव्रता असल्याने या नात्याला एक वेगळीच पातळी येते. अत्यंत तलम पोताचें हें नातें आहे. तरी पण अति दृढ आणि तितकेंच विलक्षण कोमल. या नात्यावर व्यासाने सुखाची नाजुक शिंपण केली आहे. कृष्णाच्या सान्निध्यांत द्रौपदी आपोआप उमलते. आंतल्या गाठीची ही स्त्री मनमोकळेपणें वागते. त्याच्याकडे झुकते. त्याच्यावर विसंबते. पांडवांप्रमाणेच. पण त्यांची बायको म्हणून नव्हे, तर कृष्णाची मैत्रीण म्हणून.

कृष्ण हा वास्तविक द्रौपदीचा दीर. वयाने अर्जुनाहून थोडा मोठा. ज्याला पांडव श्रेष्ठ समजून त्याच्या आज्ञेंत वागत असत. अशा या दिराशीं नववधूची इतकी सलगी व्हावी ही घटना आश्चर्यकारक खरीच. लहान दिराशीं असें नातें आपण समजूं शकतों. लग्नापूर्वी तिचा आणि कृष्णाचा कांही संबंध होता का? कशामुळे हें नातें निर्माण झालें? याचें उत्तर धूर्त व्यासाने दिलेलें नाही. द्रौपदी आणि कृष्ण किंवा कृष्ण आणि कृष्णा यांच्या नात्याच्या उगमस्थलाबद्दल व्यासाने मुग्धता राखली आहे. द्रौपदीचें समग्र व्यक्तिमत्त्व आणि पूर्णपुरुष कृष्णाचें व्यक्तिमत्त्व लक्षांत घेतां, या नात्याबद्दल अनेक तर्क करतां येण्यासारखे आहेत. व्यासाने मुग्धता बाळगली नसती तर त्यांची मैत्री ही अधिक कलापूर्ण, कोणत्याहि नात्याने न जखडलेली, शरिराच्या किंवा समाजाच्या नात्याने न जखडलेली, अशी मैत्री होण्याचा संभव होता. प्लेटोने वर्णन केलेल्या प्रीतीहूनहि जरा भिन्न; अधिक भव्य. पण प्रारंभींच्या इतिहासाबद्दल व्यासाने मौन पाळल्यामुळे पुढच्या कांही त्रोटक उल्लेखांवरूनच या विलक्षण मैत्रीचा साक्षात्कार आपल्याला होऊं शकतो.

द्रौपदी व कृष्ण यांचा कुठलाच संबंध तिच्या लग्नापूर्वीचा दिसत नाही. द्रौपदीच्या स्वयंवराला जाणारांपैकी कृष्ण हा एक होता. तो प्रेक्षक म्हणून गेलेला नव्हता हें सांगायला नकोच. अर्जुन तिथे नसता तर कृष्णाने तिला वरलें नसतें, असें म्हणवत नाही. अर्जुन तिथे असेल अशी कल्पना कृष्णाला नव्हतीच. परंतु योगायोगाने ब्राह्मणवेषांतले पांडव तिथे आले आणि कृष्णाने त्यांना ओळखलें. अर्जुन आणि कृष्ण यांचें सख्य असल्यामुळेच कृष्णाने या वेळीं स्पर्धकाची भूमिका न स्वीकारतां अर्जुनालाच पण जिंकण्यास प्रोत्साहन

दिलें. परंतु कृष्णेच्या रूपाचा, तिच्या स्वराचा प्रभावच अति विलक्षण. स्वयंवरांत द्रौपदी “ मी सूतपुत्राला वरणार नाहीं ” हे शब्द बोलली. कदाचित् तिच्या त्या आवाजानेच कृष्णालाहि भारून टाकलें असणें शक्य आहे. कारण कृष्ण हा नादलुब्ध आहे. आणि द्रौपदीच्या आवाजाचें वर्णन व्यासाने तो ‘ वीणेवर मधुर आलापांत गांधाराची सुंदर मूर्च्छना लागावी ’ तसा होता, असें केलें आहे. कीचकवधाच्या वेळीं याच आवाजाच्या मोहिनीने भीमाला गुंगवून टाकलें. द्रौपदी वनांत संतापून बोलत असतांहि युधिष्ठिराला तिच्या आवाजांतल्या गोडव्याचा प्रत्यय येत होता. तिच्या रूपाचें प्रलोभन कृष्णाला तिच्या विवाहानंतर पूर्वीच्या स्वरूपांत राहिलें नाही हें अगदी खरें. परंतु जें आकर्षण त्या दोघांत राहिलें, त्याचा दुवा हें तिच्या स्वरांतलें माधुर्य नसेलच असें म्हणवत नाही. कारण वारंवार संभाषण झाल्याशिवाय मैत्री वाढत नाही. द्रौपदीच्या विवाहानंतर ही मैत्री कशी उद्भवली आणि वाढीस लागली हें जरी कुठेंच सांगितलेलें नाही, तरीहि वस्त्रहरणाच्या प्रसंगीं द्रौपदी भक्त म्हणून कृष्णाचा धावा करते, आणि कृष्णहि दैवी भूमिकेंत वस्त्रें पुरवून तिची लाज राखतो. या ढोबळ चमत्काराखाली त्याच्या पार्थिव भूमिकेचा एक थर व्यासाने झाकून टाकला आहे. पण त्या थरांच्या गाभ्यांत जो दोन मनांतल्या भावांचा लसलसता कोंब होता, तो व्यासाला दाबून टाकतां आला नाही. कारण वनपर्वांत त्याचे मस्त माजलेले धुमारे दृष्टीस पडतात.

कृष्ण व द्रौपदी यांच्या परस्परांतल्या संबंधाबद्दल कृष्णाने स्पष्ट उद्गार असा कुठेंच काढलेला नाही. जे उद्गार आहेत ते सारे द्रौपदीचे. पहिली क्रिया तिची, मग त्याची. धाव्याचा प्रसंग हा प्रतीक आहे. द्रौपदीने बोलावलें म्हणून तो आला. तिची साद व याचें प्रत्युत्तर. वनवासांत कृष्णाला पाहून द्रौपदीला राहवेना. आपली सारी व्यथा ती त्याच्यापुढे ओकली आणि म्हणाली, “ कृष्णा, प्रणयामुळे मीं माझें दुःख तुझ्यासमोर उघडें केलें आहे. ”

कृष्णाला पाहून दुःखाचा जो प्रचंड उमाळा तिला आला, त्याच्या आवेगांत ती बोलून गेली, “ कृष्णा, पांडवांची भार्या, तुझी सखी आणि धृष्टद्युम्नाची बहीण मी असतांना, माझ्यासारखीला सभेंत कसें ओढून न्यावें ? ” एवढेंच बोलून ती थांबत नाही, तर पुढे वैतागून म्हणते की, “ मला पति नाहीत, पुत्र नाहीत, आप्त नाहीत, भाऊ नाहीत, बाप नाही आणि तूंहि, कृष्णा, नाहीस. ”

"तूंहि नाहीस" यांत त्याच्याबद्दलची एक अननुभूत भावना द्रौपदीने व्यक्त केली आहे यांत संशय नाही.

एवढेंच नव्हे तर ती आणखी एकदा म्हणते, "कृष्णा, चार कारणांसाठी तूं माझें नेहमी रक्षण करतोस. नात्याच्या संबंधामुळे, तुझ्या थोरवीमुळे, सख्या-मुळे आणि प्रभुत्वामुळे."

यानंतर फार फार नंतरची गोष्ट. युद्ध संपून अश्वमेध यज्ञाला प्रारंभ व्हायचा आहे. पांडवांचें साम्राज्य प्रस्थापित झालें आहे. पांडव, द्रौपदी आणि कृष्ण यांच्या सुखवार्ता चालल्या आहेत. त्या वेळीं युधिष्ठिराने एक प्रश्न कृष्णाला विचारला. युद्ध संपलें. सारे पांडव स्वस्थ झाले. तरीहि अश्वमेधाच्या तयारी-साठी अर्जुनाला देशोदेशीं फिरावें लागलें. फिरून युद्धासाठी सज्ज व्हावें लागलें. ही त्याची वणवण पाहून युधिष्ठिराच्या मनांत कालवाकालव झाली. तो म्हणाला, "कृष्णा, सर्व पांडवांत अर्जुनाने फार दुःख सोसलें. याच्यामागे ही भणभण कां? याच्या शरिरांत असें काय आहे की यालाच असें दुःख नेहमी भोगावें लागतें? वणवण भटकावें लागतें?" कृष्णाची विनोदी वृत्ति उसळून आलेली दिसते. त्या प्रश्नाचें गांभीर्य उडवून लावीतच जणु तो म्हणतो, "कांही नाही. याच्या पोटऱ्या इतरांपेक्षा मोठ्या आहेत ना, म्हणून याला फिरत राहावें लागतें. दुसरें कांही नाही."

ज्याच्या पोटऱ्या मोठ्या त्याला जास्त भटकावें लागतें, हा सामान्य सामुद्रिक संकेत अर्जुनाच्या बाबतींत आणि तोहि कृष्णाने लावावा हें द्रौपदीला आवडलें नाही. निदान तसा बहाणा तिने केला. व्यासाच्याच शब्दांत सांगायचें झाल्यास, "कृष्णा द्रौपदीने कृष्णाकडे रागाने तिरपा कटाक्ष टाकला. तिच्या त्या प्रणयाचा स्वीकार कृष्णानेहि केला. कृष्ण हा तिच्या सख्या अर्जुनाचा सखा; तो जणु कांही मूर्तिमंत अर्जुनच होता." हा छोटासा पण अति हलकाफुलका असा एकच एक जिवंत प्रसंग द्रौपदीच्या बाबतींत उल्लेखून व्यासाने कृष्ण आणि द्रौपदी यांच्या संबंधाचा समारोप केलेला आहे. भक्तीच्या आवरणाखाली त्यांच्या संबंधाचें पहिलें दर्शन आणि अर्जुनाच्या सख्याच्या मिषाने त्याचें शेवटचें तिरकस ओझरतें दर्शन घडतें. अशा तऱ्हेने एका रहस्यमय, परंतु तरीहि विशुद्ध, प्रणयपूर्ण, अशरीरी अशा मैत्रीचें व्यासाने असें अर्धस्फुट दर्शन घडवलें आहे. कृष्णाला द्रौपदीच्या या वृत्तीची चांगली जाणीव होती, म्हणूनच

की काय, तो कर्णाला प्रलोभन दाखवतांना म्हणाला की, "तूं पांडवांचा भाऊ म्हणून त्यांच्या बाजूला ये. द्रौपदी तुला वरील." परंपरेने कर्णाबद्दलचें द्रौपदीचें आकर्षण जें निर्माण केलें आहे, त्याचें बीज या अशा तऱ्हेच्या उल्लेखांत नव्हतेंच असें कसें म्हणावें ?

प्रिया, सुंदरी, पतिव्रता आणि पंडिता या चार भूमिकांत द्रौपदीचें व्यक्तिमत्त्व व्यासाने रंगवलें आहे. द्रौपदी ही तेजस्विनी होती. मानिनी होती. तरी पण शालीनपणाचें अवगुंठन तिने टाकलें नव्हतें. कुलीन स्त्रीचें गृहांतलें बंदिस्त जीवन तिनेहि शिरोधार्य मानलें होतें. अंतःपुराच्या परिसरांतच तिचें व्यक्तिमत्त्व उमललें. तिला सभेंत आणलें तें दुःशासनाने. नको त्या वेळीं, नको त्या वेषांत. स्वयंवरांत राजेरजवाड्यांच्या दृष्टीस पडलेली कृष्णा कौरवसभेंत द्यूतांत हरलेल्या पतीची पत्नी, कौरवांची दासी म्हणून ओढून आणली जाते. केसांना धरून तिला दुःशासन ओढतो. तिची विटंबना करूं पाहतो. त्या वेळीं तर ती कुठल्याहि स्त्रीसारखीच हंबरडा फोडते. पुढे कृष्णाने तिची लाज राखली. सभा तटस्थ झाली. तिच्या पावित्र्यामुळे भारली गेली. आणि द्रौपदी सावरली. तिने एक प्रश्न युधिष्ठिराला उद्देशून आणि सभेला अनुलक्षून केला, "तूं आधी कुणाला पणाला लावलेंस ? स्वतःला की मला ?"

या प्रश्नाचें उत्तर सोपें होतें; पण निवाडा तितकाच कठीण होता. युधिष्ठिराने आधी स्वतःला पणाला लावलें होतें व नंतर द्रौपदीला. चतुर द्रौपदीने लागोलाग सवाल केला की, स्वतः हरलेल्या माणसाला दुसऱ्यावर कितपत अधिकार चालवतां येतो ? युधिष्ठिराचा अधिकार तर आता उघडच झाला होता.

याच सभेंत द्रौपदीने दुःखाचा पहिला उमाळा गिळून टाकला. आणि तिच्यांतली स्त्री जागी झाली. आता कामिनी म्हणून नव्हे, तर जिवंत हाडामासाची स्त्री म्हणून. शोकक्षोभाच्या त्या प्रचंड उसळीने, ज्वालामुखीने प्रखर तेजाचा रस ओकावा त्याप्रमाणे, ज्या शब्दांतलें तेज मोजायला हिमालयहि ठेंगणा पडेल असे ते शब्द तिच्या तोंडून वदवले. मानवाच्या लौकिक अभिमानाचे पापुद्रे तर तटातटा फाटले. बीजाचे बाहेरचे पापुद्रे फाटावे तसे फाटले. आणि आजवर ज्याला जगांतल्या कोणत्याहि वक्तव्यांत तोड नाही, असे उपनिषदांनाहि लाजवणारे उद्गार लसलसत्या कोंबाप्रमाणे त्यांतून बाहेर

पडले. सर्व वेदना, घोर अपमान विरघळून गेले आणि त्याच्यांतून सत्याच्या प्रचीतीची सुंदर प्रतिमा साकार झाली. स्वतः अग्नींतून बाहेर आलेल्या या कामिनीच्या तोंडूनच शोकक्षोभाची आग भडकलेली असतांना हे उद्गार निघावे, हा योगायोग विलक्षण आहे. ती म्हणाली, "जिच्यांत वृद्ध नाहीत ती सभा नव्हे. जे धर्म सांगत नाहीत ते वृद्ध नव्हेत. ज्याच्यांत सत्य नाही तो धर्म नव्हे. ज्याच्यांत कपटदुष्टावा आहे तें सत्य नव्हे."

सत्याची ही मर्मस्पर्शी व्याख्या द्रौपदीशिवाय कोण करूं शकलें असतें ? कौरवांच्या सभेंत त्या दिवशीं सारे संकेत आपोआप कोलमडले होते. चांगुलपण भित्रें झालें होतें. क्रौर्याला न्यायाचें रूप आलें होतें. लाज, भीड, किंबहुना साधी सभ्यतासुद्धा हां हां म्हणतां कापरासारखी विरून गेली होती. त्या वेळीं धर्म आणि सत्य यांचें खरें स्वरूप द्रौपदीच्या वेदनेने भरलेल्या मनाने ओळखलें. त्या एका क्षणांत तिची वाणी जणु ऋषीची वाणी बनली आणि सत्यांतलें करुणेचें तत्त्व द्रौपदीने निःसंदिग्ध शब्दांत साऱ्या पंडितांना, वीरांना, जिज्ञासूंना ऐकवलें. जसजसा विचार करावा तसतसा त्यांतला नाद अधिकाधिक गंभीर होतो.

द्रौपदीच्या प्रश्नाला साधें उत्तर देण्याचें आश्वासन फक्त एका विकर्णाला झालें आणि त्याने भावाची निर्भर्त्सना करून द्रौपदी दासी नाही हा निकाल दिला. धृतराष्ट्रावरहि त्याचा परिणाम झाला. त्याने द्रौपदीला तीन वर दिले. पण मानी द्रौपदीने फक्त दोन वर मागून घेतले. फक्त पतींची दास्यांतून मुक्तता एवढेंच मागणें तिने मागितलें. याहून अन्य कांही घेणें बरें नव्हे असें तिने स्पष्ट सांगितलें. "पांडवांची गति स्त्री ठरली तर!" असे उद्वेगाचे उद्गार जरी भीमाने त्या प्रसंगीं काढले, तरी विकर्णाचे उपकार तो विसरला नाही. दुर्योधनाला मरणप्रसंगीं लाथ मारणारा, त्याच्या श्राद्धासाठी कवडीहि देऊं नको म्हणून युधिष्ठिरास सांगणारा भीम विकर्ण मेला तेव्हा रडला.

द्रौपदी वनवासांत असतांना युधिष्ठिराला संतापाच्या भरांत खूप बोलली. पांडवांची ती दरिद्रावस्था तिला साहवेना. पण त्या असह्यतेमागे पतींच्या दारिद्र्याचाच तिला कंटाळा होता, आणि ती भोगलोलुप होती, असा अर्थ नाही. जेव्हा तिने पांडवांशीं लग्न केलें तेव्हा ते दरिद्रीच होते. पहिल्या रात्रीं त्यांच्या पायगतीं ती जमिनीवरच झोपली. अत्यंत समाधानाने. वनवासांतच तिचें गृहिणीपण फार खुलून दिसतें आहे. सत्यभामेला पत्नीच्या कर्तव्याचें रहस्य ती

तिथेच सांगते. सेवाधर्माची महती गाते. तरी पण वनवासांत द्रौपदीची वृत्ति विरक्त झाली नाही. विरक्ति हा मुळीं द्रौपदीचा गुणच नाही. नटायची तिची हौस कुठल्याहि स्त्रीप्रमाणे वनांतहि ताजीच आहे. तिथे ती पतींच्याजवळ दागिने मागत नाही. वस्त्रें मागत नाही. मागते तीं सहस्रदळी रंगीबेरंगी कमळें. गंधमादन पर्वतावरील हीं कमळें आणायला भीम जातो. द्रौपदीचा हट्ट कसलाहि असो, भीम तो पुरवायला सदा तत्पर असतो. विराटपर्वांत तो तिला म्हणतोच की, "तुला काय दुखतें खुपतें, तुला काय हवें नको, तें सारें मला सांग. तुझीं दुःखें माझ्याइतका कुणी चांगला जाणणारा नाही."

द्रौपदीचें आपल्या पतींशीं वागणें जरा जरा निराळें आहे. युधिष्ठिराची ती आज्ञांकित दासी आहे. पण तिच्या मनांत त्याच्याबद्दल रागहि भरपूर आहे. तिचें व त्याचें वनांतलें संभाषण हें पति-पत्नींचें गुजांतलें संभाषण नाही. तो सर्वांसमक्ष झालेला विवाद आहे. अर्जुनाची ती प्रेयसी आहे. अर्जुनाबद्दलचा तिचा ओढा स्वाभाविक आहे. 'पांच जणांनी भिक्षा वाटून घ्या' याचा खरा अर्थ काय झाला, हें पाहून कुंतीहि जरा वेळ हळहळते आणि म्हणते, "काय म्हटलें हें मीं? अर्जुनाने तुला जिंकली. तूं खरोखर त्याचीच व्हायला हवीस. अगोदर कळतें तर मीं असें म्हटलें नसतें." पण अर्जुनाचा आणि तिचा प्रेमप्रसंग तर राहोच, पण कुठे संवादहि व्यासाने दाखवलेला नाही. भीमाची ती स्वामिनी आहे. तिच्या संतापांत आणि क्षोभांत भीमासारखी साथ तिला कुणींच दिलेली नाही. नकुल-सहदेवांना ती ममतेने जपणारी आहे. वनांत जातेवेळीं कुंती म्हणते की, "या माझ्या दोन मुलांना तूं स्वतः जेवूं खाऊं घाल." परंतु नायक या दृष्टीने त्यांना महाभारतांत महत्त्वच नसल्याने द्रौपदीच्या व त्यांच्या संबंधालाहि विशेष महत्त्व नाही.

प्रिया, परमदर्शनीया आणि पतिव्रता या तिला युधिष्ठिरानेच लावलेल्या विशेषणांना तिच्या कुठल्याच पतीच्या संबंधांत बाध आलेला नाही. मात्र 'पंडिता' या विशेषणाचा मात्र पुरता कस तिचें युधिष्ठिराशीं जें संघर्षयुक्त नातें पुढे आलें त्याने लागला. लौकिकदृष्ट्या द्रौपदी जें जें म्हणाली तें सारें चतुरपणांत मोडत असलें तरी खरें पांडित्य, खरा सुजाणपणा त्याहून किती निराळा असतो, हें युधिष्ठिरानेच तिला वारंवार दाखवून देण्याचा प्रयत्न केला. जितका जितका शांतपणें, सोशिकपणें तो वागे, तितकी द्रौपदी चिडे. ती

चिडली की, भीम तिची बाजू घेई. पण शेवटीं युधिष्ठिराचेंच धोरण उजवें ठरे. सत्याचें दर्शन द्रौपदीला एका क्षणाच्या उद्रेकांत झालें. पण तें सत्य दैनंदिन आचरणांत तिला पेललें नाही. त्या दिशेने जाण्याचा सतत प्रयत्न मात्र केला, तो एकट्या युधिष्ठिरानेच.

वनवासांत द्रौपदी युधिष्ठिराला टोचून टाकून बोलली. सत्तेच्या वेळींहि प्रतिकामीबरोबर युधिष्ठिराने तिला "तूं रजस्वला असलीस, एकच वस्त्र नेसली असलीस तरी तूं सभेंत ये आणि सासऱ्यासमोर उभी राहा," असा निरोप पाठवला. द्रौपदी त्या वेळीं मूढ झाली. सभेंत स्वतः गेली नाही. प्रतिकामीलाहि तिला नेण्याचें धैर्य झालें नाही. द्रौपदीच्या प्रश्नाचा रोखहि युधिष्ठिरावरच होता. आपल्याच वरामुळे तो दास्यांतून मुक्त झाला याची कधी आठवणहि तिने त्याला दिली नाही, तरी त्याच्याबद्दलचा तिचा राग शेवटपर्यंत गेला नाही. वनवासांत ती त्याला बोलली तें असें : "दुर्योधनाचें काळीज खरोखर लोखंडाचें. तुझ्यासारख्या धर्मपर श्रेष्ठ माणसाला त्याने लागट बोलणीं ऐकवलीं. तूं राजाधिराज झालेला. आज असा वनांत चटईवर बसला आहेस. तुला या स्थितींत पाहून कुणाला संताप येणार नाही? भीमासारखा राजपुत्र आणि अर्जुनासारखा योद्धा आज भुकेतहानेने व्याकुळ व दीन झाले आहेत. ते आणि धाकटे दोघेहि धुळींत लोळताहेत. त्यांना पाहून कुणाला संताप येणार नाही? द्रुपदाची मुलगी, पांडूची सून, धृष्टद्युम्नाची बहीण, आणि तुमची राणी मी आज वनवासी झालेली पाहून तुला मात्र संताप कसा येत नाही कुणास ठाऊक? भावांना या स्थितींत पाहूनहि तुला खेद कसा होत नाही? क्षत्रियाला क्रोध हा आवश्यक आहे. पण तुझें सारेंच जगावेगळें आहे. तूं शत्रूंना क्षमा करूं नको. क्षमा कुणाला करायची? पूर्वी ज्याने उपकार केले, त्याचे अपराध क्षमा करावेत. निर्बुद्धांचे, आश्रितांचे अपराध क्षमा करावेत. अजाणतां केलेले अपराध क्षमा करावेत. पण दुर्योधन सतत अपराध करतो आहे. तो लोभी आहे. पापी आहे. त्याला क्षमा करूं नको. क्षत्रियाने वेळीं मृदु व्हावें, वेळीं उग्र व्हावें. मऊपणाने जें साधतें तें तीव्रपणाहून अधिक हें मला माहीत आहे. पण मऊ असायचें त्या वेळीं मृदुपणा दाखवावा. जिथे उग्रपणा हवा तिथे मवाळी काय कामाची?" प्रल्हाद-बलिसंवादाचा आश्रय घेऊन त्या क्रुद्ध पंडितेने पतीला पेच टाकला.

युधिष्ठिर आपल्या नेहमीच्या धीमेपणाने म्हणाला, "काय वाटेल तें झालें तरी क्षमा सर्वांत श्रेष्ठ आहे. क्षमेवर जगाची धारणा झाली आहे. मला राज्य द्या, असें म्हणून मी लोभाने बुद्धि नष्ट करणार नाहीं. काळ कठीण आहे. भरतवंशाला उतरती कळा लागली आहे. ही ओहोटी आता यापुढे थांबवतां यायची नाही, असें मला स्वच्छ दिसतें. म्हणून मी उतावळेपणा करीत नाहीं."

युधिष्ठिराने काश्यपगाथेवर आधारलेलें क्षमेचें सूत्र सांगतांच द्रौपदी आणखी चिडली. तिने विधात्याला दोष दिला. आणि म्हणाली, "तुला भ्रम पाडणाऱ्या त्या विधात्याला माझा नमस्कार असो. धर्म म्हणे आपण त्याचें रक्षण केलें की आपलें रक्षण करतो. तूं यज्ञयाग केलेस. दान केलेंस. सत्य पाळलेंस. त्याचें फळ हेंच का? माणूस सावलीमागे जातो तसा तूं धर्मामागे गेलास. त्याचें फळ काय? तर दुःख!"

यावर युधिष्ठिराने तिला फिरून अत्यंत सावकाशपणें म्हटलें, "द्रौपदी, तुझें बोलणें गोड आणि रास्त आहे. पण तुझें एक चुकलें. तूं विधात्याला दोष देऊं नको. तुझ्या बोलण्यांत मला नास्तिकपणा आढळतो. फळाची इच्छा ठेवून मी धर्म करीत नाहीं. जो हलकट असतो तोच धर्माचा सौदा करतो. देवाच्या बाबतींत तूं शंका घेऊं नको. त्याला दोष देऊं नको. धर्म जर अफल झाला तर जग बुडेल. लोक पशूप्रमाणे जगतील. विद्या होणार नाही. तप, ज्ञान, दान निष्फळ होईल. निर्वाणाला अर्थ राहणार नाही. हें जोंपर्यंत आहे तोंपर्यंत देवता आहेत. त्यांची करणी अगाध असते. म्हणून तूं त्यांना निंदूं नको."

हें साधें सरळ उत्तर ऐकून द्रौपदी खूपच गडबडली व म्हणाली, "मी धर्माला निंदीत नाही. ईश्वराला तरी मी कशी दूषण देईन? पण मी फार दीन दुःखी झालें आहें. आणि म्हणून बडबडत आहें आणि रडत आहें असें तूं समज." परंतु याहि स्थितींत आपण कांही बोललों नाही, तर हा माणूस असाच खंत करीत बसून राहील, अशी जणु शंका येऊनच की काय, द्रौपदीने बृहस्पतिनीतींतलीं वचनें युधिष्ठिराला ऐकवलीं. ती म्हणाली, "ईश्वराला सुद्धा सृष्टीचें कर्म करावें लागतें. जीवजंतूंनाहि जगण्यासाठी झटावें लागतें. कचें मडकें पाण्यांत विरघळतें त्याप्रमाणे जो कांही न करतां झोपून राहतो, तो नाश पावतो. तिळांत तेल असतें. गायींत दूध असतें. लाकडांत आग असते. पण त्यांना बाहेर काढायला योजना लागते. कर्म लागतें. तरच

परमेश्वर सिद्धि देतो. आळसाने बसणाराच्या कपाळीं दारिद्र्यच. पृथ्वी नांगरून, बी पेरून मग पाहिजे तर शेतकऱ्याने 'मीं माझें काम केलें, आता सारें पर्जन्यदेवाच्या हातीं' असें म्हणावें. समुद्र हटवतां येतो. पर्वत फोडतां येतो. मग दुर्योधनाची कथा काय?"

आणि मग इतकें बोलून तिने भीमाला बोलायला प्रोत्साहन दिलें. तो आणखीच टोचून म्हणाला, "मी आणि ही तुझ्या प्रतिविंध्याची आई, आम्ही दोघेंच तुझी ही आपत्ति पाहून संतापतों. दुर्योधनाला राज्य मिळाल्याने आपलें कांहीएक भलें व्हायचें नाही. गाईला खाजवलें तर ती दूध देते, आणि पुण्यहि मिळतें. गाढवाला खाजवून काय मिळतें? केवळ विटाळ लागतो."

या वेळीं युधिष्ठिराने निक्षून सांगितलें की, "मीं वनवासाची प्रतिज्ञा केली ती सभेंत. मी सत्य सोडणार नाहीं. प्राणांहून मला प्रतिज्ञा प्रिय आहे. तुम्ही शेतकऱ्याचा दृष्टांत देतां ना? मग शेतकरी जशी फळाची वाट पाहतो तशी जरा वाट पाहा."

हा प्रसंग इथे संपतो, पण संतापाची आग मात्र द्रौपदी व भीम यांच्या मनांत तशीच पेटत राहते. युधिष्ठिर शांतपणें विचार करून अर्जुनाला अस्त्र-प्राप्तीसाठी पाठवतो.

पुढे जयद्रथाने द्रौपदीचें हरण केलें त्या वेळींहि, "जयद्रथ हा दुःशलेचा पति आहे. ती आपली बहीण. तो पळून गेला, जाऊं दे. द्रौपदी तर आपण परत मिळवली ना?" हा युधिष्ठिराचा विचार द्रौपदीला मान्य होत नाही. ती भीम व अर्जुन यांना त्याच्या मागे पिटाळते. त्याला धरून युधिष्ठिरापुढे क्षमा मागायला लावते. वधाऐवजी त्याचें पांच पाट काढून त्याला सोडून देते.

विराटपर्वांत तर ती उघड म्हणते, "जिला युधिष्ठिर हा नवरा मिळाला तिला सुख कुठचें?" हां हां म्हणतां द्रौपदीचा तोल संतापाच्या भरांत असा तिळतिळ करीत सुटत गेला आहे. इतका की, कीचक मेल्यावर बृहन्नलेच्या रूपांतला अर्जुन तिला म्हणतो, "तूं कीचकापासून कशी मुक्त झालीस, कीचक कसा मेला तें सांग. मला ऐकण्याची इच्छा आहे." त्या वेळीं ती त्याला फटकारून म्हणते, "बृहन्नले, तुझें सैरंध्रीशीं काय काम आहे आता? तूं तर अंतःपुरांत सुखांत बसली आहेस. सैरंध्रीला दुःख आहे तें तुला नाही. म्हणून तूं मला हसत हसत विचारतेस."

द्रौपदीच्या बुद्धीची ही अवस्था लहानसहान प्रसंगींहि अत्यंत समतोलपणें दाखवून व्यास आपल्या मनावरून तिच्या पार्थिव सौंदर्याची मोहिनी पुसून टाकतो. द्रौपदीला सम्राज्ञी करतो. पार्थिव संपूर्णतेचें पुरें माप तिच्या पदरीं टाकतो. द्रौपदीच्या हरएक प्रसंगांत सारे रंगले, तरी द्रौपदीचा कुठलाच चिरसंस्कार मनावर राहूं नये असाच व्यासाचा तिच्याबद्दलचा संकेत दिसतो. सीता, सावित्री यांच्याप्रमाणे भारतीयांच्या मनांत तिला चिरंतनत्व मिळालेलें नाही. ती एक दूरची कमनीय नायिका आहे. वादविवादाच्या वेळीं कुठल्याहि स्त्रीच्या मनांत जागृत होणारी. परंतु भारतीय नारीच्या संस्कार-जीवनांत तिचें स्थान फार गौण आहे. ती जागृत होते कृष्णकथेच्या आधारें, पांडवकथांच्या आधारें. युधिष्ठिराचा स्वतंत्र आदर्श आमच्यापुढे आहे. गीतेमुळे अर्जुनाचीहि जिज्ञासा मुखामुखांत खेळती झाली आहे. त्या दोघांसारखें हिचें व्यक्तिमत्त्व कमनीय असलें तरी प्रेरक नाही. तिच्यांत असलेला पार्थिवतेचा विलक्षण चैतन्यमय स्रोत फक्त कांहींनाच कधीकाळीं जाणवेल असा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३५२८८ वि: निबंध
क्रमांक
नों: दि: ३०/११/६७

# परिशिष्ट

प्रस्तावनेसाठी उपयोगी पडलेलें साहित्य :

१. श्रीवाल्मीकिरामायणम्
२. आनंद कुमारस्वामी : 'फिगर्स ऑफ स्पीच ऑर फिगर्स ऑफ थॉट'; लंडन, १९४६.
३. रे लिव्हिंग्स्टन : 'द ट्रॅडिशनल थिअरी ऑफ लिटरेचर'; मिनिआपॉलिस, १९६२.
४. एरिक गिल् : 'आर्ट'; लंडन, १९३४.
५. क्लाइव्ह बेल : 'आर्ट'; लंडन, १९४९.
६. फ्रेडरिक स्पीगलबर्ग : 'झेन, रॉक्स अँड वॉटर्स'; न्यू यॉर्क, १९६१, इंट्रोडक्शन बाय् सर हर्बर्ट रीड.
७. गेडीज् मॅकग्रेगर : 'एस्थेटिक एक्स्पीरिअन्स इन रिलिजन'; लंडन, १९४७.
८. केनेथ वॉकर : 'लाइफ्स लाँग जर्नी'; लंडन, १९६०.
९. जॉन स्टुअर्ट : 'द आर्टिस्ट ऑफ लाइफ' (हॅवेलॉक एलिस); लंडन, १९५९.
१०. आंद्रे माल्रो : 'द मेटॅमॉर्फासिस ऑफ द गॉड्स्' (ट्रान्सलेटेड बाय् स्टुअर्ट गिल्बर्ट); लंडन, १९६०
११. रेनीरो नोली (Gnoli) : 'द एस्थेटिक एक्स्पीरियन्स् अकॉर्डिंग टु अभिनवगुप्त'; रोम, १९५६.
१२. मिग्वेल डि उनामुनो : 'ट्रॅजिक सेन्स ऑफ लाइफ' (ट्रान्सलेटेड बाय् जे. ई. क्रॉफर्ड); फ्लिन्च, १९५४.
१३. गिसेप तुच्चि : 'बुद्धजयंति' (लेख); ईस्ट अँड वेस्ट, १९५४.
१४. डी. एच. लॉरेन्स : 'सिलेक्टेड लिटररी क्रिटिसिझम'; लंडन, १९६१.
१५. स्विनबर्न : अ सिलेक्शन कंपाइल्ड अँड विथ ॲन इंट्रोडक्शन बाय् एडिथ सिटवेल; लंडन १९६१.
१६. रवीन्द्रनाथ ठाकुर : 'प्राचीन साहित्य' (मराठी अनुवाद : रामचन्द्र बलवंत आठवले); पुणें, १९४४.

123541

आनंदन विश्व
ग्रं. क्र. [illegible]

REFBK-0012345